सुश्लोकमानस-सुंदरकांड लंकाकांड व उत्तरकांड यांतील कांहीं चित्रप्रसंग ५

रावणाला मुष्टिप्रहार (पृ.७३, श्लो.१७) रामासाठीं देवरथ पृ ७७, श्लो २४)









रावणाची माया (पृ.७७, श्लो २६) रावणवध (पृ ८६, श्लो. ९)

६ सुश्लोकमानस सुंदरकांड-लंकाकांड व उत्तरकांड यांतील कांहीं चित्रप्रसंग



आनन्दोत्सव (पृ १०१, श्लो. ८)



प्रभूंचें ऐश्वर्य (पृ. १०३, श्लो. २५)



मंगल आरती (पृ १०४, श्लो २३.)



रामसख्यांचें गुरुवन्दन (पृ. १०४, श्लो. ४५)

॥ श्री ॥

'सुश्लोकमानसा'चा हा सुंदर-लंका-उत्तरकांडात्मक
तृतीय भाग

श्रीमद्रुइयाकुलभूषणा श्रीसीतारामचंद्रभक्तिरसमधुपी
पुण्यशील सुपुत्रवती महोदारहृदया

श्री. सुव्रतादेवी रामनारायण रुइया

यांस

त्यांचें श्रीरामचरितमानसप्रेम

व

सुश्लोकमानसानें त्यांना झालेला सात्त्विक आनंद पाहून

अत्यंत आदरानें समर्पण करीत आहे

धन्य श्रीमत्साध्वी अतुल श्रीरामचरितरसरसिका ।
श्रीसुव्रता तियेला वाटेल न गोडि राम-मानसिं कां ? ॥१॥

सदाशीर्वादाभिलाषी
रामचंद्र चिंतामण श्रीखंडे
श्रीरामनवमी, शके १८७७
[१ एप्रिल १९५५]

उपोद्घात वा मंगल तोरण

सुश्लोकमानसाचीं अखेरचीं तीन हस्तलिखित कांडें डॉ. श्रीखंडे यांनीं पहावयास दिलीं तीं त्यांच्या पूर्वभागांप्रमाणेंच चांगलीं उतरलीं आहेत. सुंदरकांडांत सीतेनें रावणास ' शून्याश्रमांतुनि मला हरिलेंस चोरा ! । निर्लज्जचित्त तुज खंत न या प्रकारा ! ॥ ' हें उत्तर जसें बाणेदारपणानें दिलें आहे तसेंच ठसकेदार भाषाशैलीनें डॉक्टरांनीं तें मराठींत निनादित केलें आहे. असे प्रसंगोचित संभाषणप्रकार ह्या विभागांत जागजागीं विखुरले आहेत. हनुमंताचें लंकादहन जुनें आहे पण तें येथें रसभरित काव्यवाणीनें वर्णिलेलें वाचून ' प्रतिक्षणिं नवीच दे रुचि ' ह्या पंतवचनाची आठवण करून देतें.

लंकाकाण्डांत वीर व रौद्र रस चांगले साधले आहेत. रामलक्ष्मणांचे प्रताप ज्या उत्कटतेनें डॉक्टरांनीं वर्णिले आहेत त्याच उत्कटतेनें त्यांनीं कुंभकर्ण, इंद्रजित् व रावण यांनीं वानरसेनेची केलेली दाणादाणही चित्रित केली आहे. तुलसीरामायणांत सर्वत्र व्यापून असलेला भक्तिरस सुश्लोकमानसांतही तसाच संचलेला आढळेल.

डॉ. श्रीखंडे यांची वाणी अनेक सत्कवींच्या उत्कृष्टकृति मराठींत सरस व आकर्षकपणें वर्णून सहजरम्य बनली आहे. तुलसीदासांचें हिंदींतील रामचरित मानस मराठींत सुश्लोकमानसाचा सुरम्य वेष घेऊन अवतरलें आहे. आपला दीर्घोद्यम तडीस गेल्यानें आपली सभाग्यकृति " सीतारामपदांभोजीं राम सुश्लोकमानस । अर्पि प्रेमाश्रुपूरानें सगद्गदित-मानस ॥ " अशा भक्तिभावानें अर्पण करतांना जी धन्यता डॉ. श्रीखंडे यांना वाटते तीच मराठी रसिकांना हा त्यांचा वाङ्मय यज्ञ यथासांग परिपूर्ण झाल्यानें वाटेल यांत शंका नाहीं. आधींच सीतारामचरित्र अत्यंत पवित्र व मनोज्ञ; तेंच भक्तिरसाच्या गोडवाणीनें गावून तुलसीदासांनीं नितांत पावन व मनोहर केलें त्यांतील पावनपणा व हृदयंगमता मराठीमध्यें असाधारणपणें उतरविण्याचें जें यश डॉ. श्रीखंडे यांनीं मिळविलें त्याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडे आहेत.

२।१०।५४ नवी दिल्ली. ग. स. अळतेकर.

श्रीशंकरो जयति

प्रस्तावना

अहो जी ! माझेनि स्वामी । मज संत जोडूनि तुम्ही ।
दिधलेति तेणें सर्वकामीं । परिपूर्ण झालों ॥ १७७५

पहा पां मातें तुम्हां सांगडें । माहेर तेणें सुरवाडें ।
ग्रंथाचें आळियाडें । सिद्धी गेलें ॥१७७६

काय बहु बोलों सकळां । मेळविलों जन्मफळा ।
ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ॥१७८५

मियां जैसजैसिया आशा । केला तुमचा भरंवसा ।
तो पुरवूनि जी बहुवसा । आणिलों सुखा ॥१७८६

पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती ।
सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजे ॥ १८१० अ.१८ ज्ञानेश्वरी

श्रीसीतारामचंद्रकृपाप्रसादानें सुश्लोकमानस महाकाव्याचा हा तृतीय भाग रसिक भक्तांना अर्पण करितांना मला आज अत्यंत आनंद वाटत आहे. २३-५-१९४२ ला शुभसंकल्प करून कत्रा येथें केवळ आरंभलेलें, पण मुख्यतः २३-३-१९४७ पासून आतांपर्यंत हळूहळू धिमेपणानें रचना करून श्रीकृपें १४-७-५४ संपूर्ण झालेलें हें प्रचंड कार्य खंडशः तीन भागांत प्रकाशित करूं शकलों याची किती धन्यता वाटत असेल याची कल्पना सहृद-यांस आल्यावांचून राहणार नाहीं ! श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वरील ओव्यांत ग्रंथसिद्धीचा सोहळा पूर्ण करून जन्मसाफल्य प्राप्त झाल्याचा अवर्णनीय आनंद जो व्यक्त केला आहे तो किती यथार्थ आहे त्याची मला आज सानन्द प्रतीति येत आहे ! आणि सर्व रसिक सुहृदांनीं व महोदारांनीं या ग्रंथाच्या परिपूर्ततेस जो हातभार लावलेला आहे त्याचा मी सानन्द कृतज्ञतेनें गौरव करतों.

सुश्लोकमानसाच्या या तृतीय विभागांत श्रीतुलसीदासांच्या श्रीरामचरितमानसाचीं शेवटचीं तीन कांडें — सुंदरकांड, लंकाकांड व उत्तरकांड हीं अनुवादिलेलीं असून त्यांचे श्लोक पुढीलप्रमाणें झाले आहेतः—

सुंदरकांड	(तरंग १३)	श्लोकसंख्या ३६१
लंकाकांड	(तरंग २६)	,, ८५२
उत्तरकांड	(तरंग ३६)	,, ९६०
इतर		,, ६
		एकूण २१७९ पद्यसंख्या

याप्रमाणें सर्व सुश्लोकमानस ग्रंथाची श्लोकसंख्या ६७३० चे आसपास झाली आहे.

सुंदरकांडाचें अथवा पंचमसोपानाचे दुसरें नाम ' ज्ञानसंपादन ' असेंहि प्रचारांत आहे. सुंदरकांडाचे सुंदर हें अभिधान कसें पडलें असावें याची सयुक्तिक उपपत्ति लागत नाहीं. सुमेर कांड असेंहि या कांडाचे नाम एका ' मानस ' प्रतींत आढळतें (प्रयागच्या पंचक्रोशी समितीने प्रकाशिलेले श्रीरामचरितमानस पहा.) सर्वच कांडें सुंदर आहेत मग याच एकाला ' सुंदर ' अभिधान कां ?

सुंदरे सुंदरो रामः सुंदरे सुंदरी कथा ॥
सुंदरे सुंदरी सीता सुदरे किं न सुंदरम् ॥१॥

अशासारखें सुभाषितहि क्वचित् विद्वन्मुखांत आढळतें तें एक रसिक चतुरोक्ति म्हणून विचारणीय आहे यात शंका नाहीं

सुंदरकांडांतले अनेक प्रसंग श्रीतुलसीदासांनीं निरुपम सौंदर्यानें वर्णन केलेले आहेत. प्रथमतः रामदूत हनुमान् अनेक सकटांवर मात करून लंकेंत प्रविष्ट होतो; बिभीषणाची भेट व त्याचे सल्लयाप्रमाणें अशोकवनिकेंत सीतादर्शन, मुद्रिकाप्रदान इत्यादि प्रसंग कवींनीं फारच हृदयस्पर्शी रीत्या वर्णन केले आहेत. सीतेस रामविरहांत जीवन असह्य होतें व

त्रिजटेकडून ती अग्नि मिळवूं इच्छिते परंतु तें अशक्य झाल्यानें सीता अशोकाचे लाल कोवळे पल्लव पाहून हा अशोक तरी अग्नि देऊन मला अशोक करील काय असें म्हणते. तोंवर अशोकवृक्षावर झाडींत बसलेला मारुति श्रीराममुद्रिका खालीं हळूंच सीतेकडे फेंकतो! सीतेस वाटतें अशोकानें दयाळुपणें आपणांकडे अंगारच फेकला! परंतु मुद्रिका पाहून हर्ष व शोक दोनीहि सीतेस होतात. या नाट्यमय प्रसंगास तुलसीदासांनीं प्रसन्नराघवनाटकांतील काव्यकल्पनांचा (अंक ६-३० ते ३८) सुंदर अनुकार केलेला आहे. पुढें मनोहर असा हनुमज्जानकी संवाद आहे (तरंग ४) लंकादहन व तत्पूर्वी रावणपुत्र अक्षय याचा मारुतीनें केलेला वध, रावण हनुमत्संवाद, सीतेचा निरोप व खुणेसाठीं तिनें दिलेला चूडामणि घेऊन श्रीहनुमान् परत समुद्राच्या पैलतीरीं येतात तो व पुढें रामभेटीचा प्रसंग फारच सुरस असा आहे. कपिसैन्य सिद्ध करून श्रीरामलक्ष्मण लंकेकडे प्रस्थान करतात तो प्रसंगहि (त. ७) आश्चर्यकारक असाच आहे. इकडे लंकेंत बिभीषण, माल्यवंत मंदोदरी वगैरेंचे उपदेश रावण मुळींच ऐकत नाहीं, उपदेश करणाऱ्या बिभीषणास रावणानें लत्ताप्रहार केला तेव्हा तो रामाकडे येण्यास निघतो तो प्रसंग (त. ९) भक्तिरसानें भरलेला आहे. रामबिभीषणभेट व संवाद अद्भुत सौरसयुक्त असून बिभीषणाचे उद्गार संस्मरणीय आहेत—

" स्वप्नींहि तोंवरि मनास कुठून शांति। जीवासही कुशललाभ कुठून होती?
टाकोनि काम सगळाच विपत्तिधाम। ना जोंवरीं भजत हें मन गोड राम! ४
हे तोंवरी हृदयिं दुष्ट करीति वास। ते मोह, लोभ, मद, मत्सर, मान, रोष।
ना जोंवरीं रघुपती शरचापहस्त। राहे उभा शरनिषंग कटीसि युक्त! ६
रामप्रतापरविभा जंवरीं नुदेली। अज्ञान-घोर-रजनी तंवरींच ठेली।
जी द्वेष-रागमय यां सुख दे उलूकां। जी आसराच ममतातिमिरासि देखा।।७।।
—सुंदरकांड तरंग १०

श्रीरामाचें बिभीषणास सांगणेंहि फार रसाळ व सिद्धांतमय आहे—
" माता, पिता, स्वजन, बंधु तसें कलत्र। तें देह गेह धन वा परिवार मित्र।।
यांचे ममत्वमय ताग वळून चोख। बांधीं तसें स्वमन मच्चरणां सुरेख!"।।१३
(सुं. त. १०)

रामाच्या भाषणानें बिभीषण अत्यंत समाधान पावतो, तो म्हणतो—

बोले "चराचरविभो रघुराय ! ऐका । सर्वां हृदीं वसतसां शरण त्रिलोकां ॥
होती हृदीं प्रथम जी लव वासना ती । वाहोनि नेलि विभुभक्तिसरिज्जलान्तीं १९
(सुं. त. १०)

असो. सुंदर कांडांत सीतेचा शोध लागणें ही अत्यंत आनंदप्रद व सुंदर गोष्ट घडून आली असल्यानें सुंदर शब्दाचें खरोखरच समर्थन करावेंसें वाटतें. श्रीरामचरितमानस या ग्रंथांतील हेंच कांड असें आहे कीं पुष्कळ लोक हें कांड नित्य पाठांत ठेवतात. रामाच्या मनःकामना पूर्ण होण्याचा उपक्रम या कांडांत होतो तसाच भाविकभक्तांच्याहि मनःकामना या लहानसर पण महाप्रभावी कांडाच्या वाचनानें परिपूर्ण होण्याचा अनुभव येत असलाच पाहिजे.

यानंतर सहावें लंकाकांड हें २६ तरंगांत विभागलेलें आहे. कांहीं रामचरितमानस प्रतींत या कांडास वाल्मिकिकृतींतल्याप्रमाणें युद्धकांड म्हणूनहि संबोधिलेलें आढळतें. मानसरूपक या बालकांडांतल्या तरंगांत लंकाकांडांत वर्षर्तुशोभा आहे असें वर्णिलें आहे —

भीषण निशाचरांशीं केलें जें तुमुल युद्ध घनघोर ॥
वर्षर्तु तोच सुरकुलशालीतें सुखद पथ्यकर थोर ! ॥
सुश्लोकमानस प्रथम सोपान त. १२—श्लो. २१

प्रस्तावनेंत लंकाकांडाचें सविस्तर वर्णन करणें स्थलसंकोचामुळें शक्य नाहीं. तथापि कांहीं वेंचक उल्लेख केले पाहिजेत. या कांडाच्या मंगलाचरणातहि युद्धाला शोभेल असलें वर्णन केलें आहे :—

परमाणू निमिषें लव युगवर्षें कल्प हे प्रचंड शर ।
कोदंड काल ज्याचें त्या रामा भजनिं कां मना ! उशिर ? ॥ तरंग १—७

प्रारंभींच, सुंदर ठिकाणीं रामांनीं केलेली श्रीरामेश्वरस्थापना अतिशय मनोहर आहे. नंतर सेतुबंधवर्णनहि अद्भुतरसानें नटलेलें आहे. पुनः लंकेंत मंदोदरी रावणाचें मतपरिवर्तन करण्याचा व्यर्थ प्रयत्न करते. इकडे सुवेल शैलावर प्रभुरामचंद्राचें अत्यंत सुंदर असें वर्णन आहे तें शब्दचित्र हृदयांत कायमचें ठसावें असेंच आहे. (लंकाकांड त. ३)

" सुवेलशैलीं इकडे रघूत्तम । सेनेसवें वास करी मनोरम ॥
उत्तुंगशृंगा अभिराम देखुनी । स्वच्छा समा भू रुचली तयां मनीं ॥१॥
तेथें तदा लक्ष्मण आपुल्या करीं । शय्या सुमें पल्लव आणुनी करी ॥
आच्छादि ती रम्य मृदू मृगाजिनीं । कृपाळ त्या बैसत राम आसनीं ॥२॥
सुग्रीवाच्या अंकिं ठेवूनि शीर्ष । डाव्या बाजू ठेविलें कार्मुकास ॥
भाता ठेवी दक्षिणांगीं कडेला । दों हस्ताब्जीं बाण सांभाळियेला ॥३॥
कानीं सांगे मंत्र लंकेश कांहीं । पादांभोजें चेपिती भक्त दोही ॥
नानारीतीं मारुती वालिसूनू । भक्तिप्रीती तद्हृदीं केविं वानूं ? ॥४॥
वीरासना घालुनि वीर लक्ष्मण । प्रभूपर्शी सज्जचि राहि बैसुन ॥
हस्तांबुजीं बाण तसे शरासन । निषंगशोभा कटिभाग—भूषण ॥५॥
ऐशापरीं सद्गुणधाम राघव । नवांबुदश्याम असा दयार्णव ॥
ध्यानीं अशा यन्मन लीन संतत । ते धन्य होती नर भक्तिभूषित " ॥६॥

पुढें चंद्रोदयशोभा पाहून रामाचा विरहभाव उद्दीपित होत असतां रामचंद्रांनीं चंद्रावर कृष्णता कां ? असा प्रश्न बरोबरच्या मंडळींना केला, तेव्हां कोणी कांहीं कोणी कांहीं कल्पना लढवतात. स्वतः प्रभूहि सांगतात कीं बहुधा गरलाला बंधु इंदूनें हा ठाव स्वहृदिं दिला आहे ! म्हणून विरहांत चंद्र असह्यतापद होतो. श्रीहनुमंत सांगतो, ' चंद्र तुमचा भक्त आहे. त्यानें स्वहृदयांत ठेवलेली प्रभूंची सुश्याम मूर्तिच असा भास उत्पन्न करीत आहे ! ' अर्थात् प्रभूंना या कल्पनेनें फार आनंद झाला. असा इकडे भक्तिभावसंपन्न विनोद चालला आहे, तर समोर लंकेतल्या त्रिकूटपर्वत-शिखरावर रावणाचा संगीत-विलास चाललेला मेघादींचा आभास उत्पन्न करीत आहे ! प्रभूंनीं बाण सोडून रावणाचें छत्र, कुंडलें, मुकुट इत्यादि पाडले. तथापि रावण तो अपशकुन न समजतां उद्दाम धैर्यवृत्तीनें उद्गारतो—

'हो ! शीर्षपातहि जया शुभकारि साचा । त्याचा कसा मुकुटपात अमंगलाचा ? '

ती संगीतसभा विसर्जन झाल्यावर मंदोदरी पुनश्च रावणास रामशत्रुत्व सोडण्याचा व सीतेस परत देण्याचा हितकारि उपदेश करते;

रामाचें विराट् स्वरूप ती अद्भुत काव्यात्मकतेनें वर्णिते. परंतु रावणास सर्व उपदेश विफल होतात—कवि सांगतात— पृ. ३८

'वेतास येत फल पुष्प न वा कदापि। पीयूषवृष्टि जरि मेघ तयास ओपी!॥
तैसें न मूर्खहृदयीं कधि ये प्रकाश। लाभोनिही गुरु तया विधि वा महेश!' १२

नंतर अंगदशिष्टाई वर्णनातीत सुंदर वर्णिली आहे! (त. ५,६,७) पुढें मंदोदरी पुनः रावणास आर्ततेनें उपदेश करते. पण सर्व व्यर्थ!

इकडे रामाकडे अंगद येतो. व रावणाचे जे चार उज्ज्वल मुकुट राघवाकडे फेकून दिलेले असतात ते म्हणजे साम दाम दंड भेद हे राजाचे उदार सद्गुण रावणाला सोडून तुमच्याकडे आले, ही अंगदाची चतुरोक्ति प्रभूस फारच आनंदविते. (त. ८) नंतर प्रत्यक्ष युद्धवर्णन आहे; तें 'रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव' या अनन्वय अलंकाराच्या सूक्तीप्रमाणें निरुपम असेंच श्रीतुलसीदासांनीं अद्भुत सौंदर्यानें वर्णिलें आहे. त्यांत लक्ष्मणमूर्च्छागमनवर्णन (त. ११) हनुमदौषधानयनवर्णन (त. १२) यांमधील श्रीरामचंद्राचे लक्ष्मणाविषयीं शोकोद्गार व भरत–हनुमद्–मीलन–प्रसंग, व सत्वर द्रोणागिरीसह हनुमंताचें येणें इ. प्रसंग फारच हृदयस्पर्शी आहेत! राम व सर्व कपिसैन्य लक्ष्मण-मूर्च्छेमुळें विकल झालें असतां हनुमान् औषधींसह अवतीर्ण होतात— त्याचें साहित्यदृष्ट्या वर्णन अत्यंत बहारीचें आहे– (लंकाकांड त. १२)

"ऐकोनिया श्रवणिं तो प्रभुचा विलाप।झाले मनीं विकल सर्व कपी उमाप १४
तों त्यांत पोंहचत येउनि वायुसूनु। कारुण्यपूर्ण रसिं तो रस 'वीर' मानूं!
श्रीराम मारुतिस भेटत हर्षराशि। सुज्ञ प्रभू अतिकृतज्ञ धरी उराशीं!!" ४२

पुढें कुंभकर्णवध, मेघनादवध, इत्यादींचीं वर्णनें (त. १३,१४) अत्यंत वाचनीय आहेत.

रामरावणयुद्धरंगास प्रारंभ (त. १५) होतांना ज्या विजयरथाचें वर्णन रामचंद्रांनीं बिभीषणास सांगितलें आहे तें श्रीरामचरितमानसाचें जणुं सारभूत असेंच अति उज्ज्वल तत्त्वकाव्य आहे–

" पाहूनि रावण रथी विरथीच राम।झाला बिभीषण अधीर मनीं निकाम॥
प्रीती अती उपजवीत मनांत भीति।स्नेहें नमूनि पदपद्मिं वदे निजोक्ति १७

'हे नाथ! ना रथ तुम्हां अन त्राणि पाय। कैशाप्रकारिं बलवान् अरि जिंक्य होय?'
तेव्हां वदे विभु तयास कृपानिधान। 'ये ज्या रथें विजय तो रथ अन्य जाण!
ज्या शौर्यधैर्यमय दोन रथास चाकें। ज्या सत्यशीलमय हें ध्वजयुग्म ठाके ॥
घोडे जया बलविवेकदमोपकार। ज्याला क्षमा गुण दयासमतादि दोर १९
ज्या ईशभक्तिमय सारथि सुज्ञ ऐसा। वैराग्यढाल जणुं खड्ग सुतोष जैसा ॥
ज्या ज्ञान हें परशु, शक्ति उदंडबुद्धि। विज्ञान तेच्न वरकार्मुक ज्या त्रिशुद्धि
भाता विशुद्धमन सुस्थिर होय ज्यास। त्या बाण जाण नियमांस शमा-यमांस
ज्या विप्रसद्‌गुरुसमर्चन हें सुवर्म। ऐलें दुर्जे न विजया सदुपायमर्म! ॥२१
सद्धर्मरूप रथ यापरिं ज्यास होय। जिंकील कोण अरि त्या, जगिं तो अजेय!
जिंकील तोच भवरूपमहाखळाला। मित्रा! जयास रथ यापरि हो मिळाला॥
संसाररूप अरि दुर्जय जिंकिणारा। तो जाण वीर सखया मतिमान् सुधीरा!'
ऐसें प्रभूक्त परिसोनि बिभीषणानें। वंदीयलें प्रभुपदांबुज हर्षपूर्णें ॥ २१ ॥

राम युद्धात अजेय आहे असें पाहून रावण अद्‌भुत मायायुद्ध करतो. तें वीररसानें भरलेलें आहे. तुलसीदास काव्यमयी निरुपम वाणीनें वर्णन करतात—

'माया सरतां ऋक्षकपी मुदिं परतति घेउनि गिरितरुंना।
शरवृष्टीनें राघव पाडी रावण–मस्तक–हस्त पुन्हां ॥
श्रीरघुपति–दशकंधर–संगर गातिल जरि कां कल्पभरीं।
शेष–शारदा–निगम-कविशतें पावति ना ते पार तरी!!! ॥२९॥
प्रभुचें गुणगण करि लव वर्णन तुलसिदास हा मंदमति।
मशक ज्यापरीं निजबलमानें बघत उडाया गगनपथीं! ॥
छेदियले कर–शिरें कितीदां, लंकापति तरि तो न मरे।
क्रीडा प्रभुची सिद्ध–मुनि–सुरां व्याकुळवी परि, ती न सरे! ॥३०॥

शेवटीं रावणवध होऊन—

सामावली प्रभुमुखीं दशकंठदीप्ति। ब्रह्मा महेश अति हृष्ट बघूनियां ती ॥
ब्रह्मांडही भरुनियां 'जय' शब्द राहे!। "श्रीरामराय! जयराम! रघूत्तमा हे"
त्या पुष्पवृष्टि करिती मुनिदेववृंद। उद्घोषती "जय कृपाळ! विभो! मुकुंद! ॥
हे विश्वनाथ! जय राघव! रामराया!। सीतापते! जयजयाजि विभो! अमेया!

जय करुणाब्धे, द्वंद्वविनाशा ! शरणागतसुखवितरण रे ! ।
खलदलदारण आदिकारणा ! करुणायतना नाथ हरे ! ” ॥
सहर्ष वर्षति कुसुमें सुरगण दुंदुभि निनदुनि बहु गगनीं ।
संग्रामांगणिं रघुकुलमणि तो शोभे मनसिज-कोटिंहुनी ! ॥१४॥
जटामुकुटिं शिरिं शोभति सुंदर मधें मधें सुमराजि कशा ? ।
नीलगिरीवरि तडिल्लतांसह उडुगणकांती सजुनि जशा !
भुजदंडीं शर चाप फिरवितां तनुवरि सजले रुधिरकण ।
तमालवृक्षीं सुखीं बैसले रायमुनीखग चारुगण ! ॥ १५ ॥

पुढें सीताशुद्धिप्रसंग आहे. पावकामध्यें मायासीता नाहींशी होऊन खरी सीतादेवी अग्निनायण श्रीरामास देतो त्यावेळचें दृश्य किती मनोज्ञ आहे पहा—[तरंग २२ पृ. ९०]

पाहे महाग्नि जंव तो पुढतींच सीता । हर्षें भरे हृदयिं, भीति न लेश चित्ता॥
बोले “ मनोवचनदेहिं उरीं मदीय । रामाविना जर न अन्य गतीच होय ॥

तर हे भगवन् अग्ने ! सर्वान्तर्यामि जाणका ।
पावका ! स्वप्रभावानें श्रीखण्डासम होशि कां ! ” ॥ ३८ ॥

श्रीखण्डापरिं पावकिं शिरली प्रभुतें ध्याउनि जानकी ।
नित्य यत्पदा ‘ जय जय रामा ! ’ म्हणुनि वंदितो शिव हर कीं ॥
प्रचंड पावकिं तदा जळे प्रतिबिंब, कलंकहि लौकिक तो ।
अगम्य हेतु प्रभुचा, गगनीं चकित सिद्ध मुनि सुर करितो ! ॥३९॥
अग्नि प्रकटुनि निजपाणीं श्री, वेदस्तुत जगिं विदित अशी ।
घेउनि अर्पी रामा, लक्ष्मी क्षीराब्धी जाशि विष्णूसी ॥
वामविभागीं श्रीरामाच्या शोभत रुचिरा अतिशय ती
नवनीलाब्जानिकट वाटली कांचन-पंकज-कलियुती ! ! ! ॥४०॥

विजयी श्रीरामचंद्राचें मोठ्या हर्षभरानें स्तवन सर्व देव—सिद्धगणादिकांनीं केलें. पुलकितांग होऊन व गहिंवरून विधात्यानें प्रभूची स्वतंत्र स्तुति केली (त. २३) त्याचप्रमाणें देवेंद्रानेंहि श्रीरामचंद्राचें स्तवन केलें. या व पुढेंहि अनेक ठिकाणीं आलेल्या सर्व स्तुति म्हणजे अतिशय भक्ति-

प्रेमभराचे हृदयोद्गार आहेत. व त्यामुळें त्या सूक्ति नितान्त रम्य झालेल्या आहेत. वेंचक अवतरणें देत आहे—

"आहोंत देव अम्हि हे परमाधिकारी। स्वार्थान्ध भक्ति तव विस्मरुनीच सारी॥
तेणेंच नित्य बुडलोंत भवप्रवाहीं!। आलों तुला शरण रक्षण तूंच वाहीं" ॥६॥

हे देवांचे उद्गार, किंवा, पुढील (श्लो. १७,१८)

'अजि करिंच दया तूं दीनबंधो! दयाळा॥विषममति मदीया न्यावि तूं रे लयाला
सुखचि गणुनि दुःखा सेवतों सर्वकाला। करितचि विपरीता सर्व मी कर्मजाला
निवडुनि खल सारे शोभसी सुक्षमेनें। अनिश भव भवानी त्वत्पदीं हृष्ट होणें॥
अखिलनृपतिरत्ना, द्या वरा एवढ्याच। तव शुभपदिं वाढो मद्रती नित्य साच'

हे विधात्याचे उद्गार अतिशय उद्बोधक आहेत. त्याचप्रमाणें देवेन्द्र म्हणतो—

"होता मातें हा अभिमान। कोणि न जगतीं मजसि समान॥
आज पाहुनी प्रभुपदकमलें। गर्वमान मम दुःखहि शमलें!॥११॥
गाती श्रुति ज्या अव्यक्तातें। ध्यावोतहि जे ध्याउं पहाते॥
प्रीति परी मम कोसलभूपीं। श्रीरामाच्या सगुणसुरूपीं!॥१२॥
सीता लक्ष्मण यांसह रामा!। माझ्या हृदयीं कर विश्रामा॥
जाणुनि मातें दास आपुला। रमापते दे भक्तिच मजला" ॥१३॥

त्या भावनांची यथार्थता श्रीतुलसीदासांनीं अत्युत्कटतेनें पटविली आहे. नंतर भगवान् श्रीशंकर श्रीरामचंद्राची भक्तिप्रेमोद्रेकानें सगद्गद स्तुति करतात (तरंग २४) त्यांतील उद्गार पहा—

" कमललोचना दुःखमोचना। प्रणततोषणा दीनतारणा॥
अनुज-जानकीयुक्त मन्मनीं। वस रघूत्तमा! तू निशीं दिनीं॥१३॥
त्रिभुवनोत्तमा श्यामसुंदरा। मुनिमनोहरा तापसंहरा॥
तुलसिदासहृन्नाथ सौख्यदा। हृदयिं मी नमीं राघवा सदा॥१४॥

हे नाथ! कोसलपुरीमधिं होय जेव्हां। राज्याभिषेक तुमचा बघणार तेव्हां॥
पाहीन उत्सव मनोहर तो अनन्य। होईल चित्त मम हें अतिमात्र धन्य!"१५

यानंतर पुष्पक विमानानें श्रीजानकीलक्ष्मणादिसमेत अयोध्येकडे श्रीराम येतात तेव्हां सीतेला महत्त्वाचीं सर्व स्थळें–रणांगण, सेतु, वनवासांत

निवास केलेल्या त्या त्या जागा, ऋषिस्थानें, दंडकवन, गंगानदी प्रयाग इ. दाखवितात.

" सीतेसमेत राघव करित अयोध्येसि वंदन कृपाल ।
लोचन भरले सलिलीं तनु पुलकीं हृदय हर्षभरिं लोल ॥ ६ ॥
तरंग २६, लंकाकांड

भागीरथीस व दूर दिसणाऱ्या अयोध्येस प्रभु वंदन करतात. त्रिवेणींत प्रभु सर्वांसह स्नान करतात. रामाज्ञेनें बटुरूप घेऊन हनुमान् भरताकडे कुशल कळविण्यास जातो इकडे गुहाला राम आल्याचें कळतांच तो प्रेमभरानें 'गड्यांनो नावा, नावा!' म्हणून हाकारतो. मग त्याला कळतें कीं प्रभु पुष्पक विमानानेंच आले. गंगापार होण्यास त्यांना नावेची आवश्यकताच नाहीं! तुलसीदासांनीं हा प्रसंग अतिशय स्वभावप्रीतिद्योतक असा वर्णिलेला आहे. गुंसाईजी या लंकाकांडाची फलश्रुति सांगतात—

"जे सुज्ञ कीं वाचति राघवाचें । चरित्र युद्धीं विजयी प्रभूचें ॥
करील त्यांला भगवान् अनन्त । विवेकलक्ष्मीजयभूतिमन्त" १८, त. २६

यानंतर सप्तमसोपान उत्तरकांड यांत आपण प्रविष्ट होतों. हें कांडहि अद्‌भुत, मनोहर व काव्यमय असें आहे. भरताला हनुमान् बटुवेषानें रामागमनाचे अत्यानंददायी वृत्त कळवितो तो प्रसंग अत्यंत बहारीचा व भक्तिरसानें अपूर्व नटलेला आहे. (तरंग १) हनुमान् परत रामाकडे येऊन ते सर्व विमानानें अयोध्येकडे जातात. सर्वांच्या आनंदाचें वर्णन काय करावें? भरत वंदन करतांना त्यांची स्थिति पहा—

'हस्ताब्जि घे भरत रामपदांबुजातें । वंदीति देवमुनि साम्बमहेश ज्यातें १८
भूमीं पडे भरत तैं उठतां उठे न ।। घे त्या उरीं निज दयानिधि ऊचलून ।।
तो श्यामलांग पुलकीं भरला दयार्द्र।नेत्रीं नवाम्बुजसमीं जलबिंदु सांद्र १९

श्रीरामचंद्र सर्वांना भेटतात. कौसल्यादि मातांचें अंतःकरण किती भरून आलें असेल? कवि सांगतात—

" तान्ह्या वत्सा त्यजुनि गृहीं, वनिं धेनु चराया नेलेली ।
सांजे नगरा हुंब्रत धांवे फुटुनी पान्हा त्याजवळीं ॥

भेटति सकला माता प्रेमें प्रभुसि बोलुनी लडिवाळ ।
विरह-विपत्ती लुप्त होउनी अमित हर्षसुख ये जवळ ! ॥ २९ ॥
उत्तरकांड त. २

सर्व पौरजनांचा प्रहर्षहि अवर्णनीय आहे. अयोध्येचा सर्वत्र शृंगार, तोरणें, पताका, हेमकलश, इ. मंगलें, सुगंधी द्रव्यजलानें रस्त्यांचें सिंचन, हस्तिमुक्ताफलांचीं तोरणें व माला, नाना प्रकारचीं सुस्वर मंगल वाद्यें, गायनें व सर्वांचे सानन्द आशीर्वाद इत्यादि सर्व मांगल्याला तुलनाच नाहीं !

नानारीतीं शोभलीं मंगलें तीं । वाद्यें नाना मंगलें वाजताती ॥
ओवाळाया सिद्ध सर्वत्र नारी । आशीर्वादां हर्षुनी देति सारी ॥३॥
घेऊनीयां आरत्या स्वर्णताटीं । ओवाळीती अंगना रामभेटीं ।
गार्णी गाती सुस्वना हर्षपूर्ण । मांगल्याला ना तुला अन्य कोण ! ॥४॥
त्या आरती आर्तिहरा करीती । श्रीभानुवंशांबुजभानुतें ती ॥
उत्साह सर्वत्र अतीव नादे । आनंद-मांगल्य जनांत कोंदे ॥ ५ ॥
साकेतशोभा शुभसंपदा ती । श्रीशारदा वेद अहीश गाती ॥
यथार्थगानीं नच शक्ति त्यांही । कैचें उमे ! शक्य नरास होई ! ॥६॥

जटाविसर्जन, मंगलस्नानें इ. होऊन राज्याभिषेकाची सर्व सिद्धता होते.

स्नान समाचरुनि प्रभु भूषिततनु शोभले किती राम ! ।
कोटि अनंगासम ती कांति तदीया नितान्त अभिराम ! १९ (त.१९)
अत्यादरें सादर सासवांनीं । सीतेसही उत्तम नाहवोनी ॥
दिव्यांबरीं भूषणिं सर्व अंगीं । ती भूषवीली शुभ त्या प्रसंगीं २
रामाचिया वामदिशीं विराजे । लक्ष्मीस्वरूपा गुणखाणि कीं जे ॥
हृष्टा तिला देखुनि सर्व माता । ये जन्मल्याचें फलपुण्य हातां !:

वसिष्ठ महामुनींनीं प्रथम श्रीसीतारामचंद्रांना तिलक लावला. नंतर सर्व मुनींनींहि त्याप्रमाणेंच केलें. अगणित यथेच्छ दानें दिलीं.

'दानें दिलीं द्विजगणा विविध प्रकारीं । केली अयाचकचि याचकराजि सारी
सिंहासनीं त्रिभुवनेश्वर बैसलेले । पाहोनि देवगणिं दुंदुभि वाजवीले ॥२६॥

नंतर वेद बंदिवेष घेऊन प्रभुरामचंद्राची स्तुति करूं लागले. ही स्तुति सहा कडव्यांत येथें वर्णिली आहे. (तरंग ४– १ ते ६) हीं गीतें प्रत्येक वेदानें

एक एक व राहिलेली सर्वांनीं मिळून म्हटली असें कांहीं टीकाकार म्हणतात. पण कोणतें पद्य कोणत्या वेदानें म्हटले असावें त्याची खूण कोठें अर्थ-सिद्धान्त-दृष्ट्या दिसून येत नाहीं. श्रीमद्भागवतांत दशम स्कन्धांत जशी वेदस्तुति उत्तरार्धांत ८७ व्या अध्यायांत ‘ जय जय जह्यजामजित दोष-गृभीतगुणां त्वमसि यदात्मना समवरुद्धसमस्तभगः। अगजगदोकसामखिल-शक्त्यवबोधक ते। क्वचिदजयाऽऽत्मना च चरतोऽनुचरेन्निगमः ॥१४॥ ’ अशी आहे त्याप्रमाणेंच श्रीरामस्तुति वेदांनीं येथें गाइली आहे. श्रीमद्भागवतांतील वेदस्तुति गंभीर, अर्थदृष्ट्या अवघड असून नर्दटकवृत्त असल्यानें जरा कठिणच आहे! तुलसीरामायणांतील वेदस्तुति पुष्कळच सोपी व हरिगीतिका छंदांत आहे. गुरुश्लोकमानसांतील तिच्या अनुवादापैकीं एक जरासें अवघड कडवें येथें रामभक्त कै. यादव शंकर जामदार यांनीं विशद केलेल्या अर्थानुरोधाने उद्धृत करावेंसें वाटतें—

व्यक्त मूळ नच अनादि तरु जो निगमागमिं मत चतुस्त्वची।
स्कन्ध सहा ज्या पंचाधिक विस शाखा, बहु सुमदल सुरुचि ॥
कटु मधु ऐशीं द्विविध फलें ज्या एकलि वल्ली आश्रयिणी।
पुष्पपल्लवीं नव ललिता तुज भवतरुरूपा लवुं नमुनी ॥ ५ ॥

यांत प्रभु अद्भुत संसारवृक्षरूपकांत नटलेला असा वर्णन केला आहे. रूपक असें—अव्यक्तमूळ म्हणजे सांख्यशास्त्रवर्णित पुरुष, त्या वृक्षाच्या चार त्वचा म्हणजे महत्तत्त्व व सात्विक, राजस व तामस हे तीन अहंकार मिळून चार, त्यास तीन गुण व काल, जीव व कर्म या सहा प्रधान शाखा (स्कन्ध), मन, बुद्धि, चित्त, अहंकार हें अंतःकरणचतुष्टय, पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंच महाभूतें, शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श हीं ज्ञानेंद्रियें, कर्ण, त्वचा, नेत्र, जिह्वा आणि घ्राण हीं पंच कर्मेंद्रियें आणि हात, पाय, शिश्न, गुद, वाणी व एक जीव मिळून पंचवीस उपशाखा, स्वेदज, अंडज, जारज व उद्भिज्ज असे अनेक जीवरूपी पर्ण-समूह व वासनारूप (उच्च लोकरूप) पुष्पें, पाप—पुण्यानुसार अनुक्रमें कटु व मधु अशीं द्विविध फलें—या वृक्षाच्या आश्रयानें राहणारी एकच वेल म्हणजे अहंममत्वात्मक अविद्या, जीवांचें पुनरुज्जीवन, व वासनापरंपरा

यांच्या षडामोडीच्या रूपानें नित्य नव पल्लव व कुसुमें; अशा प्रकारचें हें एक वेदांतांतले रूपक वेदांनीं वर्णिलें आहे. [अशाच प्रकारचे कूटार्थ श्लोक श्रीमद्भागवतांत अनेक आहेत. उदाहरणार्थ पहा दशमस्कंध पूर्वार्ध अध्याय २, श्लोक २७—

एकायनोऽसौ द्विफलस्त्रिमूलश्चतूरसः पञ्चविधः षडात्मा ।
सप्तत्वगष्टविटपो नवाक्षो दशच्छदी द्विखगो ह्यादिवृक्ष. ॥]

भगवान् शंकरानीं जी श्रीरामस्तुति केली आहे तीही अत्यंत मधुर व रमणीय आहे. उदाहरणार्थ—

सदा हा अज्ञानें विषयवनिं जीव भ्रमतसे ।
अनेका रोगांहीं कटुतर वियोगीं सुख नसे ॥
तुझ्या पादांभोजा विसरुनिच हें दुःखफल ये ।
म्हणोनी श्रीरामा! तुजसि कधिंही विस्मरुं नये! ४ (त. ५)

तसेंच —

मानोनि मानअपमान समानमान । सारेच संत मुखिं संचरती अदीन ॥
तू नादमी मुनिमनोऽम्बुजभृंगसाच । हे राघवा! समरधीर अनादि तूंच॥८

यानंतर रामराज्याचें अत्युत्तम असें वर्णन श्रीतुलसीदासानीं केलें आहे. आदर्श प्रजापालनकर्ता परमसत्त्वसंपन्न प्रभु श्रीराम, अत्यंत सच्छील, प्रेमळ, सेवापरायण अशी सीता, उत्कृष्ट सेवाशील आज्ञाधारक, बंधुप्रेमानें नटलेले कर्तव्यदक्ष बंधु, अतिशय सरळ, संतोषी, न्यायी, भक्तिभावसंपन्न अशी प्रजा, सर्वत्र सुव्यवस्था, उपवनें, वापी तडाग, सरिता, उत्तम उत्तम आज्ञाधारक सुशील बालकें, पतिपरायण स्त्रिया, सर्वत्र आनंदी-आनंद व निर्वैरता, अशा रामराज्यात लोकांची एकमेकास एकच शिकवण असे ती ही (तरंग ८—श्लो ३९ ते ४७)

प्रणत-प्रतिपाल जो करी । भजणें तो प्रभुराम अंतरीं
अतिशोभनशील सुंदर । सुगुणांचें जणुं भव्यमंदिर ! ॥ ४० ॥
जलजायतचारुलोचन । प्रभु जो श्यामल दुःखमोचन ॥
नयना परिरक्षि पापणी । रत तैसा निजदासरक्षणीं ॥ ४१ ॥
धृतबाण—मनोज्ञ—कार्मुक । धरि तूणीरहि भक्तरक्षक ॥

रणधीर खलांसि संहरी । रवि तो सज्जनपंकजा हरि ! ४२ इत्यादि

आशाच ज्या विपुलसंख्य अनेक माशा।जो नाशकारि हिमराशिच त्यां अशेषां।
स्वानन्दराशि अज तो अविनाशि होय।तो कां न हो भजतसां प्रभुरामराय?

मुनिमानसपूर्णरंजन । महिभाराप्रति जो विभंजन ॥
तुलसीप्रभु तो रघूत्तम । भजतां कां न तुम्ही मनोरम ? ॥ ४७ ॥

अर्थात् अशा अनन्यभक्त प्रजेकडे प्रभु आपलें अनुकूल अवधान देतच असे! १० व्या तरंगांतील सनकादिकांनीं केलेली स्तुतिहि अशीच अत्युत्तम प्रकारची आहे. प्रभुरामांनीं साधु व असाधु यांचें वर्णन भरताच्या विचारण्यावरून केलें आहे (त. ११) तरंग १२ मधे रामगीतावर्णन आहे. त्यामधें पुढील विचार पहा--

नौकाच ही नरतनू भववारिधींत । माझा अनुग्रह तिला अनुकूल वात ॥
हो कर्णधार दृढ सद्गुरुराय नावे । हें सर्व दुर्लभ परीं सहजींहि पावे ! ॥९
साहित्यसंच मिळुनीहि असा उदार । जाईल जो नच भवाब्धि तरून पार॥
तो आत्मघातकि कृतघ्न विमूढबुद्धि । त्यांच्याच तो गतिसि केवळ अंतिं साधी!

रामगीता प्रकरणाचे दोनीही तरंग बहारीचे आहेत. (त. १२ व १३). यानंतर नारदस्तुति आहे व सर्व समाजासह प्रभूंचें परमधामगमन सहज संदर निर्देशिलेलें आहे.

अशाप्रकाची अति सुंदर रामकथा श्रीशंकरांकडून ऐकून भगवती पार्वती जे धन्योद्गार काढते ते अवर्णनीय आहेत--

माधुर्यपूर्ण रघुवीर--चरित्रपान । संतृप्तता मम मना नच दे अजून
संतृप्त रामचरिता परिसोनि होती। त्याना विशेष रस ना कळलाच चित्तीं।७
(तरंग १५)

यानंतर पार्वती साहजिकच विचारते कीं इतकें सुंदर रामचरित्र आपण तरि कोठें ऐकलेंत ? या प्रश्नांतून पुढें काकभुशुंडी व गरुड यांच्या संवादाची अत्यद्भुत अशी भक्तिमधुर व सर्वोत्कृष्ट कथा सुविस्तर शंकरांनी वर्णिली आहे. तीमधें रामाचा भक्तप्रतिपालन असा स्वभाव, काकभुशुंडीचें रमणीय कथानक, त्या सुनील पर्वताचें वर्णन, त्याचीं तीं चार शिखरें, तें सरोवर, ते अश्वत्थ, पाकळ, पिंपळ, वट वृक्ष, वटवृक्ष-

च्छायेंतील ती भुशुंडीचीं रामकथेवरील परम रमणीय प्रवचनें, त्यांत भुशुंडीचें आत्मवृत्तकथन, ज्ञानदीपवर्णन, भक्ति-चिंतामणि-वर्णन इ. इ. अनेक सुश्राव्य विषय मनोहरतेनें आलेले असून सर्व रामचरितमानसाची सांगता काकभुशुंडि–गरुड संवादांत सामावलेली आहे.

श्रीतुलसीदासांचें रामचरितमानस इतकें मनोहर होण्याचें हेंहि एक कारण असेल कीं त्यांनीं इतर रामायणांत वर्णन केलेला सीतात्याग आपल्या कथेंत कोठेंहि वर्णन केला नाहीं ! त्यामुळें सर्व रामायण अत्यंत मधुर आनंदपर्यवसायी झालें आहे. बालकांडांत मानस–रूपकांत वर्णन केलेले सर्व गुणविशेष तुलसीरामायणांत प्रतीतीस येतात. व वाचकास धन्यता वाटते. या मानसाच्या भक्तिरसाची अवीट माधुरी रसिक भक्तांनीं वारंवार घ्यावी अशी प्रार्थना करून या भागांतील संविधानकाचें वर्णन मी अधिक करण्याचा मोह स्थलकालसंकोचास्तव येथें आवरता घेतों.

‘ स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा–
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति । ’

अशी आपली भूमिका तुलसीदासांनीं सांगून त्याप्रमाणें सर्व रचना अत्युत्कट प्रतिभेनें व भक्तिभावानें रचली आहे. त्या रचनेस मीं हा जो मराठी वेष सुश्लोकमानस रूपानें चढविला आहे तो सर्व रसिकांस निरंतर आवडेल यांत मला संशय वाटत नाहीं. माझा हा अनुवाद आषाढ शु॥ १४ शके १८७६ या दिनीं श्रीकृपें संपूर्ण झाला व मला अतिशय आनंद झाला. एक अतिशय उत्कृष्ट कृति निर्माण झाल्याचे धन्योद्गार अनेक रसिकांनीं काढून माझ्या आनंदांत अतिशय भर घातली आहे. जसजसे भाग होत गेले तसतसे त्यांचें गुणवर्णन करून सर्वांनीं मला अपूर्व प्रोत्साहन दिलेलें आहे. मी अनेकांचे आभार पहिल्या दोन भागांत अंतःकरणपूर्वक व्यक्त केले असले तरी अनेकांचे आभार अजूनहि मला मानल्यावांचून राहवत नाहीं ! व तसें झालें; तरीहि माझें आभारप्रदर्शन अपूर्णच राहणार यांतहि मला शंका वाटत नाहीं !

प्रथम भागाच्या प्रकाशन समारंभाचें किंचित् वर्णन मीं दुसऱ्या भागाच्या प्रास्ताविकांत केलें आहे. सुश्लोकमानसाच्या द्वितीय भागाचा

प्रकाशन-समारंभ प्रथम भागाच्या प्रकाशनसमारंभाप्रमाणेंच उत्साहानें कोल्हापुर येथें श्रीगुरुमहाराजांचे वाड्यांत शके १८७५ चे चैत्र शुद्ध पौर्णिमेस हनुमज्जयन्तीच्या शुभसमयीं पं. महादेवशास्त्री जोशी यांचे मंगलहस्तें झाला. सभेंत अनेक रसिकविद्वानांचीं ग्रंथगौरवपर भाषणें झालीं. अनेक शुभसंदेश आले होते. वक्त्यांमधें श्री जेरेशास्त्री, श्री. कात्रे-शास्त्री, प्रा. हुपरीकर, पं. खुरेरकरशास्त्री, सौ. सुमति पंडित, ती. सौ. पार्वतीबाई सरदेसाई (ज्यांना तो भाग भक्तिपुरःसर अर्पण केला आहे त्या) श्री. हिरळीकर, कु. भागवत, पं. महादेवशास्त्री यांचीं फार उत्कृष्ट भाषणें झालीं. अध्यक्ष पंडित महादेवशास्त्री यांच्या भाषणाचा सारांश येथें द्यावयाचा तो त्यांच्या भाषणाचें टिप्पणच त्यांच्या हातचें येथें देत आहें—

"श्रीतुलसीदास रामायणाचें साहित्यांत व इतिहासांत स्वतंत्र स्थान. ८ कोटी लोक वेदतुल्य मानतात. हा ग्रंथ धर्मजागृतीचा आधार. रामभक्तीच्या प्रचारांत वाल्मीकि–रामायणाला 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' चा आनंद देणारा ग्रंथ. भक्तिमार्गांत अद्वितीय. राष्ट्रदृष्टि, धर्मदृष्टि अन् भक्तिदृष्टि या तीन्ही दृष्टींनीं विचार केला तर अनन्वय अलंकार. 'रामरावणयोर्युद्धम्'

रामायण म्हणजे मर्यादापुरुषोत्तमचरित्र. तुलसीनें तें मर्यादा संभाळूनच लिहिलें. 'अनौचित्यादृते नास्ति रसभंगस्य कारणम्' त्यामुळें ग्रंथ सरस निर्दोष व पवित्र. रसवर्णनें नैतिकमर्यादा संभाळून. भक्तीला नीतीची शिस्त सूरदासांची मस्त भक्ति व तुलसीदासांची नेमस्त. वाल्मीकिरामायणापेक्षां अध्यात्मरामायणाशीं विशेष संबंध. भक्तीच्या उद्गारांवर भागवताची छाप. मराठी संतांशीं संबंध असलेल्यांना तुलसीरामायणांत चुकल्या चुकल्यासारखें वाटत नाहीं. मराठी संतांचीच नीति, भक्ति आणि संयम. सुदाम्याला परत द्वारकेंत पोंचलों असें वाटलें तसें मराठी मनाला पूर्वपरिचित वचनें वाचल्याचा भास होतो. त्यांतल्या त्यांत नाथांची आठवण विशेष. दोघे समकालीनच नव्हेत, समध्येयाचे, समविचारांचे, दीनदयाळ. नाथ कृष्णभक्त, तुलसी रामभक्त. कृष्णभक्त असूनहि मर्यादशील म्हणून नाथांना दोन मार्क अधिक.

तुलसीची मुख्य करामत अयोध्याकांडांत. विशेष परिश्रम. भरताची भूमिका लोकोत्तर. तो त्यांचा ध्यानमूर्ति. ते रामापेक्षां भरताचेच भक्त अधिक असें वाटतें. ते म्हणतात— ' कलिकाल तुलसीसे सठन्हि हठि रामसनमुख करत को '. लक्ष्मण-भरत दोघेहि भक्त. एकाला संगतीचें आणि दुसऱ्याला वियोगाचें भाग्य. भरतानें वियोगांतहि संगतीचा अनुभव मिळवला. शारीरिक संगतीपेक्षां मानसिक संगतीचें महत्त्व अधिक. शरीरानें जवळ तो मनानें दूर राहूं शकतो. पाण्यांतला धोंडा. भक्तीची तीव्रता वियोगानें वाढते. सासरीं राहिल्यावरच माहेराचें ध्यान तीव्र होतें. भरत भ्रातृभक्तीचा आदर्श. राम पितृभक्तीचा. हनुमान् दास्यभक्तीचा. रामायणातले नात्याचे म्हणजे शारीरिक संबंध तुलसींनीं आत्मिक केले, गहिरे, पवित्र, आदर्शभूत केले, माणसें देवापेक्षाहि मोठीं केलीं. अयोध्या, दंडकारण्य स्वर्गाच्याहि वर नेलीं. त्यांच्या रूपानें मानवतेचा पूर वाहवला.

असा हा ग्रंथ मराठींत त्याच तोलानें येणें आवश्यक होतें. त्या कामीं डॉ. श्रीखंडे योग्य पुरुष लाभले. गोविंद, कुमार, मेघ, या रूपानें आधीं तप केल्यावर मग या ग्रंथाला प्रारंभ. जणूं तपावर शिक्कामोर्तब करून रामानेच प्रेरणा. तुलसीदासांना वाल्मीकीचे अवतार मानतात. आतां डॉक्टराना कोणाचे अवतार मानावयाचें ? अवतार माना अगर मानूं नका. पण ते नाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, समर्थ, मोरोपंत या सत्कविमालिकेंत ग्रथित झाले! हें भाग्य काय कमी ! हें त्यांचे त्याबरोबरच विसाव्या शतकांतल्या मराठीचेंहि भाग्य. कारण आज लघुतेचें युग. यांत हा महान् ग्रंथ अवतरतो. महाराष्ट्राच्या मनःशुद्धीला, प्रेमभावाला, उत्कर्षाला हा कारणीभूत होवो. आतां माझेंच उदाहरण पहा. मागच्या समारंभांत मी खटपट्या. आज अध्यक्ष. ही उन्नतीच नाहीं कां ? प्रत्यक्ष डॉक्टरांचाहि उत्कर्ष. पहिला कीर्तिलाभ, दुसरा गृहलाभ. ग्रंथाच्या गुणदोषचिकित्सेचें काम तुमचें. कारण ' कविः करोति काव्यानि ' मात्र तें करतांना कवीच्या प्रचंड तपस्येकडे दुर्लक्ष न व्हावें. माझ्या मतें तें सत्काव्य. अमृतस्यंदी वाणी

" अमृतजलधैः पायंपायं पयांसि पयोधरः ।
किरति करकास्ताराकारा यदि स्फटिकावनौ ॥
तदिह तुलनामानीयन्ते क्षणं कठिनाः पुनः ।
सततममृतस्यन्दोद्गारा गिरः प्रतिभावताम् ॥ " प्रसन्नराघव १–२१"

पं. विश्वनाथशास्त्री कात्रे यानीं पुढील कवितारूपानें आपला हृदयंगम आशय व्यक्त केला:–

रामें पुष्प समर्पिलें प्रथमहि श्रीशंकराच्या शिरीं ।
गेलें तें परि तन्निवासि सहजीं भागीरथीच्या करीं ॥
कंठीं भूषवुनी द्वितीय कुसुमें श्रीपार्वतीशंकरा ।
तद्भक्तां अजि अद्वितीय दिधला आनंद आम्हां खरा ! ॥ १ ॥
आधींच पावन चरित्र रघूत्तमाचें । येई प्रसादपण त्यासहि शंकराचें ॥
त्याची समग्र महती कवि कोण वानी । भक्तांसि राम वितरी अजि मेजवानी!॥
ऐशीं ईशचरित्रें आम्हां रामा ! पुनःपुन्हां वितर ।
विश्रांत वंद्य व्हाया तुज सावन याविना नको इतर ! ॥ ३ ॥
श्रीरामयशोगानें त्वद्यशही दशदिशीं पहा पसरे ।
संतांचा अनुभव की, ' प्रभु कधिं निजसेवकांसि ना विसरे !'॥ ४ ॥
या सीतारामांनीं श्रीशिवकृपया शतायु व्हावेंच ।
तत्काय–वाङ्मनांचा रामीं व्हावा सदा असा वेंच ! ॥ ५ ॥

टीपः–[पद्य १ सुश्लोकमानस प्रथमभाग ज्या आर्येला अर्पिला आहे त्यांचें नाम श्री. भागीरथी आहे व त्या भारताचे सन्मान्य अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांच्या मातुश्री होत. सुश्लोकमानस द्वितीय भाग कविभगिनी सौ. पार्वतीबाई व त्यांचे पति श्री. शंकरराव सरदेसाई या दंपतीस अर्पिला आहे. इतरत्र राम हें कविनाम व सीताराम हा उल्लेख कवि व कविपत्नी यांना उद्देशून आहे.] (गर्जना एप्रिल १९५३)

प्रकाशनसमारंभाचे प्रारंभीं सौ. श्री. सुधा नाडकर्णी यांनीं जटायुकृत रामस्तुतिपद्यें ' जय जय रामा० ' इ. गाइलीं. समारंभास

प्रशंसोद्गारसंपन्न संदेशांनी अभीष्टचिंतन करणाऱ्यांत रँ. प्रा. नारळीकर, डॉ. पु. वि. घारपुरे, प्रा. मंगरुळकर, भक्तिभूषण श्री. आण्णासाहेब कुलकर्णी, इचलकरंजी, राजे श्री. ल. सी. खेर, मेजरजनरल थोरात, श्री. माडखोलकर, श्रीमंत वामनराव कुंडईकर, कविभूषण खापर्डे, साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, श्री. ग. स. अळतेकर इ. अनेक आहेत. श्री. अळतेकरांनीं म्हटलें होतें—" सुश्लोकमानसाच्या द्वितीय भागाचें महाराष्ट्रीय जनतेला समर्पण परम रामभक्ताचे जन्मदिनीं व्हावें यांत भक्तिभावनेबरोबर औचित्यहि आहे—' यत्र यत्र रघुनाथकीर्तनं तत्र तत्र कृतमस्तकाञ्जलिः। ' असे मारुतिराय आहेत. त्यांना सुद्धां आपल्या जन्मदिनाच्या दिवशीं रामचरितमानसाच्या मराठींतील अवतारानें आनंद होईल. पं. महादेवशास्त्री जोशी यांच्यासारख्या विद्वान् व रसिकाच्या हस्तें हा समारंभ होत आहे ही दुधात साखरच होय. आपल्या प्रकाशनसमारंभास सुयश चिंतून पुढील पूर्ततेस हनुमंताप्रमाणें झेप घ्याल अशी आशा व्यक्त करतों. आपला ग. स. अळतेकर ता. २८-३-५१ नवी दिल्ली " प्रकाशनसमारंभांत उपस्थित असलेल्या उपकारकर्त्यांचे प्रतिनिधिच असे वयोवृद्ध श्रीमान् रामराव लाटकर यांना व अध्यक्षादींना हारतुरे अर्पण करून मीं सर्वांना वंदन करून आशीर्वाद घेतले. व प्रसाद वाटण्यांत येऊन हा संस्मरणीय समारंभ पूर्ण झाला. समारंभास २०० वर मंडळी उपस्थित होती.

सुश्लोकमानस काव्यांत छंदोदृष्ट्या पाहिल्यास वसंततिलका, आर्या, उपजाति, अनुष्टुभ्, शिखरिणी, मालिनी, शार्दूलविक्रीडित, छंद (' रतिसुखसारे गतमभिसारे ' याचालीसारखे), इंद्रवंशा, मंदाक्रांता, इंद्रवज्रा, शालिनी, कामदा, स्वागता, पुष्पिताग्रा, माल्यभारा, स्रग्विणी, वंशस्थ, द्रुतविलंबित, वियोगिनी, पृथ्वी, हरिणी, भुजंगप्रयात, उपेन्द्रवज्रा, पादाकुलक, स्रग्धरा, रथोद्धता अशा सव्वीस सत्ताविस प्रकारची काव्यरचना आढळते. यांतील आर्या, अनुष्टुप्, छंद, पादाकुलक अशी थोडीच शु. १% मात्रावृत्तांची रचना आहे, बाकी बहुसंख्य गणवृत्त रचना झालेली आहे.

सर्वांत जास्त म्हणजे शेकडा सुमारें ६३ वसंततिलका आहेत. ही सर्व गणना आमचे कविवर्य वे. शा. सं. विश्वनाथशास्त्री कात्रे यांनीं करून मजकडे टिप्पण दिलें. रघुकुलतिलकाचें चरित्र वसंततिलका वृत्तानें प्रामुख्यानें या काव्यांत गाण्यांत आलें आहे. सर्वत्र रसभावानुकूलता भंग होऊं दिलेली नाही, असेंच रसिकांस आढळेल. स्थलसंकोचास्तव वृत्तनामें ज्या त्या ठिकाणीं देणें अशक्य झालें. बहुश्रुत वाचकांस मुळींच व्यत्यय येणार नाहीं. वापरण्यांत आलेल्या वृत्तप्रकारांची माहिती कोशग्रंथांत आढळेलच. तथापि श्रीतुलसीदासांच्या रामचरितमानसावर प्रबंध लिहिण्याचा मानस आहे, तो साधल्यास ही सर्व माहिती अवश्य सोदाहरण देईन. तो भाग सुश्लोकमानसाचा चवथा भाग उपसंहारात्मक व विवेचनात्मक होईल. तसेंच टीपा, सूची, सुभाषितसंग्रह व तुल्य वचनेंहि त्यांत देण्याचा सर्व प्रयत्न करतां येईल.

सुश्लोकमानस ग्रंथकार्यास ज्या अनेक सहृदय उदार मंडळींनीं प्रेमानें प्रोत्साहन दिलें त्यांत श्रीमंत अनुबाई उर्फ वहिनीसाहेब घोरपडे, इचलकरंजी, श्रीमंत राजेसाहेब चिंतामणराव पटवर्धन, कुरुंदवाड, श्रीमंत डॉवेजर राणीसाहेब जत, यांचा सादर उल्लेख करतों. कै. श्रीमंत रघुनाथराव बाबासाहेब पंतसचिव, भोर यांनीं 'शंकराजी नारायण' हें उत्तम वाङ्मयास दिलें जाणारें पारितोषिक १९५३–५४ सालासाठीं सुश्लोकमानस प्रथमसोपान ग्रंथास देऊन थोर गौरव केला. कै श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं निर्मिलेल्या वाङ्मयोत्तेजन निधींतून सुश्लोकमानस प्रथम व द्वितीय भागांना निधीच्या विद्वान् ट्रस्टींनीं चांगलें प्रोत्साहन दिलें. डेक्कन व्हर्न्याक्युलर ग्रंथोत्तेजक संस्था पुणे, या संस्थेकडून चांगलीं पारितोषिकें माझ्या सर्वच कृतींना वेळोवेळीं लाभलीं. ग्रंथोत्तेजक संस्था इंदूर यांजकडून सुश्लोकमानस प्रथम विभागास बक्षिस मिळालें आहे.

शेठ श्रीमान् हिरालाल शहा, बी. ए. वसंतविजय मिल मुंबई, या संस्कृतज्ञ पंडितांनीं सुश्लोकमानसास उत्तेजन दिलें. शेठ श्रीमान् राधाकृष्ण रामनारायण रुइया यांनीं अत्यंत अगत्यानें आपल्या पूज्य मातुश्री श्रीमती

सुव्रतादेवी यांच्या निदर्शनास सुश्लोकमानस मजकडून आणवून मला अभूतपूर्व आनंद दिला. श्रीमती सुव्रतादेवी यांचें मानसावर अतिशय प्रेम आहे. त्यांच्या तें सत्काव्य पाठांतच आहे. त्यांना मराठी समजत असल्यामुळे सुश्लोकमानसमधील रामवाल्मीकिमीलनप्रसंग, ज्ञानदीपप्रसंग इ. मनोहर भागांचे श्लोक त्यांना मी ऐकवूं शकलों व आम्हांस अतिशय आनंद झाला या पुण्यशील महिलेनें प्रेरणा देऊन आपले सुपुत्र श्रीमान् शेठ राधाकृष्णजीसाहेब यांचे हस्तें सुश्लोकमानस तृतीय भागास अगत्यपूर्वक उदार आश्रय दिल्यामुळेंच हा ग्रंथ संकल्पाप्रमाणें आज प्रकाशित होऊं शकत आहे. असेंच थोर साहाय्य श्रीरामचरितमानस व सुश्लोकमानस याची एकत्र उत्तम आवृत्ति काढण्याच्या संकल्पित थोर कार्यास त्यांचेकडून लाभेल अशी सदाकांक्षा सुफलित लवकरच होईल. प्रस्तुत सुश्लोकमानस तृतीय भाग मी मोठ्या प्रेमादरानें श्रीराधाकृष्णजींना वंदन करून त्यांच्या पुण्यशील माताजी श्रीमती सुव्रतादेवी यांना सप्रणाम अर्पण करीत आहे. सर्वांसच अनंत धन्यवाद !

श्रीमान् शेठ मदनमोहन लोहिया, यांच्या साहाय्याबद्दलहि मी ऋणी आहें. कोल्हापुरचे रावसाहेब श्री. आर्. वाय्. चव्हाण, न्या. श्री. व्ही. जी. जमखंडी डिस्ट्रिक्ट जज्ज कोल्हापुर, न्या. मू. बावडेकर, न्या. मू. गजेंद्रगडकर, श्री. डी. सी. पावटे, व्हा. चॅं. कर्नाटक विश्वविद्यालय, श्रीमंत नानासाहेब सातार्डेकर, कालिदासव्यासंगी सॉ. शांताराम आत्माराम सबनीस, मुंबई, महोदार श्रीमान् विद्याप्रेमी श्रीप्रतापशेठजी, अमळनेर इत्यादि थोर मंडळींचें साहाय्य सुश्लोकमानस महाकाव्याच्या प्रकाशनास सानंद लाभलें हें लिहिण्यास फार संतोष वाटतो.

सुश्लोकमानस ग्रंथांवर अनेक विद्वान् रसिकांनीं उत्कृष्ट समालोचनें निरनिराळ्या अनेक नियतकालिकांत लिहिलीं त्यांचा मला फारच उपयोग झालेला असून मला अतिशय आनंद झालेला आहे. अशा साहित्यसमालोचकांत प्रा. भ. श्री. पंडित (युगवाणी), साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास (महाराष्ट्र), श्री. र. गो. सरदेसाई (विविधवृत्त), श्री. ना. ग. गोरे (साधना), श्री. तात्यासाहेब करंदीकर (केसरी), प्रा. चिं. वि.

जोशी (प्रभात), श्री. द. पां खांबेटे (लोकमान्य) श्री. ग. वि. करंदीकर (यशवंत), सौ. उषा कोलते (A. I. R. नागपूर, म.सा.पत्रिका), श्री. र. वि. हेरवाडकर (मौज, A. I. R. मुंबई), प्रा. गि. के. पंडित (नवयुग व सत्पथ) कवि वि. गो. साठये (मनोहर), श्री. ग. कृ. प्रभुदेसाई (प्रबोधचंद्रिका) श्री. ' तारकेश्वर ' (नवयुग) प्रा. ग. श्री. हुपरीकर (साहित्य, सुश्लोक-मेघ परीक्षण, दिवाळी अंक १९५०), प्रा. आंबेकर (A. I. R. मुंबई), पं. करुणाशङ्कर पाण्ड्या (हिंदी समालोचन, नवभारत टाइम्स) श्री. ल. ना. गोखले (A. I. R. पुणें), श्री. वि. म. बेडेकर (नवभारत) इ. संस्मरणीय आहेत

श्रीमान् शेठ नारायणदास (शाहुपुरी) श्री. हसबनीस, श्री. काळे, श्री. होस्पेटकर, श्री. शिदोरे, श्रीमती देवस्थळी प्रभृति भाविक प्रवचनश्रोते, गु. श्री. सासने, श्री. अष्टेकर, विद्वद्वर्य प्रा. कृ. पां. कुलकर्णी, प्रा. न. र. फाटक, श्री. ज. र. आजगांवकरप्रभृति व्यासंगी मंडळी, प्रा. माधवराव ओक, डॉ. नानासाहेब व रामभाऊ म्हस्कर, श्री. खंडोपंत कुलकर्णी, श्री. सातपुते प्रभृति हितचिंतक, श्री. मो. स., श्री. शं. प्रभृति श्रीखंडेमंडळी, चि. श्री. गंगूताई, श्री. सौ. वेणुताई, ती. सौ. कृष्णाक्का प्रभृति वाचक भगिनीजन, कविवर्य वि. शं. कात्रे व सौ मंगलावैनी कात्रे, श्री. शंभुराव इनामदार, श्री. गं. गो. कानेटकर, प्रभृति स्निग्धजन, ती. गणपतराव करंदीकरांसारखे हरिभक्त स्नेहार्द्र आप्त, श्री. कोटिभास्कर बंधु, कवि श्री. सूर्यकांत खांडेकर,— चि. अनंत-यशवंत-शरत्कुमार व त्यांची माता, सौ. सीतादेवी,

' श्रीरामचंद्रचरिता ग्रथित करी तुलसि भक्तिरस दाटे।
अनुवादि 'राम' भावें जीह्वाग्रीं शारदाच कीं प्रगटे' ॥१॥

असें म्हणणाऱ्या कवयित्री श्री. लक्ष्मीबाई पटवर्धन, प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे, विद्वद्रत्न श्री. लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर, डॉ. भास्कर पटेल, मुंबईचे प्रधानमंत्री श्री. मुरारजी देसाई, ह भ. प. प्रवचनकार श्री. टिल्लू, व वे. मू. श्री. धर्माधिकारी, इत्यादींचे निर्देश तरी केल्यावांचून मला कसें राहवेल? प्रा. हुपरीकरांनीं म्हटलें होतें " डॉ. श्रीखंडे यांनीं आपलें वाङ्मयकार्य निष्काम बुद्धीनें ' स्वान्तःसुखार्थे' केलें आहे. त्यांच्या सुश्लोक-

मेघानें आतां यापुढें त्यांना ‘सुश्लोकमानसा’कडे (श्रीतुलसीदासकृत रामचरितमानसाच्या अनुवादाकडे) वळविलें आहे. कारण यक्षाचा मेघदूत जसा उत्तरेकडील अलकेस जाणारा आहे तसाच तो नैसर्गिकपणें अलकेच्या पलीकडे असलेल्या मानस सरोवराकडेहि वळणारा आहे. ही घटना लक्षांत घेतां डॉ. श्रीखंडे यांच्या सुश्लोकमेघाचा प्रवास आतां ‘सुश्लोकमानसा’चा दिशेनें घडावा व त्या ठिकाणीं त्यांच्या काव्यशक्तीनें यथेच्छ विहार करावा ही घटना जितकी नैसर्गिक तितकीच अपूर्व आहे, असें रसिकांना वाटल्यावांचून राहणार नाहीं. डॉ. श्रीखंडे यांनीं या महत्त्वाच्या कार्यासाठीं हृदयस्थ रामाचें पसायदान व सज्जनांचे आशीर्वाद यांची याचना अवतरणिकेच्या शेवटीं केली आहे. आतांपर्यंत ‘सुश्लोकमानसा’त जो त्यांचा ‘स्वान्त:सुखाय’ यशस्वी विहार झाला आहे तो मीं लक्ष्यपूर्वक पाहिला आहे. व नवभारताच्या एका अंकीं थोडा नमुना छापला गेला आहे त्यावरून पाहतां हृदयस्थ रामाचा त्यांना पूर्ण प्रसाद मिळाला आहे आणि रसिक सज्जनहि सुश्लोकमेघाकडे पाहून अंत:करणपूर्वक—

‘इष्टान् देशान् विचार जलद प्रावृषा संभृतश्री: ।’

असेंच म्हणतील यांत शंका नाहीं.” (सुश्लोकमेघ परीक्षण १९५०) या सर्व मजविषयींच्या सज्जनांच्या सदिच्छा ईशकृपेनें सुफलित झाल्या आहेत! सज्जनसाहाय्यांबद्दल कितीहि लिहिलें तरी तें अपुरेच होणार आहे म्हणूनच लेखनी कुंठित होते यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. म्हणून मनानेंच आतां मी इतर असंख्य व्यक्तींचे साभार चिंतन करतो.

श्रीरामपंचायतन ब्लॉक्स श्रीमंत भय्यासाहेब पंत यांजकडून कृपेनें लाभल्याबद्दल त्यांचे अतिशय उपकार आहेत. या चित्राची रंगीत छपाई आर्ट ब्यूरो कोल्हापुरला भूषणावह आहे. भाविक भक्त श्री. सखाराम राउळ, श्री. पु. दे. भंगाळे, डॉ. व सौ. प्रभावळकर, श्री. ब. द. फणसळकर, श्री. वा. ना. फडणीस, श्री. बा. रं. अत्रे, प्रा. अदवंत इ. च्या सदिच्छेबद्दल ऋणी आहें.

यांशिवाय अनेक रसिक सज्जनांनीं पत्रें पाठवून आपले सुश्लोकमानसविषयीं उत्कट प्रशंसोद्गार कळवून मला अपरिमित आनंद दिलेला आहे. अशा मंडळींत सातारचे कै. श्री. दत्तात्रय नारायण नावर, कै.

श्रीरामदासानन्द केकावलीटीकाकार श्री. श्रीधर विष्णु परांजपे, ब्र. स्वामी केवलानन्द (पं. नारायणशास्त्री मराठे, वाई) यांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. 'कल्याण'चे संपादक पं. हनुमान्प्रसाद पोद्दार यांनीं मला लिहिलें,

"I congratulate on the 2nd volume of your very successful translation of Shri RamaCharitamanas. Your gift to the Marathi literature will be most precious and imperishible......" (पत्र ५-५-५३)

ब्र. स्वामी केवलानन्द यांनीं कळविलें (पत्र आश्विन कृ. ५ शनिवार शके १८७६)—

" ॐ नारायणस्मरणम् । मी दिल्लीहून काल सायंकाळीं परत आलों... लहानसा अभिप्राय देत आहें... पानांत वाढलेलें श्रीखंड एकेक बोट रुचि घेत घेत रसना संपविते. एक बोट रुचकर लागल्यास आणखी आणखी खाण्याची इच्छा वाढतच जाते..

कोल्हापुरचे श्री. रा. चिं. श्रीखंडे यांनीं केलेल्या तुलसीरामायणानुवादरूप सुश्लोकमानसाच्या प्रथमसोपानाचे पहिले पांच तरंग आणि अयोध्याकांडांतील १८ पासून ४० पर्यंत तरंग वाचीत असतां माझें वरीलप्रमाणेंच झालें. एक वाचल्यावर दुसरा, तो झाल्यावर तिसरा अशी वाचनाची इच्छा वाढत गेली. आधींच रामकथा गोड. ती श्रीतुलसीदासजींनीं गाइलेली आणि ती सांगोपांग श्रीखंडे यांनीं श्लोकरूपानें अनुवादिलेली असा हा मधुरत्रययोग जमला आहे.

सुश्लोकमानसकर्त्याचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच.

स्वामी केवलानन्दसरस्वती. वाई "

कै. श्रीरामदासानन्द (श्रीधर विष्णु परांजपे,) हनुमानगड वर्धा यांनीं अनेक पत्रांत मजवर प्रशंसोक्तींचीं कवितांचीं सुंदर सुमनेंच उधळलीं आहेत. येथें ६-१०-५३ च्या पत्रांतील थोडा भाग उद्धृत करतों. त्याच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त १० आर्या व १ अनुष्टुभ् पद्यांनीं मीं त्यांचें अभिनंदन केलें त्यास त्याचें हें उत्तर आहे:—

"सुश्लोक रामकविची मुदमंगल देत मानवा कविता ॥
रामघन मयूरेश्वर असता तरि नदुनि मान वाकविता ॥ १ ॥

तुलसीदासही झाला रामा प्राणाधिक प्रिय ।
तुलसीमंजरी त्याला प्रिय हें काय सांगणें ? ॥ २ ॥
शंकरगुरुपूजार्थ नित्य श्रीफल (= बिल्व) पाहिजे ।
सुश्लोकराम म्हणुनी बेलबागांत राहतो ॥ ३ ॥

आपण केलेल्या प्रशंसेला रामा! हा जीव पात्र नाहीं तरी आपण केलेल्या पद्यात्मक स्तुतीला मी सुश्लोकशिखामणि श्रीसीतारामाचा आशीर्वाद म्हणून नम्रपणें ग्रहण करतों. 'माझी लाज तुला गुरुराया' एवढेंच म्हणतों.

आपल्या काव्यरचनेविषयीं मला काय वाटतें तें मी वरील आर्येत सांगितलें आहे. दहा आर्यांची एक छोटी माळ त्याला अनुष्टुभ्छंदाची मेरुमणि गांठ देऊन एकादश पद्यें अर्पिलीं तीं एकादशस्वरूपी हनुमदवतारी श्रीसमर्थांना समर्पित करतों.

सीतारामचरणीं अक्षय मस्तक ठेवून येथेंच विराम पावतों.

श्रीरामदासानन्द (परांजपे) "

कै. कवि दत्तात्रय नारायण नाबर यांनीं बालकांडाचें परीक्षण कळविलें पत्र ११-३-५३ त्यांत पुढील आर्येनें आरंभ आहे—

" कविवर्या काय वदूं अनुभवितां जाहला मला मोद ॥
सुश्लोकमानसाचा सुरतरुसुमगंधसाच आमोद ॥ १ ॥...

महाकवींचा अनुवाद निष्णात कवींनीं केला तर तो शब्दास प्रतिशब्द अशा प्रकारचा नीरस न होतां सरस अभिनव काव्याच्या रूपानेंच होतो याचें उत्कृष्ट उदाहरण आपलें प्रस्तुत काव्य हें होय. याला मी अनुवाद म्हणतच नाहीं. मूळ कवितेची ती कन्या आहे. तें स्वतंत्र प्रतिभाजनित महाकाव्य आहे. तेजस्वी शब्दरत्नानीं भरलेलें एक विस्तीर्ण दालन आहे. व तीं रत्नें अशा अप्रतिम कौशल्यानें मांडलीं आहेत कीं त्यांचा प्रकाश एकमेकांवर पडून अवर्णनीय शोभा दृष्टीस पडते, मराठी भाषा किती समृद्ध आहे, व सुवर्णाप्रमाणें तिला पाहिजे तशी वळवून कुशल कारागीर किती सुंदर अलंकार घडवूं शकतो, हें आपण दाखवून दिलें आहे.

आपल्या कवितेचे विशेष म्हटले म्हणजे तिची मनोहर गति, रचना-सौष्ठव, ओज, प्रसाद, रसवत्ता, नादमाधुर्य, सालंकारत्व आणि पावित्र्य हे होत. आपण आयुष्यरूपी काळनदीला बंधारा घालून तिच्या पाण्यानें दिव्य

पत्रपुष्पफलांनीं समृद्ध असें चिरस्थायी मनोहर उद्यान निर्माण केलें; व तेणेंकरून आपल्या जन्माचें सार्थक केलें आहे. एवढेंच नाहीं तर समाजास पारमार्थिक कल्याणाचें कायमचें साधन करून ठेवलें आहे. आपल्या काव्यांत भक्तिरस प्रधान आहे. त्या रसाची निष्पत्ति करणें हें तर कठिण काम आहे. तें आपण साध्य केलें हें आपणांस अत्यंत भूषणावह आहे.

आपल्या काव्यांतील कांहीं उतारे मासल्याकरितां देतों (येथें १८ श्लोक निर्देशून श्री. नावर महोदय पुढें म्हणतात)—

मी आपल्या काव्याकडे केवळ करमणुकीच्या क्षुद्रदृष्टीनें पहात नाहीं. हल्लीं जगांत अधर्माचा पगडा बसत आहे. धर्मग्लानि होत आहे. त्यामुळें खून, दरवडे, अत्याचार, स्त्रियांवर बलात्कार इत्यादि भयंकर अपराधास ऊत आला आहे. जीवित आणि घरदार यांस सुरक्षितपणा राहिला नाहीं. आसुरीमतांचा प्रसार जनतेंत झपाट्यानें होत आहे. सामान्य लोकांस भीति आणि निराशा ग्रासून टाकीत आहे. धर्मसूर्याचें ग्रहण कसें सुटेल अशी चिंता उत्पन्न झाली आहे. अशावेळीं आपण निःस्वार्थी-पणानें अत्यंत परिश्रम करून सद्धर्माच्या रक्षणास व प्रसारास उपकारक असें महत्कार्य करीत आहां हे आमचें परमभाग्य होय. परमेश्वरानें आपल्यासारखे पुष्कळसे सत्पुरुष आम्हांस द्यावे अशी त्याजपाशीं नम्र प्रार्थना आहे. --आपला दत्तात्रेय नारायण नावर." परम रामभक्त स्वामी श्री. रामकुमारदास विरक्त, मानसचक्षु, श्रीराममंदिर, कुंडाळ, अहमदाबाद यांनीं सुश्लोकमानस पाहून असाच अतिशय आनंद व्यक्त केला. स्वामी श्रीराम लुधियाना, या रामचरितमानसप्रेमी सद्भक्ताचेहि अत्यंत उत्कृष्ट अभिप्राय व आशीर्वाद मला लाभले. ज्योतिर्मठ बदरिकाश्रमचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीकृष्णबोधामृतस्वामी यांच्या भेटीचा सुयोग आला असतां त्यांनींहि उत्तम प्रशंसोद्गारपूर्वक ग्रथास अभीष्ट चिंतन केलें आहे.

मुंबईचे डॉ. शरद् रघुनाथ प्रधान, एम्. डी. या तरुण व्यासंगी सन्मित्रांनीं वारंवार प्रशंसोद्गारपूर्वक माझ्या कृतींचें परिशीलन केलें, कवि डॉ. वसंतराव अवसरे, सॅटा क्रुझ् यांनाहि या वाङ्मयकृति अतिशय आवडल्या. त्यांचा मी फार ऋणी आहें.

सोलापुरचे माझे रसिक स्नेही श्री. अनंत विश्वनाथ लिमये यांनीं वारंवार चिकित्सापूर्वक सर्व ग्रंथाचें अवलोकन करून प्रशंसोद्गारांनीं अनेक प्रकारें सहृदयता व्यक्त केली. त्यांनीं ग्रंथांवर व मजवर अलोट प्रेम केलें. छपाईंत राहिलेले मुद्रणदोष निदर्शनास आणण्यांतहि त्यांनीं मोठें साह्य उत्साहानें केलें. त्यांचे आभार कसे मानावेत हें समजत नाहीं. माझ्या सर्व ग्रंथांवर त्यांनीं कविताबद्ध रसिक अभिप्रायहि अनेक पाठविले आहेत !

पुण्याचे श्री. सी. न. साने या रसिक काव्यप्रेमी स्नेह्यांचाहि मला साभार उल्लेख करावासा वाटतो. डॉ. ना. वि. थत्ते, डॉ. पु. वि. गोखले, डॉ पी. बी. भट्टे, कर्नल डॉ. व्ही. आर. दामले, श्री. शंकरराव किर्लोस्कर, श्री. रावसाहेब देशपांडे, यांच्या प्रोत्साहनांबद्दल मी ऋणी आहें. एक तरुण वाचक श्री. र. अ. कंटक, त्याचप्रमाणें सुश्लोकमानसचा व्यासंग करून आनंद लुटणारे लहानथोर आप्त, स्वकीय मित्रमंडळी चि. श्री. प्र. वि. कशाळकर, श्री. गो. शं. हुजुरबाजार इ. यांचा मी कृतज्ञ आहें. ज्यांनीं मला वारंवार प्रोत्साहन दिलें, लहानपणींच गणवृत्तांची ओळख करून दिली ते वडील बंधु कै. ती. भाऊसाहेब हुजुरबाज़ार यांचा चिरवियोग होऊन हा ग्रंथ पूर्ण छापलेला पाहण्यास ते नाहींत या विचारानें कंठ गहिंवरतो. या काव्याचें कार्य फारच प्रदीर्घ ! व विद्युचलं जीवितम् अशी स्थिति, म्हणूनच रामचरितमानसारंभीं गुंसाईजींनीं,

'माता, पिता, गुरु मदीय, उमामहेश। आयुष्यदायक दयाळु नमूं तयांस'॥

सुश्लोकमानस बालकांड त. ५–१५

अशी प्रार्थना केली आहे !

इचलकरंजीचे ह. भ. प. भक्तिभूषण श्री. कल्याण श्रीपाद ऊर्फ अण्णासाहेब कुलकर्णी यांनीं सुश्लोकमानस काव्यावरून श्रीरामनवरात्रांत प्रवचनें देण्याचा मानस प्रकट केलेला आहे. याबद्दल अतिशय धन्यता वाटते. सत्कथा या साधुजनांचे मुखांबुजांतून ऐकण्याचें भाग्य फारच मोठें होय.

जे संत 'कल्याण'चि रामदास। वंदीत मी संतत तत्पदास॥
प्रेमार्द्रहृत्पंकजभक्तिभूषा। कल्याणवाग् वर्षत सर्वतोषा॥ १॥

असें मला त्यांचें वंदनपूर्वक वर्णन करावेंसें वाटतें.

असो. प्रस्तुत ग्रंथविभागाचें आलोचन करून सन्मान्य विद्वद्वर्य श्री. गणेश सदाशिव ऊर्फ दादासाहेब अळतेकर, एम्. ए., एल्एल्. बी. सदस्य भारतीय लोकसभा, न्यू दिल्ली, यांच्यासारख्या रामायणव्यासंगी, सत्काव्यप्रेमी, थोर सद्भक्तानें जो अंतःकरणपूर्वक थोडक्यांत अभिप्राय दिला तोच मला शिरोधार्य वाटून उपोद्घात म्हणून किंवा या सुश्लोकमानस-विभागमंदिराचें मंगल तोरण म्हणून स्वीकारतां येत आहे याचा अत्यानंद होतो. श्री. दादासाहेबांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या ग्रंथाची छपाई श्रीसिद्धेश्वर मुद्रणालयाचे श्री. बळवंतराव ठकार, त्यांचे चि. श्री. आत्माराम व रामभाऊ, त्याचप्रमाणें श्री. म. ब. फराकटे, श्री. ल. वा. वरुटेप्रभृति कामगार मंडळी यांनीं अतिशय उत्साहानें व आपले-पणानें चांगली करून दिल्याबद्दल मला यांचा साभार निर्देश करावासा वाटतो.

सर्वांचा निरोप घेतांना हीच प्रार्थना कीं—

सज्जन सहृदय रसिकें परिसावें काव्य हे सुरस रुचिर ॥
न्यूनाधिकां सुधारुनि सेवावा रस तयांतला सुचिर ॥

सुश्लोकमानस बालकांड तरंग ११–२

या ग्रंथाचें प्रकाशन प्रथमविभागाप्रमाणेंच महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांनीं श्रीरामनवमीस करण्याचें मोठ्या आनंदानें स्वीकारलें त्या पत्रांत शेवटीं त्यांनीं पुढील श्लोकानें सुश्लोकमानसविषयीं आपला नितान्त आदर व्यक्त केला आहे—

महाराजस्य चरितं निर्माता च महाकविः ।
महाराष्ट्र्यां तु भाषाया नीत्वा प्राप्तं महत्पदम् ॥

असेच सज्जनांचे थोर आशीर्वाद मला नित्य लाभोत व उत्कृष्ट प्रेरणा देवोत अशी प्रार्थना करून श्रीसीतारामचंद्र (सुश्लोकमानस उत्तरकांड त.३५–२०)

यन्नामरूपी भवभेषजानें । क्षणींच तापत्रयशूळ जाणें ॥
सदानुकूल प्रभु तो कृपाळू । मला स्वभक्ता तुजलाहि पाळू ! ॥

अशी भक्तवर काकभुशुंडीच्या शब्दांत श्रीरामचरणीं सप्रणाम विनवणी करतों.

श्रीतुलसीमंजरी, बेलबाग
मंगळवार, कोल्हापूर
चैत्र पाडवा शके १८७७.

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

कांहीं राहिलेलीं पद्यें पुढीलप्रमाणें समजावींत–

सुश्लोकमानस भाग दुसरा पृ. ३२ अयोध्याकांड पूर्वार्ध तरंग ७ श्लोकांक २४ नंतर पुढील श्लोक २४ अ समजावा–

गुरुस्वामी, माता पितर सुर बंधू निजजनें ।
गणोनी स्वप्रणांसमचि सकलां योग्य भजणें ।।
जगाचाही स्वामी रघुपति सखा स्वार्थरहित ।
प्रिय प्राणांऐसा सकल जगता जो करि हित ।। २४ अ ।।

अयोध्याकांड पृ. ९३ उत्तरार्ध तरंग १२ श्लोकक्रमांक ३ नंतर पुढील श्लोक ३ अ समजावा—

रघुपतिभजकाच्या कार्यघाता कधींही ।
नच अमरपते ! तूं आपुल्या चित्तिं वाहीं ।।
नच जर करिशी हें हो अकीर्ती जगीं या ।
असुखहि परलोकीं दुःखपंक्ती अमेया ! ।। ३ अ ।।

सुश्लोकमानस पृ. ९९ अयोध्याकांड उत्तरार्ध तरंग १४ श्लोकांक ३९ नंतर पुढील श्लोक ३९ अ समजावा—

श्रीराम लक्ष्मण सजानकि, देववाणी । ऐकोनि ती सुखित होति अवर्ण्यमानीं ।।
सर्वांसमेत इकडे भरतादिकांनीं । मन्दाकिनीजलिं समाचरिलीं नहाणीं ।। ३९अ

सुश्लोकमानस भाग दुसरा पृ. ११७ अयोध्याकांड उत्तरार्ध तरंग २० श्लोक २९ नंतर पुढील पंक्ति श्लोक ३० व ३०अ समजाव्यात.

जी ज्ञानवैराग्य अशा स्वकूलां । पाडीत वेगें वहतां सलीला ।।
जिच्यांत पूरें भरुनी मिळाले । शोकार्त घोषें नद आणि नाले ।। ३० ।।
राजादि सारे मिथिलापुरींचे । कारुण्यवारीमधिं मग्न साचे ! ।।
शोकोर्मि दुःखें बहु जे उसासे । तुफान वारे सुटलेत भासे ! ।। ३० अ ।।

सुश्लोकमानस भाग २ रा. पृ. ११९ अयोध्याकांड उत्तरार्ध तरंग २१ श्लोक १७ नंतर पुढील श्लोक १७ अ व १८ समजावेत--

फलें अनेकें दल कंदमूलें। पवित्र रम्यें अमृतें रसाळें ॥
वसिष्ठ सर्वांप्रति पाठवीती। भारे भरोनी सकलात्मतृप्ति ॥१७अ॥
पूजूनि देवांपितरां गुरूंना। संतोषवूनी अतिथींहि नाना ॥
देऊनि सर्वांप्रति थोर मान। घेतीं फलाहार सुधेसमान ॥१८॥

सुश्लोकमानस भाग २ रा, पृ. १४५ अरण्यकांड तरंग १ श्लोक २१ नंतर पुढील श्लोक २१ अ समजावा--

मोहामुळें जो प्रभुचा करीत। विद्रोह त्या मृत्युचि होय युक्त ॥
सांडीत सारा परि रोष राम। दयानिधी राघव हा असीम! ॥२१अ॥

सुश्लोकमानस भाग ३ रा, पृ. ६३ लंकाकांड तरंग १३ श्लोकांक ३० नंतर पुढील श्लोक ३०अ समजावा--

स्वांगेंचि चिरडी रागें कपींच्या कोटिकोटिही ॥
मिळवी धूळितें कोटी कपींना पाडुनी महीं! ॥३०अ॥

सुश्लोकमानस सुंदर-लंका-उत्तरकांडांची अनुक्रमणिका

(या भागाचीं एकूण पृष्ठें २२६)

तरंग	विषय	पृष्ठांक
	सप्तम सोपान-उत्तरकांड तरंग १६	९९–१७९
१	मंगलाचरण (श्लोक १ ते ५) हनुमदागमनवर्णन रामाज्ञेनें हनुमान् भरतास रामागमन कळवून परत रामास भरतक्षेम कळवितो.	९९–१०१
२	भरत-समागम-वर्णन, अयोध्येंत आनंदीआनंद	१०१–१०५
३	रामराज्याभिषेकवर्णन	१०५–१०७
४	वेदकृत-श्रीरामस्तुतिवर्णन	१०७ १०८
५	महादेवकृत श्रीरामस्तुतिवर्णन	१०९–११०
६	रामराज्यवर्णन, सुग्रीवनलनील अंगदादिकांचा सत्कार व त्यांना निरोप देणें.	११०–११३
७	श्रीरामराज्यवर्णन	११३–११४
८	रामराज्यवर्णन. अयोध्या, सरयू—बाजारहाट, पुष्पवाटिका इत्यादींचें वर्णन. प्रजेची प्रार्थना व परस्परांस शिकवण.	११५–११८
९	रामराज्यवर्णन, रामराज्यांत दुःखी कोण व सुखी कोण ह्यांचे काव्यमय वर्णन.	११९
१०	सनकादिक श्रीरामदर्शनास येतात. सनकादिकांनीं केलेली श्रीरामस्तुति	११९–१२१
११	श्रीरामांनीं वर्णिलेलीं साधूंच्या व असाधूंच्या स्वभावांचीं लक्षणें.	१२१–१२५
१२	श्रीरामगीतावर्णन.	१२५–१२६
१३	श्रीरामगीताप्रजोपदेशवर्णन.	१२६–१२७
१४	ससमाज–श्रीरामपरमधामगमनवर्णन.	१२७–१२९
१५	भक्तिभूमिकावर्णन.	१२९–१३१
१६	गरुडास शिवोपदेश काय झाला त्याचें वर्णन	१३१–१३४

कृपेनें, कै. श्रीमंत राजेसाहेब औंध यांचे संग्रहांतील] **श्रीरामपंचायतन** [चित्रकारः- कै. **भिवा सुतार**



देवाधिदेव करुणानिधि रामराय । जो कीं शिरोमणिच भूपगणांति होय ॥
तो विश्ववंद्य तुलसीप्रभु पुण्यकीर्ति । सीतापती नमित मी अभिराममूर्ति ॥ २ ॥

सुंदरकांड, मंगलाचरण तरंग १, **सुश्लोकमानस**

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

❋ सुश्लोकमानस ❋

श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

पंचम सोपान

सुंदरकांड

तरंग पहिला

मंगलाचरण

जो शांत शाश्वत अमेय अपाप ईश । ज्या सेविती सतत ते विधि, शंभु, शेष ॥
वेदान्तवेद्य अतिसौख्यद विश्वनाथ । मायामनुष्य हरि राघव मी नमीत ॥१
देवाधिदेव करुणानिधि रामराय । जो कीं शिरोमणिच भूपगणांत होय ॥
तो विश्ववंद्य तुलसीप्रभु पुण्यकीर्ति । सीतापती नमित मी अभिराममूर्ति ॥२॥
नाहीं मदीय हृदयेप्सित अन्य रामा ! । मी सत्य हें वदत तूं सकलान्तरात्मा ॥
दे उत्कटा मजसि भक्ति रघूत्तमा रे ! । कामादि दोषगण चित्तिं नुरोत सारे ॥
निरुपमबलतेजा स्वर्णशैलाभकाया । दनुजविपिनदावा ज्ञानिवर्या नमू या ॥
अखिलगुणनिधाना वानराधीशदेवा । रघुवरवरदूता वातजाता सुभावा ॥४॥

जें बोलिलें वचन सुंदर जांबुवंतें । ऐकोनि हृष्ट हनुमंत अतीव कीं तें ॥
'हे बंधुंनो!' वदत तो 'मम वाट देखा। साहोनि कष्ट फलकंद मुळेंचि तों खा! ॥५
येईन शोधुनिच्च जों जनकात्मजेतें। होईन धन्य, जर कीं मम कार्य हो तें!'॥
बोलोनि हें नमुनि तो सकलां लवोनी । हर्षें निघे हृदिं रघूत्तम सांठवोनी॥६॥
हो सिंधुनीरिं बहुसुंदर एक शैल । तो कौतुकेंच्चि चढि त्यावरि चारुशील ॥
च्चित्तीं स्मरूनि बहुवार रघूत्तमासी। पाहे चहूंदिशि मरुत्सुत शक्तिराशि ॥७॥
ज्या ज्या गिरीवरि पदार्पण तो करीत। पाताळिं तो क्षणिंच लोपत सानुमंत ॥
जैसा अमोघगति सायक राघवाचा। तैसाच्चि तो चलत मारुतिराय साचा! ॥८॥
जाणोनि मारुति रघूत्तमदूत होय । मैनाक खेद हरण्या सृजि अब्धिराय ॥
स्पर्शी करेंच्चि नुसतें कपिराय त्यासी । उद्गारि त्यासि नमुनी निज नम्रशीर्षी ॥९॥
'नेल्याविना सकल सिद्धिस रामकाज। विश्रान्ति होय कसची मजलागिं आज?'
जातां तशा हनुमता सुरसंघ देखे। जाणावया बघति तद्बल बुद्धिलेखे ॥१०॥
धाडीति सर्पजननी सुरसाभिधाना। येऊनि ती वदलि मारुतिला सुजाणा ॥
'आहार आज मजला दिधला सुरांनीं'। तैं बोलला पवननंदन आयकोनी ॥११॥
'येईन मी फिरुनियां प्रभुकार्य होतां। सीतेसि शोधुनि, तसें कळवूनि नाथा॥
मी हा शिरेन वदनीं तव सत्य माय!। आतां नकोच्चि अडवूं! कर हेंचि साह्य'१२
ती जाउं दे न करण्याहि उपायिं त्यास।तोही म्हणे 'करशि कां नच वेगिं घास!'
जों योजनावधि मुखा पसरी निजा ती। हो मारुति द्विगुणविस्तृत भव्यमूर्ति! १३
ती योजनें मग करी निज वक्त्र सोळा। वाढे कपीन्द्र मग बत्तिस योजनांला!
ती वाढवी जसजशी सुरसा स्वतुंड। स्वाकार दुप्पट करी कपिराट् प्रचंड! ॥१४॥
ती योजनें शत, मुखा पसरीत वेगें। तों मारुती स्वतनुतें तनुता अती घे! ॥
जाई त्यांत मग बाहिर ये पुन्हांही। मागे निरोप नमुनी तिजलागिं पायीं ॥१५॥
ती बोलली "मजसि धाडियलें सुरांनीं। त्वद्बुद्धिमर्मबल ये मजला कळोनी ॥
तूं रामकार्य बलसागर बुद्धिराशि। नेशील सिद्धिसि" तया अशि देइ आशी १६
गेली निघोनि सुरसा, कपिही सहर्ष। जाई पुढें अतिजवें क्रमि अंतरास ॥
त्या सागरामधिं निशाचरि एक राही।जी घेइ ओढुनि बलें, उडत्या खगांही॥१७
जे जीव जंतु उडती जरि अंतराळीं। छाया तदीय धरि ती जलिं खालिं आली॥
आकृष्ट ती करुनि खाइ तशा खगांना।ती मारुतीसिहि धरूं बघे युक्ति नाना१८

जाणोनि तत्कपट मारुति तीस मारी । लंघोनि सागर रिघे कपि पैल तीरीं ॥
देखे तिथें पवननंदन वृक्षशोभा । गुंजारवा करिति भृंग मरंदलोभा ॥१९॥
पुष्पें फळें तरुवरीं बहु शोभणारीं । पक्ष्यां मृगां बघुनि हो मनिं हर्ष भारी ॥
पाहे पुढेंचि कपि एक विशाळ शैल । निर्भीक त्यावरि चढे कपिराट् सलील २०
प्रौढी उमे ! न कपिची गण यांत कांहीं । हें काळभक्षि विभुचें बळ सर्व पाहीं ॥
त्या पर्वताग्रि चढुनी कपि पाहि लंका । जी दुर्गमा अतिशयें सकलां, न शंका २१
उत्तुंग ती नगरि वेढिलि अब्धिनें जी । सौवर्ण कोट विलसे अतिदिव्य तेजीं
अत्यंत रम्य मणिरत्निं विराजलेला । विस्तीर्ण रुंद तट सुंदर त्या पुरीला॥२२
चौहाट, हाट पथ उत्तम शोभणारे । नानाप्रकार गजवाजि रथादि सारे ॥
सेना पदाति गण यां गणना असेना । नानास्वरूप रजनीचर यूथ नाना २३
बागा वनें उपवनें सर कूप वापी । शोभायमान नगरी अतुलस्वरूपी ॥
गंधर्वदेव नर नाग मनोज्ञ कन्या । ज्या मोहतील मुनिचित्तहि रूपधन्या ॥२४
कोठें कुठें तनुविशाल बलाढ्य मल्ल । व्यायामशील, घनगर्जितयुक्त शैल ॥!
कुस्त्या करीति बहु तर्जुनि एकमेकां । त्यांचें यथार्थपरि वर्णन शक्य हो कां ?२५

नगर रक्षिती सर्व दिशीं बहुकोटि विकटतनु राक्षस ते ।
दुष्टनिशाचर भक्षिति गर्दभ, महिषी अजनरधेनूंतें ॥
यास्तव तुलसीदासहि त्यांतें संकोचानें वर्णितसे ।
सर्वां परि, त्यां, प्रभुशरतीर्थीं उद्धाराचें भाग्य दिसे! ॥ २६ ॥

पाहोनि ते नगररक्षक भूरिसंख्य । चित्तीं करीत सुविचार कपींद्रमुख्य ॥
घेऊन रूप अतिमात्र लघू असेंच । जावें निशीं प्रविशुनी नगरांत साच २७

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने ‘ सुश्लोक-मानसे ’ सुन्दरकाण्डे श्रीहनुमद्बलबुद्धिवर्णनन्नाम प्रथमस्तरङ्गः ॥

तरंग दुसरा

घेऊन सान मशकासम रूप जात । लंकेप्रती कपि मनीं नृहरी धरीत ॥
तैं लंकिनी निशिचरी कपिलागिं भेटे । बोले ‘ कसा चुकवुनी मज जाशि वाटे! ॥ १
माझें न मर्म तुज ठाउक कीं शठा रे । जे चोर ते असति मत्प्रिय भक्ष्य सारे!’ ॥
हाणी महाकपि तिला निजमुष्टिघातें । तैं ती पडे क्षितिधि ओकत रक्त कीं तें ! २

ती लंकिनी उठत सांवरुनी पुन्हांही । जोडोनि अंजलि वदे विनयें वचें हीं ॥
'जेव्हां विधी वितरि तो वर रावणासी । तेव्हां मलाहि वदला खुण तोचि ऐसी ॥
'होशील जैं विकल तूं कपिच्या प्रहारें।तेव्हां विनाशि गण राक्षस जाति सारे!' ॥
हें होय पुण्य मम थोर अतीव आजि। कीं रामदूत करि धन्यचि दृष्टि माझी! ॥४॥
तें स्वर्गमोक्षसुख हीं मिळुनी जरीं कीं । तोलीयलीं कुणि तुलेमधि सर्व लोकीं ॥
देतील तीं उभय ना लवही कदाही । सत्संग देत सुख जें घडि चाहि पाहीं ॥५॥
लंकेंत तूं शिरुनि रे ! करिं सर्व कार्या । चित्तांत वागवुनि राघव रामराया ॥
ज्याचेवरी प्रभु दया करि त्यास होई । पीयूषसें विषहि मित्रपरी अरीही ॥६॥
श्रीराम ज्या सकृप पाहि,तयास होतो । कीं गोष्पदासमचि अब्धिहि केवढा तो ! ॥
त्यातें सुमेरुहि गिरी जणुं रेणुसाच । अग्नीहि शीतळपणा धरि त्यास साच !' ॥
घेऊनि तैं अतिलघू हनुमान् स्वरूप । लंकेंत जाइ नमुनी प्रभुसी अपाप ॥
शोधीत तो प्रतिगृहीं फिरला अमूप । सर्वत्र त्या दिसति वीरचि मात्र खूप ॥
जाई पुढें कपिहि रावणमंदिरांत । वैचित्र्यहर्म्य नच वर्णन शक्य होत ! ॥
तैं तो बघे शयनसुप्त दशाननातें । सीता न तेथ दिसली परि त्याजला ते ॥९॥
प्रासाद त्यास दिसला अतिरम्य एक । ज्यामाजिं देवघर निर्मियलें सुरेख ! ॥
रामायुधांकित विभा कशि वर्णु यावी । देखे प्रहृष्ट तुलसीतरुराजि तेवीं ! ॥
लंका निशाचरगणा वसती अशेषा । कैसा करील तरि सज्जन येथ वासा ? ॥
ऐसा विचार कपिराय मनीं करीत । तों होय जागृत बिभीषण रामभक्त ११
'श्रीराम ! राम !' वदनीं करि तो सुघोष । जाणोनि सज्जनखुणां कपि मानि तोष ॥
चित्तीं म्हणे'करुनि ओळख घ्यावि याची।ना कार्यहानि कधिं साधुमुळें असेचि'
तो विप्ररूप धरुनी करि वेदघोष । येई बिभीषण क्षणीं परिसोनि त्यास ॥
वंदोनि त्यासि कुशला पुसुनी विनीत । प्रार्थी 'द्विजा! मज कथा सगळें स्ववृत्त
आहां तुम्ही कवण कीं हरिचेच दास? । माझ्या मनीं उपनला अतिथोर हर्ष ॥
दीनानुरागि तुम्हि राघव रामराय । आलांत धन्य करण्या मजलागिं काय ?' ॥
सांगे तदा पवननन्दन आत्मनाम । श्रीरामवृत्तहि निवेदित भक्तिधाम ॥
तें ऐकतांच पुलकांकित दोंहि होती । श्रीरामसद्गुणगणीं भरि चित्तवृत्ति ॥१५
"हे मारुते ! परिस मी वसतों कसा रे । जिह्वा विचारि दशनांतरिं जवि थारे ॥
केव्हां बरें मजसि जाणुनियां अनाथ । तो सूर्यवंशविभु हो करुणार्द्रचित्त १६

ये तामसी मम तनू नच साधना हे । न प्रीति राघवपदांबुजि नीट राहे ॥
विश्वास आज परि हे हनुमंत ! येत । भेटेल ना हरिकृपेविण साधुसंत ॥१७॥
केली कृपा रघुवरें मज आज मोठी । कीं दाविलें तव पदाब्ज मदीय दृष्टी " ॥
'ऐकें बिभीषण ! अशी प्रभुची सुरीति । कीं सेवकावरि रती अति रामचित्तीं १८
मी काय थोर कुलिंचा ? कपि जन्मजात । जात्याच चंचल अभाग्यहि सर्वरीत ॥
जे घेति नाम अमुचें उठुनी सकाळीं । त्यांतें उपासचि तया दिनिं ये कपाळीं ! ॥
ऐसा जरी अधम मी तरि देख कीं हें । माझ्यावरी रघुपती करुणाचि वाहे! ॥
ऐशी कृपा प्रभु करी सखया!' म्हणोनी। त्या आठवोनि विभु, लोचनिं येत पाणी॥
जाणोनिही प्रभुवरा विसरोनि चित्तीं । सर्वत्र जे भ्रमति, दुःखिं न केविं होती?॥
ऐशापरीं स्तवुनि रामगुणां अनंतां । होई अनंतसुख त्या बहु भाग्यवंता॥२१॥
सांगे बिभीषण पुढें सगळेंचि वृत्त । जैशापरी जनकजा वनिं राहि तेथ ॥
तेव्हां विचारि पवनात्मज 'सांग, बन्धो!। मी केविं तीप्रति बघूं शकणार साधो?'
त्यातें बिभीषण तदा सुचवीत युक्ति । घेई निरोप क्षणिं मारुति ऐकुनी ती ॥
घेऊनि रूप पहिल्यापरि तें फिरून । गेला अशोकवनिं मारुतिराय तूर्ण॥२३॥
चित्तांत मारुति नमी बघतांच तीतें । रात्रीं वसे प्रहर एक अशोकिं कीं तें॥
होती कृशा तनु जटा शिरिं, एकवेणी । चित्तासि जी रमवि राघवसद्गुणांनीं॥
दृष्टी जिनें निजपदावरिं ठेविलेली । चित्तांत रामचरणांवरि वृत्ति ठेली ॥
ती जानकी परमदुःखित दीन ऐसी । साध्वी तदा दिसलि मारुति-लोचनांसी ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे सुन्दरकाण्डे श्रीहनुमद्विभीषणसंगमवर्णनन्नाम द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

राहे दडून कपि तो तरुपल्लवान्तीं । 'कैसें करूं पुढतिं?' हाच विचार चित्तीं
तों तेवढ्यामधिंच रावण येत तेथ । संगें अनेक युवतीपरिवार होत॥ १ ॥
सीतेसि तो खल अनेकपरीं बुझावी । तो सामदाम भयभेद अनेक दावी ॥
बोले "अगे सुमुखि ! एक शहाणि होशी । मंदोदरी-प्रभृति होतिल तूज दासी!॥
ऐसें करीन शपथें तुज सांगतों हें । गे ! एक वार तरि तूं मजलागिं पाहें !"
हातीं तृणा धरुनि बोलिलि त्यासि सीता । रामा स्मरूनि हृदयीं करुणाधिनाथा ॥

'हे आयकें दशमुखा ! नलिनीस केवीं। खद्योततेज फुलवील विशुद्ध भावीं।।
ऐसा विचार करिं रे!' वदली पुढेंही। 'दुष्टा! न आठविसि रामशरासि कांहीं!
शून्याश्रमांतुनि मला हरिलेंसि चोरा!।निर्लज्जचित्त तुज खंत न या प्रकारा!'।।
खद्योत आपण, रघूत्तम भानुसाच। ऐकोनियां परुष भाषणही तसेंच।।५।।
क्रोधायमान हृदिं रावण हो अतीव। काढोनि खड्ग वदला तिज दुष्टभाव।।
'सीते! मला बहुपरीं अपमानिलेंस। या तीक्ष्ण खड्गिं तव कापित मीच शीर्ष
नाहीं तरी क्षणिंच मान मदीय वाणी। चंद्रानने! मग न हो तव जीवहानि'
सीता वदे "करिकरोपम ती विशाल।नीलाब्जदामसम सुंदर चारुशील।।७।।
ऐसी रघूत्तमभुजा मम कंठिं बैसे। किंवा तुझा असि तरी अति घोर रोषें!
हे रावणा! मम असा पण ऐक नीट। रे चंद्रहास! मम तूं हर तापकष्ट।।८
श्रीरामचंद्रविरहाग्नित मी जळें ही। होईल शीतल निशा असिधार पाहीं!।।
ती ही हरो तव करीं मम दुःखभार"। ऐकोनि रावण तिला वधुं पाहि उग्र।।
मंदोदरी करि तयाप्रति नीतिबोध। त्या आवरीत विनयें करुनी विरोध।।
बोलावुनी वदत रावण राक्षसींसी। "सीतेप्रती छळ करा अतिमात्र रोषीं।।
ही होय ना वश मला जर एक मासीं।कापीन मी हिजसि या असिनें न कैसी!"
गेला गृहासि दशशीर्ष; पिशाच्चिसंघ। सीतेसि तो बहुपरी छळि पापसंग।। ११

होती त्यांत परी एक त्रिजटा नाम राक्षसी।।
जीची रामपदीं प्रीती सुविवेकयुता अशी।। १२।।
सर्वां बोलवुनी बोले त्रिजटा "स्वप्न देखिलें।।
सीतेसि सेवुनी साधा सख्यांनो! हित आपुलें!।। १३।।
स्वप्नीं मीं देखिली लंका जाळिली ही कपीश्वरें।।
सर्व राक्षससेनाही वधिली कुपितांतरें।। १४।।
नग्नसा गर्दभारूढ दशशीर्ष बघीतला।।
शिरें ज्याचीं छेदिलेलीं भुजाभारहि खंडिला!।। १५।।
ऐशापरि रिघाला तो दक्षिणेप्रति रावण।।
लंकाराज्यीं बैसवीला पाहिला म्यां बिभीषण।। १६।।
सर्वत्र रामराजाची नगरीं द्वाहि ती फिरे।।
सीतेप्रती बोलवूनी घेई श्रीराम सत्वरें।। १७।।

वदतें स्पष्ट हें माझें स्वप्न मी आपणां खरें ॥
होईल सत्य हें सारें त्रिचतुर्दिवसांतरें " ॥ १८ ॥
ऐकोनि वच तें भ्याल्या सर्वही राक्षसी मनीं ॥
जानकीचरणाब्जातें नमस्कारिति तत्क्षणीं !! ॥ १९ ॥
जिकडे तिकडे जातां दूर सर्व निशाचरी ।
सीता करि विचारातें चिंतामग्न निजांतरीं ॥ २० ॥
'एक मासामधें खास मजलागिं वधील कीं ।
नीच राक्षस हा क्रूर कपटी पापि घातकी !' ॥ २१ ॥

जोडोनि हात मग ती त्रिजटेस सांगे।"माते! विपत्तिमधिं आश्रय तूंच हो गे!
प्राणान्त येथ करण्या वद तूं उपाय । हा होतसे विरह कीं मजला असह्य ॥
काष्ठें चिता रचुनि तूं मज देइं माते! । दे अग्नि तूं जननि गे! मम या तनूतें
मत्प्रीति सत्य करिं तूं त्रिजटे! शहाणी"।ती केविं हो श्रवणिं शूलचि सह्य वाणी
ऐकोनि तें, शिरिं नमी त्रिजटा तियेसी । रामप्रतापबल ती तिज वर्णि तोषीं ॥
" रात्रीं न अग्नि मृदुले! न मिळेल येथ "। सांगोनि हें गृहपथा त्रिजटा धरीत ॥
सीता म्हणे " विधिच की प्रतिकूल मातें । अग्नीहि ना मिळतसे; नच दुःख जातें
आकाशिं हे दिसति वह्निसमान तारे । ना एकही मजसि भूतलिं तो उतारे!॥
हा चन्द्र अग्नि असुनी ठिणगीहि दे न! । तो जाणतो हृदयिं मी हतभागि पूर्ण ॥
ऐकोनि मद्विनति हा तरुही अशोक । नामासि सार्थ करु, वारु मदीय दुःख॥२६
हे अग्निसेच तव पल्लव रे! नवीन । तूं अग्नि देचि मज आणुं नकोस विघ्न!"॥
पाहोनि ती विरहदु:खित तेविं सीता । झालाच कल्पसम तो क्षण रामभक्ता ! ॥
चित्तीं विचार करि मारुति आणि टाकी । तो खालतीं प्रभुकराश्रित मुद्रिका कीं
'अंगार काय दिधला मजला अशोकें!' वाटोनि हें जनकजा करिं घेत तोषें!॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोक-मानसे महाकाव्ये सुन्दरकाण्डे श्रीजानकीरावणसंवादवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः ॥

तरंग ४ था

तों देखिली अति मनोहर मुद्रिका ती श्रीरामनामशुभमुद्रित चारुमूर्ति ॥
ती होय तेविं चकिता बघतांचि तीतें । हो हर्ष त्यापरि विषादहि थोर चित्तें!॥

'जिंकील कोण ! रघुराज असे अजेय । ना मुद्रिकाहि कपटें अशि शक्य होय' !॥
नाना विचार करि मानसिं ऐसि सीता । तों गोड शब्दिं हनुमान् सुखवीत चित्तां
श्रीरामचंद्रगुणवर्णन तो करीत । सीता जया परिसतां मनिं होत तुष्ट ॥
बोले सती 'अमृतधारचि कर्णि ओती । जो हे कथा, नयनिं पाहिन तो सुमूर्ति !' ॥
तेव्हां तिच्याजवळि मारुतिराय येई । तों शंकिता फिरवि पाठ तयाकडे ही ॥
"हे आइ जानकि ! गणीं मज रामदूत । श्रीरामरायशपथें कथि सत्य उक्त ॥४॥
म्यां आणिली जननि गे ! प्रभुमुद्रिका ही । ही खूण तो मज दयानिधि राम देई" ॥
सीता विचारि 'नरवानरमैत्रि कैसी ?' । सांगे समग्र मग मारुति वृत्त तीसी ॥५॥
सप्रेम तें वचन मारुतिचें श्रवोनी । विश्वासलें जनकजामन साधुगानीं ॥
हा देहवाङ्मनिं असे करुणाब्धिदास । ऐसें तिच्या कळुनि ये क्षणिं मानसास ॥
जाणोनि दास हरिचा मनिं भक्ति दाटे । रोमांचली तनु, विलोचनिं अश्रु लोटे ! ॥
सीता वदे "बुडत मी विरहाब्धिमाजीं । होतें, परी सुखद नावचि होशि माझी ॥
ओवाळिलें तुजवरूनिच मी स्वकाय । आहेत सानुज सुखामधिं नाथ काय ! ॥
श्रीराम कोमलमना करुणानिधान । झालेत निष्ठुर कसे मज ते सुजाण ॥ ८ ॥
ज्यांचा स्वभावचि सुखी करणें स्वदास । माझी स्मृतीहि नच राहिलि कां तयांस ! ॥
केव्हां बरें नयन हे मम शांत होती । पाहोनि ती मृदुल नील-सुचारुमूर्ति ! ॥ ९ ॥
मातें कसे विसरले तरि राम ! ' ऐसें । बोले, न शब्द उमटे जल नेत्रिं वर्षे ! ॥
पाहोनियां विरहदुःखित जानकीतें । बोले विनीत कपि तो मृदुलें सदुक्तें ॥१०॥
"माते ! असे कुशल सानुज रामराय । कारुण्यधाम तव दुःखिं सुदुःखि होय ॥
शंकाहि ना हृदयिं तूं लवमात्र घेचि । प्रीती दुणी तुजहुनी तव ठायिं त्याची ! ॥
घेऊनि धैर्य हृदिं ऐकचि राघवाचा । संदेश जो कथिन मी तुज योग्य वाचा" ॥
बोलोनि मारुति असें उगाच राहे । येई गळा भरुनि लोचनिं नीर वाहे ! ॥
बोले पुढें "वदत राम' तुझ्या वियोगें । सीते ! मला सकलही विपरीत हो गे ! ॥
वह्नीचसी गमलि पालवि कोवळी ही । कीं कालरात्र रजनी उन्ह चंद्रिकाही ॥
इंदीवरें गमतिं कुंतसमूह तीक्ष्ण । कीं तप्त तेल जणुं वर्षत मेघ जाण !१॥
दे त्रास सावलि मला सकलां तरूंची । फूत्कारसा त्रिविध वायु मनासि जाची ॥
सांगोनियां दुसरिया, जरि दुःख सोसे । सांगूं कुणां ? नच दिसे कुणि जाणि ऐसें
जें प्रेम मन्मनिं तुझ्यावरि सत्य होय । जाणे मदीय मन एकचि तें अमेय ॥

"तेंहि प्रिये ! मन तुझ्यामधिं नित्य राहे । तूं यांत जाण सगळें रससार पाहें ' " ॥
संदेश ऐकुनि असा प्रभुमानसींचा । ती प्रेममग्न विसरे तनुभाव साचा ! ॥
बोले तदा पवननंदन "धैर्य घेई । सीते ! स्मरोनि विभु सेवकसौख्यदायी ॥
आणीं मनीं रघुपतिप्रभुचा प्रभाव । ऐकें मदुक्त; हृदिंचा त्यज भीतिभाव ॥
या सर्व राक्षसगणां गण तूं पतंग । श्रीरामचंद्रशरसंघ कृशानुसंग ॥
तूं धीर सोड न मुळीं मनिं हेंचि घेई । झालेच दग्ध जणुं राक्षस मान आई ! ॥
होता जरी रघुवरा तव ठाव ठावा । ना लागता क्षण विलंब विभूसि केव्हां ॥
श्रीरामचंद्र जणुं भानुसमान मान । त्या राक्षसां समज गे ! तिमिरासमान ॥
आतांच घेउनि तुला असतों निघालों। आज्ञेसि घेउनि तशा प्रभुच्या, न आलों !
हें सत्य रामशपथें करुनी वदें मी । यासाठिं धीर धर कांहिं दिनानुगामी ॥२०
येईल तों कपिसमूहसमेत राम । नाशील राक्षसगणांप्रति तो निकाम ! ॥
नेईल तो परत गे ! तुजला निराधि । त्रैलोक्यि गातिलचि तें यश नारदादि "
सीता पुसे ' असति का तुजसे कपी ते ? । हे वीर राक्षस बलोद्धत युद्धकर्ते
संदेह यास्तव मला बहु वाटताहे ' । तें ऐकतां प्रकट हो कपि आत्मदेहें !॥२२
सौवर्ण भूधर विशाल शरीर तैसें । युद्धीं भयंकर, बलिष्ठ कपीन्द्र भासे ॥
सीता धरी भरवंसा बघतां तयाला । तों मारुती फिरुनियां लघुरूप झाला ! ॥
सीतेसि सांगत 'जरी नसती कपी ते। बुद्ध्या विशाल बलशालि विशेष माते !॥
रामप्रताप परि होय समर्थ ऐसा । खाईल कीं अहि लघुहि पहा, खगेशा ' ॥
ऐकोनि मारुति-वचा अति हृष्ट सीता । भक्ति प्रताप बल त्यांत दिसून येतां
रामप्रिया समजुनी तयिं देइ आशी। 'होशील रे ! अमितशीलबलाढ्यराशि ॥
वत्सा ! गुणाब्धि अजरामर नांदशील । होशील राघवमनीं प्रिय चारुशील '॥
श्रीरामचंद्र करतील कृपा अपार, । हें ऐकतांच हनुमान् मनिं हृष्ट फार २६
सीतापदाब्जि बहुवार नमी लवोनी । बोलेहि जोडुनि करांबुज गोड वाणी ॥
"झालों असे जगतिं मी कृतकृत्य माते ! । आशीषच तव अमोघ मिळालिं मातें
हें ऐक आइ ! मज लागलि भूक भारी । पाहोनि सुंदर फळें तरुंना समोरी "
सीता म्हणे ' असति राक्षस राखणारे । मोठे बलाढ्य, असती बहु, ऐक बा रे!'
बोले कपीन्द्र ' मज भीति तदीय नोहे ! । तूं तें रुचेल तर काढुनि भक्षितों हे '
देखोनि बुद्धि बल मारुतिचें विशाल। सीता वदे "कपिवरा ! वनिं जा खुशाल

चित्तांत आठवुनि रामपदारविंदां । तूं खा फळें मधुर—सत्तम सौख्यकंदा !"
तेव्हां नमूनि विनयें जनकात्मजेसी।आरंभि मारुति शिरे फलराशि भक्षी३०

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे सुन्दरकाण्डे श्रीजानकीहनुमत्संवादवर्णनन्नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

मोडीहि तो तरु अनेक बलेंकरूनी । मारीहि रक्षसगणां कुटुनी करांनीं ॥
जाती कितीक पळुनी झणिं रावणातें । आक्रंदती कटुरवें भयभीत कीं ते ॥१
'आला बलाढ्य कपि एक वनांत नाथ ! । तेणें अशोकवन मोडियलें समस्त॥
खावोनि पुष्कळ फळें उपटी तरूंतें । पाडोनि राक्षस भुईवरि मर्दिले ते!' २
ऐकोनि रावण, झणीं भट धाडि नाना । गर्जोनि पाहि हनुमान् अति हृष्ट त्यांना
संहारि मारुति निशाचर सर्व लीलें।गेले तयांतिल पुन्हां कुणि अर्धमेले ॥३॥
तैं रावणें तनय अक्षय पाठवीला । तो चालला सहित राक्षसवीरमेळा ॥
येतां तया बघुनि मारुति वृक्षपाणि । तर्जोनि संहरि; भरी नभ गर्जनांनीं ॥४
कांहीं तयें वधियले, किति मर्दियेले। कांहीं धुळीं मिळविले, झणिं लोळवीले!
त्यांतून जाति कुणि राक्षस रावणासी।त्या सांगती 'प्रभुवरा ! कपि शक्तिराशि!'
ऐकोनि पुत्रवध रावण रुष्ट फार । तो मेघनाद बलशालि विसर्जि वीर ॥
सांगे तया 'वधुं नको कपिलागिं बांध !। आणोनि दाखव कसा कपि कोण? शोध'
चाले तदा अतुल तो बलि मेघनाद । संक्रुद्ध बंधु—निधनास्तव वैरबद्ध ॥
तैं मारुती बघि भयंकर वीर येत । धांवे तयावरि कडाडुनि खात दांत!॥७
घेई विशाल तरु तो उपडून तूर्ण । तो मेघनादरथ मोडि, करीत चूर्ण !॥
जे त्यासमेत कुणि राक्षसवीर होते । तो लोळवी अति विमर्दुनियां तयांतें ॥
निःपात त्यां करुनि गांठित मेघनादा । दोघे तदा स्मरविती गजराजयुद्धा !॥
हाणोनि मुष्टि चढला कपि वृक्षशाखे । हो मेघनाद पळ मूर्च्छित त्या धडाकें
ठाके पुन्हां उठुनि दावित युद्धमाया । मानोनि मारुति अशक्यचि आंकळाया
ब्रह्मास्त्र योजि अभिमंत्रुनि मेघनाद । तेव्हां विचार करि मारुति हें सुबुद्ध ॥
' ब्रह्मास्त्र-मान जर ठेविन मी न आतां । त्याचा रिघेल महिमा जगतांत अस्ता'
तो ब्रह्मबाण करि जर्जर मारुतीतें । संहारि राक्षस किती कपि आत्मपातें! ॥

पाहोनि मूर्च्छित अशा पवनात्मजासी । ने मेघनाद क्षणि बांधुनि नागपाशीं
ऐकें भवानि ! जपतांक्षणिं नाम ज्याचें । ज्ञानी करीति भवबंध विदीर्ण साचे
तद्दूत तो तरि कशापरि बद्ध व्हावा ? । तो आत्मबंधनिंहि दावित नाथसेवा
ऐकोनि बद्ध कपि, राक्षस तूर्ण येती । सारी सभा बघत कौतुक येउनी ती ॥
तो पाहि रावण सभेप्रति आंजनेय । जीची विभा अतिविशाल अवर्णनीय ॥
जोडोनि हस्त सुर दिक्पति नम्र जेथ । लंकेश्वरभ्रुकुटितें भिउनी बघीत ॥
निःशंकचित्त कपि देखत त्या प्रतापा । जैसा खगेश्वर बघे अमितांहि सर्पा ॥
हांसे दशानन कपीस तशा बघूनी । निंदीहि दुर्वचनिं त्यासि कठोरवाणी १५
तों आठवूनि निजनंदन–घात चित्तीं । होऊनि खिन्न मनिं, बोलत त्या निजोक्ति
' हे वानरा ! कवण तूं ? कवण्या बळानें । केलेंसि नष्ट अजि कानन ह्याप्रमाणें ?
तूं ऐकलेंसिहि न कीं मम नाम कर्णीं । चोरा ! न ये लवहि भीति तुला दिसोनी
कां मारिलें निरपराध निशाचरांना । प्राणां तुझ्या शिवलि भीति शठा ! कशी ना ?
" रे रावणा ! परिस यद्बलिं सर्वसृष्टि । माया सलील विरची क्षणिं विश्वकोटी
ज्याच्या बळें विधि रमेश महेश देव । निर्मीत, रक्षित, विनाशित विश्व सर्व
ज्याच्या प्रतापिं निजशीर्षि सहस्रशीर्ष । वाहीतसे गिरिनद्यांसह विश्वकोष ॥
जो देवरक्षक अनेक तनू धरोनी । ताळयास आणि तुझियासम दुष्ट कोणी ॥
जो भंजि शंकरशरासन वज्रसार । भूपालसंघमद त्यासह नाशि पार ॥
नाशी खर त्रिशिर दूषण तेविं वाली । जो सर्व हे अतुल दारुण शक्तिशाली ॥
ज्याच्या बलांश-लवलेशिं चराचरा या । झाडून सर्व जगतां जिणलेंसि राया ॥
ज्याची सती प्रियतमा हरलीस तूं रे ! । त्याचाच दूत मजला गण सत्प्रकारें
आहे पराक्रम तुझा मम सर्व ठावा । तूं कार्तवीर्यसह जिंकिशि युद्धिं दावा
वालीसवेंदि लढुनी यश मेळवीशी ! । मी जाणतों सकल रे तव कीर्ति कैशी ! " ॥
ऐकोनि मारुतिवचा विहसोनि कांहीं । लंकेश तो विषय तेथचि रोधुं पाही ॥
बोलेहि मारुति पुढें " क्षुधितांतरीं मी । तोडूनि सेविलिं फळें प्रभु ! वृक्षगामी ॥
खोड्या स्वभाविं कपि हा तरु मोडि कांहीं । सर्वांसि आवडि विशेषचि आत्मदेहीं
मारीति राक्षस मला कुमती कुमार्गी । जे मारिती मज, तयां वधि मीच वेगीं
हा इंद्रजित् सुत तुझा मग बांधि पाशीं । आणोनि ठेवित मला क्षणिं तूजपाशीं ॥
लज्जा न कांहिं मज यापरि बांधिल्याची । मी स्वामिकार्य करण्यांप्रति सर्व वेंची ॥

प्रार्थीत मी तुजसि रावण ! बद्धपाणि । टाकून गर्व धर हे उपदेशवाणी ॥
तूं आपुला कुलविचार पहा करूनी । भ्रांति त्यजून, मनिं भक्तकृपाळ आणीं॥
ज्याच्या भयें अतिशयें मनिं काळ भीत । जो हे चराचर सुरासुरही असीत॥
त्याच्याशिं वैर कधिंही करुं तूं नकोस । दे मद्वचें परत त्याप्रति जानकीस !॥
कारुण्यधाम विभु राम खरारि तूंतें । रक्षील विस्मरुनियां अपराध ते ते ॥
तूं जाच रे ! शरण त्या प्रणताधिपाला । चित्तांत ठेव रघुनाथपदांबुजाला ॥२८
लंकेवरी अचल राज्य सुखें तुझें हो । इंदू पुलस्तियश निर्मल नित्य राहो ! ॥
होऊं नकोसचि तयावरि तूं कलंक । सोडून मोह मद चित्तिं विचार राख ॥२९
श्रीरामनामविण शोभत नाहिं वाणी । वस्त्राविना युवति भूषित भूषणांनीं ॥
रामासि जे विमुख तत्प्रभुताधनादि । नासो असो गत अनागत, तुल्य आधि
ज्यांतें मुळीं न जलनिर्झर, त्या नद्यांचें । वर्षेंच तोंच जल, ना तरि शुष्क सार्चे !
मी निश्चयें कथितसें दशकंधरा ! हें । त्राता न रामविमुखा कधिं कोणि आहे ! ३१
जो द्रोह रामचरणां करणार त्यासी । ब्रह्मे सहस्र हरि शंभु कुणी न रक्षी ! ! ॥
टाकीं तमोगुणचि दुःखद मोहमूल । सोडूनि दे दुरभिमान मनामधील ॥ ३२

भगवान् करुणासिंधू श्रीराम पुरुषोत्तम ।
तया शरण तूं जा गा ! भक्तिभावें तयीं रम ! " ॥३३॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोक-
मानसे सुन्दरकाण्डे श्रीहनुमद्रावणसंवादवर्णनंनाम
पञ्चमस्तरङ्गः ॥

तरंग ६ वा

होती जरी कपिगिरा हितदा अती ती । जेथें विवेक विरती नय थोर भक्ति ।
बोले दशानन हंसोनि महाभिमानी । " तूं मर्कटा ! गुरु महाबुध लब्ध कोणी ! १
दुष्टा ! तुझ्या निकट मृत्युच पातलासे । जें देशि नीच मज तूं उपदेश ऐसे"॥
' होईल हें चि उलटें ! ' वदतो कपी तो ।' झाला मतिभ्रम तुला; मज दृश्य होतो '
ऐकोनि हें वदत रावण फार रोषें । " माराच ठार झणिं या कपिलागिं कैसे ! "॥

ऐकोनि धांवति निशाचर त्या वधाया । ये मंत्रिसंगत बिभीषण त्याच ठायां १
तो नम्रशीर्ष विनवी बहुतां परींनीं । " तोडा न नीति तुम्हि दूतवधा करूनी ॥
नाथा ! करा उचित अन्याचि दंड कांहीं!' सारे तदा म्हणति ' गोष्ट भली खरी ही'
ऐकोनि हांसुनि वदे दशकंठ वाणी । " द्या अंगभंग करुनी कपितें पिटोनी ! " ॥
सर्वां दशानन वदे "कपिलागिं चित्तीं । प्रीति स्वपुच्छि अतिमात्रचि वाटते ती ॥
तेलामधें भिजविल्या पटिं पुच्छ बांधा । द्या पेटवूनि मग त्या अनलें सबंधा ॥
जाईल तो निजगृहा परतोनि लांडा । नाथासमेत मग येइल येथ चांडा ! ॥
ज्याची बढाइ बहु बोललि वानरें या । त्याच्या बघूं तरि अम्ही सुविशेष धैर्या '! ॥
ऐकोन रावणवचा कपि चित्तिं हासे । ' वाग्देवताच मज साह्य करीत ऐसें ' ! ॥
तें ऐकतांच वच त्यापरि रावणाचें । ते मूर्ख राक्षस करीति तसेंच साचें ॥
लंकेंत राहि न मुळीं घृत वस्त्र तैल । जों वाढवीत कपि पुच्छ निज स्वलील८
देखावया कुतुक तें पुरवासि येती । मारीति मारुतिस ते पदिं आणि हातीं ॥
टाळ्या पिटीति किति ढोलहि वाजवीती । काढूनि फेरि पुरिं शेंपुट पेटवीती ॥
झाला ज्वलन्त बघुनी हनुमंत अग्नि । घेई क्षणांत लघुरूपतनू करूनी ॥
जाई चढून मग हेमगृहोच्चदेशीं । पाहोनि भीति अति राक्षसिणी तयासी! ॥
वाहेहि त्याच समयीं अतिमात्र वात । ज्या प्रेरणा करितसे भगवंत मूर्त !१०
गर्जोनि मारुति तदा करि अट्टहास । होई महावपु कपी भरि कीं नभास !
होई विशाल हनुमंत अति त्वरेनें । धावे गृहाहुनि दुज्या गृहिं या तऱ्हेनें ॥
हो दग्ध तें नगर, लोक भिऊन गेले । ते अग्निनें सकल वेढियले कराळें ॥
'हा तात ! हा जननि!'फोडिति सर्व टाहो। 'यांतून वांचविल कोण अम्हां अतां हो!
होतोंच सांगत अम्ही,"कपि हा न कोणी । हा देव येइ कुणि वानररूपवर्णी ॥
साधुच्छलें फल असेंचि मिळावयाचें ! । झालें अनाथपरि हें पुर भस्म साचें !" ॥
तें जाळिलें नगर की निमिषांत एका । ना जाळिलें परि बिभीषणसद्म जें कां ॥
अग्नी जयें सृजियला गिरिजे! प्रभूत । तद्दूत तो म्हणुनि दग्ध तयें न होत ॥
जाळूनि सर्व नगरी इथुनी तिथूनी । मारी कपी जलधिमाजिं उडी वरूनी ॥
पुच्छास तो विझवि, घालवि शीण कांहीं । टाकी विशालतनुता, लघुरूप होई ॥
ठाके उभा जनकनंदिनिचे समोर । जोडोनि पाणियुगलांबुज भक्तिनम्र ॥१६

" मला माते ! द्यावी कवण तरि ती खूण अपुली ।

जशी देई मातें रघुवरहि तो अंगठि भली " ॥
तदा सीता देई विमलमति चूडामणि निज ।
खुणेसाठीं त्यातें प्रमुदित मनें घे पवनज ॥ १७ ॥
वदेही एँसे ती " नमन मम सांगे प्रभुवरा; ।
असे पूर्णाकांक्ष प्रभु अखिल रीतीं, न दुसरा ॥
दयाळू दीनांचा करुच अपुलें ब्रीद सुफल, ।
हरावी नाथांनीं मजवरिल आपत्ति अतुल ! ॥ १८ ॥
जयन्ताची सारी कथन कर तूं त्यांप्रति कथा ।
प्रभूंच्या बाणाचें बल अमित त्यां जाणविं, सुता ! ॥
जरी ना ते येती प्रभु इथवरीं तीस दिवसीं ।
तरी ना मी त्यांतें गवसिन जिती भासत मसीं ! ॥ १९ ॥
कसे मीं राखावे असु मम मला सांग सखया ! ।
' निघोनी मी जातों परत ' म्हणसी तूं हि मज या ॥
तुला देखोनीयां हृदय मम धालें किति मनीं ॥
निघोनी तूं जातां, मजसि दिन ते ! त्याच रजनी ! " ॥ २० ॥
बहुपरिं समजावी मारुती जानकीतें । वदत तिजसि " सोडी ना मुळीं धैर्य कीं तें
चरणकमलिं तीच्या वंदुनी नम्रभावें । कपि निघत क्षणीं कीं राघवापाशि यावें

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे
सुन्दरकाण्डे लङ्कादाहवर्णनन्नाम षष्ठस्तरङ्गः॥

तरंग ७ वा

गर्जोनि जैं चलत मारुतिराय जाय । भीतीमुळें गलितगर्भ निशाचरीय ! ॥
लंघोनि सिंधु क्षणि मारुति पार आला । तैं आयके किलकिलाट कपींत झाला ॥
हर्षोनि सर्व बघती पवनात्मजाला । वाटे तयां फिरुनि जन्म जणूं मिळाला ।
त्याचें प्रसन्नमुख तेज विराजलेलें । जें सूचवी खचित राघवकार्य झालें ! ॥
सारे कपी मिळति मारुतितें सहर्ष । कीं शुष्कमीनगणिं लाभत वारिवर्ष ! ॥
हर्षे समस्त रघुनायकभेटिं जाती । मार्गी कथा पुसति ऐकति कौतुकें ती ॥
तों येति ते मधुवनामधिं सर्व मोदें । खाती फलें मधुर अंगद संमती दे ॥

आरामरक्षक जधां करिती विरोध । मुष्टिप्रहारिं पळवीति तयांसि योध ॥४
उद्यानपाल झणिं धांवति ते सुकंठा । आक्रंदुनी म्हणति ' अंगद मांडि तंटा '
सुग्रीव तें परिसुनी अति हर्षि बोले । ' वाटे समस्त करुनि प्रभुकार्य आले ॥
त्यां शुद्धि लाभलिच निश्चित जानकीची । हि त्याविना मधुवनीं फलभुक्ति कैंची '
सुग्रीव यापरिं विचार मनीं करीत । तों येत सन्निध तया कपि ते समस्त ॥
येतांच ते नमिति तत्पदिं नम्रशीर्ष । सप्रेम भेटत तयां सकलां कपीश ॥
त्यांतें विचारि कुशला प्रभु हर्षधाम । 'देखोनि हे कुशलपाद सुख प्रकाम ॥
झालेंहि काज रघुराज–कृपाप्रसादीं । हें सर्व सद्यश महान् हनुमंत साधी ! ॥
याच्यामुळेंच कपि सर्व अम्ही जिवंत ' । ऐकोनि हें फिरुनि भेटत त्या सुकंठ
आले पुढें सकळ ते रघुरायभेटी । आनंदला कपिसि पाहुनि राम दृष्टीं ॥
केलें सुकार्य म्हणुनी रघुराय तोषे । बंधूसवें स्फटिकसत्तमिं राम बैसे ॥९॥
दोघांसही चरणिं वंदियलें कपींनीं । कारुण्यसिंधु विभु भेटत त्यां भरोनी ॥
प्रेमें पुसे कुशल; तैं वदती कपीही । 'हो पावलों कुशल देखुनि पावलें हीं' ॥
तैं जांबुवंत विनवी ' रघुराय ! ऐका । ज्याचेवरीं प्रभु कृपा करितील हे कां॥
त्यातें सदा कुशल मंगल सर्वरीतीं । देवर्षि मानव तया सुख आचरीती ११
होईल तोच विजयी विनयी गुणाब्धि । सत्कीर्ति त्याचिच जगत्त्रय गाय शब्दीं
ही श्रीकृपा म्हणुनि सिद्धिस कार्य जाय । हें आमुचें जनन आज कृतार्थ होय ! ॥
हे नाथ ! केलि करणी पवनात्मजें जी । ती गावयास नच शेषहि शक्य हो जी ! '
सांगेहि मारुतिकृती परमाद्भुता ती । तैं जांबुवंत विभुलागिं विशुद्धकीर्ति ॥
ऐके कृपानिधि मनामधिं तोष पावे । आलिंगि मारुतिसि तो अतिहृष्टभावें ॥
त्यातें पुसे प्रभु 'कशापरि जानकी तीं ?। स्वप्राण रक्षि कशि ती वद भक्तिमूर्ति ! ॥
तैं मारुती वदत ' तन्मुखिं 'राम'नाम । तें पाहरा करित रात्रदिनीं निकाम ॥
ध्यानीं कपाट हृदिंचें, प्रभुपायिं डोळे।जावेत मार्गि कवण्या? असु कोण वेळे ?
चूडामणी मज दिला निघतां तिनें हा'।त्या राम वक्षिं धरुनी निववीत दाहा।
बोले पुढें पवननन्दन ' नाथ ! सीता। सांगीत साश्रुनयना परिसा तदुक्ता१६
'वन्दोनि लक्ष्मणसमेत भवत्पदाब्जा । हे दीनबन्धु नतदुःखहरा महौजा ! ॥
मी देहवाच्मनिं असें चरणानुरागी । कां त्याग ? कोण अपराध असा मदंगीं ?
मी जाणतें अवगुणा मम एकल्या कीं।मत्प्राण हा तव वियोगिं मला न टाकी ! -

हा दोष होय मम लालस लोचनांत । प्राणांप्रती मम हठेंचि निरोधतात ! १८
हा देहतूल विरहाग्नित दग्ध व्हावा । श्वासानिलें क्षणिंच निश्चय हा वहावा
स्वार्थामुळें स्रवति लोचन वारिधारा । हा होत भस्म विरहानलिं ना विचारा !
आहे विपत्ति अति थोरचि जानकीची।हे दीनबंधु ! कवणा कथवेल साची !
कल्पा-हुनीहि गुरु होति पळेंहि तीतें । मर्दोनि दुष्ट, तिजला झणिं आणणें तें
ऐकोनि दुःख सतिचें प्रभु सौख्यराशि । राजीवलोचन भरे बहु अश्रुवर्षी ।।
'जे देहवाङ्मनिं मलाच अनन्यभक्ति।स्वप्नींहि त्यांप्रति कदा छळि का विपत्ति? '
तैं मारुती वदत 'तीच विपत्ति होय । जेथें नुरे स्मरणही उरिं राघवीय ।।
ती हो कथा कितिशि या रजनीचरांची।जिंकोनियां रिपुसि जानकि आणणेंचि
श्रीराम मारुतिस सांगति 'ऐक ताता ! । नाहीं समान तुझिया उपकारकर्ता !
नाहींच देवमुनिमानविं तूजऐसा । होईन मी तव ऋणीं उतराइ कैसा ! ।।
झाले तुझे मजवरीं अमितोपकार । त्यांचें न आकलनही मज हो समग्र ।।
त्यांची कशी परतफेड तरी करूं ती? । मी पाहतों बहुपरीं विवरूनि चित्तीं '
तो देवरक्षक दयानिधि रामराय । पाहे किती कपिसि जो करि भक्त साह्य ।।
श्रीरामचंद्रनयनाम्बुजिं अश्रु वाहे । रोमांचुनी प्रभुतनू अतिशोभताहे ! २५
ऐकोनियां प्रभुवचां हनुमान् विलोकी।तो श्रीमुखासिच तधी प्रभुमूर्ति ती कीं
तो प्रेमसद्गद पडे प्रभुपायिं हर्षें । 'भो ! रक्ष रक्ष भगवन्' करुणोक्ति घोषें ! ।।
त्या ऊठवूं बघत राम पुनःपुन्हांही । तो प्रेमनिर्भरें उठूं शकला न कांहीं ।।
तैं वायुनंदनाशिरीं प्रभुपाणिपद्म । तैसें स्मरूनि शिव हो हृदिं सौख्यसद्म-।।
तैं सावधान मन शंभु करी फिरून । लागे कथूं परमरम्य कथा-निधान ।।
प्रेमें तया उचलुनी प्रभु घे उराशीं।त्या बैसवीत निजसन्निध भक्तिराशि २८
तैं मारुती बघुनि त्या प्रभुतें प्रसन्न । बोले तया निरभिमान अतीव लीन ।।
'हो हाचि थोर पुरुषार्थ अम्हां कपींचा।कीं मारणें बहु उड्या तरुशाखिं साच्या
लंघोनि सिंधु करिं दग्ध सुवर्णलंका । संहारिं राक्षस, वनासहि मोडिलें कां ।।
हा हो! प्रताप तुमचा रघुनाथ ! होय । ना थोरवी लवहि तेथ असे मदीय।।
ज्यातें तुम्ही प्रभुवरा ! अनुकूल व्हाल । कांहीं अशक्य न तयाप्रति कार्यजाल !
जाळील कापुसहि तो वडवानलाही । लाभे प्रभावबल ज्या तुमचेंच कांहीं '
ऐकोनि तें प्रभुसि फारचि हर्ष होय।त्या कायवाङ्मनिं गणी निजभक्तराय ।।

हांगे कपीसि विभु 'तूं वर घे हवा तो। देईन कीं तुजसि जो सुखमूल होतो'
तैं मारुती म्हणत 'भक्ति सुखात्ममूर्ति।द्यावी कृपेंकरुनि जी अनपायिनी ती'
ऐकोनि तद्वच तसें प्रभु जें अतीव।बोले 'तथाऽस्तु' विभु शौरि। महानुभाव॥
ज्यांतें सुभाव कळला रघुनंदनाचा । ना हेतु त्यांसि भजनाविन अन्य साचा
संवाद हा गिरिसुते ! स्मरती मनांत । त्यां रामपादकमळीं अति भक्ति होत॥
ऐकोनियां प्रभुवचा कपिवृंद गाती । 'श्रीराम राम जय राम कृपाळुमूर्ति' ॥
'तों राम बोलवुनि सांगतसे सुकंठा।' व्हावें सुसज्ज आणि घेउनि सैन्य सांठा ॥
आतां कशास्तव गड्या ! करणें उशीर? । आदेश दे, सकल आण कपिप्रवीर
पाहूनि हेतु सुर वर्षुनि पुष्पराशि । जाती नभांतुनि गृहा परम प्रहर्षी ॥ ३६

सुग्रीवाशैंकरुनी आले कपियूथ यूथप अनन्त ॥
नानावर्ण अतुलबल ऋक्षसमूहहि तसेच बलवंत ॥ ३७ ॥
प्रभुपदकमला वंदुनि लववुनि शिर गर्जना करिति सारे ॥
ते ऋक्षवीर वानर निरुपमबलराशी ज्यांमधें थोरे ॥ ३८ ॥
साऱ्यां कपिसैन्यातें करुणासागर विलोकि निज नयनीं ॥
प्रभु पंकजाक्ष तेव्हां सारे बल पावले अतुल भुवनीं ॥ ३९ ॥
रामकृपासामर्थ्यें झाला एकेक वानर समर्थ ॥
वाटे कीं तो जणुं हो सपक्ष बलशालि शैलवर सार्थ ! ॥ ४० ॥

श्रीरामचंद्र करि तो मग जैं प्रयाण । होती तया शकुन उत्तम भाग्यपूर्ण ॥
ज्याची असे सकलमंगलराशिकीर्ति । त्याच्या प्रयाणिं शकुनोत्तम हेचि नीति !
रामप्रयाण कळलें आणि जानकीतें । वामांगिंचें स्फुरण जें तिज कीं कथी तें॥
जों जों सिला शकुन उत्तम होत जाती।तों तों घडे कुशकुनावलि रावणा ती !
सारें निघे कटक, वर्णु न ये अपार । ते गर्जती अमित वानर भालु थोर ॥
ज्यां आयुधें शित नखें तरु शैल घेते । जाती यथेच्छ अवनीं नभिं वा त्वरें ते
ते ऋक्ष वानर निनादति सिंहसेच । चीत्कारती भिउनि दिग्गज ऐकतांच ! ॥
डोले मही, गिरिहि हालति त्या रवांनीं।सिंधूहि दावि थरकांप अतिप्रमाणीं !
झाले प्रहृष्ट रविचंद्र मुनीश्वरादि । ते नाग किन्नरहि होति मनीं निराधि ॥
तेव्हां कपी कटकटां रुषिं दांत खाती।ऐसे भयंकर असंख्याचि धांवताती ४५
ते वीर ऋक्षकपि गर्जति घोषुनीयां । 'श्रीकोसलेश जय ! रे जय रामराया !
श्रीकोसलाधिप अगाध बलप्रतापी । श्रीराम राम ! जय राम ! खलांसि दापी'

साहुं शकेना उदार शेषहि भार, कितीदा मोर्हि पडे ।
निजदंतांनीं फिरुनि फिरुनि तो कमठपृष्ठिं त्या कठिणिं जडे ! ॥
रघुवीराची प्रयाणपद्धति रुचिर आणुनी जणुं खोदी ।
कमठखर्परीं सर्पराज तो अविचल पावन अति मोदीं ! ॥ ४७ ॥
ऐशापरीं रिघुनि सागरतीरिं येई । श्रीरामचंद्र करुणांबुधि सैन्यवाही ॥
तेव्हां अनंत कपिवीर, मिळेल तेथें । खाती फळें विपुल वानर भक्ष्य ते ते ॥४८॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकालिकलुषविध्वंसने सुश्लोक-मानसे सुन्दरकाण्डे श्रीरामचन्द्रप्रस्थानवर्णनन्नाम सप्तमस्तरङ्गः ॥

तरंग ८ वा

जेव्हांपासुनि गेला कपि तो जाळून सर्वही लंका ।
रजनीचर ते इकडे भीति वहाती मनीं, सतत शंका ॥ १ ॥
आपापल्या निवासीं करिति निशाचर विचार ऐसाच ।
"कोठेंच क्षेम कुशल राक्षसवंशीं उरे न तें साच ! ॥ २ ॥
ज्याच्या दूताचें बल वर्णन करणें अशक्य, तो येतां ।
चालुनि लंकानगरां होइल तरि काय आमुचें आतां ! " ॥३॥
पौरांच्या उद्गारां दूतिमुखें ऐकतां मनीं झाली ।
मंदोदरी सचिंता एकांतीं कांतपद धरुनि वदली ॥ ४ ॥
जोडुनि अंजलि सांगे नीतीचें सार ती अमृतमधुर ।
" हे नाथ ! ना कराजी ! श्रीहरिशीं कलह सर्वनाशकर ॥५॥
मी सांगत्यें धरा तें हृदयामधिं वाक्य आत्महितसार ।
सर्वस्वहानि न करा घ्या चित्तीं वसवूनि सुविचार ! ॥ ६ ॥
ज्याच्या दूताची ती करणी चिंतूनि राक्षसी नारी ।
गर्भगलित होती, या तत्त्वीतें पाठवूनि सचिवकरीं ॥ ७ ॥
निजकांतगृहीं सीता धाडुनि द्या इच्छणें जरी स्वहितें ॥
नीतीतें नाशुनियां कवणा लाभेल सौख्य अल्पहि तें ! ॥ ८ ॥
तुमच्या कुलकमलवना घाया अति दुःख पालली सीता ।
रजनी शिशिरतूंची जाणों हे कमलनाशकर शीता ! ॥ ९ ॥

ऐका नाथ ! तुम्ही हो दिवस्यावांचून परत ती सीता ।
शंभु, ब्रह्मा हेही तुमचें हित नच करूं शकति कांता ! ॥ १० ॥
श्रीरामबाण अहिगण, राक्षससैनिकसमूहभेकांतें ।
जोंवरि न भक्षुं लागति, द्यावी तोंवरिच परत सीता हे" ॥ ११ ॥

ऐकुनि पत्नीवचना, शठ रावण जगतिं विदित अभिमानी ।
मंदोदरीस बोले " नारी अबला, स्वभावभीरु मनीं ॥ १२ ॥
मंगलमय समयींही कुढती चित्तामधें जिवा भारी ।
येतां मर्कटकटकें राक्षस खातिल तयांसि पोटभरीं ! ॥ १३ ॥

ज्याच्या भयोंचि कांपति दिक्पति चित्तांत त्याचिया स्त्रीनें ।
भ्यावें ऐसें कां गे ? जगही हांसेल कां न या कृतिनें ? " ॥ १४ ॥
ऐसें म्हणोनि रावण हंसुनी हृदयीं धरी स्वकल्पनेतें ।
जाई सभागृहातें अधिकचि गर्वान्ध होउनी चित्तें ! ॥ १५ ॥

मंदोदरी हृदयिं फार करीत चिंता । भाली असेल विपरीतचि दैव कांता ॥
आलेंचि रावणसभेमधिं वृत्त तों हें । कीं सिंधुपार रघुवीर ससैन्य आहे !
लंकेश तैं उचित तें सचिवां विचारी।तैं हांसुनी भजति मौनाचि अल्प सारीं॥
ते बोलले 'क्षणिं सुरासुर जिंकिलेत । चिंता तुम्हांसि नर वानर केंविं देत ?'
मंत्री, भिषग्जन, गुरु, प्रिय बोलणारे । भीती धरूनि कथिती अयथार्थ सारे
जाण्या धुळीस मग राज्य, शरीर, धर्म। नाहीं उशीर स्वभावहि, नीतिमर्म
झालीच रावण–दशाहि तशा प्रकारीं। त्याची स्तुतीच करिती जन तेथ सारी॥
जाणोनि तैं समय योग्य कथावयातें। आला बिभीषण रमापतिभक्त तेथें १६
शीर्षीं नमूनि निज बंधुसि, त्या सभेंत।तो आसनीं बसत वंदुनि त्या विनीत॥
आज्ञा तयास मिळतां वदला निजोक्ति।'मातें पुसाल तर सांगिन कांहीं युक्ति
सांगेन मी हित यथामति हें दयाळा! । कल्याण कांक्षित असाल जरी स्वतांला
सत्कीर्ति धी गति सुखादिक वांछि जो कीं। टाको रती परकलत्रिं मनेंहि लोकीं
ती चंद्रकोर जणुं कीं चवथ्या तिथीची।जाणूनि सेवन तिचें नच योग्य होयि।
हो कां जरीहि चवदा भुवनांत नाथ । ना तो टिकेल छळतां कुणि भूतजात॥
जो कोणि होय गुणरत्नमहानिधान। त्या अल्प लोभहि करील सुकीर्तिहीन॥
हे सर्व होत जणुं पंथ अधोगतीचे। ज्यां क्रोध काम मद लोभ म्हणूं स्वभावी

सांडूनि सर्व करि यांप्रति, चित्ति संतां क्षा, मक्तिनें भजति तो भज राम नाथ ॥
ताता ! न राम मुळचा नर भूप जाण। त्रैलोक्यनाथ भुवनेश्वर आदिहीन ॥२४
जो ब्रह्म निर्गुण असा भगवान् अनंत। व्यापूनि सर्व, सुर-गो-द्विज रक्षि भक्त॥
जो कीं कृपाजलधि, मानुषरूपधारी। तो साधुरंजन विभंजुनि दुष्ट मारी २५
जो वेदधर्मपरिरक्षक आत्मकारी। त्या राघवासि नम, हो न तथासि वैरी ॥
श्रीराम हो प्रणतदु:ख विनाशणारा। त्या जानकी परत दे प्रभु रामचंद्रा ॥
निष्काम जो हित करी भज त्याच रामा॥पाळीत जो शरण, त्या भज सौख्यधामा
त्यागीत जो न कधिंही शरणागताशी। हो कां जरी त्रिभुवनच्छलनाघराशि !
तापत्रयासि विनिवारित नाम ज्याचें। तो राम हा प्रकटला मनिं जाण साचें॥
हे रावणा! नच धरीं मनिं दुष्ट भाव। श्रीराघवा भजुनि सर्व सुखांसि पाव!२८
वंदोनि मी तव पदीं बहुवार नाथा!॥ हें प्रार्थितों दशमुखा! लव घेइं चित्ता॥
सोडोनि मान मद मोह मनामधील। तूं कोसलाधिपतितें भज भक्तिशील॥२९
धाडी पुलस्त्य निजशिष्यकरीं निदेश। तो म्यां त्वरें कथियला तुजसि प्रभूस ॥
पाहोनि योग्य समया तुज जाणवीत। हा ध्यानिं घे सदुपदेश गुरूक्त तात!"
तैं माल्यवान् सचिव सुज्ञ बिभीषणोक्ति। ऐकोनि तुष्ट मनिं होय वदेहि नीति
"हा नीतिभूषण बिभीषण बंधु सान। जें सांगतो तळमळोनि तयास मान!"
"दोघेहि हे शठ करीति रिपुप्रशंसा। या झाकलून झणिं, कोण इथें न कैसा!"
उद्गारि रावण, तदा निज गेहिं गेला। तो माल्यवंत हितवाग् अवमानियेला ॥
बोले बिभीषण पुन्हां कर जोडुनीयां। "हे नाथ! सर्वहृदिं सन्मति दुर्मती या॥
संपत्ति सर्वपरि तेथ, जिथें सुबुद्धि। जो कीं कुबुद्धि धरि त्यासि विपत्ति बाधी!
सिद्धान्त हा कथियला निगमीं पुराणीं। दुर्बुद्धि तैं निजमनामधिं नैव आणीं
दुर्बुद्धिनेंच हित तो अरि वाटताहे। शत्रूहि मित्रपरि मानिसि चित्तिं तूं हें ३४
जी कालरात्र जणुं राक्षसवंशजाता। ती इच्छितोसि अति आवडिं चित्तिं सीता
वंदूनि मी चरणिं याचित एवढें हें। दे जानकी रघुपतीस, सुखांत राहें" ॥३५
ती ऐकतां विबुध-वेद-पुराणमान्या। वाणी बिभीषणमुखांतिल नीतिधन्या ॥
क्रोधोनियां उठुनि रावण हें म्हणाला। 'दुष्टा! तुझ्यानिकट मृत्युचि आज आला!
माझ्याचरीं जगुनि संतत मत्कृपेंत। तूं पक्ष घेशि अरिचा अकृतज्ञ धूर्त! ॥
आहे जगीं कवण सांग असा खळा रे!। जो जिंकिला भुजबलें नच म्यां प्रवीरें! ३७

मारुन्या पुरीं वसुनि माविसि तापसांसी।दुष्टा!तयां मिळुनि नीति न कां कथीसी?
ऐसें वदोनि करि त्या चरणप्रहार। तेव्हां धरी अनुज तत्पद वेळवार॥३८॥
हे गौरि! होत महती तरि हीच संतीं। दुष्टाकरींहि करणें अति साधुवृत्ति! ॥
बोले बिभीषण "पित्यासम तूं मदीय।तूं मारितोस मज हेंहि सुयोग्य होय॥
होईल हेंचि हित नाथ! तुला अतीव। कीं रामराय भजणें धरुनी सुभाव!"
बोलोनि हें, सचिव घेउनि आत्मसंगें।जाई नभःपथिं बिभीषण सत्य सांगे॥४०

"श्रीराम सत्यसंकल्प; सभा कालवशा तव॥
रामा शरण मी जातों; न दे दोष मला कव!" ॥ ४१ ॥

॥ इति बिभीषणस्योपदेशवर्णननामाष्टमस्तरंगः ॥

तरंग ९ वा

सांगोन यापरिं बिभीषण जों निघाला। तों राक्षसांवरतिं अंतककोप झाला॥
तत्काल पापफल साधुजनापमानें। कल्याण-हानि गिरिजे! अखिलार्थि होणें!
टाकीत ज्या क्षणिं बिभीषण रावणासी। श्रीहीन त्या क्षणिंच रावण जात नाशीं!
हर्षें बिभीषण निघे रघुनायकातें। जातां मनोरथ करी बहु आत्मचित्तें॥
"देखेन जाउनि पदांबुज राघवाचें। जें भक्तसौख्यद मृदूत्तम रक्त साचें॥
यत्स्पर्शनें तरलि ती मुनिवर्यपत्नी। जें दंडका करित पावन संचरूनी! ॥२॥
जीं श्रीपदें जनकजा हृदयाब्जिं वाही। मायाहिरण्मयमृगा धरुं धांवलींही॥
श्रीसांबहृत्सरिं सरोज अशीं पदें तीं। पाहीन मी; मम सुधन्यचि भाग्यमूर्ति!
ज्यांच्या धरूनि हृदिं, पावन पादुकांतें। तो राहिला भरत तन्मय भक्तिचित्तें
नेत्रीं बघीन अजि तो प्रभुवर्य राम।बाऊनि भक्तिभरिं पावन सौख्यधाम!" ५
सप्रेम यापरि विचार करीत येत। तो अब्धिपार अतिशय सुखिमंत॥
तें पाहती कपि बिभीषण येत आहे। वाटे तयांस रिपुदूतचि येउं पाहे॥६॥
त्यातें उभा करुनि, वेंति कपी कपीशा।ते त्या निवेदिति तदीय कथा अशेषा
सुग्रीव तें वदत "राघवराय! ऐका। भेटीस येत अजि रावणबंधु, देखा"॥७

श्रीराम तें पुसत 'काय सख्या ! करावें ?'।'ऐका' वदे सुगळ 'जें मज नाथ वाटे
ना राक्षसी [illegible] कपणादि माया।हा कामरूप वपु पाहत कां वि ! बापा ! ॥८
घ्यायास भेद अमुचा शठ काय ये हा ?। बांधून ठेवुं अथि यास, मदीय ईहा'
श्रीराम तें वदत "भीति तुझी खरीच।आहे मदीय पण हा परि ऐक साच ९
भीती निवारिनचि मी शरणागताची !"। होई प्रहृष्ट पवनात्मज ऐकतांचि ॥
चित्तीं म्हणे 'प्रणतवत्सल रामराय । हा कोसलेश विभु दीनदयार्द्र होय' ॥
"आला कुणी शरण त्याप्रति जे त्यजीती।मानोनि तो करिल आपुलि हानि कीं ती
ते जाण पामर खरे अति पापराशि । ऐशांसि पाहुनिहि हानिच हो नरांसी॥
हो कोटिविप्रवधपापि असाहि कोणी।येतां मला शरण, देइन ना त्यजोनी ॥
कोणीहि जे शरण संमुख मागिया कीं।तत्कोटिजन्मदुरितांतुनि त्यासि राखीं १२
जे पापि तन्मनिं असा सहजस्वभाव । कीं नावडेचि मम भक्ति तयांस नांव !
तो दुष्ट होय हृदयीं जर कां खराच । येईल केविं मज तो शरणार्थ साच ?॥
जो शुद्ध निर्मलमना, मज तोच पावे । ना छिद्र दंभ कपटादिक ज्यास ठावें॥
भेदार्थ त्या जर दशानन पाठवीत।नाहींच हानि भय वा ! मज कांहिं त्यांत !
जे कोणि राक्षस, सख्या ! असती जगांत।त्यांचा करील क्षणिं लक्ष्मण खास अंत
आला असेल भिउनी शरणार्थ मातें । मी प्राणसाच जपणार तयास चित्तें १५
दोहीं प्रकारिं, मजपाशिं तयास आणा"।हांसोनि हें कथि कृपानिधि जैं कपींना
तैं हृष्ट गर्जति कपी 'जय राममूर्ति !'। ते मारुतीसहित सांगद तूर्ण जाती ॥
घालूनि सादर पुढेंचि बिभीषणास । येती कपी, प्रभु जिथें करुणानिवास ॥
ते दोन बंधु निजलोचनहर्षकारी । देखे दुरूनिच बिभीषण हर्षपूरीं ॥१७॥
रामच्छवी बघुनि ती हृदयाभिराम । राहे पहातांचि बिभीषण सौख्यधाम ॥
आजानुबाहु अरुणांबुजरम्यनेत्र । भासील जो प्रणतभी प्रभु नीलगात्र ॥१८
यत्स्कन्ध केसरिपरी सुविशाल वक्ष । ती वक्त्रभा मदनकोटिविमोहदक्ष ॥
पाहे बिभीषण तदा जल नेत्रिं वाहे । त्याची तनूहि पुलकांकित शोभताहे ॥
चित्तांत धैर्य धरुनी वदला मृदूक्ति । "हे नाथ ! मी दशमुखानुज पापवृत्ति ॥
मी तामसी [illegible] जात । कीं हो उलूकमनिं आवड ती तमांत ॥२०॥
ऐकोनि संयश विभो ! तुमचें सुधन्य । आलों तुम्हां शरण मी सुखदा ! अनन्य ॥
हे आर्तिनाशक ! रघूत्तम रामराय !। संसारभीतिशमक ! रक्षक व्हा मदीय" ॥२१

॥ इति बिभीषणशरणागतवर्णननाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

बोलोनि हें ममन त्या करतां बघून। हर्षें अतीव विभु तैं उठलाच तूर्ण ॥
दीना वचा परिसुनी प्रभुचित्त तोषें। त्यातें विशालभुजिं आकळि राम वक्षें॥१
त्या भेटवी अनुज सचिव वैसवी ही। तो भक्तभीतिहर बोलत या वचांहीं ॥
"लंकेश ! हो कुशल कीं परिवारयुक्त। आहां तुम्ही कुटिल वासिं परी रहात ॥
रात्रंदिनीं खलगणावृत संग होतां। कैसें स्वधर्मपरिपालन देत हातां ! ॥
आचार नीति तव जाणत मी अशेष। नीतिप्रिया न रुचणें कधिं नीतिदोष ॥
ताता ! भली वसति कीं नरकींहि होवो। ना दुष्टसंग परि देव कधींच देवो" ॥
बोले बिभीषण "सुखी पददर्शनानें। जाणोनि दीन करुणा करणें प्रभूनें ॥४॥
स्वप्नींहि तोंवरि मनास कुठून शांति। जीवासही कुशललाभ कुठूनि होती ॥
टाकोनि काम सगळाच विपत्तिधाम। ना जोंवरीं भजत हें मन गोड राम ॥५॥
हे तोंवरी हृदयिं दुष्ट करीति वास। ते मोह लोभ मद मत्सर मान रोष ॥
ना जोंवरी रघुपती शरचापहस्त। राहे उरीं, शरनिषंग कटीसि युक्त ॥६॥
रामप्रतापरविभा जंवरी नुदेली। अंधारघोररजनी तंवरीच ठेली ॥
जी द्वेषरागमय या सुख दे उलूकां। जी आसरा्च ममतातिमिरासि देखा ॥७॥
हों आज मी कुशल; भीति नुरेचि चित्तीं। देखोनि राम ! तव पादसरोजकांति ॥
तुम्ही असाल अनुकूल कृपालु ज्यास। न व्यापितील कधिं ताप तिन्ही तयास॥
मी हों निशाचर सुनीच कुलस्वभाव। नाहीं शुभाचरण आचरिलेंहि नांव ॥
ज्याचें स्वरूप न कळे मुनिंना तरेंही। सानन्द तो प्रभु मला कवळोनि घेई !॥
माझें अमेयचि अतीव सुभाग्य होय। हे राघवा ! सुखकृपांबुधि रामराय ! ॥
कीं लोचनीं प्रभुपदांबुजयुग्म पाहें।जें की विरिंचिशिवसेव्य सदैव आहे" १०
श्रीराम तैं वदत "ऐक मदीय मित्रा !। माझा स्वभाव तुज सांगत सच्चरित्रा !
ज्यातें भुशुण्डि, गिरिजा, शिव जाणतात।कीं रक्षि मी खलहि जे शरणार्थ येत
हो कां कुणीहि सचराचरजातवैरी। आला मला शरण आकुल आर्त भारी
टाकून मोह मद मत्सर शाठ्यभाव। मी त्यां करी क्षणिंच साधुसमप्रभाव! ॥
माता पिता स्वजन बंधु तसें कलत्र। ते देह गेह धन वा परिवार मित्र ॥
यांचे ममत्वमय ताग वळून चोख। बांधी तसें स्वमन-मच्चरणां-सुरेख !११

टाकोनि हर्ष भय शोक समग्र काम । ठेवी स्वचित्त समदर्शि असें निकाम॥
ऐसा मदीय हृदिं सज्जन वास लाहे।लोभ्याचिया हृदिं जसें धन सर्वथा हें१४
होती तुझ्यासम भक्त, प्रिय फार, संत।माझा तदर्थ अवतार, न अन्य हेतु।
जे कीं उपासति मला सगुणासि भक्त । ते नीतिमंत दृढनिश्चय शुद्धचित्त ॥
जे साधिती परहितें, हृदयें दयाळ । जे विप्रपादकमळीं रत साधुशील ॥
प्राणांसमान मज आवडती अतीव । ऐसे अपाप जन मद्भजनस्वभाव ॥१६
लंकेश ! ऐक असती गुण हे तुझ्यांत । यास्तव तूं असशि मत्प्रिय रे ! नितांत"
ऐकोनि रामवच वानरयूथ हर्षें । उद्गारती 'जय कृपानिधि राम !' घोषें ॥
ऐके बिभीषण वचें प्रभुचीं सुधासीं।ना तृप्ति होइ हृदयीं मुळिंही तयासी ॥
श्रीरामपादकमलां धरि कैक वेळां।न प्रेमसिंधु हृदिं मावत मावळेला ! १८
बोले ' प्रभो सचराचरनाथ ! ऐका । सर्वांहृदीं वसतसां शरण त्रिलोकां ॥
होती हृदीं प्रथम जी लव वासना ती । वाहोनि नेलि विभुभक्तिसरित्प्रवाहीं
आतां कृपाजलनिधे ! निजभक्ति पुण्य । ती शंभुतोषकरणी मज द्या अगण्य '॥
तेव्हां 'तथास्तु' म्हणत प्रभु राम 'वेगें । आणा समुद्रजल हो !'कपिलागिं सांगे
बोले रघूत्तम सुतुष्ट बिभीषणासी।' इच्छा तुझ्या हृदयिं नाहिं जरीहि तैसी॥
नोहेच दर्शन मदीय कधींहि मोघ'। सांगोनि हें करि तया अभिषेक सांग !॥
केली नभांतुनि तदा अमरीं प्रहृष्टीं । त्यांचवरी अतुल नंदनपुष्पवृष्टि ! ॥
श्वासानिलें फुलुनि रावणकोपवह्नि।ज्या जाळिता, सुखविं त्या प्रभु राज्यदानीं
संपत्ति जी दशशिरास्तव रावणातें।कैलासनाथ वितरी अति तुष्ट चित्तें ॥
संकोचुनीच रघुनाथ बिभीषणासी।संपत्ति ती वितरि संतत सौख्यराशि॥२३॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे सुन्दरकाण्डे बिभीषणस्य श्रीरामशरणगमनवर्णनन्नाम दशमस्तरङ्गः ॥

तरंग ११ वा

ऐशा त्यजूनि विभुला, भजतो दुजांना । तो पुच्छशृंगविण जाय पशूपमाना॥
केला बिभीषण जसें अपुलाच ऐसा।याची करीति कपि-यूथ किती प्रशंसा !
सर्वेश सर्वहृदयस्थ तरी उदासी । जो सर्वरूप सकलांहि अतीतवासी ॥
जो नीतिरक्षक सलील नरावतारी । तो बोलला वचन दानववंशवैरी-॥२॥

“ लंकेश ! तेवि कपिवीर ! तुम्ही समग्र। बांधा कसा जलधि हा तरणें गभीर ?
जो पूर्ण मत्स्यमकरादिगणीं अगाध । हो सर्व रीतिं अति दुस्तर हें प्रसिद्ध ! ”
लंकेश तैं वदत ‘ भो रघुनाथ ! ऐका । कोटीहि सिंधु तव सायक शोषिती कीं
आहे असें तरिहि वाटत योग्य नीति । कीं प्रार्थिणें जवळ जाउनि अब्धिमूर्ति
नाथा ! तुम्हां कुळगुरूच समुद्र होय । तो योग्य साच कथणार तुम्हां उपाय
घाताविनाच तुम्हि सागर हा तराल । हे ऋक्षवानरसमेत तुम्ही सलील ’ ॥
बोले विभू ‘कथिसि उत्तम तूं उपाय। तो आचरूं सकळ हो मज देव साह्य ’॥
ना लक्ष्मणासि रुचला परि तो विचार । रामोक्तिनें गमत त्या हृदिं दुःख फार ॥
तो बोलला ‘ भरंवसा कसला कि ! दैवीं। शोषूनि अब्धि सुकवाचि निश्चयभावीं ॥
आधार दैव जगिं एकचि कातराशी। तैसाचि आळसि पुकारित दैव, घोषीं ’ ॥
ऐकोनि तें स्मितमुखी करि राम उक्ति। ‘ऐसेंचि रे करुं, धरीं लव धीर चित्तीं’ ॥
श्रीराम लक्ष्मणममा समजावि ऐसें । ये अब्धितीरिं रघुनायक चित्ततोषें ॥८॥

आधीं वंदोनियां राम सागरा नतमस्तक ।
तीरीं दर्भासनीं बैसे तो प्रभू विश्वनायक ॥ ९ ॥

जेधवां रामरायातें निघे याया बिभीषण ।
निजदूत तयापाठीं पाठवी बंधु रावण ॥ १० ॥

घेऊनियां कपितनू कपटात्म त्यांनीं । देखीयलें सकल वृत्त तिथें रिघानी ॥
चित्तीं प्रशंसिति किती प्रभुच्या गुणांसी । कीं जो कृपाळु शरणागत भक्त रक्षी
सप्रेम ते स्तविति रामगुणस्वभावा । जैं विस्मरूनि निज मायिक रूपभावा ॥
ते शत्रुदूत म्हणुनी कळलें कपींसी । बांधूनि त्यांसि कपि नेति कपीशपासीं॥१२॥
सुग्रीव तैं वदत “ हे कपिनों ! कराच । विद्रूप यांसि मग हे परतोत साच” ॥
मारोनि बांधिति तयांप्रति हिंडवीती । सैन्यांत सर्वपरिं त्यां करुनी फजीति॥१३॥
त्यांतें कपी बडविती बहुरीतिं कोण ! । ना सोडिती जरिहि ते रडती सुदीन॥
‘कापूं-पहाल ’ म्हणती ‘जरि नाक कान। आहे तुम्हां रघुपतिप्रभुचीच आण!’
ऐकोनि तें जवळ लक्ष्मण बोलवीत । त्यां सोडवूनि वदला करुणार्द्रचित्त ॥
“‘हें पत्र रावणकरीं वितरूनि सांगा । ‘या वाच लक्ष्मणवचा कुलघातक्या गा!’
तैसाच सांग मदमत्त तया विमूढा । माझा निरोप शुभदायि उदार गाढा ॥
‘यावेंस तूं शरण देउनि जानकीला । हें ना तरी समज काळ समीप आला!’”

वंदोनि लक्ष्मणपदीं नमूनि माथा । ते जाति दूत मुखिं वर्णित रामगाथा ॥
कीर्तित येति यश वर्णित राघवाचें । वंदीति रावणपदीं नतशीर्ष साचे॥१७॥
हांसोनि तैं पुसत रावण सर्व वृत्त । "तूं आपलें कुशल सांग मला समस्त॥
तैसें बिभीषणहि काय करीत सांग । आलाच सन्निध तयाप्रति अंतकांग १८
लंकाधिराज्य शुभ तो शठ टाकि धीट । दुर्भागि कीटहि गव्हासह होय पीठ ॥
तीं भालु वानरदळें मज सांग कैशीं । प्रेरीत काळचि तयांप्रति या स्थळाशी॥
जीवासि रक्षक तयांप्रति होय अब्धि।जो जाहला मृदुकचित्त दयार्द्रबुद्धि ॥
तूं सांग आणखि कथा मज तापसांची।माझ्यामुळें थरकती हृदयें न कैचीं?२०
भेटले ते तुला ना ? कीं गेले गा ! परतोनियां ।
ऐकोनि निज कर्णांनी सत्यशांप्रति माझिया ? ॥ २१ ॥
कथिली न मला कैसा अरिसैन्य कसें असें ।
त्यांच्या तेजोबलादींनीं त्वच्चित्त गळलें जसें ? " ॥ २२ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे सुन्दरकाण्डे रावणदूतागमनवर्णनन्नामैकादशस्तरङ्गः ॥

तरंग १२ वा

तेव्हां वदे शुक ' कृपा करणें प्रभूंनीं । क्रोध त्यजून परिसा कथितो स्ववाणीं
येतांच भेटि, तुमच्या अनुजा करीत । लंकाधिराज्यि अभिषेकचि रामनाथ ॥
येतां कळून तुमचे अम्हि दूत ऐसें ।आम्हांसि बांधुनि कपी छळिती विशेषें
कापूं पहाति अमुचे श्रवणि नाक कान । घालूनि रामशपथा सुटलों तिथून ! ॥२॥
आहे कशी पुसतसां तुम्हि रामसेना।अब्जीं मुखांहि अहि कुणासिहि वर्णवेना
आहेत भालु कपि, ज्यांप्रति वर्ण नाना।वक्त्रें भयंकर विशाल कथूंहि येना॥
ज्यानें तुझा वधियला सुत, दग्ध लंका । सान्या कपींमधिल दुर्बल तोच देखा
नामें अनंत भट वज्रकठोर उग्र । दुर्मेय नागबलशालि महान् समग्र ॥४॥
नलनील अंगदादि द्विविदमयंदादि विकटहास्य तसे ।
दधिवदन कुमुद केसरि बलशाली जांबुवंत गय विलसे ॥५॥
सुग्रीवतुल्यबल वानर हे समस्त । ऐसेच कोट्यवधि ना गणती यथार्थ ॥
त्यांचें अतुल्य बल रामकृपाप्रसादीं । त्रैलोक्यही गणति ते तृणतेंच युद्धीं ॥

मी रावणा ! परिसलें निजकर्णि साचें । कीं पथ होति भळरा कपिकुंजराचे ॥
नाहींच त्या कटकि कोणि कपी असा कीं । जो रावणा ! तुजहि ना रणरंगिं जिंकी ॥
क्रोधांत ते सकळ चोळिति हात बोटें । आज्ञा न देत रघुनाथ परंतु कोठें ! ॥
' शोषूंहि सिंधु सगळा सहसर्पमीन । फेकून अद्रि गुरु, फाडुं तथा भरून ॥
मर्दूनि चूर्ण करुं सत्वर रावणासी ' । ऐसे कपी म्हणति उत्कट शब्दघोषीं ॥
निःशंक ते करिति तर्जुनि गर्जनाहि । लंकेसिहि गिळुं पहाति विलंब नाहीं ॥
आहेत ऋक्षकपि ते सहजींच शूर । श्रीराम त्यांवरि शिरीं जगदेकवीर ॥
हे रावणा ! गमतसे जणुं जिंकितील । ते कालकोटिसहि संगरिं ज्यां न वेळ ॥
श्रीरामतेज, बल, बुद्धि, तदीय थोर । गाया न जी शकति शेषहि ते सहस्र ॥
जो एकबाणिं शतसागर शोषणार । आत्या तुझ्या पुसत नीतिनिधी उदार ॥
प्रार्थी बिभीषणवचें प्रभु सागरासी । चित्तीं दयार्द्र पथ मागत त्याजपाशीं, '
ऐकोनि हें हंसत रावण बोलताहे । ' तो मंदधी म्हणुनि घे कपिवाक्य पाहें १२
आत्याच भीरु वच ऐकि बिभीषणाचें । अब्धीप्रती विनवि सोडुनि लाळ वाचें
मूढा ! बढाइ मजला कथिसी तयाची । मी जाणतों सकल शत्रुबलादि साचीं
ज्याचा बिभीषण असे अतिम्याड मंत्री । त्याला न भूति, जय वा, जगतीं परत्रीं'
ऐकोनियां खलवचा मनिं रुष्ट, दूत । काढीत पत्र समया बघुनी सुयुक्त १४
सांगे 'दिलें मजसि पत्रक लक्ष्मणानें । वाचोनि नाथ, करणें उर शांत, येणें!'
तें घेइ वाम करिं रावण पत्रिका ती । वाचावयासि सचिवा कथि दुष्टमूर्ति ॥
तो वाचि 'मान मनिं मोद वचें शठा गा! ॥ना नाथ तूं स्वकुल दह्य नको! अभागा
ना वांचशी रघुवरा बनुनी विरोधी । हो कां तुला अज विष्णु, विधी शिवादि ॥
सोडोनि मान, निजबंधुसमान होईं । श्रीरामपादकमलीं जणुं भृंग, पाहीं ! ॥
दुष्टा पतंगपरिं रामशरानलांत । ना हो क्षणामधिंच दग्ध कुलासमेत! '॥१५
तें ऐकतांच मनिं भीत, वरीं हंसोनी । बोले दशास्य शुकला कळवी स्ववाणी ॥
'भूमीं बसोनि नभ कोण धरील हातीं । हे वाग्विलास लघुतापसि त्याच रीतीं'
तेव्हां वदे शुक ' खरी भवदीय उक्ति । सांडुनि गर्व परि घ्या समजूनि चित्तीं
क्रोध त्यजून परिसा मम सांगणें हें । रामासि वैर तुमचें नच योग्य आहे १६
त्रैलोक्यनायक असे जरि रामराय । त्याचा स्वभाव परि कोमल फार होय ॥
त्यातें मिळाल तर राम कृपा करील । ना एकही स्वदपराध हृदीं धरील ॥१७

सीतेसि द्या परत हो रघुनाथकांतें । हें एवढेंच वदलें प्रभुंनीं मदुक्तें ' ॥
'सीतेसि द्या' म्हणत तो, तंव दुष्ट हाणी।लत्ताप्रहार अति रोषिं हृदीं भरोनी
तेव्हां नमूनि चरणीं, शुक ये तिथून । जेथें असे रघुपती करुणाब्धि पूर्ण ॥
रामा नमोनि कथि तो स्वकथा तयासी । त्यातें मिळे प्रभुकृपें गति पूर्व वेषी॥
होता अगस्ति ऋषिचा, अभिशाप त्यातें।होई जसें बुध मुनी परि रक्ष कीं तें॥
हे गौरि ! वंदि शुक रामपदीं किलीदा । येई निजाश्रमपथा वरुनि प्रमोदा॥
प्रार्थीयला सुविनयें त्रिदिन प्रभूंनीं । मानीचना जलनिधी जडसाच कोणी॥
श्रीराम तैं म्हणति कोप धरूनि चित्तीं ।प्रीतीहि भीतिविन नांदत ना सुरीति!

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे सुन्दरकाण्डे शुकदूतरावणसंवादवर्णनंनाम द्वादशस्तरङ्गः ॥

तरंग १३ वा

'हे लक्ष्मणा ! मम क्षणीं शरचाप आण । बाणाग्निनें जलधि शुष्क करीन तूर्ण
ही व्यर्थ कीं विनवणी शठ जो तयाला ।प्रीतीहि होय कुटिलाशिं न सत्फलाला
होई स्वभावकृपणा उपदेश फोल । न ज्ञानगोष्ट मनिं घेइ ममत्वशील ॥
कैंची विरक्ति कथणें अतिलोभियासी !।क्रोध्यासि शांति हरिकीर्तिहि कामुकासी
हो व्यर्थ पेरणि कृता उखरांत जैसी '। ऐसें वदोनि चढवी विभु कार्मुकासी!
तें मात्र लक्ष्मणमना रुचलें अतीव। जोडीत राम शर कार्मुकिं उग्रभाव॥३॥
तों तैं उठे जलनिधींतुनि अग्निदीप्ति । नक्रोरगादिगण मीन भयार्त होती ॥
जातील जंतु जळुनी बघतांचि, अब्धि । ये विप्ररूप धरुनी गतगर्वबुद्धि॥४
घेऊनि हेम तबकीं मणिराशि नाना । तो येइ नम्रपणिं तोषविण्या प्रभूंना॥
कापोनि होय फलदा कदली, न आन। कोटी उपायिं जलसिंचनही करून!
हे जाण रीति गरुडा, विनयें कधींच । ना नीच तो वळतसे, दमनेंचि साच!
तैं सिंधु पाय धरि भीतमना प्रभूचे। प्रार्थी 'क्षमा अवगुणा मम' बोल वाचे
ही नाथा भू जल समीर नभोऽग्नि पांच।आहेत हे जडचि तत्प्रकृती तशीच
त्वत्प्रेरणाचि अधिनिर्मि तयांसि माया।जी सृष्टिहेतु सकळश्रुति वर्णिती या ॥७॥
आज्ञा असे विधिकि ज्यापरि ज्यासि देवें । तेणें तसें विचरुनी सुख मेळवावें॥
शिक्षा दिली प्रभुवरें मज चांगलें हें । मर्यादिकेंहि मजला प्रभुनेंचि आहे॥८

स्त्री, ढोल, गांवढळ, शूद्र, पशू, समान । हे ताडणा सकळ पात्रचि होति पूर्ण !
स्वामिप्रताप मजला सुकवील, पार । जाईल सैन्य; मज यांत न कीर्ति थोर ॥
ना लंघनीय जगतीं भवदीय आज्ञा । सांगे श्रुती मत तसें करणेंचि ! सुज्ञा' ॥
ऐकोनियां जलधिवाक्य विनीत तैसें । सांगे सुहास करुणाकर राम ऐसें १०
' [illegible] ! मला वद उपाय असा उदार । जाई जयें कपिचमू जलराशिपार ' !
सांगीत सागर ' विभो! नल नील दोन । बंधू बलाढ्य कपिवीर अतीव सुज्ञ ॥
त्यांना लहानपणिं दे मुनिवर्य आशी । स्पर्शें तदीय गिरिभारहि थोर राशि-
अब्धीमधेंहि तरतील भवत्प्रतापीं । मीही यथाबल तुम्हां मम साह्य अर्पीं ॥१२
मी जाणतों निजमनीं प्रभुकर्मशक्ति । बांधा तुम्ही जलनिधीप्रति बांध युक्तीं ॥
गातील तें सुयश आवडिं लोक तीनी । जातील तूर्ण भवसागर संतरोनी ॥१३
नाथा! शरें तुमचिया मम उत्तरेचे । तीरस्थ दुष्ट नर संहरिं पाप साचे ! ' ॥
ऐकोनि सागरमनांतिल शल्य, दूर । श्रीराम तें करितसे रणरंगधीर ॥ १४ ॥
देखोनि रामबल पौरुष त्यापरीं तें । होई पयोनिधि अतीवचि तुष्ट चित्तें ॥
सांगे प्रभूसि सगळें खललोकवृत्त । वंदोनि रामपदपंकज अब्धि जात ॥१५॥

सागर जाई निजभवनातें तन्मत मानी श्रीराम ।
कलिमलहारी तुलसि गात हें चरित यथामति सुखधाम ॥
रघुपतिगुणगण संशयवारण शोकविनाशन सदन मुदा ।
त्यजुनी आशा सकल भरंवसा शठहृदया ! गा परिस सदा ॥१६॥
सर्वसुमंगलदायक रघुनायकसुगुणगान आयकिती ॥
जे सादरचित्तें तें तरती भवसिंधु त्यां नको तरि ती ! ॥ १७ ॥
आवडो ' राम 'हृदया श्रीरामगुणगायन ॥
त्या विना जीवनामध्यें जावा क्षणहि वाय न ! ॥ १८ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुंदर-
काण्डे सेतुबन्धसम्मतिवर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

॥ इति ' ज्ञानसंपादनो ' नाम पंचमः सोपानः ॥

॥ इति श्रीसुश्लोकमानसे सुन्दरकाण्डः श्रीसीतारामचन्द्रकृपया संपूर्णः ॥

श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ।

श्रीगणेशाय नमः ।

श्रीमवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

❋ सुश्लोकमानस ❋

श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

षष्ठ सोपान

लंकाकांड

तरंग १ ला

मंगलाचरण

श्रीराम जो शंकरसेव्य होय । हरीत जो संसृतिभी अमेय ॥
जो सिंह हो काळमतंगजाला । ज्ञानेंचि योग्याप्रति गम्य झाला ॥१॥
गुणाढ्यही निर्गुण निर्विकार । अतीत मायेसि, अजिंक्यवीर ॥
सुरेश ज्या दुष्टवधांत हर्ष । जो ब्रह्मवृंदा प्रभु हो विशेष ॥ २ ॥
जो मेघनीळोत्तमकायकांति । जो पद्मनेत्रीं विलसे सुमूर्ति ॥
जो देव भूमीपतिरूपधारी । श्रीराम तो मी नमि भक्तिपूरीं ॥ ३ ॥

अत्यंत सुंदरतनू शशिचंद्रकान्ति । शार्दूलचर्मवसन प्रभु भव्यमूर्ति ॥
जो व्यालसर्पमयभीषणभूषणांगी । गंगा शशांक अति ज्या प्रिय शीर्षभागीं ॥
जो काशिनाथ कलिपातक नाशिणार । कल्याणकल्पतरु भक्तमनोविहार ॥
गौरीश शंकर मनोजविनाशकारी । मी वंदि सद्गुणनिधी भवतापहारी ॥५

कैवल्यही दुर्लभ देत सजना । जो दुर्जना योग्य करीत दंडना ॥
तो विश्ववंद्य प्रभु शंभु शंकर । होवो मला संतत सौख्यसागर ॥ ६ ॥
परमाणू, निमिषें, लव, युगवर्षें, कल्प हे प्रचंड शर ॥
कोदंड काल ज्याचें, त्या रामा भजनिं कां मना! उशिर? ॥ ७ ॥

ऐकोनि सिंधुवच, बोलवि रामराय । तो आपुले सचिव त्यां कथि कार्य काय
'आतां विलंब न करा; झणिं सेतु कीजे । अंभोधिपार उतरो कपिसैन्य हें जें'
बोलोनि हाल बदला तथिं जांबुवंत । "हे नाथ! सूर्यकुलकेतु तुम्ही अनंत
आहे सुनाम अपुलें जणुं सेतुसैच । जेणें तरे नर भवांबुनिधीस साच! ॥९
हा तों लघूच जलधी, तरण्या न वेळ" । ऐकोनि हें वदत मारुति भक्तिशील
'स्वामिप्रताप वडवानल जो प्रचंड । शोषी पयोनिधिजला जरि तें उदंड ॥
शत्रुस्त्रिया तुमाचिया रडतां जलांनीं । नेत्रांश्रुंच्या जलधि खारट हो भरोनी!'
अत्युक्ति आयकुनि यापरि मारुतीया । सानंद सर्व कपि पाहति रामराया! ॥
तैं जांबुवंत निजसन्निध बोलवीत । ते बंधु नीलनल, सांगत त्यांसि वृत्त ॥
बोले 'स्मरोनि मनिं राममहाप्रताप । बांधाब्धि सेतु लवही न तुम्हांसि ताप'
अन्या कपींसि मग बोलवुनी कथीती ।'विज्ञापना मम तुम्हां परिसा असे ती
ध्याऊनि चित्तिं रघुनाथपदांबुजातें । हें एक ऋक्षकपिंनो! करणें समस्तें ॥
आणा समर्थ तुम्हि वानरयूथ वेगें । नाना महाविटप शैल तसे निजांगें '॥
ऐकोनि ऋक्षकपि ते निघती सुघोष । 'हू हा हु हा! जय रघुत्तम! विक्रमेश!'
अत्यंत तुंग तरु शैलगणां सलील । ते आणिती उपटुनी अति दक्षशील ॥
त्यांचा रचीति नलनील महाब्धिसेतु । श्रीरामचंद्रयश त्याप्रति मुख्य हेतु! १५
आणूनि देति कपि शैल विशाल तेथ । ते सेतुसेव्य नलनीलहि रोविताती ॥
श्रीराम सेतुरचना अतिरम्य तैसी । देखूनि हांसत वदे करुणांबुराशि ॥१६॥
'भूमी अतीव रमणीय अनुत्तमा ही । जीचा अनंत महिमा मज वर्णवे नाहीं
ये कल्पना परमसुंदर मन्मनांत । कीं स्थापणें त्रिपुरहर प्रभु शंभु येथ!' ॥

तें ऐकुनी कपिपती बहु धाडि दूत । आमंत्रुनी मुनिवरांप्रति आणवीत ॥
स्थापोनि लिंग विधिवत् करि राम पूजा।बोले 'मला शिवसम प्रिय नाहिं दूजा
द्रोही शिवा मम असा म्हणवीत भक्त। त्यांनीहि तो नर मला मच पाविजेल
जो शंकरा विमुख, भक्ति मदीय कांक्षी।तो मूढची नरकगामिच पापराशि !१९
जे शंभुभक्त परि शत्रु मदीय होती। मद्भक्त वा करिति जे शिववैर चित्तीं॥
ते सर्व घोरनरकीं पचतील लोक । कल्पान्त होय तंवरी सहतील दुःख॥२०

घेतील रामेश्वरपुण्यदर्शन । ते विष्णुलोका रिघतील सज्जन ॥
गंगाजळा आणुनि घालती, तयां । सायुज्य मुक्ती मिळते निरामया ॥२१
निर्दंभ निष्काम भजेल, त्याप्रति । भो शंभु मद्भक्ति तयासि दे अति ॥
हा सेतु जो मत्कृत पाहि मानव । तरेल तो सागर अश्रमें भव !'॥२२
रामोक्तिनें सर्व सुतुष्ट होउनी। आपापल्या आश्रमिं जाति सन्मुनि ॥
अशी उमे! राघवरीति सुंदर । कीं प्रीति भक्तीं करणें निरंतर ! ॥२३॥
उत्कृष्ट सेतू नलनीलिं बांधिला । कीर्ती भरे रामकृपें नसे तुला ॥
बुडोनि जाती बुडवीति दूसऱ्यां। शिला अशा अर्चित जाहल्या तऱ्या!
माहात्म्य हें ना जलराशिचे लव। न वा कपीचें, नच वा शिलोद्भव ॥
श्रीराघवाचाच असे प्रताप हा । ऐशासि ना वंदिति, मंद ते पहा !

श्रीरामचंद्ररघुवीरविभुप्रतापें । पाषाण सागरजलीं तरले अपापें ! ॥
रामा अशा त्यजुनि अन्य कुणा प्रभूसी।जे ध्याति ते खचित मूढचि मौर्ख्यराशि
पाहोनि सेतु अति तो दृढ बांधियेला । श्रीरामचंद्र करुणानिधि तुष्ट झाला॥
सेना तयावरुनि चाललि वानरेना । ते गर्जतात कपिवीर समूह नाना !२७
तैं सेतुबंधिं रघुराय चढे कृपाळ । सर्वत्र पाहि जलराशि अपार लोल ॥
पाहावयास करुणार्द्र रघूत्तमाला । आल्या अनंत जलजीवसमूहमाला !॥२८

नाना मत्स्य असंख्य नक्र मकरव्यालादि मोठे अति ।
आकारें घन योजनेंहि अपुरीं किंवा न ज्यांना मिति ॥
अन्योन्यांप्रति भक्षणारहि तसे जे भीति अन्यांप्रति ।
ना भीतां प्रभुसी पहाति, हृदयीं संतोष हो त्यां किती !!! ॥२९॥

ते आणि तेथ भरले इतुके अनंत । कीं वारिपृष्ठहि तदा न दिसोनि येत ॥
श्रीरामरूप बघुनी तयिं लीन चित्त । ती धन्यता कवण वर्णु शके यथार्थ !

[illegible] चालतां कपिसैन्य तेथें । विस्तार तो कवण वर्णु शके विशेषें ? ।।
संमर्द सेतुवरि हो इतुका तदीय । कीं कोण कोण गगनीं उडुनीच जाय ।
कित्येक वारिचरपृष्ठतलांवरूनी । केलीं तदा त्वरित आक्रमणें कपीनीं ! ।।
तें रामलक्ष्मण विलोकिति कौतुकातें । हांसे कृपालु रघुराय मनीं किती तें ! ।।१२

।। इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने लङ्काकाण्डे सेतुबन्धवर्णनं नाम प्रथमस्तरङ्गः ।।

तरंग २ रा

सेनेसमेत उतरे प्रभु अब्धिपार । कोणास मेय कपियूथपती समग्र ! ।।
डेरे दिले प्रभुवरें मग पैलतीरीं । आज्ञापिले सकल वानर या प्रकारीं ।।१।।
"जा, खा फळें मधुर सुंदर कंदजात" । ऐकोनि ऋक्ष कपि धांवति जेथ तेथ
सारे तरू फळति रामहिता विशेषें । ना त्यां ऋतू अनृतु कालअकाल जैसे !
खाती कपी मधुफळें, तरु हालवीती । लंकेवरी गिरि शिला किति फेकताती !
कोठें कुठें जर निशाचर ये मिळोनि । ते नाच नाचविति त्यांप्रति चेष्टितांनीं ।।
नासा श्रुती दशनिं चावुनि खंडिताती । सोडूनि देति, जर रामयशास गाती !
जे होति राक्षस विखंडितकर्णनास । येवोनि ते रडत सांगति रावणास ।।
'वारिधी बांधिला !' ऐसें पडतां श्रवणांवरी ।।
अत्यार्त उठुनी बोले दशतुंड अशापरीं–।। ५ ।।
'कीं बांधिला जलधि, सागर, वारिराशि । अंभोधि, तोयनिधि, कंपति अप्रयासीं
अब्धी, सरित्पति, अपांपति, तो समुद्र । हें काय आयकत मी श्रवणीं अभद्र!"
तो व्याकुलत्व निज जाणुनि अंतरींचें । तें लोपवूनि वरि दावित हास्य साचें
गेला परी भिउनि रावण मंदिरांत । मंदोदरीहि परिसे तंवरी यथार्थ ।।७।।
बांधीयला प्रभुवरें उदधी सलील । हें ऐकुनी पतिकरा धरि ती सुशील ।।
आणूनि त्यासि निजमंदिरिं वंदुनीयां । जोडी करां, पदरही पसरीत जाया८
मंदोदरी वदत सत्य मनोज्ञ बोल । 'ऐका प्रिया ! वच न व्हा मनिं रोषशील!
नाथा ! तशासिंच भलें करणें जि ! वैर । ज्या जिंकण्यास बलबुद्धि शकेल थोर
तुम्हांत आणखि रघूत्तमिं तुल्य काय?। खद्योत केविं रविसा कधिं काळिं होय
ज्येणें बलाढ्य मधु-कैटभ मारियेले । जे वीर उग्र दितिवंशज पूर्वि झाले ।।१०।।

बांधील जो बलिसि, मारित कार्तवीर्या । जो भूवरी अवतरे खलनाशकार्या ॥
त्याशीं करा नच विरोध कदापि कांता॥ जो काल कर्म असु यां प्रभु हो समस्तां
श्रीरामपादकमलांप्रति वंदुनीयां । सीता समर्पण करा प्रभुला अमेया ॥
हें राज्यही सुतकरामधि सोंपवोनी । जावें वनीं रमुनि रामगुणानुमननीं ॥
आहेत नाथ ! रघुराय दयाळ दीनीं । जातां तया शरण बाधहि दे न हानि !॥
होतें मनीं सकल तें तुम्हि पूर्ण केलें । तुम्हीं सुरासुर चराचर जिंकियेले ! ॥
हे संत सांगति दशानन ! ऐशि नीति । जावें नृपें निघुनि वार्धकिं काननांतीं
जाऊनि तेथ भजणें प्रभुलागिं ज्या हो । तो हाच राम शरणागतरक्षिता हो ॥
निर्मीत, पाळित, विनाशित जो जगातें । त्यागूनि सर्व ममता भजणें जि ! नाथें
यत्प्राप्तिसाठिं करिती मुनिवर्य यत्न । राज्य त्यजूनि नृप होति विरक्तिपूर्ण ॥
तो रामराय विभु कोसलनाथ येत । तुम्हांवरी करिल तो करुणार्द्र चित्त ॥
मत्प्रार्थना जर तुम्ही परिसाल कांत !। त्रैलोक्यिही तुम्हिच व्हाल सुकीर्तिमंत"
हें बोलतां नयनिं अश्रु भरोनि येती । ती कांतपाद धरि कंपितगात्रमूर्ति ॥
बोले "भजाल जर कां करुणार्द्र रामा । सौभाग्य राहिल मदीय, जया न सीमा !"
तेव्हां दशानन तिला उठवून घेई । वर्णीत तो खल तिला अपुली बढाई ॥
'ऐकें प्रिये उगिच कां मनिं घेशि भीति ?। माझ्यासमान न जगीं कुणि वीर होती
दिक्पाल मीं भुजबलीं जिणले सलील । वायू कुबेर यम काल जलाधिपाल ॥
ते देव दानव नरादि मदीय दास । मंदोदरि ! प्रियतमे ! मग भी कशास ?' ॥१९
मंदोदरी समजली मनिं हा विचार । 'हा हट्ट नाथहृदिं कालचि निर्मि घोर'
लंकेश येउनि सभे सचिवां विचारी । शत्रूशिं युद्ध करणें कवण्या प्रकारीं ॥
तें बोलती सचिव 'राक्षसनाथ ! कशी । पृच्छा अशी करितसां असकृत् अम्हांशी
हो कोणतें भय तरी ? कसला विचार ?। आम्हांस खाद्य नर वानर ऋक्ष थोर' ॥
ऐकोनि तें सचिव–भाषण त्या प्रकारीं । बोले प्रहस्त कर जोडुनि सद्विचारी॥२२
"हे नाथ ! नीतिसि विरोध करूं नका हो। ही मंत्रिबुद्धि अति कोति मुदुःखदा हो
हीं तोंडदेखलिं वचें सचिवोक्ति होत । यांहीं न कांहिंच निभाव पडेल नाथ !
लंघोनि अब्धि, कपि एकचि येथ येई । त्याची कृती सकल जाणिति चित्तिं पाहीं
तेव्हां तुम्हांस नव्हती काशिही बुभुक्षा?। जाळोनि जैं नगरि तो करि पूर्ण रक्षा !।
हे मंत्रि सांगति तुम्हां मत जें स्वकीय । तें ऐकतां सुखद, दुःखद अंतिं होय ॥
बांधीति जो सकळ वारिधितें सलील । गांठील सैन्यसमवेत गिरी सुवेल ॥२५॥

तो सांगतां नर तया अम्हि खाउं ऐसें। हे बोलतां फुगवुनी तुम्हि गाल बैसे !
हे तात ! सादर तुम्ही मम बोल ऐका । मार्ते गणा नच तुम्ही सुत भीरु देखा
जे ऐकती मधुर भाषण बोलतीही। ऐसेच होति जन या जगिं फार पाहीं ! ॥
अत्यंत भव्यकर, मात्र कठोर काना । वक्ते तसे परिसते नर अल्प माना ॥२७
पाहुनि थिट, अजि उत्तम हेंचि नीति,। सीतेसि द्या परत, ध्या मनिं रामभक्ति
रामासवें उचित सामचि सौख्यदायी । तें आचरा, प्रभु जयें मनिं तुष्ट होई ॥
घेउनि सीते जाती अरि ते तरि वाढवा न वैरातें ॥
ना तरि संमुख लढुनी मर्दावे करुनि घोर समरा ते ॥२९॥
प्रभो ! मानवलें तुम्हां जर कां मम हें मत ॥
दोंहीं परिं तुम्ही व्हाल जगतीतलिं कीर्तित " ॥३०॥
बोले सुताप्रति तदा दशकंठ रुष्ट । "कोठें शठा ! शिकशि ही तव बुद्धि दुष्ट ?॥
हो आजपासुनिच कां तव चित्तिं भीति!। तूं वंशमूळिं जणुं घातक कीटमूर्ति"॥
ऐकोनि त्या पितृवचा परुषातिघोरा । जाई प्रहस्त गृहिं बोलुनि वाक् कठोरा
'तुम्हां रुचे न हितकारिहि वाक्य तैसें। हो कालवश्य जनिं औषधही नकोसें'
संध्यागमा बघुनि रावण जाय गेहीं । तो आपुल्या विस भुजां निरखोनि पाही
लंकेचिया शिखरिं मंदिर रम्य एक । वैचित्र्यपूर्ण अति कौशलिं बद्धरेख ॥३१
जेथें अनेक गुणि गायकवृंद होती । ये तेथ रावण विलास धरूनि चित्तीं ॥
चाले मनोहरण किन्नरगान गोड । वीणामृदंगमृदुवादन ज्या न पाड ॥
रम्याप्सरा करिति नर्तन नित्य जेथ । तेथें विलासरत रावण हर्षे होत ॥
इंद्राहुनी शतगुणी रमला विलासीं । चित्तीं न भीति जरि शत्रु बलाढ्य शीर्षी

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने
' सुश्लोकमानसे ' लङ्काकाण्डे मंदोदरीरावणसंवादवर्णनं नाम
द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

सुवेलशैलीं इकडे रघूत्तम । सेनेसवें वास करी मनोरम ॥
उत्तुंगशृंगा अभिराम देखुनी । स्वच्छा समा भू रुचली तयां मनीं ॥१॥
तेथें तदा लक्ष्मण आपुल्या करीं । शय्या सुमें पल्लव आणुनी करी ॥
आच्छादि ती रम्य मृदू मृगाजिनीं । कृपाळ त्या बैसत राम आसनीं ॥

सुग्रीवाच्या अंकिं टेकूनि शीर्ष । डाव्या बाजू ठेविलें कार्मुकास ॥
भाता ठेवी दक्षिणांगीं कडेला । दों हस्तांनीं बाण सांभाळिलेला ॥३॥

कानीं सांगे मंत्र लंकेश कांहीं । पादांभोज चेपिती भक्त दोही ॥
नानारीतीं मारुती, वालिसूनू । भक्तिप्रीती तद्‌हृदीं केविं वानूं ? ॥४॥

वीरासना घालुनि वीर लक्ष्मण । प्रभूपशीं सज्जचि राहि बैसून ॥
हस्तांबुजीं बाण तसें शरासन । निषंगशोभा कटिभाग-भूषण ॥५॥

ऐशापरी सद्‌गुणधाम राघव । नवांबुदश्याम असा दयार्णव ॥
ध्यानीं अशा यन्मन लीन संतत । ते धन्य होती नर भक्तिभूषित ॥६॥

पूर्व दिशेसि विलोकी प्रभु जों देखे शशांक हो उदित ॥
" निःशंक सिंहसा हा चंद्र पहा ! " रामचंद्र हें वदत ॥७॥

पूर्वेचिया गिरिगुहेमधिं वासकारी । प्रौढी प्रताप बल तेज जयास भारी ॥
मत्तेभ-कुंभतिमिरासि विदारि मूर्त । हा केसरी गगनकाननिं संचरीत ॥
मुक्तावली विखुरली जणुं तारका या । ही सुंदरी जणुं निशा सजवी स्वकाया ॥
बोले प्रभू शशिमधें अशि कृष्णता कां?। आपापल्या मतिं तुम्ही निरसा जि! शंका
सुग्रीव तैं वदत 'मी कथितों विभो ! हें । छायाच ही धरणिची शशिमाजि आहे'
कोणी म्हणे 'शशिसि जो करि राहु घाय । तें श्यामलत्व उरिं वाहत चंद्र काय ?'
कोणी तदा म्हणति "घेउनि सारभाग । चंद्रांतुनी रचि विधी रतिचें मुखांग॥
त छिद्र हें प्रकट भासत इंदुवक्षीं । छाया तयावरि कृता जणुं अंतरिक्षीं!"॥११
बोले प्रभू "गरल बंधुच इंदुचें हो । दे त्यासि ठाव हृदिं तो अपुल्या प्रिया हो ॥
तेणेंचि इंदु विषसंयुत अंशुजालीं । नारीनरां प्रियवियोगिं मनांसि जाळी !" ॥
सांगे तदा पवननंदन " नाथ ऐका । हा चंद्र होय निजदास तुम्हांस एका॥
ही तद्‌हृदीं प्रभुवरा ! तुमची सुमूर्ति।ती श्यामला निवसती करि भास तो ती" ॥
ऐकोनि मारुतिवचासि सुजाण राम । हांसे शुचिस्मित विभू हृदयाभिराम ॥
पाहूनि दक्षिणदिशे करुणानिधान । बोले "बिभीषण ! पहा तरि दिग्वितान ॥
ह्या देख दक्षिणदिशे, घनदाट मेघा । सौदामिनी विलसती द्युतिमन्त रेषा ॥
माधुर्यपूर्ण घन गर्जतसे गभीर । वाटे जणों उपलवृष्टिच हो कठोर!" ॥१५॥
तेव्हां बिभीषण वदे "परिसा कृपाळा । या दामिनी न,न म्हणा घनपंक्ति यांला॥
लंकेचिया शिखरिं सुंदर मंदिरांत । हा रावणास्तव असे ध्वनि गीतजात ॥१६॥

जे मेघडंबर परी शिरिं त्यांचिया तें । हो छत्र त्या धनपट्टहि हुनील त्यातें ॥
मंदोदरीश्रवणभूषण कुंडलें तीं । ज्या दामिनीपरि विभो अतिमात्र कांति ॥
जे वाजती बहु मृदंग सताल जेथ । त्यांचाच हा मधुर सुंदर नाद होत" ॥
हांसे प्रभू बघुनि रावणगर्ववृत्ति । घेऊनि चापशर जोडित, सोडि हस्तीं ॥
तों तत्क्षणींच पडलीं धरणीं समस्त । तें छत्र कुंडल, तसें मुकुटांसमेत ॥
सारे पहाति परि मर्म न कोणि जाणे । ऐशी चमत्कृति करी प्रभु एकबाणें ॥
ऐसें करून अति अद्भुत कृत्य तेथ । तो रामबाण परतोनि निषंगिं येत ॥
सारीच रावणसभा हृदयांत भीता । देखोनि उत्सविं तदा रसभंग होतां ॥२०॥
ना कंप भूमिसि, न मारुत वा विशेष । ना अस्त्र शस्त्र दिसलें कसलें कुणास ॥
सान्यांसि वाटत परी हृदयांतरांत । 'झालाच हा शकुन दुष्ट अतीव येथ!'
जेव्हां दिसे दशमुखा स्वसभा भियाली।हांसोनि तो वदत भाषण युक्तिशाली॥
' हो! शीर्षपातहि जया शुभकारि साचा।त्याचा कसा मुकुटपात अमंगलाचा?
आपापल्या गृहिं रिघूनि निजा सुखांत'।सारे तदा नमुनि त्या, निजगेहिं जात
मंदोदरी निजउरीं धरि थोर चिंता । कीं कुंडलें श्रवणिंचीं गळलीं पहातां ॥
डोळे भरूनि, कर जोडुनि बोलली ती।' हे प्राणनाथ ! परिसा मम नम्र उक्ति
कांता ! विरोध न करा तुम्हि रामराया।हट्ट त्यजा! नच गणा नरमात्र हो! या॥
हो विश्वरूप रघुवंशमणी ! गणा हा । विश्वास आत्महृदयीं मम वाहिंय वाहा
प्रत्यंगिं लोकवसती श्रुति सांगतात। ज्या तो रघूत्तम गणा अजि ! विश्वनाथ

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे लङ्काकाण्डे सुवेलपर्वतोपरि रामचन्द्रस्य चन्द्रव्याजेन विरहवर्णनन्नाम तृतीयस्तरङ्गः ॥

तरंग ४ था

पाताल, पादतल, मस्तक धातृलोक । अंगांगिंही अपर लोक जया अनेक ॥
यद्भ्रूविलास जणुं भीषण काल झाला । यन्नेत्र भास्कर, कचावलि मेघमाला ॥
ते अश्विनीतनय होत जयास नासा । जे कां निशादिवस त्यां तुळणें निमेषां ॥
दाही दिशा श्रवण, ज्याप्रति वेदगाती।यच्छ्वास तो पवन ही श्रुतिची वदूक्ति
जो लोभ तो अधर, जो यम घोर दांत।मायाच हास्य, दशदिक्पति बाहु होत
यद्वक्त्र अग्नि, वरुण सागर जीभ लोल । उत्पत्ति पालन विनाश जयास खेळ ॥

हो रोमराजि सम ज्यास वनस्पतीही । हे शैल अस्थि, सरिता नस रक्तवाही
नीचेन्द्रियें नरक, ज्या प्रति पोट अब्धि।हा विश्वरूपि विभु कल्पितला अनादि
ज्याचा अहंकाराचि होय शंकर । बुद्धी विधाता, मन हें सुधाकर ॥
यश्चित्त विष्णू भरि जो चराचरा । नराकृति तो प्रभु राम हा खरा ! ५
ऐसा विचार हृदयीं करुनी प्रभूशीं । वैर त्यजूनि भजणें प्रभु सौख्यराशि ॥
श्रीरामपाद-कमलीं निजचित्त ठेवा । प्राणेश्वरा ! मज अहेवपणा रहावा !' ॥
स्त्रीवाक्य तें परिसुनी दशकंठ सांगे।"आश्चर्य! मोहमहिमा बलवान् किती गे!॥
नारीस्वभाव कविवर्णित सत्य होय । कीं अष्ट दोष असती हृदयीं तदीय ॥
चांचल्य साहस असत्य अशौच माया।भीरुत्व निर्दयपणा अविवेक हो या ॥
त्यां गाइलेंस रिपुरूप समग्र भार्ये ! । जें कीं विशाल भय वर्णिशि जें मला ये
आहे प्रिये! सकल मत्करिं ईशभाव । केला प्रसादाचि तुवां कळवूनि सर्व ॥
कौशल्य हें प्रियतमे! तव जाणताहें । माझें प्रभुत्व मज वानुनि सांगशी हें॥
गूढार्थभाषण मृगाक्षि! तुझें मनासी । दे सौख्य,जें परिसतां भय सर्व नाशी!"
मंदोदरी मनिं म्हणे अजि निश्चयें हे।धीभ्रांति कांतमनिं कालवशत्वि आहे!
ऐशापरीं बहुपरीं करतां विनोद । झाली प्रभात दशकंधर तो मदांध ॥
लंकापती विगतशंक सभेंत येत । होऊनि निष्फल तथा उपदेशजात ॥११॥
वेतासि येत फल पुष्प न वा कदापि । पीयूषवृष्टि जरि मेघ तयास ओपी॥
तैसें न मूर्खहृदयीं कधि ये प्रकाश।लाभोनिही गुरु तया विधि वा महेश !

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे लंकाकांडे रावणमन्दोदरीसंवादे विराट्रूपवर्णनं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

झाले प्रभातिं इकडे रघुराय जागे । मंत्र्यांसि बोलवुनि तन्मत घेत सांगे–॥
"सांगा त्वरें अजि कसा करणें उपाय" । तैं जांबुवंत कथि वंदुनि रामपाय ॥१॥
"सर्वत्र हे प्रभुवरा ! हृदयाधिवासी । हो धर्मबुद्धि बलकांति गुणाढ्यराशि ॥
सांगूं तुम्हांप्रति यथामति मंत्र हाच । कीं पाठवा जि ! अजि अंगद शिष्टसाच" ॥
तें बोलणें बहु रुचे सकलांस चित्तीं । बोले कृपाल विभु वालिसुतासि उक्ति–
"धीमान् बलिष्ठ गुणसागर अंगदा रे !। लंकेसि जाउनि करीं मम कार्य सारें॥२॥

तूं युवराज तुज बोलुं विशेष काय ?। मी जाणतों चतुरता तव हो अमेय ।।
आलेलकाज मम, त्याचहि जें हिताचें। ऐसेंचि तूं रिपुसवें वद वाक्य साचें!”
आज्ञापितां प्रभुवरें नमुनी पदांसी । तो उक्ति अंगद करीत उठोनि ऐशी–।।
“हे राम! आपुलि कृपा मिळणार ज्यास । होईल तोच गुणसागर तोच ईश
आहेच कार्य तुमचें स्वयमेव सिद्ध । हें आदरें मजसि गौरवितां विशुद्ध ”।।
उद्गारतां वच असें युवराज चित्तीं। आनंदला पुलकमंडित धन्यकीर्ति ।।६।।
श्रीरामपादकमळीं नमुनी महत्त्व । चित्तीं धरूनि सकलां नमि शुद्धसत्त्व ।।
जात्याच वालिसुत धीर बलाढ्यवीर। रामप्रताप धरि त्यांत हृदीं उदार! ।।७।।
लंकेंत येत, तंव रावणपुत्र त्याला । खेळांत दंग दिसला सह मित्रमेळा ।।
अन्योन्य ते वदति रोषभरें मिळाले । दोघे अतुल्यबळ यौवन ज्यांत खेळे ।।८
तो अंगदावरि उगारित लाथ येत । तो ती धरी भ्रमवि भूप्रति आपटीत ।।
तें सर्व राक्षस बघोनि तशा सुवीरा । गेले चहूंदिशि पळोनि न शब्द वक्त्रा!
तें सांगती न घडलें कवणाहि वृत्त। पाहूनिही वध, समस्तचि मौनवंत ! ।।
कोलाहलें भरलि ती भयभीत लंका। ‘जो जाळि, तोच कपि ये फिरुनी न शंका?
‘बाप्या! करील अजि वानर काय आतां?’। ऐसें विचारिति समस्त भयार्तचेता
त्या वाट दाविति, तयें न विचारतांही । ज्या वालिसूनु बघि तो झुकुनीच जाई!
चिंतूनि चित्तिं रघुनायकपादकंज । तो जाय अंगद सभेमधिं शक्तिपुंज ।।
तो सिंहसाच जणुं सर्व दिशीं पहात । तो धैर्य वीर्यबलशालि पराक्रमार्थ ।।१२
धाडूनि देत क्षणिं एक निशाचराला। जो रावणा कळवि ‘वानर तेथ आला’ ।।
ऐकोनि हांसत दशानन त्यास सांगे। ‘कोठूनि येइ कपि? पाठवि येथ वेगें!’ ।।
आज्ञापिले बहुत धावुनि जाति दूत। त्या अंगदासि क्षणिं घेउनि येत तेथ ।।
तो वालिपुत्र बघि रावण बैसलेला । सप्राण कज्जलगिरी जणुं तेथ ठेला! ।।१४।।
ज्या वृक्षसे भुज, शिरें जणुं शृंगसीं तीं। नाना लताच जणुं वाटत रोमपंक्ति ।।
त्या नासिका–नयन–वक्त्र–समूह कान। होती अनंत गिरिकंदर–भासमान।।
गेला सभेंत, मन लेश न भीतियुक्त। तैं वालिनंदन महाबल बुद्धिमंत ।।
सारी सभा उठुनि राहि बघोनि त्यासी। ये क्रोध रावणहृदंतरिं तैं विशेषी!
सिंहें जसें बहु मतंगजयूथिं जावें। तैसा प्रवेश करि अंगद धीरभावें ।।
रामप्रताप हृदयामधिं आठवीत । बैसे सभेंत शिर वांकवुनी विनीत ।।१७।।

त्यातें दशानन पुसे 'कपि कोण? तूं रे !' । 'मी रामदूत' कपि सांगत 'जाण सारें'॥
माझ्या पित्यासह असे तव मैत्र नातें । त्यासाठिं मी तव हिताप्रत येत येथें॥
तूं जात उत्तम कुळांत, पुलस्तिनातू । पूजीयले शिव विरंचि बहू परीं तूं ॥
तूं मेळवीशि वर सर्व करीशि काज । जिंकूनि लोकपति होशि समस्तराज !
झाला नृपत्वमद वा मतिमोह तूंतें । सीतेशि नेशि हरुनी जगदंबिका ते !
आतां कथीन परिसें शुभ जें करील । सारे क्षमील अपराध दयार्द्रशील ॥२०॥

(आतां शुभ तुझें व्हावा सांगतों ऐक मद्वच ॥
सान्या त्वदपराधांतें क्षमा प्रभु करीलच ॥२०॥)

दांतीं धरीं तृण, गळ्यांवरि घे कुठार । सांगातिं घे जन तुझे ललनादि सार॥
सर्वांपुढें करुनि सादर जानकीस । ऐशा प्रकारिं चल टाकुनि भीतिलेश ॥२१॥
प्रार्थीहि हें "प्रणतपाल रघूत्तमा गा ! । तूं रक्ष रक्ष मज दावुनियां सुमार्गा"॥
ऐकोनियां प्रभु तुझी अशि आर्त वाणी । देईल तो अभय रे ! तुजला द्रवोनी"॥
तेव्हां दशास्य वदला कपिबालका रे ! । संभाळुनीच कर तूं मज बोल सारे॥
मूढा ! न जाणसि मला सुरशत्रुरूपा । तूं सांग नांव तव, जें तव नांव बापा ॥
कैसा असेल तव तात मदीय मित्र ? । सांगेंच रे ! कथ मला तुमचें चरित्र'॥
बोले कपी 'मजसि अंगद नाम जाण । मत्तात वालि, कधिं तो तुज भेटला न ?'
तें अंगदोक्त लव भीववि राक्षसेशा । तो सांगि "हो ! मज न ठाउक वालि कैसा ?
हे अंगदा ! असासि तूं सुत वालिजात । वंशाग्नि तूं स्वकुल-घातक दुष्टमत्त ॥
गर्भांतुनीच न कसा गळलास ? नीचा ! । 'हों दूत' आपणचि सांगसि तापसांचा
आतां वदें 'कुशल वालि' कुठें असे तो ?" । हांसोनि उत्तर तया कपि हेंचि देतो
"जाशील तूं दशदिनांतचि वालिपाशीं । त्या क्षेम तूं पुस धरोनि तया उराशीं ॥
रामा विरोध करतां, कुशलासि जैसी । तो ती स्वतांच तुज सांगिल त्या समाती !

शठा ! ऐक तयाचींतीं भेदाला मिळतें स्थल ॥
जयाच्या हृदयीं नोहे श्रीरघूत्तम निर्मल ! ॥२८॥

म्हणसी मज कुलघातक, असशी तूं स्वकुलदीप ना विसरें ॥
ना अंध, ना बधिरही, सांगिल तुज नयन कान विस विस रे॥२९॥
विधि-हर सुर-मुनि सारे पाहति सेवावयास यच्चरण ॥
त्याहूत होत कुल मी नाशीं, म्हणतां न ये तुला मरण ? " ॥३०॥

ऐकोनि वाक् अति कठोर अशी कपीची । बोले तराळनि वदे दशकंठ [illegible]॥
"दुष्टा ! तुझी सहत मी कठिनोक्ति सारी । कीं धर्म नीति मज आवडते विचारीं"
सांगे कपीहि "तव जाणत धर्मशीला । तूं चोरुनी परिहरी परकीय बाला ॥
मी दूतरक्षणि वदें तव नीतिपोषा । धर्मज्ञतीं बुडुनि तूं मरशी न कैसा ? ॥१२॥
पाहूनही भगिनितें श्रुतिकर्णहीना । तूं तत्क्षमा करिशि धर्मविचारपूर्णा ॥
आहे प्रसिद्ध जगतीं तव धर्मराशि । मद्भाग्य थोर मज भेटशि लोचनांशी !"
क्रोधें दशानन वदे "कपिकीटका रे ! । कां जल्पतोस मतिमंद ! अयोग्य सारें॥
उद्दण्ड चंड मम देख समर्थ बाहू । जो लोकपालबलपूर्णशशीसि राहू ॥ १४ ॥
आकाश हेंच सर, पाणिसमूह सारा । हा पद्मराशि मम, ज्यावरि शोभणारा ॥
कैलास शंभुसह निर्मि सुचारु भास । कीं होय सुंदर असा जणुं राजहंस ! ॥१५
रे ऐक वालिसुत ! सांग मशीं लढेसा । सैन्यामधें तुमाचिया ! तरि कोण ऐसा ?
नारीवियोगिं बलशून्यचि नाथ तूझा । तद्दुःखिं दुःखितमना लघुभाउ दूजा ॥
सुग्रीव तूंहि तरु कूलजसेच दोन । माझाहि तो अनुज भीरु अतीव जाण ॥
तो जांबुवंत अति वृद्धचि मंत्रि होय । साधेल संगरिं पराक्रम त्यास काय ? ॥
ते शिल्प-कर्म-पटु कीं नल नील साच ! । आहे महाबलि असा कपि एकलाच॥
येवोनि आधिं करि जो नगरीस दग्ध" । तैं देइ वालिसुत उत्तर हें विदग्ध—॥
"हे राक्षसेश ! वदसी मज सत्य सारें । ही जाळलीच कपिनें नगरी तुझी रे ! ॥
जाळीत रावणपुरी कपि अल्प एक । मानील सत्य तरि हें वच कोण देख ॥
ज्याची बलिष्ठ म्हणुनी करिशी प्रशंसा । सुग्रीवसेवकचि पायपिट्या लघूसा ! ॥
जो चालतो बहुत तो नच वीर होत । धाडीयले अग्नि तया कळण्यास वृत्त ॥
आज्ञा न तो मिळवितांचि तशी प्रभूची । जाळी पुरीस कपि यास्तव भीति येचि
सुग्रीवसन्निधहि तो अजुनी न येई । वाटे कुठेंतरि भयें लपुनीच राही४१
जें बोलसी दशमुखा ! वच तें न खोटें ।त्यांचा मुळींच मजलागिं न कोप वाटे
ना व्यक्ति कोणि अमुच्या कटकांत ऐसी।शोभेल जी तुज रणांगणिं झुंजण्याशी
प्रीती, विरोधहि तसा करणें समाशीं । सर्वत्र ही दिसतसे मज नीति ऐसी॥
मारील कीं मृगपती जर बेडकांना । वाटेल तो मग भला जगतांत कोणा ?
तूंतें वधूनि जरि लाघव येत रामा । मोठाच दोषहि जडेल तदीय नामा ॥
हे रावणा ! जरि खरें तरि जाण चित्तीं । की क्षात्रजातिसि अनावर रोप होती "
वक्रोक्तिचापिं शर-भाषण जोडुनीयां । सोडीत शत्रुहृदिं अंगद दुःख व्हाया
प्रत्युक्ति कांडच जणूं गमली मना ते।जीनें दशानन वदी शर काढण्यातें ॥

हांसोनि बोलत दशानन ' हो तुम्हांत । मोठाच एक गुण वानरजातिजात॥
जो कीं तुम्हां करितसे प्रतिपाल त्याचें।त्यान्या उपाधिं करितां हित तेंचि त्याचें
आहांत धन्य कपिहो ! निजनाथकाजा । कोठेंहि नाच करतां दवडूनि लाजा' !
नाचून वागडुनि रंजविता जनांना।सेवीतसां निजधन्यां चतुराइं नाना॥॥४७
हो स्वामिभक्त जगिं अंगद ! जात तूझी।गाईल ना मग कसा प्रभुसद्गुणा जी।
मी सुज्ञ तेंवि अति सद्गुण जाणणारा।तूझ्या कटूक्ति नच आणित मी विचारा।
तेव्हां वदे कपि ' तुझी गुणलालसा रे! । सांगी मला पवननंदन सत्य सारें॥
मोडोनि बाग, वधिला सुत, दग्ध लंका।नूं त्या तथापि नच देसि विशेष दुःखा
जाणोनियां तव असा प्रकृतिस्वभाव । केली धिटाइ दशकंधर मीहि सर्व ॥
तो बोलला सकल तें बघण्यास ये मी । नाहींच लाज नच रोष तुला न गुर्मी'
'हे मर्कटा ! मति तुझी अशि, खाशि बासी !'।बोलोनि हें हंसत रावण पापराशि
तें वालिनंदन वदे अति धैर्यशील । धीमान् रघूत्तमपदीं मन भावलोल ५१
'तातासि खाइं, अजि मी तुजलाहि खातों।आला परी मम हृदीं सुविचार हा तों
तूं वालिनिर्मलयशा स्मरवीसि, मत्ता ! ।नीचा अशाहि तुज मी न वधीत आतां
झाले जगांत किति रावण, रावणा रे !।तें सांग, मी परिसिलें कथितोंचि सारें॥
पातालिं एक रिघला बलितें जिणाया।त्या ठेविती शिशुच बांधुनि अश्वठायां॥
त्या बालकें छळिति ताडिति जें बघोन।सोडीत त्यासि कनवाळु बळी तिथून।
एका पुन्हां बघित तो नृप कार्तवीर्य । साश्चर्य त्या धरित वाटुनि जंतु काय।
तो कौतुकेंचि गृहिं घेउनि त्यासि येतां।झाला पुलस्ति मुनि तेथुनि सोडवीता
संकोच वाटत मना, कथितां तृतीय । जो वालिनें कवाळिला निजकक्षिं होय॥
या तीन रावणांतूनी तूं रे ! कवण ? तें मला ।
खरें सांग, त्यजोनीयां दिमाख हृदयांतला! " ॥ ५६ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकाण्डे अंगदरावणसंवादो नाम पंचमस्तरङ्गः ॥

तरंग ६ वा

लंकेश तें म्हणत ' ऐक शठा ! जरासें।तो मी असें प्रबळ रावण रे विशेषें॥
ज्याच्या भुजांतिल बला हरवील जाणे।ज्याचा पराक्रमहि जाणत शंभु तेणें १

पूजीयलें निजशिरःकुसुमावलीनें । काढोनि शीर्षकमलें निज हातिं जेणें ॥
पूजीयलें अमितवार जयें हरातें । केलें प्रसन्न गिरिजारमणांतरातें ॥ २ ॥
दिक्पाल मद्भुजपराक्रम जाणतात । ज्यांच्या उरीं अजुनही अति आर्ति होत
दिक्कुंजरांसहि तदा समजून आलें। काठिन्य मद्धृदयिं जें अतिमात्र ठेलें।
ज्या ज्या क्षणीं भिडत मी बलशालि त्यांतें।त्यांचीं कराल दशनें फुटलीं समस्तें
जावेत ज्यापरि मुळें तुटुनी सलील । वक्षांवरी धडकतां मम वज्रशील ॥४॥
जो चालुं लागत तदा धरणी डुलावी । जैसी मतंगजभरें लघु नाव व्हावी ॥
विख्यात तो जगतिं रावण विश्वजेता। त्वां ऐकलाहि न कधींच कपे! प्रमत्ता!
त्या रावणा समजसी तृणसेंच कैसा?। क्षुद्रा नरा स्तवुनि तूं करिशी प्रशंसा!
रे नीच, मर्कट, खला! भकसी असत्य।आलीं कळून तव धी, बल आणि कृत्य'
ऐकोनि अंगद सकोप वदे तयाशी।'संभाळ जीभ अधमा! बहु माजलाशी!
ज्याच्या कुठारिं अनलासम घोरमूर्ति। होळी सहस्रभुजबाहुवनां करीती॥७॥
ज्याच्या जणों परशुसागरतीक्ष्णधारा । नाशीति कीं बुडवुनी सहजीं अपारा
भूपाल-संहति मदोद्धत कैकवेळां । त्याचाहि गर्व वधतांक्षणिं ज्या निमाला८
तो काय मानवचि मानिसि रे अभागा!। दुष्टा! कसें नराचि तर्किसि विश्वरंगा?
गंगा कशी समजतोस नदीच एक। धन्वीच मन्मथ? पशू सुरधेनु नीक? ॥
सामान्य दानसम होइल अन्नदान?। साधेंच पेय कधिं होय सुधेसमान?
साधा विहंग गणशील किं वैनतेय?। शेषासही म्हणसि केवळ सर्प काय?॥
चिंतामणीस गणना दगडांत त्या कीं?। वैकुंठ तो समजणें जणुं एक लोकीं॥
श्रीरामभक्ति गणणें जणुं लाभ साधा?! रे रावणा! दशमुखा! वद बुद्धिमंदा
सेनेसमेतहि तुझा मद हारवीता । उध्वस्त जो करि वना तुझिया समस्ता ॥
लंकेसि जाळि, तव पुत्र वधोनि जाय।तो मारुती कपिच केवळ काय होय?
हे रावणा! परिस, टाकुनि धूर्ततेतें । तूं ना जरी भजसि राघवराय चित्तें ॥
होशील तूं जर खळा! जगिं रामवैरी।ना शंभु, ना विधिहि वा! तुजलागिं तारी?
मूढा! वृथा करुं नको मुळिं वल्गना या।तूं रामवैर करणें, स्थिति ऐशि व्हाया
लागोनि रामशर, पात तुझ्या शिरांना।होईल, भूवरि कपी बघतील नाना॥
ती वाटतील मदकंदुकलीच त्यांसी । ते खेळतील कपि अक्ष समस्त शीर्षीं॥
श्रीराम जैं हृदयिं कोप करून घोर।सोडील सायक भयंकर तीक्ष्ण उग्र॥१५

घालेल काय मिमली तव ही तदा रे ।।ऐशा विचारिं मज राम मत्या प्रकारें'
हें ऐकतांच सघळे दशवक्त्र चित्तीं । वाटे घृताहुतिच कीं ज्वलनीं पडे ती।
सांगेहि तो ' मम सहोदर 'कुंभकर्ण',।'शक्रारि ' तेविं मम नंदन शौर्यपूर्ण।।
माझा पराक्रम कधीं नच ऐकलास !।मीं जिंकिले बलिं चराचर विश्वकोष !।।
घे ऋक्षवानरसहाय्य तुझा धनी हें । बांधूनि सिंधु जल लंघुनि येत आहे ।।
कित्येक पक्षिहि समुद्र उडोनि जाती। मंदा कपे! नच तयां परि शूरकीर्ति !
माझा भुजाब्धि बलवारिनितान्तपूर्ण । ज्यामाजिं शूर नर देव किती निमग्न ।।
हें कीं अगाध जलराशि अपार वीस । लंघील पार तरि कोण सुधीर यांस !।।
मी लाविं दिक्पतिसही भरण्यास नीर । दुष्टा मला कथिसि भूपतिकीर्ति फार।।
ऐसा जर प्रभु तुझा रणशूर आहे । ज्याचें करीसि गुणगान पुन्हां पुन्हां हें
कां पाठवीत मजला तुज आत्मदूत। शत्रुप्रती विनवितां नच त्यासि खंत!।।
मद्बाहु देख, शिव-शैल करीत सैल । माझ्यापुढें निज धनी किति वानशील!।।
रे रावणासम असे तरि कोण शूर!। शीर्षांसि कापि अपुल्या करिं जो सुधीर।।
त्या आहुतीहि अनलीं बहुवार देत। या साक्ष होय गिरिजापति मूर्तिमंत!२२
ती शीर्षपंक्ति अनलामधिं दग्ध होतां । मी वाचिं लेख लिहि जे मम भालिं धाता।।
वाचोनि मन्मरण मानवहस्तिं तैसें । जाणोनि खोटि विधिवाक् किति मीच हांसें !
चिंतूनि तें मजसि भीति न लेश चित्तीं । कीं अक्षरें जरठधीविधि-हस्तिचीं तीं!
तूं वानिसी मजपुढें किति अन्यवीरां । दुष्टा! फिरूनि फिरुनी,नच लाजणारा!"
तैं वालिसून वदला "जगतीं सलज्ज । हे रावणा! तुजसमान न कोणि आज ।।
तूं लाजरा विनत रे सहजस्वभावें । या साठिं आत्मगुणगान तुला न ठावें ।।
रे! आठवे तुजसि मस्तक आणि शैल । जें बोललास आजि तूं मज वीस वेळ।।
तूं आपल्या भुजबला उरिं लोपवीसी । जेणें सहस्रभुज, वालि, बली, जिणीसी।।
रे मंदधी! मजसि उत्तर दे समग्र । काटोनि शीर्ष कुणि होइल काय शूर !
तो इंद्रजालि, नच वीर कथीति लोकीं । कापीतसे निजकरें निजदेह जो कीं!।।
होऊनि मोहवश जाळुनि घे पतंग । भारासि वाहि किति गर्दभवृंद संग ।।
त्यांना न कोणिहि गणी जगिं शूर ऐसें । रे बुद्धिमंद! मनिं वागविसी न कैसें !
दुष्टा! न जास्त वद कांहिं! कथीन ऐक। सोडूनि दे सकल मान, मदुक्ति देख।।
मी पातलों दशमुखा! नच सामकाम । तो पाठवीत मज राघवराय राम ।।२१।।
आणि कृपानिधि मला बहुवार हें चि। 'नाहीं शृगालवधिं केसरिकीर्ति साची'।।
आदेश राममुखिंचा धरुनीच चित्तीं । दुष्टा! तुझ्या सहन मी करिं दर्पितोक्ति।।

नाहीं तरी करुनियां मुखभंग तूझा । नेतोंचि मी जनकजेसि बळें स्वतेजा ! ॥
नीचा ! तुझें बल मला कळलें सुरारे ! । तूं आणिली परिस्त्री परनार कीं रे ! ॥
तूं राक्षसाधिपति थोरचि गर्वराशि । मी दूत, दास अवघा रघुनायकाशीं ॥
रामापमान करण्या जर मी न भीतों । इष्टीसमोर तव कौतक हें करीतों ॥३२॥
चारूनि धूळ तुज सैन्य तुझें वधोनी । जाळोनि गांव तव घेउनि सर्व राशी ॥
जातोंचि मी जनकजेसहि घेउनीयां । दुष्टा ! नसेचि परि हे महती मदीया ॥
मेल्यास मारुनि असे पुरुषार्थ कोण ! । प्राणीहि केवळ शवें, चवदाहि जाण ॥
जे कौल, कामवश, कंजुष मूढचेत । अत्यंत दीन अयशी अतिवृद्ध सात ॥
रोगी सदा, सतत कोपि, हरीसि वैरी । साधुश्रुतींप्रति विरोधक, पापकारी ॥
निंदा करी, स्वतनुपोषि-असेहि सात । हे प्राणवंत तरिही शवसेच होत ! ॥३५॥
ऐशा विचारिं न खळा ? तुज मी वधीत । आतां न रोष मम तूं कर बुद्धिमंत "॥
तेव्हां सकोप अति राक्षसनाथ सांगे । चावून ओठ अधरा कर चोळि रागें ॥
"रे नीच वानर ! हवा तुज मृत्यु आतां । छोट्या मुखीं करिसि तूं बहु थोर वार्ता॥
ज्याच्या बळें कटुक हें वच जल्पतोसी । नोहे प्रताप बलधी द्युति रे ! तयासी ॥
जाणोनि त्या अगुण मानविहीन, ऐसा । धाडीतसे वडिल त्यासि अरण्यवासा॥
तो दुःख भोगि, युवतीविरहार्त दीन । माझाहि धाक दिनरात तयास पूर्ण ॥
ज्याच्या बळें करुनि गर्व वहासि थोर । तैसे मनुष्यगण या जगतीं अपार ॥
आहार होति दिवसा निशिं राक्षसांना । जाणून, मूर्ख कपि रे ! मदमत्त हो ना"
जेव्हां करीत अशि रावण रामनिंदा । संक्रुद्ध होत कपिराट् न करीत वादा ॥
खाई किती करकरा कपिसिंह दांत । आघात दोंहिं भुजिं भूमिवरी करीत ॥
कांपे धरा पडति खालिं सभासदादि । भी-मारुतें पळति धावति सैर वृंदीं ॥
तै सांवरीत उठला दशशीर्ष काय । देदीप्यमान मुकुटां क्षितिं पात होय ॥४१॥
घेऊनि कांहिं निजमस्तकिं बैसवीत । फेंकीत अंगद किती प्रभुराज जेथ ॥
येतां बघूनि मुकुटां, कपि धांव घेती । "उल्का कशा पडति भूमिं दिसां सुकांति !
कीं क्रुद्ध रावणचि फेंकित चार हीं कां । वज्रेंच, येति अति वेगिं न यांत शंका !"
हांसोनियां प्रभु वदे "नच व्हाजि ! भीत । नोल्का न वज्र,नच राहु,न केतु होत

तेजस्वी असती देखा रावणाचे किरीट हे ।
माझ्याकडे फेंकियेले अंगदें शत्रुगर्वहें ! " ॥४४॥

माकनियां क्षणि उडी पवनात्मजें ते । आणियले प्रभुकडे धरुनि स्वहस्तें ।।
सूर्यापरी द्युति अतीवचि देखतां ती । साश्चर्यचित्त कपि ऋक्ष समस्त होती!

।। इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंककांडे अंगदेन रावणमुकुटरामसमीपप्रेषणं नाम षष्ठस्तरङ्गः ।।

तरंग ७ वा

इकडे चिडोनि रावण, सर्वां सांगे सरोष " या वेगें ।
धरुनी वधा कपीतें, " ऐकुनि अंगद सहास बघुं लागे।।१।।

सांगे पुढें " तुम्हि अशापरि सर्व धांवा । वेगेंचि शूर रजनीचर सिद्ध हो! व्हा
जेथें जिथें दिसति वानर ऋक्ष, खा ते । पृथ्वी करा सकल मर्कटशून्य कीं ते !२
आणा जिते धरुनि तापस बंधु दोनी "। त्यातें पुन्हां वदत अंगद रोषवाणी ।।
" रे बोलसी किति? नसे तुज लेश लाज । घे कापुनी निज गळे, मर तूर्ण आज
माझें बघोनि बल, भीसि न तूं अजूनी । ऐसा कुलघ्न गतलज्ज नसेचि कोणी।।
स्त्रीचोर दुष्ट अघराशि कुमार्गगामी । तूं मंदधी भकसि सैर मदांध कामी।।४।।
तूं ग्रस्त कीं मनुजभक्षक सन्निपातें। होतास कालवश आज खला ! स्वहस्तें ।।
देतील ऋक्ष कपि जैं तुजला चपेटे । तेव्हांच कर्मफल तूज समग्र भेटे !! ।।५।।
तूं बोलसी मनुज केवळ राम होय । तेव्हांच जीभ झडुनी जरि ती न जाय।।
शीर्षांसमेतचि गळेल रणांगणीं ती । यामाजि संशय खला ! न धरींच चित्तीं
एक्या शरेंच वधि जो बलशालि वाली । रे रावणा ! नराचि त्या म्हणतोस बोलीं
धिःकार रे ! तुज असो, नच शील लेश । तूं आंधळाच गमसी, जरि नेत्र वीस७
प्यावास शोणित तुझें अति ताहनेले । श्रीरामचंद्रशरसंघ खरेच झाले ! ।।
त्यां दुःख होइल म्हणोनिच सोडिं तूंतें । हें निंदका ! निशिचरा अधमाधमातें
आहे समर्थ जरि मी तव दंतभंगा । आज्ञा न देत मज राघव या प्रसंगा ।।
तोडूं शिरें दशहि रोष मला असा ये । लंका समुद्रिं बुडवावि बलें अमेयें'।।९
ही होय उंबर फलासम मात्र लंका । जंतूंपरीच तुम्हि त्यांत मुळीं न शंका! ।।
हे खावयास फल नाहिं मला उशीर। आज्ञा परी न मज दे रघुवीर धीर "१०
ऐकोनि युक्तिवच तें दशकंठ हांसे । बोले " कुठें शिकासि रे ! वदण्यास ऐसें"।।
वाली कपी न वदला असत्या बढाया। लावीति तापस लबाड तुला पढाया !"

'मी हो लव्हाळचि खरोखर विंध्य-हस्ता!। कीं ना तुझ्या उपटि मीच जिसा समस्ता?
रोषें वदोन हृदिं आणुनि रामकीर्ति। रोवी धरेवरति पाय वदे पणोक्ति॥१३
'माझे पदा शकशि तूं हटवूं शठारे!। सीतेसि हारविन, राम इथें न थारे!'॥
सर्वांसि सांगत दशानन 'वीर ऐका!। पाया धरूनि कपि हा धरणीसि फेका'
तेव्हां बलिष्ठ अति इंद्रजिदादि सर्व। जेथें तिथें उठति हर्षुनि शौर्यगर्वे॥
नानापरी करिति यत्न पदा धरूनी। ना तें हटे लवहि तैं बसले लवोनी!॥
कांहीं पुन्हांहि उठुनी झटले पदास। ना तें हले लवहि देवरिपूंसि लेश!॥
जैसे कुयोगि जन ना शकती खगेशा!। पाडावयास भवि मोहतरूसि ऐशा॥
ते मेघनादसम राक्षसवीर कोटी। येती उठोनि झटती चरणासि कष्टीं॥
गेले फिरूनि बसले लववूनि शीर्ष। ना त्या हले चरण तो कपिचा लवांश!
सांडी न पाय कपिचा लवही धरेला। तत्काळ शत्रुमद तो सगळा विराला॥
संतांसि आलि जरि संकटकोटि लोकीं। नीतीसि न त्यजित तन्मन येवढें कीं!
देखोनि शक्ति कपिची थिजले समस्त। लंकेश तैं उठत ज्या कपि बोलवीत–!
घेऊं बघे करिं पदा, तंव अंगदानें। सांगीतलें "मम पदा धरुनी न होणें॥१८
मूर्खा! जरी धरशि तूं पद राघवाचें। त्वत्प्राण रे दशमुखा! तर मात्र वांचे"
संकोचुनी परतला परिसोनि ऐसें। निस्तेजसा शशि जसा दिनमध्यि भासे
सिंहासनीं नतशिरा दशकंठ बैसे। संपत्तिमान सगळा हरलाच जैसें!॥
आत्मा जगासि रघुनायक जीवितेश। त्या शत्रुता धरुनि केविं सुखासि लेश?
रामाचिया गिरिसुते! भृकुटीविलासें। हें विश्व जन्मत, तसेंचि फिरूनि नाशे
वज्रा करी तृण, तृणाप्रति वज्र जो कीं। तद्दूतवाक्य कधिं होय असत्य लोकीं?
त्यातें पुन्हां वदत नीति कपी किती तें। मानी दशास्य न परी धृत कालहस्तें॥
तद्गर्व हारवि, तया प्रभुकीर्ति वानी।तो जाय वालिसुत त्याप्रति हें वदोनी!–
'मी जों रणीं तुजसि खेळुनि युद्धकेळि। हाणीत ना तुजसि तों वदुं काय बोली?'
आधींच कीं यमपुरा तनया कपी ने। तद्वाक्य ऐकुनि दशास्य भरे भयानें॥२१

देखिलें अंगदपणा त्यापरीं दशकंधरें॥
भयें व्याकुळ तैं झाली, सगळ्यांचींच अंतरें!॥ २४॥

धर्षोनियां रिपुबळा अति हर्ष पावे। तो वालिपुत्र बळपुंज कपि स्वभावें॥
येवोनियां धरित रामपदांबुजांसी। रोमांचकाय जळलोचन नम्र शीर्षीं!॥२५

हो सांजवेळ, दशकंधर जाय गेहीं । अत्यंत दुःखित भयाकुळचित्त होई ॥
मंदोदरी बहुपरीं समजावि कांता । "नाथा! त्यजा कुमति, घ्या सुविचार चित्तां

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुष-
विध्वंसने लंकाकांडे रावणसमासद्भंगवर्णनं नाम सप्तमस्तरङ्गः ॥

तरंग ८ वा

"ना युद्ध शोभत तुम्हां रघुरायसंगें । रामानुजें अवनिं ओढियल्याहि रेखे ॥
उल्लंघवे नच तुम्हांप्रति सर्वथा जें । जिंकाल काय समरांगणिं त्यांसि तेवें ॥
जिंकाल काय तुम्हि त्यासि रणांगणांत । यद्दूतही अति पराक्रमशालि होत ॥
कीं, कौतुकें जलधि लंघुनि येइ लंके । ना घेत चित्तिं लवही कपिसिंह शंके ॥
आरामपालक समस्त विनष्ट केले । विध्वंसिलें उपवनासि अगम्य लीलें ॥
जेणें समक्ष तुमच्या वधिलेंचि अक्षा । जाळोनियां नगरि केलि समस्त रक्षा ॥
गेले होते कुठें तेव्हां बलगर्व तुम्हांतले ! ॥
आतां नाथा ! मृषा बोलें कार्य काय जि ! निष्फलें ! ॥४॥
सांगतें मी करा त्याचा विचार हृदयीं लव ॥
न माना रामरायातें राजा केवळ मानव ! ॥ ५ ॥
तो हो चराचरस्वामी तुलना नाहिं तद्बला ॥
त्याच्या बाणप्रतापातें जाणे मारीच तो भला ! ॥ ६ ॥
कांता ! न मानिलें तुम्हीं मारीचाचेंहि सांगणें ॥
मानिलें नीच तद्वाक्य भरलें जरि सद्गुणें ॥ ७ ॥
सीतास्वयंवरासाठीं जनकाच्या सभेमधीं ॥
आले असंख्य भूपाल ज्यामधें तुम्हिही सुधी ॥ ८ ॥
विशाल बलगर्वाढ्य होतां त्यांत तुम्ही जरी ॥
रामेंच भंजुनी चाप सीता वरिलि सुंदरी ॥ ९ ॥
तेव्हां करुनि संग्राम कां न रामासि जिंकिलें ! ॥
सुरेन्द्रतनयातेंही अल्प तद्बल वाटलें ! ॥ १० ॥
धरोनि फोडिला डोळा, रामें तत्प्राण राखिले ॥
भोगी शूर्पणखा काय तेंहि तुम्हींच देखिलें ! ॥ ११ ॥

तरीहि न विशेषत्वें वळले तुमचें मन ॥
विराध वधिला लीलें, कबंध, खर, दूषण ! ॥ १२ ॥
वाली एक शरें जेणें मारिला त्यास ओळखा ॥
कांता ! चित्तामधें जाणा राघवा विश्वपालका ॥ १३ ॥
नाथा ! पहा जगन्नाथें लीलें हो बद्ध सागर ॥
सेने-समेतही आला सुवेले जगदीश्वर ॥ १४ ॥

कारुण्यराशि रविवंशमनोज्ञकेतु । तो दूत पाठवि तुम्हांप्रति भव्यहेतु ॥
जो कीं सभेंत तुमचें बल मंथि सर्व । जैसा हरी मृगपती बहुदन्ति-गर्व ॥ १५ ॥
ज्या दास होति रणधीर बलाढ्य खासे । ते शूरवीरमणि अंगद–मारुतीसे ॥
त्यांतें प्रिया ! म्हणतसां नर लाखवार । हा व्यर्थ मान, ममता मदगर्वभार !
हा ! हाय ! कांत ! तुम्हि राघववैर केलें । कालप्रभाव ! मनिं राहि न बोधियेलें ॥
घेऊनि दंड नच मारि कुणासि काल । तो धर्मबुद्धि हरि शक्ति विचार शील १७
हे नाथ! ज्यां जवळि ये जगिं कालपाश । त्यांना मतिभ्रमचि होय जसा तुम्हांस !
दों मारिले तनय, दग्ध पुरी, अजूनी । द्या जी ! तुम्ही परसती प्रभुला भजूनी १८
श्रीरामराय करुणांबुधि पुण्यमूर्ति । नाथा ! तया शरण जाउनि घ्या सुकीर्ति "॥
नारीवचें परिसुनी शरतीक्ष्ण ऐशीं । येई प्रभातिं उठुनी अपुल्या सभेसी ॥ १९
सिंहासनीं बसत तो अभिमानपूरीं । चित्तांतली विसरुनी निज भीति सारी ॥
पाचारि राम इकडे प्रिय वालिजाता । तो येउनी प्रभुपदांबुजिं ठेवि माथा २०
अत्यादरें बसत रामसमीप भक्त । बोले कृपाळु खरशत्रु सुहास्ययुक्त ॥
"हे अंगदा ! नवल हें मज फार चित्ता । मी जें विचारिं तुज सांग खरेंचि ताता !
आहेच रावण निशाचर-वंशहीर । ज्याचा प्रताप जगतीतलिं फार थोर ।
त्याचे तुवां मुकुट फेंकियलेसि चार । तूं केविं ते मिळविलेसि वदें समग्र २२
तैं अंगदें कथियलें 'प्रणतार्तिनाशा ! । सर्वज्ञ आपण कथा पुसतां जि ! कैशा !
ऐका प्रभो ! मुकुट ते नव्हतीच चार । ते होत भूपगुण चार महा उदार २३
जे साम दाम गुण दंड, तसाच भेद । राजामधें वसति गाति जयांस वेद ॥
ते नीतिधर्ममय या चरणां उदारां । जाणोनि येति तुमच्याच तयांस थारा !॥
जो धर्महीन विमुख प्रभुपादपद्मा । जा आयचा निशिचराधिप, कालसद्मा
त्या रावणा त्यजुन ते गुण येथ आले । जाणा, तुम्हां रघुपतिप्रति आणि चाले !'

ऐकोनी ती परम चतुरा अंगदाची सदुक्ति ।
श्रीरामाची प्रमुदित अती जाहली चित्तवृत्ति ॥
सांगे रामा सकल, घडलें वृत्त लंकापुरीं जें ।
वालीचा तो तनय, भगवद्भक्ति चित्तीं विराजे ॥ २६ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे अंगदस्य लंकासकाशाद्रामसमीपागमनवर्णनं नामाष्टमस्तरङ्गः ॥

तरंग ९ वा

तैं शत्रुवृत्त सगळें समजोनि येतां । श्रीराम बोलवुनि घे साचिवां समस्तां ॥
लंकेचिया अति सुसज्जचि चारि वेशी । ते सर्व चिंतिति कसें रिघणें प्रवेशीं १
तेव्हां बिभीषण कपीश सजांबुवंत । चित्तीं स्मरूनि रघुवंशकुलाधिनाथ ॥
ते सर्व रीतिं करिती सुविचार हाच । कीं चार भागिं करणें कपिसैन्य साच॥
केले नियुक्त कटकाधिपति प्रभावी । बोलाविले सकल यूथपतीहि तेवीं ॥
रामप्रताप सकलांसि निवेदियेले । तैं सिंहनाद करुनी कपिही निघाले ! ॥ ३
हर्षोनि रामचरणीं लवुनी शिरातें । घेवोनि अद्रिशिखरें कपि धांवती ते ॥
ते गर्जती सकल ऋक्ष कपी सुघोष । 'श्रीरामराम जय राघव कोसलेश !' ४
जाणोनिही परमदुर्ग अशीच लंका । रामप्रतापिं कपि घेति न लेश शंका ॥
घेरीयली चहुंदिशीं नगरी कपींनीं । भेरी निषाणरव वाजविती मुखांनीं !! ५
'श्रीरामराय जय लक्ष्मणराय !' घोष । 'सुग्रीवराय ! जय राघव कोसलेश' !
हे सिंहनाद कपि ऋक्ष करीति वीर । ज्यांच्या बलद्युतिंसि नाहिं कुठेंचि पार!६
कोलाहलें भरुनि जाय समस्त लंका । गर्विष्ठ रावण म्हणे परिसोनि "देखा!
हो काय वानरगणा सुचली धिटाई !" । बोलावि राक्षसचमूपति त्याच ठायीं ७
सांगे 'इथें सकल वानर काळयोगें । आलेत, राक्षसगणांसहि भूक लागे !' ॥
ऐसें म्हणोनि करि तो शठ अट्टहास। बोले 'विधीच गृहिं धाडित खाद्य घास !
सारे सुवीर तुम्हि चारि दिशां मिळा हो । हे ऋक्ष वानर धरा, सगळ्यां गिळा हो'
हो रावणास अतिगर्व उमे ! शहाणे ! कीं वाहि टिट्टिभ नभा निजुनी उताणे !

आज्ञा मिळोनि रजनीचर वीर जाती। ते भिंदिपाल, बरच्या करिं शक्ति घेती
चंडां तसे परिघमुद्गरतोमरांतें । शर्के कृपाण परशू गिरि शूल घेते ॥ १० ॥
जैसें बघोनि अरुणोपलराशि त्यांतें। धांवोनि हिंस खग हाणिति चोंच कीं ते॥
मूढांस त्यां न समजे निजचंचुभंग। तैसे कपींवरि निशाचर युद्धिं दंग ॥ ११॥
घेऊनि चापशर आयुधराशि नाना। आले बलाढ्य रजनीचर ज्यां तुला ना ॥
ते दुर्गकोटिं चढती क्षणिं कोटिकोटी। युद्धार्थ ज्यांस बहु आवडि होय पोटीं!

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने
लंकाकांडे युद्धार्थमुभयसैन्यसमागमवर्णनं नाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

ते दुर्गकोटिं दिसले गण राक्षसांचे । कीं मेरुशृंगिं चढले घन कृष्ण साचे ! ॥
तैं वाजुं लागति रणार्थ निषाण ढोल । ऐकोनि चेव चढला हृदयीं अमोल॥१॥
तैं वाजुं लागति अपार नभींहि भेरी। भीरूंप्रती परिसतांक्षणिं येत घेरी ! ॥
चेष्टा तशा कपिकृताहि न कोण पाही । ते ऋक्षवीर तरि फार विशालदेही ॥२
त्यांना न त्या कितिहि दुर्गम घाट वाटा । फोडूनि पर्वत नव्या करितीहि घाटा॥
ते गर्जती कटकटां रव वीरकोटी। उड्डाणही करिति रोवुनि दांत ओठीं ॥॥३॥
द्वाहीहि एकिं 'जय रावण!' ऐशि होई। अन्यत्र घोष 'जय राम विभो!' अशाही॥
सर्वत्र शब्द 'जय हो!' 'जय हो!' असा दे। आपापलीं जय-वचें करिती अमेयें॥
लोटीति राक्षस कपींवरि अद्रिशृंगें। जीं झेलिती वरि वरींच कपीहि रागें ॥
फेंकूनि देति फिरुनी वरतीं विशालें। ज्यांहीं निशाचर किती तरि ते निमाले ! ॥

कुरीं घेउनी पर्वतखंडां प्रचंडतनु ते ऋक्ष कपी ।
लंकादुर्गावरी फेकिती लीला जणुं ती त्यां सोपी ! ॥
ओढिति चरणां धरुनि राक्षसां आपटिती ते धरणिवरी ।
पळतां त्यांतें पुन्हां बोलविति युद्ध कराया बरोबरीं ॥ ६ ॥
चपल तरुण ते निजप्रतापें चढति गडावरि किती तरी ।
मंदिरशिखरीं चढुनि ऋक्षकपि राघवकीर्ती गाति खरी ॥

एका एका धरुनि राक्षसा कपिभट परतति पळत किती ! ।
वरतीं आपण तळीं राक्षसां घालुनि मारिति उभ्या क्षितीं ! ॥७॥

रामप्रतापबलिं ते कपियूथ सारे । मर्दीति राक्षसगणांप्रति शक्तिसारें ॥
दुर्गावरी चढति वानर जेथ तेथ । रामप्रतापरविचा जय गर्जतात ! ॥८॥
आई निशाचर-समूह तदा पळोनी । जावेत मेघ पवनें अति विस्कळोनी ॥
कल्लोळ सर्व नगरांत भरून जात । बालें स्त्रिया रडति शोकभरें नितान्त ॥९॥
देती शिव्या सकळ निंदुनि रावणास । 'राज्यांत आणित निमंत्रुनि मृत्युपाश' ॥
सेना स्वकीय विचला परिसोनि कानीं । लंकेश त्या परतवोनि वदे स्ववाणी ॥
"जाईल जो विमुख होउनिदां रणातें । तीक्ष्णीं कृपाणिं अजि मीच वधीन त्यातें॥
सर्वस्व खाउनि यथेच्छहि भोग नाना । स्वप्राणिं कीं समरिं वल्लभता सुटेना !" ॥
ऐकोनि उग्र वचना सगळेच भ्याले । वाटोनि लाज, परि, वीर फिरूनि आले ॥
वीरासि होय रणिं सन्मुख मृत्यु शोभा । या निश्चयें त्यजिति चेवुनि जीवलोभा ॥
नानायुधें धरुनि ते लढती समस्त । आह्वान देति रिपुतें अतिरोषयुक्त ॥
शस्त्रेंचि शूळ परिघादिक हाणुनीयां । ते क्लेशवीति अति ऋक्ष-कपींसि कीं या ॥
सारे भयाकुल कपी पळुं लागले ते । होणार गौरि ! जरि शेवटिं तेच जेते ! ॥
कोणी तरी पुसत अंगद, वायुसूनु । कोठें बली द्विविद नीळनलादि? नेणूं ! ॥१४॥
जाणे मरुत्सुत टिके नच आत्मसेना । तो द्वारिं पश्चिमिं असे रणरंगराणा ॥
तेथें करीत अति संगर मेघनाद । भंग न वेश कठिना नच शक्य भेद ॥१५॥
संक्रुद्ध होय पवनात्मज फार चित्तीं । गर्जे बलाढ्य जणुं कालचि योधमूर्ति ॥
लंकातटावरि चढोनि सुवीर पावे । तो मेघनादिं गिरिखंड धरोनि धावे ॥१६॥
केला विभग्न रथ, सारथि संहरीला । लत्ताप्रहार हृदयावरि हाणियेला ॥
जाणोनि त्या विकल, सारथि अन्य कोणी । घालोनियां रथिं क्षणीं सदनांत आणी ॥
जैं अंगदें परिसिलें तटिं एकलाच । गेला असे चढुनि मारुति वीर साच ! ॥
तैं जाय वालिसुतही वरतीं चढून । लीलेंचि तो समरवीर अतीव तूर्ण ॥१८॥
ते क्रुद्ध युद्धपटु वैरि-विरुद्ध दोन । रामप्रताप हृदयामधिं संस्मरून ।
धावोनियां चढति रावण—सद्म—माथां । द्वाहीहि गर्जति रघूत्तम—कीर्ति—सत्ता
तें सद्म त्यांहिं कळसासह भग्न केलें । पाहोनि रावणमनीं भय निर्भियेलें ! ॥
नारीसमूह उर ताडुनि बोलताती 'उत्पातकारि कपि हे अजि दोन येती !'

चेष्टा करीत कपि त्यां भिववीति दोनी। श्रीरामचंद्रयश उत्तम गाति गानीं॥
ते स्तंभ कांचनि कधीं उपटोनि घेती।सर्वत्र हाणुनि विनाश तयें करीती! २१
गर्जोनि ते प्रविशले रिपुसैनिकांत । मर्दीति त्यांसि भुजशक्तिबलें नितान्त ॥
लत्ता कुणांस विसरीति कुणां चपाटे। 'घ्या रामवैरफल हें तुम्हि हो! करंटे!'
एका एका राक्षसा मर्दुनी ते । त्यांच्या शीर्षां कापिती क्रुद्धचित्तें ॥
फेकोनी त्यां रावणापास देती । भग्नें होती कीं दहीहंडिशीं तीं ! ॥२३॥
जे मुख्य मुख्य रजनीचर कीं विशेष । त्यांतें धरूनि पदिं फेंकिति रामपास
सांगे बिभीषण तिथें अभिधान त्यांचें। दे राम त्यांस निजधाम अनंत साचें!
जे मानवाद खल जे द्विजमांसभक्षी।पावे तयांहि गति जी मनिं योगि कांक्षी
मानी उमे ! मृदुमना करुणाब्धि राम।'वैरेंहि राक्षस मला स्मरतो निकाम'
दे त्या अनुत्तम गती प्रभु जाणुनी हें।ऐसा कृपालु गिरिजे ! जगिं कोण आहे?
भ्रांति त्यजूनि विभुला भजती न जे कीं । दुर्भागि ते परममंद मनुष्यलोकीं
' दुर्गीं प्रविष्ट जणुं अंगद मारुतीही '। श्रीरामचंद्र म्हणती वच तर्कवाही॥
लंकेंत दोन कपि ते सजतात कैसे?। मंथीति सिंधुजल मंदर दोन जैसे !॥२७॥
भुजबळें अरिसैन्य विमर्दुनी । वधुनि ये दिन जाउनि, यामिनी ।
उभय ते विगतश्रम राघवा । जवळि येउनि वंदिति सोत्सवा ॥२८॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे राक्षसवानरयुद्धवर्णनं नाम दशमस्तरङ्गः ॥

—:॰:—

तरंग ११ वा

माथा तयीं लवविला प्रभुपादपद्मीं । श्रीरामचित्त विहरे अतिसौख्यसद्मीं ॥
पाहे कृपानिधि तया युगला सुवीरा । सौख्यासि सेविति गतश्रम ते अपारा॥
पाहोनि अंगद, मरुत्सुत दोंहि गेले । ते ऋक्ष वानरहि वीर तसे निघाले ॥
संध्याप्रदोषबल पावुनि राक्षसांनीं । हाही पुकारली दशाननकीर्तिगानीं ॥२॥
पाहोनि राक्षसचमू फिरले कपीही । चावोनि दांत लढती अति शौर्यवाही ॥
दोही बलें प्रबल, वीरहि एकमेकां । आह्वान देति लढती न धरून शंका ॥

ते कृष्णवर्ण रजनीचर वीर थोर । वर्णे अनेक परि वानरवीर शूर ॥
योद्धे समानबल दोंहि दलांतले जे । क्रोधें भरून लढती अतिशौर्यतेजें ॥ ४ ॥
प्रावृट्घनावलिशिं शारदमेघराशि । जाणों लढे, बघुन सोडि सर्वे जयासी !
संग्राम भीषण महान् घनघोर ऐसा । ज्याचें यथार्थ करि वर्णन कोण कैसा !
देखे अकंपन तसें अनिपातिकाय । म्याली असे निजचमू नच राहि धैर्य ।
माया सृजीति निमिषीं तम त्यांहिं केलें । रक्तोपलांसहित भस्मचि वर्षियेलें !
दाही दिशां तिमिर दाट भरोनि येतां । कोणास कोण न कळे कपिंना समस्तां
नालोचतां कुणि कुणां करिती मुखांनीं । आवाज घोर रवि ते किति आरडोनी !
मायादि मर्म कळतांक्षणिं राघवातें । घे बोलवोनि क्षणिं सांगद मारुतीतें ॥
त्यातें निवेदित रघूत्तम सर्व वृत्त । जें आयकोनि कपिसत्तम रुष्ट होत ॥ ८
तेव्हां कृपानिधि रघूत्तम चाप जोडी । अग्न्यस्त्र सायकवरा अति तूर्ण सोडी
होतां प्रकाश क्षणिं, ना तम राहि कोठें । ज्ञानोदयें नुरत संशय, हें न खोटें !
ते ऋक्ष वानर तदा मिळतां प्रकाश । त्रास–श्रमां चुकविती हृदिं घेति हर्ष ॥
हो गर्जना इतुकि अंगद–मारुतींची । गेले पळोनि रजनीचर ते त्वरेंचि ॥ १०
त्यां धांवतां धरणिं पाडिति ते धरोनी । अत्यद्भुता करणि दाखविली करोनी ॥
ते राक्षसां भिरकवीति समुद्रिं लीलें । नक्रादिमत्स्यगणिं त्यां क्षणिं गट्ट केलें !॥
मारीयले कितिक, तोडियले कितीक । गेले गर्दी पळुनि राक्षस ते अनेक ॥
दैना अशी करुनि राक्षस–सैनिकांत । ते ऋक्ष वानर रणांगणिं गर्जतात ॥ १२
जाणोन रात्र अजुनी, कपिसैन्यभाग । चारीहि ते परतले प्रभुतें शुभांग ॥
श्रीराम त्यां करुणदृष्टिं विलोकतांच । अक्लेशचित्त कपि सर्वहि होति साच !॥

इकडे दशाननानें सचिवां अपुल्या निमंत्रुनी सकलां ।
केला विचार समरीं, अपुला सैनिकविभाग किति टिकला ॥ १४ ॥
सांगे रावण सचिवां, "सैन्यार्धा मर्दिलें कपींनीं कीं ! ।
आतां वेगें सांगा काय करावें अम्हीं कृशानीकीं ? ! " ॥ १५ ॥
तैं माल्यवंत नामक मातामह रावणास नात्यानें ।
अतिवृद्ध मंत्रिनायक राक्षस जो, कथियलें तदा त्यानें ॥ १६ ॥
त्याच्या उक्ति पवित्रा, सुनीतिपथ दावित्या परम हितदा ।
"ताता ! ऐक मदीया उपदेशालागिं, तूं बहा न मदा ॥ १७ ॥

सीतेतें तूं जेव्हांपासुनि आणीयलेंसि रे! हरुनी।
तेव्हांपासुनि होती, अशकुन जे वर्णुं काय मी फिरुनी ? ॥ १८ ॥
वेदपुराणें ज्याचीं गाति यशें आवडीं अमृतमधुरें।
त्या श्रीरामप्रभुला विमुखपणा धरुनि कोण हो सुखि रे!? ॥ १९ ॥

जेणें हिरण्याक्ष सबंधु मारिला। विनाशियेलें मधुकैटभां खलां ॥
तो हा कृपाब्धी अवतीर्ण होउनी। आला असे कीं भगवान् बुधाग्रणी ॥
जो कालरूप खलकानन दाहणारा। जो सद्गुणायतन, बोधजलास थारा ॥
ज्यातें महेश्वर विरिंचिहि सेवितात। त्याशीं विरोध करुनी हित केविं, तात!?
दे वैदेही त्यासि, टाकूनि वैर। सेवावा तूं तो कृपाळू उदार" ॥
ऐसे त्याचे शब्द बाणांसमान। लागोनी तो बोलला क्रोधपूर्ण ॥ २२ ॥
"हे दुर्भगा! वदन कां करिसी न काळें?। आहेस वृद्ध म्हणुनी तुज ना वधीलें ॥
तूं जा इथून मम दृष्टिपथींहि ये न"। ऐसें तया दशमुखें छळिलें वदोन॥२३
तैं माल्यवंत हृदयीं करि हा विचार। यातें वधूं वधत राम दयासमुद्र ॥
तेव्हां तयास हसडून शिव्या अनंत। गेलाच तो निघुनि तत्क्षणिं माल्यवंत
तों मेघनाद अतिरोषभरें वदें हें–। "उद्यां प्रभातिं मम कौतुक तात! पाहें ॥
बोलेन मी किति? करूनचि दाखवीन"। ऐकोन विश्वसत त्यावरि तात पूर्ण २५
प्रेमें तयास निज अंकिं दशास्य घेत। ऐशा विचारिं उजडूनि घडे प्रभात ॥
तों वेढिती कपि सुदुर्गम दुर्गसारा। कोलाहलें भरलि ती नगरी अपारा ॥२६

घेऊनि विविधें शस्त्रें किती राक्षस धावती!।
शिखरें पर्वतांचीं ते फेंकिती खालतीं किती! ॥ २७ ॥
कोट्यवधी गिरि शिखरें लोटिलिं, गोळे सुटले कितीतरी ॥
प्रलयकालच्या मेघा ऐसे गर्जुनि अशनिच पडे वरी।
विकट वीर ते मर्कट लढती एकवटोनी जर्जर ही ॥
शैल घेउनी चढति गडावरि, राक्षस वधिले किति त्यांहीं! ॥२८॥

जैं मेघनाद परिसे गढ वानरांनीं। वेढीयला स्वकटकांहिं चहूंकडोनी ॥
दुर्गावरूनि उतरे तळिं मेघनाद। शत्रूवरी चलत, वाजत वाद्यवृंद ॥२९॥
"ते बंधु युग्मवर कोसलनाथ कोठें?। त्रैलोक्यविश्रुत धनुर्धर वीर मोठे? ॥
सुग्रीव नीळ, नल, ते द्विविदादि कोठें?। तो श्रेष्ठ अंगद कुठें हनुमंत भेटे? ३०

विद्रोहि बंधुसि बिभीषण तो कुठें हो? । दुष्टास निश्चयिं वधीनाचि आज मी हो!"
बोलून यापरि शरासनिं उग्र बाण । जोडूनि ओढि अतिरोषिं नितान्त ताण ॥
संक्रुद्ध तो शरसमूह असंख्य सोडी । कीं पक्षयुक्त अहि धावति ते धडाडी!॥
सर्वत्र भूवरि कपी पडले विदीर्ण । त्याचेपुढें टिकत त्यासमर्थी न कोण ॥ ३२ ॥
जाती पळून कपि ऋक्ष रण त्यजून । इच्छाच युद्ध करण्या लवही उरे न! ॥
कोणी रणीं न दिसला कपि ऋक्ष ऐसा । ज्या कीं लढूं आशि उरे लवमात्र आशा!
तैं मेघनाद कपिवीरगणां रणात । पाडीत मारुनि दहा शर तीव्रघात ॥
गर्जेहि धीर बलवीर अतीव नादें। जो सिंहनाद रिपुदन्तिमना भया दे ॥३४॥
तेव्हां बघे पवननंदन सैन्य भीत । तो धावला जणु करालचि काल मूर्त ! ॥
घेई त्वरें उपटुनी करिं थोर शैल । तो मेघनादिं क्षणिं फेकित कोपशील॥३५॥
येत्या गिरीस बघुनी, नभिं तो उडाला । टाकूनि अश्व-रथ-सारथि त्या स्थलाला!
आह्वान देत जरि मारुति त्या कितीदा । ना येत तो निकट,जाणुनि मर्मबोधा!॥
रामापुढें मग सरे घननाद युद्धा । नानाप्रकारिं करि तो प्रभुराभनिंदा ॥
शस्त्रास्त्रसंहति रघूत्तमिं सोडि सारी । श्रीराम कौतुकिंच तोडुनि ती निवारी ॥
रामप्रताप बघुनी चिडलाच मूढ । मायाप्रयोग करु पाहत तो निगूढ ॥
जैसा कुणी गरुडसंगति खेळुं पाहे । दावूनि साप लघुसा तशि गोष्ट कीं हे!॥

प्रबला मायाशक्तिस ज्याच्या वश शिवविरिंचि लघुथोर ॥
त्या हा निशिचर दावी निजमाया मंदबुद्धि कुविचार ॥३९॥

आकाशिं तो चढुनि वर्षित अग्निराशि । क्षोणींतुनी प्रकटवी जल धारवर्षी ॥
नानाप्रकारिंहि पिशाच्च-पशाचनींना । 'मारा पिटा!' म्हणुनि नाचवि घोरवर्णा
विष्ठास्थि-केश-रुधिरासि सपूय वर्षी । कोठें कुठें पृथु शिलाहि तशा विनाशी ॥
वर्षोनि धूळि करि तो तिमिरा अशा कीं! हातासही पसरिल्या नच कोणि देखी ॥
माया-प्रकार बघुनी कपि होति भीत । साऱ्यांसि तैं गमत कीं क्षणिं मृत्यु येत!॥
तैं कौतुकें परि बघे स्मितयुक्त राम । सारे कपी सभय होत रणीं निकाम! ॥४२॥
तो एक बाण परि सोडुनि नाशि माया । जैसा रवी क्षणिंच लावि तमा निमाया॥
श्रीराम पाहि कपि ऋक्षगणां दयेनें । होती बलिष्ठ न रुचे परतूनि येणें! ॥४३॥
आज्ञा तशी मिळवि जी रघुराय देत । ते अंगदादि कपिवीरहि संगिं घेत ॥
संक्रुद्ध लक्ष्मण निघे सरसावुनीयां । हातांत सायकशरासन घेत साह्या ॥४४॥

आरक्त नेत्र, उर, बाहु विशालशोभी। शैलेंद्रकान्तिसम ती तनु नेत्रलोभी ॥
किंचित् सुरक्त सुषमा वरि शोभणारी। कीं वीर वीररस लक्ष्मण तो शरीरी ! ॥४५॥
तैं वीर पाठवि दशाननही अनेक। शस्त्रास्त्रधारि वरसावति ते अशंक ॥
अद्री नखें विटप घेउनि आयुधाली। श्रीरामघोषिं कपिवीरचमूहि आली ॥४६॥
ते जोडिजोडिं भिडले सगळेहि योध। इच्छा जयीं उभयिंही अतुला अमंद !
चावीति हाणिति रिपूंप्रति मुष्टि लाथा। ऐसे कपी विजयिं ताडिति त्यां समस्तां ॥
"मारा! धरा! अजि धरा! सकलांस मारा!॥तोडा शिरा! कर धरा! उपटा चरारा!"
ऐशा रवीं भरुनि राहिलि भूमि सारी। रुंडे प्रचण्ड समरांगणिं नर्तणारीं ! ॥
तें युद्धकौतुक नभांतुनि पाहतात। सारे विमानिं बसुनी सुरवृंद तेथ ॥
आश्चर्य युद्ध बघतां कधिं ते उदासी। दखोनियां कपिजया कधिं वा प्रहर्षी ॥

रुधिरें भरती गर्त त्यावरी धूळ सांठली ॥
अंगारराशि कीं छन्ना प्रेतधूमेंचि वाटली ! ॥ ५० ॥

घायाळ वीर रणिं शोभति रक्त कैसे?। कीं ते पलाशतरु पुष्पसुशोभि जैसे ! ॥
ते दोन वीरवर लक्ष्मण मेघनाद। जे एकमेक लढती हृदिं वैरबद्ध ॥५१॥
कोणासि कोण नच ते रणिं जाति हारी। मायावि युद्ध करि राक्षस नीतिवैरी॥
संक्रुद्ध होत हृदिं फारचि तैं अनंत। मोडी ससारथिरथा अरिच्या क्षणांत ! ॥
क्षणी अनंतपरिं त्याप्रति तेथ शेष। होई निशाचर तयें जणुं जीवशेष ! ॥
तेव्हां विचार करि रावणपुत्र ऐसा। घेणार जीव अजि संकटिं मार्ग कैसा ?
तो वीर घातकरि सोडित शक्ति त्यासी। जी लक्ष्मणोरिं धडके द्युतिपूर्ण राशि
शक्तिप्रहार करि मूर्च्छित लक्ष्मणाला। ये मेघनाद मग त्या, गतभीति झाला!
तैं मेघनादसम कोटि सुवीर तेथें। ते लागती उचलण्यास्तव लक्ष्मणातें ॥
आधार सर्व जगता प्रति जो अनंत।तो त्यांस केविं उचले! मग घेति खंत ॥५५
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' सकलकालिकलुषविध्वंसने
लंकाकांडे मेघनादशक्तितो लक्ष्मणमूर्च्छागमनवर्णनं नामैकादशस्तरङ्गः ॥

तरंग १२ वा

क्रोधवह्नि गिरिजे ! करणार दग्ध। चौदाहि विश्वभुवनें नच ज्यास बंध
सेवीति ज्या सुरनरादि चराचरादि। त्या जिंकणार तरि कोण रणांत,युद्धीं ?

खेळेसि या जगतिं जाणिल तोच लीलें। श्रीराम ज्यावरि कृपा करि शैल-बाळें
होतां निशा फिरलिं दोंहि दळें स्वठायां । सैन्यस्थिती दल-पती सरले बघाया
जो व्यापक प्रभु अजिंक्य, जगत्त्रयेश। तो तें पुसे 'करि न लक्ष्मण कां प्रवेश?'
ये वायुनंदन तयाप्रति घेउनी तों । त्या पाहतां प्रभु दयानिधि आर्त हो तो!
तें जांबुवंत कथि ' वैद्य सुषेणनामा । लंकेमधें वसत बोलवुं त्यासि रामा!'
तें मारुती धरुनि रूप लघूच जाय।त्या आणिता त्वरित गेहसमेत होय। ४
येतां सुषेण नमि राघवपादपद्मा । शीर्षासि वांकवुनि सांगित सौख्यधामा ॥
कीं कोणता गिरि, जयावरि औषधी ती।'जा मारुते! त्वरित घेउन ये स्वहस्तीं!'
श्रीरामचंद्रचरणांबुज राखि चित्तीं । चाले प्रभंजनसुत स्वबलाहि चिंती॥
हें रावणा कळवि सर्वहि वृत्त दूत । ये कालनेमिगृहिं रावण दुष्ट हेत॥६॥
सांगे दशानन तयाप्रति मर्म सारें । तें कालनेमि शिर हालवि कीं,'वृथा रे!
जो कीं समक्षचि तुझ्या नगरीस जाळी।मार्गी तया अडवि कोण बलीं विशाळीं
श्रीराघवा भजुनि तूं हित घे करून । नाथा! त्यजून कटुवाद् फुका अजाण
इंदीवराभतनु सुंदर नीलकांति । नेत्राभिराम निज वागविं तूं हृदंतीं ॥८॥
टाकून गर्व ममतादि अहंकृतीला। ध्या घोर मोहरजनींतुनि जागृतीला ॥
भक्षीत जो सहजिं कालकरालसर्पा। स्वप्नींहि त्यास परि जिंकिल कोण बापा?"
ऐकोनि रुष्ट अति रावण तो बघोनी। हा कालनेमि हृदयांत विचार आणी
कीं रामदूतकरिं मृत्यु बरा अतीव । पापात्म हा खल दशानन दुष्टभाव १०
चिंतूनि हें निघत तो, रचि मार्गि माया।उद्यान मंदिर सरस्तटिं निर्मि ठाया
तें मारुती बघुनि आश्रम चारु मानी।देखूं मुनी, जल पिऊं श्रम घालवोनी
राहे तिथें कपटवेषिच कालनेमी । मायेशदूत मन मोहवुं पाहि धामीं ॥
जाऊन मारुति तया नमवीत माथा। लागे कथूं मुनि रघूत्तमकीर्तिगाथा १२
' हें हो महत्तमचि रावण-राम-युद्ध । जिंकील राघव खरोखर कीर्तिशुद्ध ॥
मी येथुनीच बघतों रण सर्व तात। हो ज्ञानदृष्टिबल सिद्ध मला समस्त' १३
तें मागतां जल कमंडलु दे मुनी तो। सांगे कपी 'लव जलें नच तोष होतो'
बोले मुनी "सरिं निमज्जन ये करून। ज्ञानोपदेश तुज मी विधिनें करीन!"
जाई सरी, तंव पदा मकरी धरीत। होऊनि आकुल कपी तिजला वधीत ॥
ती जाय दिव्य तनु घेउनि देवलोका। बोले कपीस " अवि मी खरि निष्कलंका

त्वद्दर्शनें शमत रे! मुनिवर्य-शाप। तूं जाण हा मुनि न, राक्षस घोर पाप!" ॥
ती अप्सरा वदुनि हें वच दूर जाय। ये राक्षसाजवळ मारुति तो अमेय ॥१६
सांगे कपी 'प्रथम घ्या गुरुदक्षिणा ही। द्या मागुनी मज मुने! गुरुमंत्र तोही!'
लांगूल तच्छिरिं लपेटुनि आपटीत। तैं मृत्युकालिं तनुतें प्रकटी यथार्थ! ॥१७
तो 'राम राम' म्हणुनी असुतें त्यजीत। ऐकोनि तुष्ट मनिं मारुति तूर्ण जात ॥
तो शैलिं येत परि औषधि नोळखेचि। तैं पर्वता उपटुनी करिं घे सुखेंचि!

पर्वता घेउनी रात्रीं नभीं मारुति धावतां।
अयोध्यानगरीच्या तो वरतीं ये नभःपथा ॥ १९ ॥

देखोनियां नभिं विशाल अशा तयासी। चिंतीतसे भरत 'राक्षस तो प्रवासी' ॥
तैं त्यात्ररी नभिं फळाविण सोडि बाण। आकर्ण ओढुन धरूनहि नेम पूर्ण॥२०
तो लागतां शर विमूर्च्छित वायुपुत्र। खालीं पडे स्मरत 'राघव'नाम मात्र ॥
ऐकोनि त्या प्रियवचा भरतें उठोनी। धावोनि आतुर अती कपिसन्निधानीं
त्या व्याकुळा कपिसि लावित तो उराशीं! त्या शुद्धि आणुं बघि तो बहुत प्रयासीं
जागा न होत कपि तैं भरतें सशोकें। बोलीयलें वचन लोचनिं अश्रुसेकें ॥२२॥
"जो कीं विधी मजसि रामवियोगिं लोटी। लोटीत तोचि मज याहि सुतीव्र कष्टीं
वाक्कायचित्तिं जर मद्रति रामपायीं। पुण्या खरोखर असेल जरी अमायीं॥
होवोचि हा कपि गतश्रमशूल तूर्ण। श्रीराम हो जर मला अनुकूल पूर्ण!" ॥
तें ऐकतां उठुनियां बसला कपीश। बोलोनि 'राम जय! राघव! कोसलेश!' २४
घेऊनि मारुतिसि गाढ धरी उराशीं। रोमांचकाय नयनांबुजिं बिंदु वर्षी ॥
प्रीती न माय हृदयीं भरताचिया ती। श्रीरामचंद्रविभुला स्मरुनी स्वचित्तीं २५
त्याला पुसे 'कुशल कीं सुखधाम रामा। भ्रात्यासवें जनकजेसिहि, माय आम्हां?'
तैं थोडक्यांत कथि मारुति सर्ववृत्त। दुःखी तयें भरत हो अनुतापयुक्त ॥२६
उद्गारि तो "अहह! मी किति हा करंटा!। झालों कशास जगतीतलिं रामकष्टा?
एकाहि कार्यिं घडली प्रभुची न सेवा। हा व्यर्थ जन्म मम काय दिलास देवा!"
जाणोनि वेळ कठिना, मनिं धीर घेई। बोले पुन्हां भरत वीर कपीसि हेंही ॥
"ताता! विलंब तुज होइल जावयातें। नासेल काज जर पोंचशि तूं प्रभातें२८
शैलासमेत मम सायकिं तूं चढावें। धाडीन जेथ विभु कारुणिक स्वभावें" ॥
ऐकोनि तें म्हणत मारुति साभिमान। 'माझ्या भरें कुठुनि जाउं शकेल बाण?'

रामप्रभाव परि चिंतुनि तो विचारें । वंदी पदाब्जि भरता अति भक्तिभारें ॥
बोलेहि अंजलि जुडूनि "तव प्रताप । चित्तीं धरूनि क्षणिं जाइन मी अपाप !"॥
बोलोनि हें, मिळवुनीहि निदेश तैसा । जाई त्वरें पवननंदन रामहर्षा ॥
आतां मनीं करित तो कुतुकें विचार— । 'कैसें अमेय भरतीं बल शील थोर !।
श्रीरामपादकमलीं किति गाढ भक्ति !' । ऐसें प्रशंसि हनुमान् भरता स्वचित्तीं ॥
पाहोनि लक्ष्मणदशा इकडे प्रभूही । लीलामनुष्यतनु बोलत या वचांहीं ॥१२॥
"ही मध्यरात्र उलटे, कपि कां न येई ?" । ऐशा विलापिं अनुजा उरिं राम घेई
बोलेहि "दुःख मम तूं कधिं साहशी न । बंधो ! स्वभाविं तव रे ! मृदुताच पूर्ण
माझ्या हितास्तवचि टाकुनि मायबापां।तूं सोशिलेंसि विपिनीं हिम, वात-तापां
माझ्यावरील ममता तव ती कुठें गा !? । कां आर्त वाक् परिसुनी नच होसि जागा?
मी जाणतों जर वनीं तव हो वियोग । मी मानितों न पितृवाक्यहि तें अमोघ !
स्त्री, पुत्र, वित्त, परिवार, गृहादि सारें । होतीहि जातिहि जगीं बहु वेळ हे रे !
ऐसा विचार करुनी तरि ऊठ बाळ !। बंधू न सोदर जगीं तुजसा मिळेल ! ॥
पंखाविना खग जसा अति होय दीन । जैसा फणी मणिविना गज हस्तहीन!३६
बंधो ! तुझ्याविण तसा मम होय जीव ! ठेवील कीं जर जिवंत मला कुदैव ॥
कोण्या मुखें स्वनगराप्रति म्यां रिघावें ?। स्त्रीसाठिं बंधुसिच मी जर हारवावें ?
लोकीं अकीर्ति सहणें बरवें गमे तें । स्त्रीहानिची क्षिति न तेवढि मन्मनातें !॥
आतां अकीर्तिसह हा तव तात ! शोक । साहेल कीं मदुर निष्ठुर कीं विलोक
आधार आत्मजननीस कुमार एक । तो तूं तिनें मज दिलास करें सुरेख ॥
जाणोनि मी सुखद होइन त्या सुरीतीं । जाऊनि मी समजवूं जननी कशी ती ?।
हें सांग कीं क्षणिं उठोनि मला सुबंधो ! । हे लाडक्या ! जिवलगा गुणरत्नसिंधो !"
ऐशा प्रकारिं करि शोक विशोककारी । राजीवनेत्र विभुचे सृजितात वारि! ४०
ऐसा उमे ! खचित ईश्वर जो अखंड । भक्तीं कृपालु नरवृत्त करीं उदंड ! ॥
ऐकोनियां श्रवणिं तो प्रभुचा विलाप । झाले मनीं विकल सर्व कपी उमाप॥४१
तों त्यांत पोंहचत येउनि वायुसूनू । कारुण्यपूर्ण रसिं तो रस 'वीर' मानूं ! ॥
श्रीराम मारुतिसि भेटत हर्षराशि । सुज्ञ प्रभू अति कृतज्ञ धरीं उराशीं !! ४२

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे हनुमदौषधानयनवर्णनं नाम द्वादशस्तरङ्गः ॥

—:०:—

तरंग १३ वा

केला उपाय अति सत्वर वैद्यरावें। बैसे उठून क्षणिं लक्ष्मण, हर्ष पावे ॥
आल्यासि भेटत विभू कवळूनि वक्षीं। तैं ऋक्षवानरचमूहि भरे प्रहर्षी ॥१॥
वैद्यासि पोंचवित मारुति तेविं तेथ। जेथूनि घेउनि तयाप्रति जेविं येत ॥
वृत्तांत हा दशमुखा कळतांच सारा। दुःखें शिरें बडवि तो बहुत प्रकारां २
ये व्याकुलत्व धरुनी मग कुंभकर्णा। जागे तया करित तो विविधप्रयत्नां ॥
जागा निशाचर दिसे नयनास कैसा?। कीं काल मूर्त बसला तनुधारि जैसा ॥
बंधूसि तैं पुसत यापरि कुंभकर्ण। "कां कांति रे तव मुखीं दिसते विलीन?"॥
त्यातें मदान्ध दशकंठ निवेदि सारें! सीतेसि आणिलि हरून कशा प्रकारें॥४॥
"मारीयले सकळ राक्षस बा! कपींनीं। ते धीर वीर मम योध नुरेचि कोणी ॥
ते देवशत्रु नरभक्षक दुर्मुखादि। तैसे सुवीर अतिकाय, अकंपनादि ॥५॥
जे अन्य वीरहि महोदर मुख्य शूर। संहारिले समरधीर रणीं समग्र" ॥
ऐकोनि रावणवचा अति दुःखपूर्ण। बोले यथार्थवच यापरि कुंभकर्ण ॥६॥
"आणूनिया हरुनि ती जगदंबिका रे। कल्याण कांक्षिसि शठा! कवण्या प्रकारें?
ना तूं निशाचरपते! भलि गोष्ट केली। आतां मला उठविसी, नुठवूनि वेळीं ।७
ताता! अजून तरि तूं अभिमान टाक। श्रीराम तो भज, घडेल सुरेख देख ॥
हे रावणा! मनुज कीं रघुनाथ होय। ज्या दास मारुतिसमान असे अमेय ८
केली तुवां अहह! केवढि चूक ही रे!। आलास ना कळविण्या मज आधिं सारें
ज्याचे विरिंचि-हरसे सुर दास सर्व। त्या तूं प्रभूसि करितोसि विरोधभाव ९
श्रीनारदें मुनिवरें कथिलें मला तें। तें सांगतों तुजहि, वेळ परी न मातें ॥
आतां मदंगभरिं भेटाचि गाढ ताता!। जाऊनि मी सुफल नेत्र करीन आतां।१०
तो श्यामलांग सरसीरुहलोचनांचा। तापत्रयांतुनि विमोचन पाहुं साचा।" ॥
त्या रामरूपगुण आठवुनी मनांत। तल्लीन तो क्षणभरीं अतिमात्र होत। ॥११॥
तों त्याजसाठिं दशकंधर मागवीत। रेडे अनेक, मदिरा-घटकोटियुक्त ॥
खाऊनियां महिष तो कृतमद्यपान। तो वज्रपातसम गर्जत कुंभकर्ण। ॥१२॥
ऐसा मदांध रणधुंद, न संगिं कोण। दुर्ग त्यजून रिघला रणिं कुंभकर्ण ॥
भेटे बिभीषण तयापुढतीं सरून। सांगे नमून पदिं त्या निजनाम पूर्ण॥१३॥

बंधूसि तो उठवुनी हृदयीं धरीत । संतुष्ट होत हृदिं जाणुनि रामभक्त ॥
सांगे बिभीषण "हितप्रद रावणासी । मी बोलतां मजसि हाणित लाथ शिर्षीं॥
दुःखेंचि त्या, रघुवराश्रय मीच घेई । दीनावरीं प्रभु कृपाळुच नित्य होई"॥
तें कुंभकर्ण कथि "रावण नायकील । तो होय कालवश, त्या उपदेश फोल! ॥

तूं धन्य निश्चित बिभीषण! धन्य धन्य। तूं तात! राक्षसकुलांसि ललाम, नान्य॥
उद्धारिलास निजवंश तुवां सख्यारे! । सौंदर्यसौख्यनिधितें भजसी विचारें ॥
टाकूनियां कपट वाकृतनु·चित्त यांनीं । तू रामरायचरणां भज सर्वमानी ॥
जा तूं दुरीं मज कळे न पर स्वकीय। मीही असे रिघत कालमुखीं अवार्य!" ॥
बंधूक्त ऐकुनि बिभीषण येत मागें। त्रैलोक्यभूषण रघूत्तमपादिं लागे ॥
सांगे "विभो! गिरिसमानशरीर वीर। ये कुंभकर्ण इकडे रणरंगधीर" ॥१८॥

तें सांगतां परिसती कपि जों स्वकर्णीं। ते त्यावरी रिघति धावत गर्जनांनीं॥
घेती करीं उचलुनी गिरि वृक्ष तैसें। फेकीति त्यावरति चावुनि दांत रोषें॥१९॥
त्यातें प्रहार करिती गिरिशृंगकोटी। एकाच वेळिं कपि ऋक्ष असंख्यदाटीं ॥
ना तो बुजे, हटविला तरि तो हटे न। मारोनि अर्कफलिं कुंजर हो न खिन्न!॥
मुष्टिप्रहार तंव मारुति त्या करीत। जेणें पडे धरणिं तत्क्षणिं वेदनार्त! ॥
ताडीत मारुतिसि तो फिरुनी उठोनी। तों खालती पडत मारुति वेदनांनीं ॥
पाडीत तो क्षितितळीं नलनील यांना। जेथें तिथें क्षितिसि लोटित वीर नाना॥
झाले बळीहि कपिवीर तशा प्रहारीं। माघारिं येति कपि ऋक्ष अशा प्रकारीं॥

तो अंगदादी कपिंना विमूर्च्छित। करूनि सुग्रीवहि त्यापरि स्थित ॥
घेऊनि काखें कपिराजया चले। अमेय सामर्थ्य तयांत संचलें! ॥२१॥

लीला अशा करि उमे! नरतुल्य राम। जैशा करी गरुड सर्पगणीं निकाम॥
जो आपुल्या भृकुटिभंगिंहि नाशिं काला।शोभावि त्याप्रति अशी कशि युद्धलीला
विस्तारि विश्वविभु पावन आत्मकीर्ति। जी गाउनी नर तरून भवाब्धि जाती॥
मूर्च्छा सरोनि हनुमान् रणिं होय जागा। कोठें सुकंठ? म्हणुनी बहु शोधि जागा॥
मूर्च्छा सरोनि सुगला, जंव जाग आली!। तो भासवूनि मृतसा निसटेहि खालीं॥
तो नासिका श्रवण काढुनि टाकि दंतीं। गर्जे नभीं म्हणुनि त्या कळली कथा ती!॥
त्या कुंभकर्ण भरुनी पदिं, पाडि भूसी। सुग्रीव तें क्षणिं उठे, चपलाइ ऐसी!॥
ये तो प्रभूंजवळ तूर्ण बलाढ्य वीर। गर्जे 'कृपाळु जय हे जयवीर धीर!' ॥२७॥

त्या तोडिले जंव कळे निज नाक कान। होई विषण्ण पळ, हो अति रोषिं मग्न ॥
ये तो फिरून लढण्या; श्रुतिनासहीना। पाहून भीति भरली सकलां कपींना ! ॥

'जय जय जय जय रामा रघुकुलरत्ना!' म्हणूनि कपि सारे ! ॥
धांवति त्यावरि गर्जुनि ताडुनियां शैलपादपासारें ! ॥ २९ ॥

तै कुंभकर्ण रणरंगि चले अरींतें। कीं क्रुद्ध कालचि असे गमलें मनातें ॥
तो कोटि कोटि कपिंलागि धरूनि खात। कीं टोळ ते शिरति पर्वतकंदरांत ! ३०
नासा मुख श्रवण या फिरूनी त्रिमार्गीं। जाती पळूनि कपि ऋक्ष असंख्य संघीं!॥
तो युद्धदर्प मदमस्त निशाचरांचा। विश्वासही ग्रसिलसा गमलाच साचा ! ॥
कोणीहि वीर नच त्या टिकती रणांत। त्यां रेटले तरिहि दाखवितीच पाठ ॥
अंधेरि येइ सुभटां नच ऐकवेही। ऐशी स्थिती कपिसमूहचमूंत होई ! ॥३२॥

देखोनि कुंभकर्णाचें कपिसैन्यविमर्दन ॥
राक्षसांच्या नव्या सेना येति आणखि धावुन ! ॥ ३३ ॥
पाहे राम स्वसैन्याची स्थिति ती विकला अति ॥
पथकेंहि नवीं आलीं राक्षसांचीं तशांत तीं ॥ ३४ ॥
राजीवलोचन वदे " ऐका सुग्रीव ! लक्ष्मण ! ॥
हे बिभीषण ! रक्षा हो तुम्ही आपापले जन ॥ ३५ ॥
मीच जाऊन बघतों दुष्टसैन्यगणांप्रति ! " ॥
चाप-पाणि असे राम, भाते कटिस साजती ॥ ३६ ॥
शत्रुसैन्यविनाशार्थ असे राघव चालले ॥
टणत्कारेंचि करित आधीं बधिर तीं दलें ! ॥ ३७ ॥
सोडी लक्षावधी बाण सत्यवाक् रघुनायक ॥
सपक्ष जणुं ते जाती कालसर्पचि सायक ! ॥ ३८ ॥
जिकडे तिकडे जाती अनंत प्रभुबाणही ॥
पडती मृत होवोनी विद्ध राक्षसही महीं ॥ ३९ ॥
कोणाचे तुटले पाय, शीर्ष, वक्ष, भुजादिक ॥
कित्येकांच्या शरीरांचे खंड होती शताधिक ! ॥ ४० ॥
कित्येक पडले वीर घायाळ होउनी क्षितीं ॥
उठोनिहि पुन्हां कोणी लढती वीर ते किति ! ॥ ४१ ॥

लागतां बाण ते तीक्ष्ण मेघसे किति गर्जती ! ॥
बघूनीच तशा बाणां भागती बहु मागुतीं ! ॥ ४२ ॥
रुंडें प्रचंड वीरांचीं विनामुंडचि धांवुनी ॥
'मारा ! धरा ! धरा !' ऐसे मोठ्यानें काढिती ध्वनी ! ॥४३॥

क्षणांत ऐसें प्रभुसायकांनीं । रणांत ते राक्षस लोळवोनी ॥
श्रीराघवाच्या फिरुनी निषंगीं । प्रवेश केला तयिं लागवेगीं ! ॥ ४४ ॥
जैं कुंभकर्णें मनिं जाणियेलें । क्षणींच कीं राक्षस नष्ट झाले ॥
संक्रुद्ध तो दारुण वीर होई । सिंहापरी गर्जत राहि कांहीं ॥ ४५ ॥
कोपें करीं घे उपटोनि शैला । टाकीत जेथें कपिवीरमेळा ॥
येत्या बघोनी प्रभु त्या गिरीसी । शरें तया मेळवि तो धुळीसी ! ॥४६॥
रोषेंचि ओढूनि पुन्हां धनूसी । श्रीराम सोडी बहुबाणराशि ॥
तनूंत त्याच्या शिरुनी पुन्हां ते । श्रीरामभात्यांतचि होति येते ! ॥४७॥

सौदामिनी चमकुनी घनिं होति गुप्त । तैसेच रामशरसंघ निषंगिं होत ! ॥
रक्तप्रवाहिं किति शोभत कुंभकर्ण । कीं गेरुलोटिं जणुं कज्जलशैल पूर्ण ! ॥
तो कुंभकर्ण अति आर्त बघोनि येती । त्याचे समोर कपिऋक्षचमू तदा ती
हांसे तयां बघुनि, गर्जुनि कोटि कोटि । घेऊनि ऋक्षकपि भूतलिं त्यांसि लोटी !
मारी तयांसि गजराजबलोपमान । घे रावणावरुनि तो शपथ प्रमाण ॥
जाती तदा पळुनि ऋक्षकपी अनंत । जैसे वृका बघुनि मेषवरूथ भीत ५०
क्रंदोनि आर्त रविं ऋक्षकपी भिऊनी । जाती पळोनि वदती मुखिं हें, भवानि !
"दुष्काळसाच जणुं राक्षस घोर ये हा।नष्टांश हा कपिकुला करि काय हा ! हा!
श्रीराम हे खररिपो ! करुणासमुद्रा । तारा अम्हां प्रभुवरा ! प्रणतार्ति वारा" ॥
ती ऐकतां करुणवाक् भगवान् महौजा । घेऊन चाप शर धांवत भक्तकाजा॥
घालून पाठिसि चमू निज जी भयार्त । येई सरोष रघुनायक तो त्वरेंत ॥
जोडूनि बाणशत कार्मुक खेंचुनीयां । सोडीत जे घुसुनि पीडिति शत्रुकाया ॥५३
ते लागतांच शर कोपत कुंभकर्ण । धांवे तदा गिरि सकंप धरा हलोन ! ॥
घे तो महान् उपटुनी गिरि एक हातीं । तों राम तोडित समूल शरें भुजा ती ५४
घेऊनि वाम करिं तों गिरि, कुंभकर्ण । धांवे तदा करि रघूत्तम तीहि दीर्ण ! ॥
कैसा सवे उभय हस्तहि तोडियेला ? । कीं पक्षहीन जणुं मंदरशैल केला ! ५५

तो उग्रदृष्टि अवलोकत राघवाशी । ग्रासूं बघे जणुं जगस्त्रितयासि रोषीं ! ॥
चित्कार घोर करुनी पसरूनि तोंड । तो धांवला रघुवरावरतीं प्रचंड ! ॥५९॥
तेव्हां नभीं भयभरें सुरसिद्ध सारे । 'हा ! हा !' करीति अति आकुल ते बिचारे !
भ्याल्या सुरां बघुनि तो करुणानिधान । आकर्ण ओढुनि शरासन सोडि बाण !
ते बाण राक्षसमुखीं भरती अनन्त । ना तो पडे धरणिसी तरि शक्तिमंत ॥
आला समोर, शरसंध मुखांत ऐसा । जाणों निषंगचि सजीव कृतान्त जैसा !
कोपें तदा प्रभुवरें अति उग्र बाणें । केले शिराहुन धडाप्रति भिन्न तेणें ॥
तें रावणापुढतिं शीर्ष पडे उडून । तो आर्त होय, मणिहीन फणीच दीन!॥
धांवे प्रचण्ड धड तें, धरणीहि खाचे । तेव्हां दुखंड करि रावण त्या धडाचे ॥
ते अद्रिसे क्षितिवरीं पडती वरून । ज्यांखालिं ऋक्षकपि राक्षस होति चूर्ण ! !
तत्तेज जाय शिरुनी प्रभुच्या मुखाब्जीं । साश्चर्य देवमुनि पाहति तत्प्रभा जी ॥
हर्षोनि देव नभिं दुंदुभि वाजवीती । वर्षोनि पुष्पतति राघवकीर्ति गाती !६१
　स्तवोनियां देव निघोनि गेले । देवर्षि तों नारद तेथ आले ॥
　नभींहुनी रामगुणौघ गाती । देखोनि ती वीररसात्म मूर्ति ॥ ६२ ॥
　प्रसन्नतेनें मुनि हें कथीत । 'वेगें वधा हो ! खळ हे समस्त !' ॥
　गेले मुनी वंदुनि राघवातें । रणांगणीं शोभत राम होते ॥ ६३ ॥
　　राम विराजे संग्रामाजिरिं कोसलेश तो अतुलबली ।
　　घर्मबिंदु मुखिं कमलनयन तनु अरुण शोणितीं अति नटली!॥
　　भुजयुगिं चाळा चापशरांसी चहुंदिशिं वानर, ऋक्ष उभे ।
　　तुलसि वदे, नच शकत शेषही गाया प्रभुच्या द्युतिशोभे! ६४
　अधमा अति पापि राक्षसा । प्रभु देई निजधामसौरसा ॥
　गिरिजे ! नर मंद ते किती ! । भजती जे न रघूत्तमाप्रति ! ॥६५॥
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे कुम्भकर्णवधवर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

तरंग १४ वा

जाती दिनान्तिं निघुनी उभयें दळें तीं । सारेच वीर अतिमात्र दमून जाती ॥
वाढेच रामकृपया कपिसैन्यशक्ति । जैसें मिळोनि तृण, वाढत अग्निमूर्ति ॥१॥

रात्रंदिनीं झिजत राक्षसशक्ति जाय। जैसें स्वतां कथुनि पुण्यहि शून्य होय!
केला विलाप अतिमात्र दशाननानें। तो बंधुशीर्ष कवळीं हृदिं आर्ततेनें २
आक्रंदिती बडवुनी निजवक्ष नारी। वाखाणुनी अमित तद्गुलशक्ति सारी॥
ये तेथ त्या समयिं राक्षस मेघनाद। ताता कथा बहु कथोनि करीत बोध॥३॥
'उद्यां मदीय बल शौर्य तुम्हीं पहावें। आतांच तें कथुनि म्यां किति दाखवावें!
जो इष्ट देव मज दे रथ आणि शक्ति। ना दाखवीन अजि तात! तुम्हांस मी ती'
एशी करि बढाई तो, संपली तोंवरी निशा॥
चारी वेशींवरीं आल्या कपिसेना अनन्तशा ॥ ५ ॥
एकीं कृतान्तसम ते कपि–ऋक्ष शूर। दूजे निशाचर रणांगणयुद्धवीर॥
ते व्हावया विजयि, युद्ध करीति घोर। जें वर्णवे न गरुडा! कधिंही समग्र॥६॥
मायामयीं स्वरथिं तैं चढि मेघनाद। आकाशिं जाय बहु गर्जत उग्र शब्द॥
जें आयकोनि कपि सैन्य अतीव भीत। शस्त्रास्त्रवृष्टि करि तो वरुनी नितान्त॥७
वर्षी कृपाण तरवारि, सशक्ति शूल। वज्रायुधें, विविध अस्त्रतती विशाल॥
पाषाण, तेविं परशू, परिघादि फेकी। तो तीक्ष्ण बाणहि तसे अरिच्या अनीकीं ८
झांकोनि जाय नभ दाहिं दिशा शरांनीं। कीं मेघमंडल मघेंतिल वर्षि पाणी!॥
'मारा! धरा!' श्रवणिं ये ध्वनि हाचि सारा। मारी कुणा कवण जाणत ना प्रकारा!
आकाशिं धांवति कपी गिरि-वृक्ष-पाणि। देखोनि ना अरिसि, येतिहि खिन्न मानीं
सारेहि दुर्ग गिरिकंदर घाट वाटा। मायाबलें शरिं भरे अरि उग्र मोठा! ॥१०॥
सर्वत्र होति कपि आकुल बाणबंधीं। कीं मंदरादि पडले जणुं इंद्रबंदीं!॥
तैं सर्ववीर बलशालि मरुत्सुतादि। ते वालिसूनु नलनील भयार्तबुद्धि॥११॥
सुग्रीव, लक्ष्मण, बिभीषण मेघनादें। केले शरार्ततनु जर्जर मायियुद्धें॥
तो राघवासह करी समरप्रसंग। तद्बाण त्या छळति होउनि उग्रनाग॥१२॥
तो व्यालपाशवश होय खरारि राम। जो कीं स्वतन्त्र अविकारि अनन्तनाम!॥
नाना परीं नटसमान चरित्र वेष। लीलावतारपटु दाखवि जानकीश!॥१३॥
रणशोभा म्हणोनीयां प्रभूही होय बद्धसा॥
पावले भीतितें देव बघोनी तशि तद्दशा! ॥ १४ ॥
यन्नामही जपुनि हो भवपाशनाश। हें येतसे अनुभवा मुनिमानवांस॥
तो पाशबद्ध तरि होइल केविं गौरि!। श्रीरामचंद्रविभु विश्वनिवासकारी?॥
सगुणचरित जें हें राघवाचें भवानि!। अगमचि मतितर्का कुंठवे शक्तिवाणी॥
समजुनि मनिं ऐसें तज्ज्ञबुद्धी विरक्त। त्यजुनि सकल तर्का होति रामासि भक्त॥

सार्‍यांसि मूर्च्छित करी क्षणिं मेघनाद। होऊनि तो प्रकट देइ शिव्या मदांध ॥
तैं जांबुवंत वदला “क्षण थांब चोरा!”। ऐकोनि तें भरत कोप निशाचरोरां॥

“म्हातारा तुज जाणुनी अजि शठा! मीं सोडियेलें तुला।
देशी तूं अधमा! शिव्या परि मला घे तूर्ण रे! तत्फला!” ॥
ऐसें बोलुनि मेघनाद अपुला फेंकी त्रिशूल क्षणीं।
घेई झेलुनि जांबुवंत परि तो हाणीहि त्या धावुनी! ॥ १८ ॥

वक्षीं त्रिशूल बहु लागुनि मेघनाद। तो घेरि येउमि पडे धरणीं सशब्द ॥
त्या जांबुवंत अति रोषभरें धरीत। पायीं, तसे भ्रमवुनी भुइं आदळीत!!
त्या दावुनी बल असें निज जांबुवतें। लंकेवरीं फिरकवूनि दिलें तयातें ॥
होता तयास पहिलाच वरप्रसाद। तो यामुळेंचि न मरे तइं मेघनाद ॥२०॥
देवर्षि नारद मुनी क्षणिं पाठवीत। रामाप्रती गरुड येत तदा क्षणांत ॥
मायास्त्र नाग सगळे खगराय खाय। मायाविमुक्त कपिसैन्य सहर्ष होय! ॥
घेऊनि शैल, तरु तेविं शिला नखाना। तैं धावली कपिचमू अति रोषपूर्णा
दुर्गांत तैं सकळ राक्षस ते चढोनी।गेले पळोनि भिउनी अति दीनवाणी २२
मूर्च्छेंतुनी उठत तोंवरि मेघनाद। हो पाहुनी स्वपितया, अति खंत खेद ॥
जाइ पुढें त्वरित तो गिरिकंदरांत। चित्तीं जयार्थ, मख एक करूं पहात ॥
तेव्हां विभीषण विवेकि विभूस बोले।“ऐका उदारतम राघव! चित्तिं ओळें-
हा मेघनाद करि यज्ञ अपुण्यकारी। मायावि देवपरिपीडन दुष्ट भारी॥२४
जाईल तो जर विभो! परिपूर्णतेस। येईल ना विजय युद्धिं तुम्हांस लेश!”
तें आयकोनि रघुनायक सौख्यपूर्ण। तो अंगदप्रभृतिलागिं निमंत्रि तूर्ण ॥
“ जा लक्ष्मणासह तुम्ही सगळे कपी हो!।तो मेघनादमख नष्ट तुम्हांकरीं हो।
हे लक्ष्मणा! समरिं तूं वध मेघनाद। देखोनि हे सभय देव मला न मोद!
जेणें समस्त रजनीचर नष्ट होती। ऐसेचि तूं कर उपाय सुबुद्धिमूर्ति ॥
सुग्रीव आणिक विभीषण जांबुवंत। राहा तिथेंहि तुम्हि सज्ज चमूसमेत” ॥२७
आज्ञा तशी मिळवितांच रघूत्तमाची। भाते कटीस शरचाप करांत घेचि ॥
चित्तीं स्मरून रघुनाथयशःप्रताप। गंभीर वाग् वदत लक्ष्मण मेघकल्प ॥२८॥
“मी मारल्याविण तया जर यें फिरून। मी रामसेवक असें म्हणवीन हो न! ॥
त्या साह्य होय जरि शंभर शंकरांचें। मारीन रामशपथें अजि त्यास साचें!”२९

वंदोनि रामपदपंकजिं नम्रशीर्ष । आई त्वरेंचि रणिं लक्ष्मण मूर्त शेष ॥
त्यासंगतीं निघति अंगद नील वीर । ते मारुती नल मयंद बलें अपार ॥ ३०॥
जाऊनि पाहति कपी, तंव त्यां दिसे तो । जो रक्तमांसमय आहुति यज्ञिं देतो ॥
विध्वंसिला सकलही मख तैं कपींनीं । जों तो नुठे तंवर शंसिति त्या सुवाणी॥३१॥
तो ना तरीहि उठतां कपि तत्कचांसी । ओढीति ताडिति करें पदिंही विशेषीं !॥
जाती पळोनि दुरिं त्यांवर मेघनाद । धांवे त्रिशूळ करिं घेउनि आर्तशब्द ॥३२
तैं लक्ष्मणाजवळ वानरवीर येती । ये मेघनादहि तयांवरि कोपमूर्ति ! ॥
हाणी त्रिशूळ अति गर्जत घोरनादें । तैं वायुनंदन सहांगद ये विरोधें ! ॥३३॥
हाणी त्रिशूल उरिं त्यांप्रति मेघनाद । ते भूमिसी पडति मूर्च्छित नष्टबोध ॥
फेकी त्रिशूल अरि लक्ष्मणिं तो प्रचंड । ज्या तोडि लक्ष्मण शरें करुनी दुखंड ॥
मूर्च्छेतुनी उठुनि मारुति, वालिसूनु । त्वेषें अरीसि किति ताडिति काय वानूं !
मारीयला तरि मरे नच मेघनाद । ते येति तों परत,-धांवत तो सशब्द ॥३५॥
येत्या बघोनि कुपिता जणुं मूर्त काला । सोडीत लक्ष्मण तया विशिखा कराला ॥
येतां बघोनि परि वज्रसमान बाणां । हो मेघनाद क्षणिं गुप्त दिसे न कोणा! ॥३६॥
नाना स्वरूपिं मग तो करि युद्ध ऐसें । केव्हां दिसे प्रकट, लोपत ही स्ववेषें ॥
भ्याले कपी, बघुनि शत्रु अजिंक्य ऐसा । ये लक्ष्मणा परम कोप हृदीं अहीशा ॥
सौमित्र चिंति 'अरि म्यां बहु खेळवीला। आतां करुंचि क्षणिं अंत अशा खळाला'
चिंतूनि चित्तिं शुभ कोसलनाथकीर्ति । जोडोनि बाण क्षणिं सोडित वीरमूर्ति

मेघनादाच्चिया वक्षीं बाण तो तीक्ष्ण लागत ॥
त्यजोनी सर्वही माया होय तत्क्षणिं तो मृत ! ॥ ३९ ॥
'रामानुज कोठें हो ! राम कुठें ?' वदुनि टाकि तो प्राण ॥
'तव धन्य धन्य जननी !' उद्गारिति वालिपुत्र हनुमान ॥४०॥

उच्चलूनि तयालागीं लीलया वायुनन्दन ॥
लंकाद्वारांत ठेवोनी परते कपिभूषण ॥ ४१ ॥

तन्मृत्यू कळतांक्षणिं येती गंधर्व, देव गगनांत ॥
आपापल्या विमानीं बैसोनी धन्यवाद देतात ॥ ४२ ॥
सुमनें अनन्त वर्षति दुंदुभिही वाजवीति मोदभरें ॥
विमल श्रीरामयशां गाती सगळे निजस्वरें मधुरें ॥ ४३ ॥

" जगदाधार अनंता ! जयजयकारहि अनन्त तव करितो ॥
देवांस सर्वपरिं तुम्हि तारियले नाथ ! हर्ष मनिं भरतो !! " ॥४४॥
ऐसी स्तुती करोनी जाती सुर सिद्ध आपुल्या स्थाना ॥
लक्ष्मण भेटाया ये करुणेच्या विश्वभूषण निधाना ! ॥ ४५ ॥
सुतवध जंव कानीं पातला रावणासी । अवनिवरि पडे तो जाउनी शुद्धि नाशी
रुदन करित शोकाक्रान्त मन्दोदरीही । निज उरिं बडवोनी घे किती ती कराहीं !
तैसेच सर्वही पौर होती व्याकुळ अंतरीं ॥
' अधमा रावणा ! नीचा ! ' निंदिती सर्वतोपरीं ॥ ४७ ॥
सान्या स्त्रियांना समजावि रावण । करीत त्यांचें ऋजु शब्दिं सांत्वन ॥
म्हणे ' अहो ! चित्तिं विचार हा करा । सारीच सृष्टी समजा विनश्वरा ! '
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुषविध्वंसने लंकाकाडे मेघनादवधवर्णनं नाम चतुर्दशस्तरङ्गः ॥

तरंग १५ वा

ज्ञानोपदेशा कथि त्यांसि रावण । तत्त्वें भलीं सांगत मंद आपण ॥
परोपदेशीं सगळेच पंडित । जे आचरीती नर ते परी मित ॥ १ ॥
संपोनि रात्र जंव होत असे प्रभात । चारीहि वेशिंवरि ऋक्ष कपीहि येत ॥
तेव्हां दशाननहि बोलवि आत्मवीरां । सांगे तयां समजवूनि अशा विचारा-
"जाऊनियां रणिं पुन्हां मनिं घेति भीति।आतांच ते स्वपद मागुतिं कां न घेती ?
युद्धांतुनी परतणें नच चारु रीति । मातें गमे सुभट हो ! जगतीतलीं ती ॥३॥
मी वाढवीं भुजबलें मम शत्रुवैर।आला रिपू चढुनि त्यासि लढेन शूर " ॥
ऐसें म्हणोनि रथ साजवि वायुवेगी । वाद्यें रणोचितहि वाजति त्या प्रसंगीं ॥४॥
सारे अतुल्यबल वीर रणा निघाले । कीं कज्जलें भरुनि वादळ काय आलें ! ॥
होई तयां कुशकुनावलि त्याच कालीं।मानी बळीं न परि गर्वभरीं विशालीं ॥
अतिगर्वें ना शकुनाशकुनां गणि तो, गळती करायुधें ।
पडति रथी भट हयगज सैरा पळति क्रंदत कटु नादें ॥
गृध्र भयंकर शृगाल खरख रडति श्वानें भयस्वनें ।
कालदूत जणुं उलूक जे म्हणुं काढिति वचनें भीषणें ! ॥ ६ ॥

रामास जे विमुख कामुक मोहलुब्ध । द्रोही सदैव जगिं भूतिं जयां विरोध ।।
कोठून त्यां शकुनवैभव मंगलांचें ? । स्वप्नींहि शांतिसुख त्यांप्रति होय कैचें ?
चाले निशाचरचमू महती अनन्ता । मोठीं असंख्य पथकें चतुरंगयुक्ता ।।
नानाप्रकारिं रथवाहनयानपूर्णा । नानाविधा ध्वजनिशाणिं अनेकवर्णा
जाती गजालि मदमत्त असंख्य जींत । प्रावृट्-पयोद-ततिला जणुं वायु नेत।
रंगीं अनेक सजले जयिं दैत्य वीर । योद्धे रणांगणिं तसे कपटींहि शूर ।। ९
शोभे विचित्र अशि राक्षसवाहिनी ती । सेना जणों सजवि वीर वसंतमूर्ति !
जातां तसें कटक, दिग्गज कंपमान ! क्षोभे पयोधि, गिरि डोलति कंपपूर्ण ।।
रेणू उडोनि रवि त्यांत जणों विलुप्त । थांबे मरुद्गति, धरा व्यथिताचि होत।
वाजे निषाणपणवादिक घोरनाद । कीं गर्जती प्रलयमेघाचि ते अमंद ! ।।११।।
भेरी नफीरि सनया बहु वाजतात । वीरांतरांप्रति सुखप्रद कीं नितांत ! ।।
ते सिंहनाद करती सगळेचि वीर । उच्चारुनी प्रकटती बलराशि थोर ! १२
वीरांसि बोलत दशानन या प्रकारें-।" ते ऋक्ष वानर कुटा अपल्या मुसारें
भूपाल-पुत्रयुग बंधुसि ठार मारें " । ऐसे वदोनि चमुच्या मुखभागिं थारे

कळे हा वानरांलागीं सर्व वृत्तांत जेधवां ।
तेही धावति गर्जोनी ' जय ! श्रीराम राघवा ' ।।१४।।

विशाल धावति ऋक्षकपी ते कराल कालासम जेव्हां ।
अद्रिवृंद कीं पक्षयुक्त ते उडती वाटे मनिं तेव्हां ।।
ज्यांस आयुधें नखदंतादिक अद्रिमहाद्रुम निःशंक ।
रावण-वारण-सिंह-रघूत्तम-कीर्ति वानिती प्रत्येक ! ।। १५ ।।

आपापली जोडि बघोनि वीर । दोहींकडे हो जयघोष थोर ।।
एकीकडे राघवरायकीर्ति । दुजीकडे रावणमान गाती ! ।। १६ ।।

पाहून रावण रथी विरथीच राम । झाला बिभीषण अधीर मनीं निकाम ।।
प्रीती अती उपजवीत मनांत भीति । स्नेहें नमूनि पदपद्मि वदे निजोक्ति ।।१७
'हे नाथ ! ना रथ तुम्हां अनवाणि पाय। कैशाप्रकारिं बलवान् अरि जिंकय होय?'
तेव्हां वदे विभु तयास कृपानिधान । 'ये ज्या रथें विजय तो रथ अन्य जाण !
ज्या शौर्यधैर्यमय दोन, रथास चाकें । ज्या सत्यशीलमय हें ध्वजयुग्म ठाके ।।
घोडे जयां बल-विवेकदमोपकार । ज्याला क्षमा, गुणदया समतादि दोर ।।१९।।

ज्या ईशभक्तिमय सारथि सुज्ञ ऐसा । वैराग्य ढाल, जणुं खड्ग सुतोष जैसा
ज्या ज्ञान हें परशु, शक्ति उदंड बुद्धि । विज्ञान तेंच वरकार्मुक ज्या विशुद्धि ॥
भाता विशुद्ध मन सुस्थिर होय ज्यास । त्या बाण बाण नियमांस शमा-यमांस
ज्या विप्रसद्गुरुसमर्चन हें सुवर्म । ऐसें दुजें न विजया सदुपायमर्म ! ॥२१॥
सद्धर्मरूप रथ यापरि ज्यास होय । जिंकील कोण अरि त्या, जगिं तो अजेय ॥
जिंकील तोच भवरूप महाखळाला । मित्रा ! जयास रथ यापरि हो मिळाला ॥
संसाररूप अरि दुर्जय जिंकिणारा । तो जाण वीर सखया ! मतिमान् सुधीरा !"
ऐसें प्रभूक्त परिसोनि बिभीषणानें । वंदीयलें प्रभुपदांबुज हर्षपूर्णें ॥२३॥

'कृपा थोर प्रभू मातें या मिषें उपदेशित ॥
सौख्यसागर हे राम' हें बिभीषणसन्मत ॥२४॥
इकडे प्रोत्साहन दे दशमुख, हनुमंत वालिसुत तिकडे ॥
राक्षस ऋक्षकपी ते, लढती, गाती निजप्रभुसि कोडें ॥ २५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे श्रीरामकथितविजयरथवर्णनं नाम पंचदशस्तरङ्गः ॥

तरंग १६ वा

विधिमुख निर्जर सार सिद्ध मुनी विविध कौतुकें बघती ॥
समरा त्या अतुल अशा चढुनि विमानीं नभीं असंख्य कृती ॥१॥
त्यांच्याच संगतिं उमे ! कुतुकान्तरंग । मी ही असें बघत राघवयुद्धरंग ॥
ते वीर युद्धिं रमले दुहिं बाजुं धुंद । होती कपी विजयि रामबलानुबंध ॥२॥
आह्वान देति भट ते रणिं एकमेकां । एकास एक परिमर्दिति त्यां न शंका ॥
पाडीति भूवरति, तोडिति, आपटीती । छेदीति शीर्ष किति शीर्षि दुजा वधीती॥
फाडीति पोट, उपटीति भुजा कितीक । पाया धरोनि भिरकावित एकमेक ॥
ते ऋक्ष राक्षसभटां क्षितिं गाडिताती । गाडोनि त्यांवरति वाळु किती भरीति ॥
ते वीर वानर अतीवचि कोपलेले । कीं चंडकालपुतळे अतिरुष्ट झाले ! ॥
त्यांची तनू स्रवत शोणित शोभणारी । त्यान्या निशाचरगणासि विमर्दणारी ५

ते गर्जतात घनसे बलशालि वीर। ठोसे अरींसि वितरीति करें अपार! ॥
दंतींहि दंशति अरींप्रति देति लाथा। चित्कारुनी करिति ऋक्षकपी खलान्तां॥
ते राक्षसां धरुनि फाडिति तत्कपोलां। घेती गळां उदर फाडुनि आंत्रमाला॥
प्रल्हादनाथ जणुं नैकतनू धरूनी। खेळे रणांगणिं गमे विविधां तनूंनीं! ॥ ७ ॥
"मारा धरा, तनु चिरा विखरा" गिरा या। येती अघोरतर, भूमि नभां भराया॥
श्रीराम वज्र तृणसें तृण वज्रसें वा। जो लीलया करि, तया जय नित्य व्हावा!
पाहोनियां स्वदल तें चळतें भिऊन। येई दशानन पुढें स्वरथीं निषण्ण॥
ज्या वीस हस्ति असती दश चाप चंड। सांगे, 'फिरा, रण करा, अरिशीं उदंड!'

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे रावणवानरादियुद्धवर्णनं नाम षोडशस्तरङ्गः ॥

तरंग १७ वा

अत्यंत क्रुद्ध होऊनी धावला दशकंधर ॥
आले त्याच्यापुढें तों ते 'हा हू' करित वानर!! ॥१॥
ज्यांच्या हातांमध्यें शस्त्रें वृक्ष-शैलशिलामय ॥
तुटून पडले सारे रावणावरि निर्भय ॥२॥
लागतां शैल ते तेव्हां वज्रदेही दशानना ॥
फुटून पडती क्षोणीं पिष्टिले कीं कणांकणां! ॥३॥
राहे रावण तैसाच रथावरतिं सुस्थिर ॥
रणदुर्मद तो योद्धा अति कोपोनि अंतर ॥४॥
झोडपी आपटी रोषें कपिवीरांसि रावण ॥
अत्यंत त्वेषभारानें करी तो अरिमर्दन ॥५॥
भिऊनि पळती तेव्हां सांगती ऋक्षवानर ॥
"अंगदा! हनुमंता रे! रक्षा हे दास पामर!" ॥६॥
"दयाळो! स्वामि हे रामा! वांचवा दीन सत्वर! ॥
हा मूर्त काळसा आम्हां भक्षी आज निशाचर!" ॥७॥
कपींना पाहुनी तैशा पळत्या सोडुनी रण ॥
दशचापींहि तो बाण जोडी संक्रुद्ध रावण! ॥८॥

जोडुनि धनु शर सरसर सोडी जाती जणुं ते उरग असे।
धरणीं गगनीं दशदिशि भरुनी कपि तरि पळती कुठें कसें ? ॥
कोलाहलमय ऋक्षकपी ते आकुल होउनि ओरडती।
"आर्त बांधवा करुणासिंधो! रक्षक रघुपति तूं जगतीं!" ॥९॥

पाहोनि आकुल चमू अति आपुली ती। संक्रुद्ध लक्ष्मण करी धनु सज्ज हातीं ॥
भाते कटीस कसुनी, नमुनी विनीत। श्रीरामपायिं, रणिं धावत रक्षणार्थ ॥१०॥
बोले "खळा! वधिसि का कपिऋक्ष दीन।मातें विलोक, तव काळ मलाच जाण!"
उद्गारि रावण "सुता वधि.या तुला मी।शोर्षीं, तुला वधुनि जाइन शांतिधामीं"॥
ऐसें वदोनि अति चंड शरासि सोडी।सौमित्र त्यांसि शतशां निमिषांत खंडी॥
शस्त्रें अनन्तपरिं लक्ष्मणिं रावणानें। टाकीयलीं परि निवारिलिं तूर्ण तेणें ॥१२॥
त्याच्यावरी अमित लक्ष्मण बाण सोडी। मारूनि सारथि, रथासहि पूर्ण मोडी॥
मारी सहस्र शर तो दश-भालदेशीं। कीं व्याल ते प्रविशती गिरिशृंगशीर्षी ! ॥
मारी फिरूनि शतबाण उरांत त्यासी। तो क्षोणिसी पडत, जाउनि शुद्धि नाशीं ! ॥
मूर्च्छेतुनी प्रबळ तो उठला सरोष। तो ब्रह्मदत्त वरशक्तिसि सोडि त्यास ॥१४॥

ब्रह्मदत्त ती प्रचंड शक्ती अनन्तवक्षीं पडतांच।
पडे वीर तो विकल उचलतां रावणबलमद गत साच ! ॥
एका मस्तकिं ज्याच्या शोभे विश्व एवढें अवधि कणी।
शेषा उचलूं बघे दशानन मूर्ख नुमजुनी जगद्धनी !! ॥१५॥
तें पाहुनी मारुति येत वेगें। दशानना बोलत थोर रागें ॥
येताच तैशापरि मारुतीतें। ताडीतसे रावण मुष्टिघातें ! ॥१६॥

टेकीत जानु हनुमंत, पडे न भूमीं। संभाळुनी उठि पुन्हां मनिं रोषगामी ॥
मुष्टिप्रहार करि तोहि दशाननासी। वज्रप्रहार गिरिसा पडला न सोसी! ॥
मूर्च्छा सरोनि मग जागृत हो पुन्हांही।लागे प्रशंसु कपिशक्तिसि सद्वचांहीं ॥
तैं मारुती म्हणत 'धिग् बल शक्ति माझी!।धिक् पौरुषा मम,उठे सुरशत्रु की जी!'
तें पाहुनी अ ति रावण विस्मयासी। हो थक्क रावण तसें बघुनी विशेषीं॥
सौमित्रितें वदन राघव रामराय। "तूं मृत्युभक्षक सुरावनकारि होय" ॥१९॥
सौमित्र तैं उठुनि बैसत आयकोनी। शक्ती कराल लपली गगनीं रिघोनी ॥
घेऊनि चापशर धावत तो पुन्हांही। शत्रूसि संमुख रणांगणिं धीर होई ॥२०॥

त्येषांत रावणरथा करि भग्न तूर्ण । तत्सारथ्या करुनि मूर्च्छित पाडि पूर्ण ॥
तो रावणा हृदिं असंख्य शरांहि वेधी । क्षोणीतळीं पडत रावण, जाय शुद्धी!
घालूनि अन्यरथिं सारथि अन्य त्यासी । लंकेंत ने त्वरित वांचवुनि प्रयासीं ॥
तेव्हां प्रतापनिधि लक्ष्मण रामबंधु । वंदी रघूत्तमपदांबुज सौख्यसिंधु ! ॥२२॥

तिकडे रावण मूर्च्छा सरतां करुं एक लागला यज्ञ ।
रामविरोधी विजयाकांक्षी शठ आग्रही परम अज्ञ ! । ॥ २३ ॥

जेव्हां कळे सकल वृत्त बिभीषणासी । रामाप्रती कळवि, जाउनि त्याजपाशीं ॥
"आरंभि, नाथ ! दशकंधर एक याग । सिद्धीस जाय तर तो न मरे अभाग
धाडा विभो ! त्वरित वानरवीर तेथें । विध्वंसितां मख रिघेलचि तो रणातें" ॥
जैं आत्मवीर विभु पाठवित प्रभातीं । तैं मारुति प्रभृति अंगदयुक्त जाती ॥२५॥
लंकेंत ते चढति मारुनियां उड्याच । आले दशास्यभवनीं गतभीति साच!
जैं देखती करित यज्ञ दशाननाला । साऱ्या कपींसि हृदिं फाराचि कोप आला ॥
ते रावणा म्हणति 'लाज न कीं ! पळोनी। येशी रणांतुनि इथें बक होशि मौनी ॥
निर्लज्ज, टाकुनि रणा, सदनीं रिघोनी । ध्यानांत मग्न बकसा बसलास मौनी!" ॥
उद्गारोनि असें त्यातें लत्ता अंगद हाणित । स्वार्थांत दंग लंकेश लक्ष दे नच तीप्रत

बधिचना तों कुपित कपी त्या चावति मारिति लाथाही ।
केशीं धरुनी कर्षिति नारिस रडत दीन रविं ती राही ॥
तोंच दशानन रुष्ट काळसम कपिंना फेकी धरुनि पदीं ।
मखविध्वंसन मर्षेच केलें कपिंनीं हृदिं तो अति खेदी ॥ २९ ॥

विध्वंसुनी मख असा कपि ते खुशाल । आले समस्त विभु जेथ दयार्द्रशील ॥
संक्रुद्ध तोच दशकंठहि ये लढाया । आशा समग्र निज जीवनिं टाकुनीयां ॥

॥ इति श्रीसुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकाडे
रावणयज्ञविध्वंसवर्णनं नाम सप्तदशस्तरङ्गः ॥

—:o:—

तरंग १८ वा

चिन्हें अनेक अशुभें अतिभीतिदायी । होतीं तयास निघतां लढण्या पुन्हांही—
माथ्यावरी उडुनि त्या बसती गिधाडें । मानी न कालवश; हट्ट तदीय वाढे ! १
तो घोषवी रणमदें रणवाद्यराजी । चाले अनन्त रजनीचरवाहिनी जी ॥
तेथें पदाति, रथ, भूरि करी, सवार । सेना चले अशि, जिला गणना न पार ! २

ते धावले प्रभुवरी खलसंघ कैसे । वह्नीवरी शलभ धावुनि जाति जैसे ! ! ॥
तैं देव सर्व इकडे प्रभुला स्तवीती । "आम्हां दिल्या बहु खलें प्रखरा विपत्ति ।
आतां नका अधिक खेळवुं याजलागीं। सीताहि दुःख हृदयीं अतिमात्र भोगी !"
ऐकोनि देववच सस्मित होय राम । हातांत सज्ज करि बाण विभू निकाम ॥४॥

बांधी जटाजूट शिरीं रघूत्तम । ज्यामाजिं पुष्पें दिसतीं मनोरम ॥
रक्ताब्जसे लोचन, मेघकांति ती, । त्रैलोक्यनेत्रांस विमोहवी अती ! ॥५॥
निषंग होती कसिले कटीं कसे ? । हस्तांबुजीं शार्ङ्गधनुर्लता वसे ॥
अत्यंत शोभे प्रभुमूर्ति वीर ती । विलोचनांना अभिराम भारती ! ॥६॥

शार्ङ्ग करीं धृत, निषंग कटिसी कसले शोभति शरिं भरुनी ।
दंड सुभग बलशाली शोभति वक्षीं लांछन भृगुचरणीं ॥
तुलसि म्हणे, प्रभु जेव्हां करिं शर कार्मुक सांवरि सरसरुनी ।
ब्रह्मांडकूर्म, दिग्गज, अहि, महि, गिरि, सर्वचि कंपित होत क्षणीं ! ! ॥

झाले प्रभूसि बघुनी अति हृष्ट देव । ते पुष्पवृष्टि करिती वरुनी अपूर्व ! ॥
"हे ज्ञानसद्गुणनिधान दयासमुद्रा ! । हे शक्तिमान् विभुवरा ! जय रामचंद्रा !
हे भूमिभारहरणा ! जय कोसलेशा ! " । ऐशा करीति सुर राघवकीर्तिघोषा ॥
आल्याच तेथ अति घोर रवां करीत । सेना अनंत रजनीचरसंघजात ॥ ९ ॥
पाहून जाति कपिवीर समोर त्यांसी । मेघालि कीं प्रलयकालभवा विनाशी ! ॥
जे शक्तिशूल तलवारि विशेष तेजी । विद्युल्लता चमकती जणुं त्यांतली जी !
चित्कार घोर रथवाजिगजादिकांचा ! तो गर्जनारव जणों घनजात साचा ! ॥
आच्छन्न होय नभ वानरपुच्छकोटीं। कीं इंद्रचाप विलसे अतिरम्य दृष्टीं ! ॥
जी धूळ उंच रिघली म्हणुं मेघधारा ! । ती बाणवृष्टि जणुं बिंदुमयी अपारा ! ॥
दोहीं दिशीं गमत पर्वत, ज्यां प्रहार । ते वज्रपात करतात अनेक बार ! ॥१२॥
संक्रुद्ध राघव करी शरवृष्टि मोठी । घायाळ होति रजनीचरयोधकोटी ॥
ते लागतीच शर विह्वल वीर होती । भूमीवरी पडति जाउन तोल अंतीं ! ॥१३॥

शैलांतुनि जणों येती अनंतपरिं निर्झर ॥
भीरूंसि भीववीती ते रक्तस्रोत भयंकर ! ! ॥ १४ ॥

भयद कातरा रुधिरवाहिनी परम अपावन वहति किती ! ।
सैन्यें दोन्हीं हे तट कोणी, चूर्ण रथादिक रेती ती ॥

चर्कै भोरे गज हय पदचर अर नच गणती यानांना ।
असि शर, तोमर शक्ति शरासनवीचि चर्म तें कमठ म्हणा ! ॥ १५
वीर पडति जे उलथुनि तरु ते, मज्जा गमली फेन मना ।
कातरचित्तां भिववी सरिता परि ती सुखवी सुभटांना ॥
भूत पिशाचें वेतालादिक मज्जन करिती त्या सरितीं ।
प्रमथ महाझोटिंग भयंकर डुंबति आनंदें भरती ॥१६॥
छिन्न भुजांना घेउनि उडती काक कंक खग किति गगनीं ।
एकाकडुनी एक काढुनी घेती खाती हिसकोनी ॥
एकामेकां म्हणती कोणी ' कां हो इतुकी ही घाई ! ।
शठ हो ! तुम्ही जन्मदरिद्री अहो ! किती ही भरपाई !!' ॥१७॥
पडले योद्धे कण्हत किती ते दोंहिं बाजुंना घायाळ ।
जिकडे तिकडे धारेमध्यें सापडले जणुं नष्टबळ ॥
गृध्र ओढिती आंतडिं दूरीं तटीं बसोनी, जें बघुनी ।
वाटे कोळी गळ लावोनी बसले असती दक्ष कुणी ! ॥१८॥
किती वाहती रुधिरीं प्रेतें ज्यांवरि बसले खगसंघ ।
वाटे नौकेमध्यें बसोनी क्रीडा करण्यामधिं दंग ! ॥
कवट्यांमध्यें रक्तमांस किति जोगिणि घेती भरभरुनी ।
भूत पिशाची स्त्रिया नाचती आनंदानें किति गगनीं ! ॥१९॥
वीरकपालें घेउनि हातीं करतालापरि वाजविती ।
चामुंडागण बहुप्रकारीं गाती आनंदांत अति ! ॥
जंबुक कोटी कटकट दांतीं खाती प्रेतें पोटभरी ।
एकामेकांसवें भांडती गुरुगुरु करुनी अंतरीं ॥ २० ॥
कोट्यवधी तरि मुंडविहीनें रुंडें नाचति त्या समयीं ।
पडलिंहि मुंडें करिति गर्जना जय जय जय जय शब्दमयी ॥
प्रचंड रुंडें मुंडांप्रांचुनि धावुं लागतीं चहूंवरी ।
समरभूमिवरि जे भट झुंजति मरतां, रिघती अमरपुरीं ॥२१॥
अगणित राक्षसवीरां मर्दुनि गर्जति दर्पित ऋक्ष कपी ।
रामशराहत भट समरांगणिं गेले वाटति जणुं झोपीं ! ॥

रावण हृदयीं करी विचारा, 'राक्षस सैन्यें संहरलीं।
एकाकी मी, अमित ऋक्षकपि अपार माया करुं अपुली' ॥२२॥
श्रीराम युद्ध करि चालत, हें बघोन। होती मनांत सगळे सुर ते विषण्ण ॥
तैं पाठवी स्वरथ इंद्र तयास तूर्ण। हर्षेंचि मातलि निघे रथ सिद्धपूर्ण ॥२३॥
तेजस्वि दिव्य रथ ज्या तुलनाच नाहीं। श्रीराम त्यांत चढले अति हर्षवाही ॥
ज्याचे तुरंग अति चंचल रम्य चारी। मोठे युवे अमरचित्तगतानुसारी ॥
आरूढ दिव्यरथिं पाहुनि रामराया। झाले प्रहृष्ट कपि ते समरा कराया ॥
होतां असह्यकपिशक्ति दशाननासी। मायाविलास करि रावण शत्रुनाशी ॥२५॥
बाधे न ती रघुवराप्रति मात्र माया। रामाविना सकलही फसतीच ठायां! ॥
सान्या कपींस अरिसैन्यि दिसोनि येती। सर्वत्र राम अनुजासह वीरमूर्ति! ॥
श्रीरामलक्ष्मणां बघुनि अनेकां ऋक्ष कपी अति चकित मनीं।
चित्रलिखित जणुं लक्ष्मणसह ते जिथल्या तेथें स्थित बघुनी ॥
निज चमु तैसी चकित बघूनी हांसे राघव सज्जधनू।
क्षणांत माया सारी निरसी हर्षित हो कपिसैन्य जणूं! ॥ २७ ॥
सांगेहि राम मग त्या सकलां बघूनी। गंभीर धीर वदुनी निजवाक्यवाणी ॥
"हो द्वंद्वयुद्ध अमुचें निरखा जि! वीर। विश्रांति घ्या लव अजीं! दमलां समग्र!"

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुष-
विध्वंसने लंकाकांडे रावणस्य प्रबल-माया-विध्वंसवर्णनं
नामाष्टादशस्तरङ्गः ॥

तरंग १९ वा

सांगोनि, हें लववुनी शिर विप्रपाद-पद्मीं, रघूत्तम रथा रणिं ने अबाध ॥
संक्रुद्ध चित्तिं तंव रावण ये समोर। गर्जीत तर्जन करीत सघोष उग्र ॥१॥
"रे तापसा! समरिं जे भट जिंकिलेस। ना त्यांत मत्सम तुला मिळलाच खास
मी होय रावण, यशें मम विश्व जाणे। लोकेश बंदिमधिं टाकियले जयानें ॥२॥
तूं तो कबंध-खरदूषण नाशणारा। तूं व्याधसा वधिशि वालिहि तो विचारा ॥
संहारिलेसि जर राक्षसवीरराशि। तूं कुंभकर्ण, घननादहि तें वधीशी ॥३॥

रे! वैरनिष्कृति अर्जी सगळीं करीन। जाशील ना जर रणांतुनि तूं पळून!
देईन आज तुज निश्चित अंतकासी। आलास रावणकरीं मम वज्रपाशीं!"॥
जाणोनि कालवश त्या, परिसे दुरुक्ति। हांसोनि बोलत कृपा-करुणाब्धिमूर्ति
"हो सत्य सत्य तव ही प्रभुता अतीव। कां जल्पसी उगिच? पौरुष आजि दाव!

वृथा जल्पना नको करूं तूं ऐक सांगतों नीति जरा।
त्रिविध परींचे जन संसारीं पाटल, अंबा, फणस तऱ्हा॥
एक सुमन दे, सुम-फल दे पर, तिसरा केवळ फल देई।
एक वदे, पर वदतो करतो, तिसरा करतो, न वदुनिही!" ॥६॥

रामोक्ति ऐकुनि दशानन हांसुनीयां। बोले "मला शिकवुं पाहसि गोष्टि का या?
तूं वैर आधिं करतां नच भीति घेसी।स्वप्राणि मात्र अति लालस केविं होसी!"
दुष्टोक्ति हे वदुनि रावण रोषयुक्त।सोडी अनेक शर जे जणुं वज्रशक्त॥
नानाप्रकार शर ते घनदाट येती।दाही दिशा, उपदिशा, नभ, भू भरीती
श्रीराम त्यांवरति सोडुनि अग्निबाण। जाळी क्षणामधिंच राक्षसबाण पूर्ण॥
त्वेषेंचि रावण रघूत्तमिं फेंकि शक्ति। बाणेंचि राम फिरवीत तयावरी ती!
चक्रें त्रिशूल मग रावण फेंकि कोटी। कष्टाविनाचि रघुनायक त्यांसि काटी
ते व्यर्थ होति दशकंधरबाण कैसे?। जाती लया खलमनोरथ सर्व जैसे!
तो ताडि बाणशतिं मातलिसारथ्यासी। भूमी पडे म्हणत तो 'जय राम' घोषीं!
सूताप्रती उठवि राम दया करूनी। संक्रुद्ध होत अति राघव शार्ङ्गपाणि११

होतां युद्धीं क्रुद्ध रघुपती निषंगिं सळसळ शर करती॥
कोदंडाच्या चंड ध्वनिनें राक्षस उडती जणु वातीं!॥
मंदोदरिच्या उरीं कंप ये, अब्धि, कूर्म, भू, गिरि भीती॥
क्षितिमधिं दिग्गज दशन रोविती, चित्कारति! परि सुर हंसती!!

आकर्ण ताणुनि धनुष्यगुणां अमेय। सोडी भयंकर शर प्रभु रामराय॥
श्रीराममार्गणसमूह असंख्य जाती। ते व्यालसे सळसळोनि करालमूर्ति ११
ते बाण वाटति जणों अहि पक्षवाही। संहारिती प्रथम सारथितें हयांही॥
केला विमग्न रथ मोडियली पताका। गर्जे दशानन परी हृदिं घेइ धाका॥
आणोनि तूर्ण रथ अन्य, चढे तयांत। तो अस्त्रशस्त्रगण सोडितसे अनन्त॥
त्याचे प्रबल्ल परि सर्वचि जाति वाया। सद्द्रोहिहेतु नच शक्त किं सिद्ध व्हाया

तेव्हां दशानन जवें दश शूल फेकी । चारीहि रामरथवाजिसि मारि तो कीं
त्यांना त्वरें रघुवरें धरि जीववून । खेचूनि चाप किति सोडियले स्वबाण ॥
लंकेशशीर्षकमलोपवनावरी ती । चाले रघूत्तम–शिलीमुखधारवृष्टि ॥
दाहींहि भाळिं शर हाणि दहादहा ते । तें जाहले रुधिरपाट किती वहाते ॥
तो वाहतां रुधिर धावत रावणासी । तेव्हां प्रभूहि निज चापिं शरांसि वर्षी
सोडूनि तीस शर पाडित राम तेथ । त्याचीं शिरें दशहि वीस भुजांसमेत ।
तीं तोडिलीं तंवर आलिं पुन्हां नवीन । तोडी तयां भुजशिरां प्रभुराय तूर्ण॥
तीं कापिलीं तरि फिरूनि नवीन येतीं । श्रीराम तोडित अशीं कितिदां तरी तीं
शीर्षें भुजा प्रभु फिरूनि फिरूनि तोडी । तो कोसलाधिपति कौतुक थोर मांडी ।
गेलें भरूनि नभ बाहुशिरोवितानीं । कीं केतु राहु जणु ते अमितप्रमाणीं ! २०

राहु केतु कीं अनंत गगनीं धावति शोणित वर्षीत ! ।
रघुवीराचे प्रचंड तीरहि, लागुनि भूवरि ना पडत ॥
एक एक शिरिं शर किति शिरतीं तेव्हां शोभा दिसलि अशी ।
कुपित रवी कीं असंख्य निजकरिं ओवित राहू चहूं दिशीं !!! ॥२१

जशीं जशीं छेदित राम तीं शिरें । तशीं तशीं वाढतिं तीं अतित्वरें ॥
जैशापरी कीं विषयांसि सेवितां । नवा नवा वाढत काम तत्त्वतां ! ॥ २२ ॥
जेव्हां दशानन बघे निज शीर्षिं वाढ । मानी न मृत्युसि, धरी हृदिं रोष गाढ
तो मूढ गर्जत मदांध महाभिमानी । धावे दहाहि धनुंलागिं करीं करूनी ! २३
झाला सकोप दशकंधर तें रणांत । वर्षोनि बाण करि रामरथासि गुप्त ! ॥
ना दृष्टिसीहि घटकाभर तो दिसेचि । जाणों धुक्यामधिं लपे रविमूर्ति साची !
तेव्हां करीति सगळे सुर 'हाय हाय' ! । संक्रुद्ध तो करिं धरी धनु रामराय !!
वारूनि शत्रुशर, काटि शिरें तदीय । सार्‍या दिशा नभ, धरा भरलीच होय !
शीर्षावली गगनमार्गिं उडोनि जातां । घोषे जयध्वनि, जयें भय येइ चित्ता ॥
'कोठें कपीश हनुमान् ! रघुनाथ कोठें ? । साकेतनाथ सहलक्ष्मण ?' घोष मोठे !!

शिरोगणांचा 'कुठें राम ?' रव ऐकुनि पळती कपि भीत ।
राम करी तें हंसुनि सज्ज धनु शिरें शरीं निक भेदीत ॥
शिरोमालिका धरिति कालिका वृंद वृंद बहु नभिं मिळती ।
रुधिरसरीमधिं मज्जन करुनी रणवट पूजन करुं पळती ! ॥२७॥

तेव्हां दशानन पुन्हां अति कोपयुक्त । शक्ति प्रचंड अशि सोडित दीप्तिमन्त ॥
कीं दंड कालकरिंचा अशि उग्रमूर्ति । आली सुभीषण बिभीषणसंमुखी ती !
येतां बघोनि तशि शक्ति सुतीक्ष्णधारा । स्वब्रीद पाळि निजदास सुरक्षिणारा ॥
पाठीस घालुनि क्षणींच बिभीषणासी । शक्तिप्रहार विभुवय नि आंगिं सोसी ! २९
मूर्च्छाहि येत लव लागुनि शक्ति रामा । लीलाचि ती प्रभुकृता सुरशोकधामा ॥
पाहे बिभीषण जसें प्रभु दुःख साहे । तो क्रुद्ध, घेउनि गदा करिं, धांवताहे ३०
बोले " अभाग्य शठ मंदमते ! खला रे ! । तूतें विरुद्ध नर नाग मुनींद्र सारे ॥
तूं अर्पिली शशिधरा निजमस्तकाली । एकैकमस्तकिं अजीं शत कोटि झाली ! ॥
या कारणेंचि अजि वांचशि तूं अजून । नाचेल आज तव मस्तकिं काल जाण !
तूं रामवैरि मिळवू म्हणसी श्रियेसी" । मारी गदा तदुरिं बोलुनि उक्ति ऐशी ३२

उरावरिल त्या गदाप्रहारें घोर कठोरें धरणि पडे ।
रावण दशमुखिं वाहे शोणित फिरुनि सांवरुनि रुपे लढे ! ॥
अतिबल दोघे मल्ल लढति ते, एकामेकां हाणोनी ।
प्रभुबलगर्वित बिभीषणानें रावण गणिला लव न मनीं ! ॥ ३३ ॥

हे गौरि ! रावणमुखासहि देखण्याचें । व्हावें न धैर्य लवही हृदिं ज्यास साचें !
तो हा बिभीषण लढे जणुं काळ ऐसा । श्रीरामचंद्रमहिमा करि धैर्यपोषा ॥
जेव्हां बिभीषण दिसे श्रमला अतीव । साह्यार्थ शैलधर मारुति घेत धाव ॥
नाशोनि सारथि रथा तुरगादि सारीं । लत्ताप्रहार करि कोपुनि रावणोरीं ३५
तेणें सकंप दशकंधर होय भारी । तों ये बिभीषण जिथें प्रणतार्तिहारी ॥
आह्वान मारुतिस रावण दे फिरूनी । तो जाय पुच्छ पसरून नभीं उडूनी ॥
पुच्छा धरून नभिं रावण जाइ मार्गें । तों मारुतीहि लढुं लागत त्याजसंगें ॥
ते वीरयुग्म करि संगर अंतराळीं । संक्रुद्ध हाणिति परस्पर युद्धमेळीं ॥ ३७ ॥
आकाशिं युद्ध बलिं लाघविं चालवीता । येती सुमेरुगिरि कज्जलशैल चित्ता !
केलें कितीहि परि रावण आवरेना । तेव्हां स्मरे पवननंदन राघवांना ! ३८

स्मरुनि राघवां, वदुनि दशमुखा त्वेषें हाणी पवनसुत ।
लढतां लढतां मही पडति तारे उठतिं पुन्हां त्यां सुर गात ॥
पाहुनि संकटिं हनुमंतातें धावति साह्या ऋक्षकपी ।
संक्रुद्धां त्यां रणीं रावण प्रमत्तबलिं तो बहु दापी ! ॥ ३९ ॥

प्रेरीत राम जंव, धांवति ते प्रचंड । सारे कपी रणमदें भरले उदंड ॥
तैसें बलाढ्य कपिसैन्य रणीं बघोनी । माया निजा प्रकटि रावण सर्वमानीं ॥
तो गुप्त हो क्षणि, जसा प्रकटेहि कोठें । नानाप्रकारिं दिसतो, दिसतो न, वाटे ॥
श्रीरामसैन्य कपि ते तितुके तयांना । भासे–दशानन पुढें लढतात नाना ! ॥
जाती पळून कपिऋक्षहिं थोर थोर । ते वीरही, परि तयां धरवे न धीर ! ॥
आक्रंदती 'शरण व्हा तुम्हि दोनि आम्हां।हे लक्ष्मणा ! रघुवरा! रणधीर रामा !'
दाहीं दिशा धावति कोटि रावण । जे गर्जती दारुण घोर भीषण ॥
पळोनि जाती सुर भीतिविक्लव। जयीं नुरे त्यां मनि आस ती लव ! ॥४३॥
'तो एक रावणाचि सर्व सुरांसि दापि । हे तों अनंत, गिरिकंदरिं जाउं लोपीं!'
ब्रह्मा महेश मुनि साधु जयांस ठावा । रामप्रताप, न तयां मतिलोप व्हावा !
प्रताप जाणति रामाचा ते निर्भय; कपि परि गणिति खरे ।
होति भयाकुल रटति " कृपाला ! तार अम्हांप्रति तूंच बरें ! " ॥
मारुति अंगद नीलनलादिक लढती निर्भय रणकुशल ।
कोटि कोटि ते नकली रावण नाशिति कपि ते अमितबल ! ॥४५॥
सुरां, वानरां, विकलां पाहुनि सस्मित राघव कुतुकानें ।
धनुष्य जोडुनि एक शरानें रावणमाया विलया ने ॥
प्रभु क्षणांमधिं सकलहि नाशी माया, निर्मल सकल करी ।
उदय पावुनी दिनकर लोपवि तिमिरा जगतीं सकलपरीं ॥४६॥
हर्षले देव पाहोनी होय रावण एकच ।
हर्षोनि वर्षती देव पुष्पांचा केवढा खच ! ॥ ४७ ॥
उभारुनि भुजा राम फिरवी सर्व वानरां ।
एकमेकां पुकारूनी तेही फिरति सत्वरां ॥ ४८ ॥
लाभोनियां प्रभुबला कपि ऋक्ष शूर । आले त्वरें समरभूमिमधीं सुवीर ॥
तैं देव सर्व भजती प्रभुला स्तुतींनीं । पाहूनि रावण मनांमधिं कोप आणी ४९
बोले 'मला समजला तुम्हि एक काय !।तुम्हांस मारुं तरि मी किति वेळ वाय?'
ऐसें वदोनि गगनीं सुर धावतात । तों तो म्हणे पळुनि जाल कुठें समस्त ?॥
तों धावलाच क्षणिं अंगद रावणासी । पायीं धरूनि भिरकावि बळें क्षितीसीं ! ॥
पाडोनियां बहुत ताडित त्या पदांनीं । जाई प्रभूप्रति सकौतुक तो तिथूनि॥
तेव्हां उठोनि दशकंधर घोरनाद । दाहीं धनुष्यि करि कौशलिं बाणवेध ॥
घायाळ तो करित सर्वहि युद्धवीरां । होई प्रहृष्ट भिववूनि जनां समग्रां ॥५२॥

जोडूनि दाहिं करिं चापलता दहाही । सोडीत रावण असंख्य शरां प्रवाहीं ॥
दुःखी करीत सगळे निज शत्रुवीर । चित्तीं धरीत परितोष तदा अपार ॥
तेव्हां रघूत्तम दशानन--शीर्षहस्तां । काटी त्वरें सशरचाप जरी समस्तां ॥
ते वाढती परि अनंत पटी अपाप । तीर्थी समाचरियलें परिवृद्ध पाप! ॥५४॥
तीं वाढतां भुजशिरें बघुनी अतीव । संक्रुद्ध होति कपि ऋक्ष विशेषभाव ॥
कापूनही भुजशिरें न मरे अरी हा । याकारणें करिति सर्व कपीहि 'हा! हा!' ॥
तैं वालिसूनु नलनील मरुत्सुतादि । तैसे कपी द्विविद ते पनस प्रमोदीं ॥
हाणीति वृक्ष गिरि ते दशकंधरातें । घेऊनि तेच करिं रावण फेंकि हस्तें ! ॥
एकीं नखीं रिपुतनू अति दीर्ण केली । लत्ताप्रहारिं अपरें तशि हाणियेली ॥
जाती चढूनि शिरिं तैं नलनील दोघे । तोडीति ते नखिं भरे शिर शोणितौघें ॥
पाहूनि रक्त सुरशत्रु सकोप भारी । त्यातें धरूं बघत हस्त निज प्रसारी ॥
ते नाकळोनि, फिरतीच करांवरूनी । की भृंगयुग्म कमलोपवनीं भ्रमूनी ॥५८॥
क्रोधें उडोनि धरि रावण त्या द्वयासी । पाडोनि त्यांसि महिं आपटि फार रोषीं ॥
तो घेइ शेवटिं दहाकरिं कार्मुकांना । जोडूनि बाण करि भीत तयें कपींना ॥५९॥
होती विमूर्च्छित कपी पवनात्मजादि । येनां प्रदोषघडि रावण हो प्रमोदी ॥
पाहोनि वानरगडी पडले विमूढ । ये जांबुवंत बहुसाह्यद वीर गाढ ॥६०॥
त्याच्या समेत किति ऋक्ष सवृक्षपाणि । ते रावणासि बहु ताडिति त्या तरूंनीं !
संक्रुद्ध होय दशकंधर शक्तिशाली । पादां धरूनि अपटी कपिवीर खालीं ॥
जैं जांबुवंत बघि तो निजसैन्यघात । तो रावणांसि उरिं मारित घोर लाथ ॥
जेणें पडे धरणिं रावण तो रथींचा । हातीं धरी सकल ऋक्षगणांस साचा ॥
त्या वीस हस्ति धरितां क्षणि ऋक्ष तैसे । वाटे निशीं मधुप ते कमलांत जैसे ॥
तेव्हां प्रहार करि त्याप्रति जांबुवंत । मूर्च्छान्विता बघुनि तो प्रभुपाशिं येत ! ॥

पाहोनि पातली रात्र सारथी ने दशानना ।
मूर्च्छा जावोनि ऋक्षादि येती प्रभुसि सन्मना ॥ ६४ ॥
सारे राक्षस तैं भीत रावणाप्रति घेरिती
त्यांच्या हृदयिं जो त्रास जाहला त्या नसे मिति ॥ ६५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकालिकलुषविध्वंसने सुश्लोकमानसे लंकाकांडे श्रीरामरावणयुद्धवर्णनं नामैकोनविंशस्तरङ्गः ॥

—★—

तरंग २० वा

सीतेसन्निध त्या रात्रीं त्रिजटा येइ राक्षसी ॥
सीतेसि कळवी सारें वृत्त ती बोलुनी असी ॥ १ ॥
रावणाचीं शिरें हस्त वाढताहेत ऐकुनी ॥
त्रासली अंतरीं सीता क्लेश होउनियां मनीं ॥ २ ॥
मुख म्लान मनीं चिंता दारुणा ताप दे तिज ॥
त्रिजटेतें वदे वाणी सीता हृदयिंचें गुज ॥ ३ ॥

"होणार काय पुढतीं मज सांग आई ! हा विश्वदु:खकर कां मृत होत नाहीं ! ॥
त्या वेधिती जरिहि सायक राघवाचे । ना तो मरे ! खचित दुर्घट दैव साचें ! ॥
माझें अभाग्य म्हणुनीच जगें अजूनी । झाली मला हरिपदांबुजसंगहानि ॥
केला जयें कनकरंकु उगाच खोटा । तें दैव आजहि मला करि रोष मोठा ! ॥
जें दैव दाखवि मला बहु आर्ति ऐसी । जें बोलवी मम मुखीं कटु देवरासी ॥
तें सोसवीत मज सायक हे विषारी । ज्यां मार्जि रामविरहार्ति असह्य भारी ॥
ऐशाहि दु:खिं मम जीवन रक्षणारें । दुर्दैव हेंचि मम होय कटु प्रकारें ॥
शत्रूसही करित रक्षण जें मदीय । त्यातें न अन्य कुणि रक्षणकारि होय !" ॥७॥
ऐशापरी अति विलाप करीत सीता । आणोनि रामपदकंजयुग स्वचित्तां ॥
बोले तिला वचन तैं त्रिजटा अशी ती । "गे ऐक राजतनये ! मम ही ऋजूक्ति ॥
लागेल वक्षिं शर तों झणिं तो मरेल । मारीत राम परि त्याप्रति ना सलील ॥
आहे किं तद्हृदिं तुझा परि वास सीते ! । या साठिं राघव शरें नच वेधि की तें ! ॥

" त्याच्या हृदयीं सीता राही सीताहृदयीं मम वास ।
माझ्या उदरीं अनन्तभुवनें; बाण लागतां त्यां नाश ! " ॥
राघवमत हें त्रिजटा वदतां हर्ष-विषादां धरि सीता ।
त्रिजटा तेव्हां समजावी तिज " मरेल अरि, ना कर चिंता ! ॥१०॥

छेदील रावणशिरें प्रभुराम जेव्हां । तो ध्यान टाकिल तुझें अति आर्त तेव्हां ॥
श्रीराम सुशवर तै शरिं रावणासी । वेधूनि तद्हृदयिं नेइल त्यासि नाशीं" ॥११॥
सांगोनि यापरि बहू समजावुनीयां । गेली निघोनि सदना त्रिजटा स्वठायां ॥
येवोनि चित्तिं रघुनाथसुभाव सारा । सीतेसि होय विरहार्ति हृदीं अपारा ॥

चंद्रासि तेविं रजनीसहि बोल लावी। झाली निशा युगसमा सरणार केवीं?॥
चिंतांत ती कारि विलाप अतीव सीता। श्रीरामचंद्रविरहें अति होत आर्ता॥
अत्यंत होय तिज जों मनिं शोकताप। तों वाम बाहु नयन स्फुरले अपाप!॥
जाणोनि तो शकुन उत्तम धैर्य घे ती। 'आतां दयाळु मिळणारचि राममूर्ति!'॥
हो अर्धरात्रि इकडे दशकंठ जागा। तो सारथ्यास अपुल्या अति येत रागा॥
'तूं आणिलेंसि मज सांडुनि युद्धभूसी।धिग् धिग् शठा! अधम रे! मतिमंद होसी'
तेव्हां पदां नमुनि त्या समजूत पाडी। होतां प्रभात रथिं वाहि पुन्हां घडाडी!
ऐकोनि 'ये पुनरपी दशकंठ' ऐसें। झाले कपी सकळ फार अधीर तैसे ॥१६॥
चोहींकडे उपटती कपि वृक्ष शैल। ते दांत खात रणिं धावति त्या सलील॥
हाणीत राक्षसगणांप्रति ते प्रहार। जाती पळून रजनीचर ज्यां न धीर!॥१७॥
त्या ऋक्षवानरिं दशानन घेरियेला। दांतीं नखीं सुनिशितीं बहु दीर्ण केला॥
हाणीयले कपिभटीं किति त्या चपाटे। तैं रावणा गमत 'मी अजि राहुं कोठें?'॥
पाहोनि मर्कटचमू प्रबला अती ती। ये रावणासि अशि ऊर्मि विचार चित्तीं॥
होऊनि गुप्त निमिषामधिं तो लढाया। लागे, रणीं पसरुनी निज गूढ माया!॥

निर्मीत जेव्हां रणिं तो स्वमाया। प्रचंड जंतू सृजिले लढाया॥
पिशाच्च वेताळ अनेक भूतें। चापीं शरीं जे सजले स्वहस्तें॥ २०॥
सखड्ग तैं जोगिणि संचरीती। एका करीं लेति कपाल अस्थि॥
करीति जे आवडिं रक्तपान। जे नर्तती गात मदान्ध गान!॥ २१॥
'मारा! धरा!' शब्द चहूंकडे हे। व्योमा भरूनी रव तोच राहे!॥
श्वानें किती भुंकति धांवतीही। पळूनि जाती कपि दूर कांहीं!॥२२॥
जाती जिथें मर्कट ते पळोनी। तेथेंहि त्यां पाठिशिं येत अग्नी॥
संत्रस्त झाले कपि ऋक्ष सारे। तैं वालुका वर्षति त्यांत वारे!॥२३॥
निस्तब्ध केले कपि रावणानें। गर्जे तदा विश्वहि हें दणाणे!॥
सौमित्र तैसा कपिराज वीर। सारेच तैं सोडिति आत्मधीर॥ २४॥
'हा राम! हा राघव!' आर्त हांका। मारीत सारे कपिवीर जे कां॥
ऐशापरी सर्वच शक्तिहीन। करून माया सृजि तो नवीन॥ २५॥
अनन्त केले हनुमन्त तेणें। घेती शिला धावति रोषमानें॥
रामासिही घेरियले तयांनीं। अनेक टोळ्या अपुल्या करूनी!॥ २६॥

‘ मारा धरा, सोडुं नका ’ पुकार । करीति उंचावुनि पुच्छभार ॥
लांगूलसंघीं रघुवीर साजे । अवर्णनीया सुषमा विराजे ! ॥ २७ ॥
त्यांच्यामध्यें कोसलेश बहु शोभत मेघश्यामतनू ।
इंद्रधनू कीं असंख्य वेढिति तुंग तमालच्छविसि जणूं ! ॥
प्रभुसि देखुनी हर्षविषादीं सुर भरले ‘ जय जय ’ म्हणती !
एकचि तीरें राघववीरें नाशिलि माया निमिषीं ती ! ! ॥२८॥
माया सरतां ऋक्षकपी मुदिं परतति घेउनि गिरितरुंना ।
शरवृष्टीनें राघव पाडी रावण-मस्तक-हस्त पुन्हां ॥
श्रीरघुपति-दशकंधर-संगर गातिल जरि कां कल्पभरीं ।
शेष-शारदा-निगम-कविशतें पावति ना ते पार तरी ! ! ! ॥२९॥
प्रभुचें गुणगण करि लव वर्णन जडधी तुलसीदास ।
मशक ज्यापरीं निजबलमानें उडूं पहातो आकाश ! ॥
छेदियले कर-शिरें कितीदां लंकापति तरि तो न मरे ।
क्रीडा प्रभुची सिद्ध-मुनि-सुरां व्याकुळवी परि, ती न सरे ! ॥
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे श्रीरामरावणसमरवर्णनं नाम विंशतिस्तरङ्गः ॥

—०—

तरंग २१ वा

छेदीयली तरिहि वाढत शीर्षराजि । प्रत्येक लाभि जशि वाढत लुब्धता जी ॥
केले किति श्रम परी रिपु तो मरे न । तेव्हां बघे विभु बिभीषणभाव कोण ॥१॥
कालासही करित नष्ट यदीय काम । तो भक्तभक्तिकसि परीक्षि उमे ! निकाम ॥
सांगे बिभीषण विभूस “चराचरेशा ! । भक्तावना ! सुरमुनीप्रति सौख्यपोषा !
हो नाभिकुंडिं अधिवास सुधे तदीय । यासाठिं नाथ ! नच रावण नष्ट होय ”
ऐके कृपाळ वच साग्र बिभीषणोक्त । घेई कराल मग बाण विभू करांत ! ॥२॥
होउं लागले नानापरिंचे चहुंवरिं तेव्हां दुःशकुन ।
क्रंदति भीतिद शृगाल किति ते श्वान गर्दभें कटुस्वन ॥
विश्वदुःखकर नलूकसमखग ओरडती अति आर्त रवें ।
आकाशांतरिं भयकर सकलां धूमकेतुगण किति उगवे ! ॥४॥

दाही दिशां दाहचि होउं लागला। हो ग्रासला पर्वविना रवी भला ॥
मंदोदरी जाहलि कंपिता मनीं। ये मूर्तिनेत्रांतुनि वारि वाहुनी! ॥५॥

प्रतिमा नेत्रीं, स्रवती, विद्युत् घडति पवन भूकंप मरीं।
मेघ वर्षती रक्तकेशरज अशुभ वर्णु ये केविं तरी? ॥
अनन्त बघुनी उत्पातां सुर म्याले नभिं 'जय जय' म्हणती।
सभय सुरांना पाहुनि चापीं शर जोडी प्रभु सदयमती ॥६॥

आकर्ण ओढुनि शरासन सोडि राम। तो एकतीस शर रावणमृत्युकाम ॥
ते रामसायक तसे गमले मनास। की नाशकारक कृतान्त असे फणीश॥७॥
शोषीत एक शर नाभिसुधासरासी। ते शेष लागति करांप्रति आणि शीर्षी ॥
तोडोनियां परतती शर शीघ्र मागे। तैं रुंड, मुंडकरहीनचि नाचुं लागे!॥
तैं नर्तनेंहि धड ढासळि भूमि चंड। तेव्हां करीत विभु सायकिं त्या दुखंड॥
तो घोर नाद करि रावण मृत्यु होतां। 'कोठें रघूत्तम? रणीं वधितोंच आतां!'
जेव्हां दशानन पडे क्षिति साग्र कांपे। क्षुब्धा नद्या, अचल दिग्गज अब्धि कोपे
भूमीं दुखंड पडला दशकंठ जेथ। त्या खालिं तैं चिरडले कपि ऋक्ष यूथ! १०
मंदोदरीपुढतिं टाकुनि शीर्षहस्त। श्रीरामबाण रिघती जगदीश जेथ॥
त्याच्या निषंगिं वसती करिती फिरून। तैं देव दुंदुभि निनादति हर्षपूर्ण!
सामावली प्रभुमुखीं दशकंठदीप्ति। ब्रह्मा महेश अति हृष्ट बघूनियां ती ॥
ब्रह्माण्डही भरुनियां 'जय' शब्द राहे! "श्रीरामराय! जयराम! रघूत्तमा हे"
त्या पुष्पवृष्टि करिती मुनिदेववृंद। उद्घोषती 'जय कृपाळ! विभो! मुकुंद!॥
हे विश्वनाथ! जय राघव! रामराया!॥ सीतापते! जय जयाजि! विभो अमेया!

जय करुणाब्धे, द्वंद्वविनाशा! शरणागतसुखवितरण रे!।
खलदलदारण आदिकारणा! करुणायतना नाथ हरे!' ॥
सहर्ष वर्षति कुसुमें सुरगण दुंदुभि निनदुनि बहु गगनीं।
संग्रामांगणिं रघुकुलमणि तो शोभे मनसिज-कोटिंहुनी! ॥१४॥
जटामुकुटिं शिरिं शोभति सुंदर मध्यें मध्यें सुमराजि कशा?।
नीलगिरीवरि तडिल्लतांसह उडुगणकांती सजुनि जशा! ॥
भुजदंडीं शर चाप फिरवितां तनुवरि सजले रुधिरकण।
तमालवृक्षीं सुखीं बैसले रायमुनीखग चारुगण! ॥१५॥

कृपादृष्टिवृष्टी अमूपा करूनी । सुखी वृंद केले सुरांचे प्रभूंनीं ॥
कपी ऋक्ष सारे प्रहर्षोनि चित्तीं । मुखें गर्जती सौख्यदा रामकीर्ति ! ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकाण्डे रावणवधवर्णनं नामैकविंशतितमस्तरङ्गः ॥

—:०:०:—

तरंग २२ वा

मंदोदरी पतिशिरें बघुनी समोर । होवोनि मूर्च्छित पडे धरणीसि शीघ्र ॥
आक्रंदती युवति धावति ऊठवीती।नेती तिला मृत पतीपशिं शोकमूर्ति ! १
आक्रांत ती करि पतिस्थिति पाहुनीयां। वेणी सुटे तनुहि ये नच सांवराया॥
वक्षःस्थळां पिटुनि थोर करी विलाप । वाखाणुनी बहुपरी पतिचा प्रताप॥२
"नाथा! प्रताप तव भूप्रति कांपवीता।सूर्या शशीसि अनला नच तेज, कांता!
जीचा न भार सहवे कमठा, न शेषा।ती आपुली तनु भरें धुळिनें अशेषा!
तुम्हांपुढें रणि न ठाकति धैर्यलेशें । नाथा ! कुबेर, वरुणेन्द्र, समीर ऐसे ॥
काला स्वबाहुबलिं जिंकियलेत तेजें।ते आज तुम्हि पडलांत अनाथ सेजे !॥
विख्यात सर्व जगिं हो तुमचा दरारा । होता अवर्ण्य परिवार सुतादि सारा
रामा तुम्ही विमुख त्या स्थिति हीच लोकीं।राहे न कोणि कुलिं या रडण्यासही कीं
सृष्टि प्रपंच सगळा तुमच्या अधीन । दिक्पाल ते सभय नित्य तुम्हां नमून
त्वद्धस्तशीर्ष अजि जंबुकखाद्य होय । हें रामरायविमुखा नच हो अयोग्य ॥
ना ऐकिलें वचन कालवशत्वि माझे । मानीयले मनुज विश्वपती पती! जें॥

दानवकाननदहनगवका हरिसि मानिलें तुम्हि मनुज ।
दयाघना ज्या शिवविधिसुरगण नमिति न नमिलें तुम्हि सहज ॥
परद्रोहरत जन्मभरीं तुम्हि निजतनु केली पापमयी ।
अशा तुम्हां निजधाम राम दे तो प्रभु मी नमिं मम हृदयीं ॥७॥

हे नाथ! नाहिं रघुनाथ–समान अन्य । जो कीं कृपाळ करुणांबुधि विश्वधन्य
देई तुम्हांस परमा गतितें अहाहा ! ।श्रीरामराय भगवान् अतुल प्रभू हा !"

मंदोदरीवचातें त्या ऐकोनी तुष्ट जाहले ।
सुरसिद्धमुनी सर्व हृदयें शुद्धकोमलें ॥ ९ ॥

ब्रह्मा महेश सनकादिक नारदादि । जे कीं मुनींद्र जगतीं परमार्थबोधी ।
ते लोचनीं मरुनि पाहति राघवातें । प्रेमार्द्र सौख्यभरमग्न कृतार्थचित्तें ॥
शोकार्त सर्व बघुनी दशकंठनारी । जाई बिभीषण तयां अतिदुःखभारी ॥
बंधुस्थिती बघुनि त्यासहि शोक होय । दे त्या निदेश अनुजासह रामराय ॥
जाऊन लक्ष्मण तदा समजावि त्यासि।येई बिभीषण पुन्हां प्रभुच्या पदांसी॥
पाहोनियां सकृप राम वदे तया कीं ।'सारी क्रिया उचित तूं कर गा! अशोकीं'
सारी क्रिया करित तो प्रभुच्या निदेशीं।जी देशकालविधियुक्त अशी विशेषीं
मंदोदरीप्रभृति देति तिलांजली त्या । जाती गृहीं हृदिं रघूत्तमकीर्ति गात्या॥
येई बिभीषण पुन्हां प्रभुतें नमीत। कारुण्यसिंधु निजबंधुसि सांगतात :– ॥
"तूं, वानराधिपति, अंगद, जांबुवंत,। नीतिज्ञ नील नल मारुति हे समस्त १४
जावें बिभीषणसमेत मिळून सारे। राज्याभिषेक करुनी तुम्हि त्यासि या रे!"
श्रीराम सांगति तसेंच बिभीषणा हें–। "तातोक्तिपालनिंच मीं नित वर्तताहें
यासाठिं येत नच मी नगरांत जाण। मी पाठवीन कपि, लक्ष्मण मत्समान!" ॥
होतां निदेश विभुचा कपि तूर्ण जाती। राज्याभिषेकरचना करिति सुरीतीं १६
सिंहासनीं बसविती अति आदरानें। केला तयासि अभिषेक विधिप्रमाणें ॥
त्या सांजली नमिति सर्व बिभीषणातें। येती तयासह पुन्हां प्रभु राम जेथें॥१७
तों घेत बोलवुनि राम कपी समग्र। सप्रेम बोलुनि तयां सुखवी उदार ॥
वाणी सुधेसम वदे प्रभु त्यां सुभक्तां। "साहाय्यिं हें तुमचियां रिपु मी वधीता॥
हा राज्य मेळवि बिभीषण पुण्यकीर्ति। लोकत्रयींत तुमची नित नूतना ती !॥
माझ्यासमेत तुमचें यश हें पवित्र। गातील आवडिं अनुत्तम सच्चरित्र १९
संसारसागर अपार विनाप्रयास। जातील ते तरुनि संशय नाहिं लेश!"॥
ऐकोनि रामवच तृप्ति न हो कपींना। ते वंदिती प्रभुसि तत्पद सोडिती ना!२०
बोलावि तैं रघुपती पवनात्मजातें। "लंकेसि जा" वदत राघव त्या निजोक्तें ॥
"सीतेसि जाउनि तिला कळवी सुवृत्त। तत्क्षेमही कळविं तूं मजलागिं येथ"
लंकेंत येत मग मारुतिराय तूर्ण। त्या राक्षसीं-सहित राक्षस देति मान ॥
नानापरीं तयिं तयाप्रति पूजियेलें। सीताहि होय कवण्यास्थलिं दाखवीलें २२
दूरूनचि प्रणति तो तिजला करीत। सीताहि जाणत तया रघुरायदूत ॥
ती बोलली "वद सख्या! कुशल प्रभूचें। आहे किं बंधुकपि-सैन्य-समेत साचें?"

" सर्वोपरीं कुशलि कोशलराय आहे। केला दशानन तसें रणिं नष्ट पाहें! ॥
पावे बिभीषण चिरंतन राज्य माते!"। ऐकोनि मारुतिवचा अति हर्षली ते ।२४

हृष्ट मानसीं पुलकित सीता साश्रु बोलली पुनःपुन्हां ।
" अतुला वाणी कपे! त्रिलोकीं देउं तरी तव काय गुणा?" ॥
मारुति सांगे " त्रैलोक्याचें राज्य गमे मज जणुं मिळलें ।
कीं अरि जिंकुनि, बंधुबलान्वित राम पाहिं मी युत कुशलें!" २५

सीता वदे " परिस बाळ! तुझ्या हृदब्जीं। नांदो सदा अखिल सद्गुणरत्नराजि
श्रीरामचंद्र विभु नित्य अनन्तयुक्त। राहोत रे! तुजवरी अनुरक्तचित्त!॥२६
आतां प्रयत्न कर तात! असे जयें मी। ठेवीन दृष्टि मम त्या मृदु नील रामीं"
ये राघवाजवळिं मारुति तत्क्षणींच। श्रीजानकीकुशल त्यासि निवेदि साच॥२७
ऐकोनि वृत्त रघुराय बिभीषणातें। तो अंगदासहित बोलवि सांगिही तें ॥
'जाऊनि मारुतिसमेत तुम्ही त्वरेनें। या घेउनी जनकजेप्रति थोर मानें' २८
ते जाति सत्वर जया स्थलिं होति सीता। सेवीति जीस किति राक्षसि नम्रभूता
सांगे बिभीषण तयांप्रति वेगिं सारे। सीतेसि नाहविति सादर सत्प्रकारें॥२९॥
त्या लेववीति तिज उत्तम सर्व भूषा। आणीवलीहि शिबिका अति सन्निवेशा
जीच्यामधें चढुनि बैसलि हृष्ट सीता। चिंतूनि चित्तिं सुखधाम अशा स्वकान्ता
तैं सर्व बाजुं परिरक्षक वेत्रपाणि। सोल्हास चालति तिच्यासह गौरवोनी ॥
आलोकनार्थ कपि ऋक्ष समस्त येती। तों त्यांस रक्षक सरोष निवारताती ३१
तेव्हां रघूत्तम वदे " करणें मदुक्ति। आणा इथें जनकजा अनवाणि हो! ती॥
पाहोत सर्व कपि ती जननीसमान"। ऐसें वदे रघुपती हृदयीं हंसून ॥३२॥
ऐकोनि रामवच ऋक्षकपींस हर्ष। स्वर्गांतुनी करित देवहि पुष्पवर्ष! ॥
जी ठेविली प्रथम अग्निमधें सुगुप्त। ती सर्वसाक्षि विभु तो प्रकटूं पहात ३३
त्याकारणें वदत दुर्वच तो दयाब्धि। ज्या ऐकतां भरति राक्षसही विषादीं! ! ॥
तैं मस्तकीं धरुनि शब्द रघूत्तमाचा। बोले सती शुचितमा मनिं देहिं वाचा ३४
'व्हा धर्मदायक तुम्ही मज भाउजी हो!। अग्नि प्रदीप्त तुमच्या करिं शीघ्र कीं हो'
ती शोकयुक्त शुभधर्मविवेकपूर्ण। ऐकोनि उक्ति मनिं लक्ष्मण होय दीन!॥३५॥
तो साश्रुलोचन करांबुजयुग्म जोडी। ना तो प्रभूपुढतिं कांहिं निजोक्ति मांडी ॥
जाणोनि राममन लक्ष्मण काष्ठभार। धावूनि आणि, करि अग्नि समिद्ध थोर ३६

पाहे महाग्नि जंव तो पुढतीच सीता । हर्षे भरे हृदयिं, भीति न लेश चिंता ॥
बोले "मनोवचनदेहिं उरीं मदीय । रामाविना जर न अन्य गतीच होय ॥३७॥
तर हे भगवन् अग्ने ! सर्वान्तर्याम जाणका ।
पावका ! स्वप्रभावानें श्रीखण्डासम होशि कां" ॥३८॥
श्रीखण्डापरिं पावकिं शिरली प्रभुतें ध्याउनि जानकी ।
नित्य यत्पदा 'जय जय रामा !' म्हणुनि वंदितो शिवहर कीं ॥
प्रचंड पावकिं तदा जळे प्रतिबिंब, कलंकहि लौकिक तो ।
अगम्य हेतु प्रभुचा, गगनीं चकित सिद्धमुनि सुर करितो ! ॥३९॥
अग्नि प्रकटुनि निजपाणीं श्री, वेदस्तुत जगिं विदित अशी ।
घेउनि अर्पी रामा, लक्ष्मी क्षीराब्धी जशि विष्णूसी ! ॥
वामविभागीं श्रीरामाच्या शोभत रुचिरा अतिशय ती ।
नवनीलाब्जानिकट वाटली कांचनपंकजकलिद्युती ! ! ! ॥ ४० ॥
तेव्हां चढोनि सुर हर्षभरें विमानीं । वाद्यध्वनी करिति वर्षुनि सत्प्रसूनीं ! ॥
गाती मनोज्ञ रविं, किन्नर रामकीर्ति । देवांगना करिति नर्तन रम्यमूर्ति ! ॥४१॥
श्रीजानकीसहित राम अतीव शोभे । सौख्यें अपार मन त्यांवर फार लोभें ॥
देखोनि हर्षति हृदीं कपि ऋक्ष सारे । ते गर्जती 'रघुपते ! जय' सौख्यसारें ॥ ४२॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे कलिकलुषविध्वंसने लंकाकांडे श्रीजानकीरामसमागमवर्णनं नाम द्वाविंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २३ वा

आज्ञा रघूत्तम करी, शिरिं घेउनी ती । तो जाय मातलि नमूनि पदांसि माथीं ॥
आले तदा सुर निजार्थि अतीव लोभी । रामा स्तवीति वचनीं परमार्थशोभी
" हे दीनबंधुरघुनाथ ! दयार्द्रशीला । केली तुवां सुरगणीं करुणा स्वलीला ॥
हा विश्वशत्रु खल रावण पापकामी । मेला कुमार्गरुचि आपलिया कुकर्मीं ॥
तूं ब्रह्म नित्य अविनाशि समस्वरूप । आनन्दचिन्मय उदास विभू अमूप ॥
जो कीं अनामय अगम्य अनादि होय । जो हो अजिंक्य गुणहीन अमोघवीर्य
जो मत्स्य, कूर्म, वपु सूकर नारसिंह । जो वामन प्रबल भार्गव शत्रुदाह ॥
जे संकटांत अमरांसि जधां जधां कीं । नाना तनू धरुनि नाशिसि तूंच लोकीं॥

हा पापमूल सुरशत्रु मदांध कामी । लोभी खलाग्रणि अतीवचि कोपगामी ॥
त्या रावणाहि निजधाम कृपाळ देत । येणें अम्हांस हृदिं विस्मय हो ! अनन्त !॥
आहोंत देव अम्हि हे परमाधिकारी । स्वार्थांध भक्ति तव विस्मरुनीच सारी ॥
तेणेंच नित्य बुडलों भवप्रवाहीं !। आलों तुला शरण रक्षण तूंच वाहीं "॥६॥

ऐसें स्तवीती सुरसिद्ध सर्व । सर्वत्र बद्धांजलि नम्रभाव ॥
प्रेमें सरोमांच करी विधाता । स्तुती प्रभूची मधुरा यथार्था ॥७॥

"जय जय जय रामा सर्वदा सौख्यधामा । रघुवर गुणसीमा सुंदरा पूर्णकामा ॥
करधृतशरचापा नष्टसंसारतापा । दलितसकलपापा नाथ विश्वस्वरूपा ! ॥८॥
अनुपमतनुशोभा कोटिकामस्तुताभा । गुणगण मुनि गाती सत्कवी सिद्ध जे बा !॥
दशमुख जणुं भासे जो महा नागसाच । खगपतिसम रोषें मारिला त्वां सुनीच ॥
निवडुनि भय शोकां रंजवीशी स्वभक्तां । प्रभुवर गतकोपा सर्वदा बोधयुक्ता ॥
अवनिभरविनाशा ज्ञानमेघा उदारा । अवतरसि सुकार्या सद्‌गुणांहीं अपारा ! १०
असंसि तरि अजन्मा व्यापकत्वें अनन्त । रघुवर करुणाब्धे मी तुम्हांतें नमीत ॥
असंसि रघुकुलाचा तूं अलंकाररूप । करिसि तरि वि-पूर्वा भीषणालागिं भूप ॥
सुमतिगुणनिधाना पावना हे अमाना । नमन तुज अजा रे ! नीरजा पुण्यगाना ॥
अतुलितबलदंडा ! हे प्रचंडप्रतापा । असंसि कुशल नाशीं तूं खलांच्या अमूपा ॥
हित करिसि दयाळा ! कारणावीण दीनीं । अतिशय रमणीया मी नमीं बद्धपाणि
भवनिरसन ईशा ! चित्तदोषप्रणाशा । जय सकलपरा रे वंदनीया रमेशा ! १२
करिं शर धनु शोभे स्कंध शोभे निषंगीं । अरुणकमलनेत्रा शोभसी नीलरंगीं ॥
अमितसुखनिवासा सुंदरा इंदिरेशा । शमविसि मद–कामा दूषणा पापदोषां ॥
विलससि अनवद्या, वागतीता, अखंडा । सकलहि भरुनी तूं राहसी श्रीमुकुंदा !
श्रुति गुण तव गाती वर्णनें सत्य सारीं । द्युति जरि रवितुल्या हो रवी थोर भारी !
कपि सकलहि झाले सर्वथा हे कृतार्थ । बघति तव मुखेन्दू लोचनीं सौख्य मूर्त ॥
सुरतनु परि माझी व्यर्थ वाटे मला ही । भवपतित असोनी ना तुझी भक्ति कांहीं
आजि करिंच दया तूं दीनबंधो दयाळा । विषममति मदीया न्यावि तूं रे लयाला
सुखचि गणुनि दुःखा सेवतों सर्वकाला । करितचि विपरीता सर्व मी कर्मजाला
निवडुनि खल सारे शोभसी सुक्षमेनें । अनिश भवभवानी स्वत्पदीं हृष्ट होणें ॥
अखिलनृपतिरत्ना, द्या वरा एवढ्यांच । तव शुभपदिं वाढो मद्‌रती नित्य साच"

स्तुति करीत अशी चतुरानन । पुलकितांग मुदें भरलें मन ॥
बघुनि राघव तो सुषमांबुधि । नयनिं, तृप्ति न होतचि त्या हृदीं॥१९॥

येई त्यांसमयीं तेथें राजा दशरथ स्वयें ।
तनयां पाहुनी त्याच्या नेत्रीं जल भरूनि ये॥ २० ॥

वंदी तयास विभु सानुज रामराय । आशीर्वचें वितरि तात तयां अमेय ॥
"पुण्यप्रभाव तुमचाच समग्र ताता !।कीं जिंकिला अजय राक्षसराज आतां"
प्रेमें अती भरत ऐकुनि नंदनोक्त । ये अश्रु नेत्रिं पुलकावृतगात्र होत ॥
वात्सल्यपूर्ण पितया कृपया विलोकी । दे ज्ञान त्यासि दृढ दीनदयाळ तो कीं
हे गौरि ! तैं दशरथा नच मोक्ष आस।कीं भेदभक्तिवरि तो निज ठेवि चित्त॥
जे भक्त होति सगुणा, नच मोक्ष घेती।श्रीराम अर्पिति तया निजपुण्यभक्ति! '

प्रणाम करुनी रामा वारंवार प्रभूप्रति ॥
स्वर्गीं दशरथें हर्षें केलें गमन मागुतीं ॥ २४ ॥

श्रीकोसलाधीश रघूत्तमाप्रति । सौमित्र सीता बघुनीहि संगतीं ॥
शोभा बघोनी अति हृष्टमानसीं । स्तुती करी इंद्र मनोहरा अशी— ॥२५॥

"जयजय रामा ! शोभाधामा । देशी प्रणतां तूं विश्रामा ॥
निषंग–सायक–चापीं शोभसि । अमेयबलभुजदंड ऐसशी ॥ २६ ॥
जय खर–दूषण–नाशन रामा ! । राक्षस–खलगण–मर्दन–नामा ॥
मारिलात खल हाहि दांडगा । केलें निर्भय देवखंड गा ! ॥ २७ ॥
जय धरणीभरहरण उदारा । अपार महिमा तव रघुवीरा ! ॥
रावणनाशन जय करुणाकर । केले राक्षस तूं अभयंकर ॥ २८ ॥
बलगर्वित तो रावण, देवां— । गंधर्वांतें जिंकित सर्वां ॥
सिद्ध मुनीश्वर खग नर नागहि । हठें लावि तो निजकार्या महिं २९
परद्रोहरत जो अति दुष्ट । सेवी निजफल तो पापिष्ठ ॥
दीनदयाळा तुम्हां प्रार्थना । कमलदलोपमदीर्घलोचना ! ॥३०॥
होता मातें हा अभिमान । कोणि न जगतीं मजसि समान ॥
आज पाहुनी प्रभुपदकमलें । गर्वमान मम दुःखहि शमलें ! ॥३१॥
गाती श्रुति ज्या अव्यक्तातें । ध्यावोत तया जे ध्याउं पहाते ॥
प्रीति परी मम कोसलभूपीं । श्रीरामाच्या सगुणसुरूपीं ! ॥३२॥

सीता लक्ष्मण यांसह रामा । माझ्या हृदयीं कर विश्रामा ॥
जाणुनि मातें दास आपुला । रमापते दे ! भक्तिच मजला ॥१३॥
दुःखनाशना दीनदयाळा । नमित असें मी परमकृपाळा ॥
तुलसिदासविभुराघवचरणीं । 'राम' वंदितो अन्तःकरणीं ॥

रमानिवासा हरशी त्रासा कृतशरणागतसंतोषा !
या सुखधामा मी नमिं रामा मदनशताहुनि रम्य अशा ॥
विश्वरंजना, शत्रुभंजना नरतनुधर्त्या अमितबला ।
विधि-हर-देवा नमन राघवा करुणार्द्रा अतिकोमला १५

कृपाकटाक्षीं मज पाहुनीयां । आज्ञा करावी मज कांहिं कार्या " ॥
ऐकोनियां तें प्रियवाक्य त्याचें । वदे तया राम दयार्द्र वाचें-॥१६

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे देवस्तुतिवर्णनं नाम त्रयोविंशतितमस्तरङ्गः ॥

—:०:—

तरंग २४ वा

"ऐकें सुरेश्वर अगा ! कपि ऋक्ष माझे । झाले रणीं मृत निशाचरहस्तिं कीं जे
माझ्याच कारणिं तयीं असु सांडियेले । तूं त्यां जिवंत कर सुश सुरेन्द्र ! लीलें" १
ऐकें खगेश ! रघुरायसरस्वती ती । होती अगाध मुनि-पंडितमान्य अर्थी ॥
मारूं शके जग विभू जिववूं शकेही । इंद्रासि केवळ महत्त्व समर्पु पाही ! ॥२॥
तैं वर्षतां अमृत, ऋक्ष कपी जिवंत । होती, सहर्ष उठती प्रभुपाशिं येत ! ॥
दोनी दलांवरि सुधा जरि वर्षियेली । झाले जिवंत कपि ऋक्ष, न राक्षसाली ३
होऊन राममय तन्मन मृत्युकालीं । त्यां मोक्ष लाभत नुरे भवबंधनाली ! ॥
जे कीं सुरांशक असे कपि ऋक्ष सारे । झाले जिवंत रघुनाथमतानुसारें ! ॥४
रामापरीं कवण दीनहितार्थकारी । जो सर्व राक्षस करूनि विमुक्त तारी ॥
जो दुष्ट पापखनि रावण कामचारी । तो पावला गति मुनींसि न पावणारी ! ५.
वर्षोनि पुष्पतति जाति सहर्ष देव । आपापल्या चढुनि रम्य विमानिं सर्व ॥
पाहोनि योग्य समया मतिमान् महेश । श्रीराघवाजवळिं येत मुदें विशेष ॥६

अत्यंत भक्तिभरिं जोडुनियां करांतें । तैं अश्रुबिंदु नयनांबुरुहीं वहाते ! ॥
रोमांचकाय हर गद्गदकंठ गाई । श्रीराघवा अतिमधु स्तवनप्रवाहीं– ॥ ७ ॥

"रघुकुलाधिपा ! रक्षणें मला । कर सजे शरीं कार्मुकीं भला ॥
पटल जें महा मोहमेघसें । पवनसें तुम्हीं वारितां कसें ! ॥ ८ ॥
अनल कीं वना संशयात्मका । अमररंजना विश्वपालका ! ॥
सगुणनिर्गुणा ! सुगुणमंदिरा । विजयिं शोभतां विश्वसुंदरा ! ॥९॥
भ्रम–तमाप्रती वारिता रवी । आशि तुम्हां असे पुण्य थोरवी ॥
मदमतंगजक्रोधकाम यां । दमक सिंहसे तुम्हि दयामया ! ॥ १० ॥
जनमनोवनीं संचरूनियां । करितसां तया नित्य निर्भया ॥
विषयकल्पनाकमलिनीवना । हिमतुषारसे शीघ्रनाशना ! ॥११॥
सदय इंद्रियातीत राघवा ! । भवनिवारका जानकीधवा ! ॥
भवमहाब्धिच्या मंदरोपमा । शमविं संसृती, हे मनोरमा ! ॥१२॥
कमललोचना दुःखमोचना । प्रणततोषणा दीनतारणा ॥
अनुजजानकीयुक्त मन्मनीं । वस रघूत्तमा ! तूं निशींदिनीं ॥ १३ ॥
त्रिभुवनोत्तमा श्यामसुंदरा । मुनिमनोहरा तापसंहरा ॥
तुलसिदासहृन्नाथ सौख्यदा ! । हृदयिं मी नमीं राघवा सदा ॥१४॥

हे नाथ ! कोसलपुरीमधिं होय जेव्हां । राज्याभिषेक तुमचा बघणार तेव्हां ॥
पाहीन उत्सव मनोहर तो अनन्य । होईल चित्त मम हें अतिमात्र धन्य !" १५
ऐसी स्तुती करुनि शंभु निघून जात । येई बिभीषण तिथें प्रभुदर्शनार्थ ॥
वंदोनियां प्रभुपदीं वदला मृदूक्ति । "ऐका जि ! शार्ङ्गधर ! जें मम होय चित्तीं
मारी प्रभू दशमुखा सकुला ससेना । विस्तारिलें त्रिभुवनीं यश पुण्य नाना ॥
मी दीन हा मलिन हीनमती कुजाति । माझ्या वरी करि कृपा प्रभु कैक रीतीं
येऊनि दासगृहिं पावन तें करावें । स्नाना करून समरश्रम घालवावे ॥
पाहोनि राक्षसगृहांतिल संपदा ती । द्यावी कपींसि विभुनें मुदितस्व चित्तीं ॥
सर्वोपरी मजसि मानुनि आपलासा । जावें सवें मज, पुरा निज, कोसलेशा ! "
ऐकोनि तें मृदुल दीनदयाळ राम । होई जलार्द्रनयनांबुज तो निकाम १९
सांगे प्रभू "गृह तसे तव कोशराशी । माझेचि होत सखया ! नच भिन्न होशी !
मातें परंतु भरतस्थिति आठवूनी । हो कल्पतुल्य निमिषैकहि सत्यवाणी ! ॥

वेषें तपस्वी, कृश देह ऐसा। सदैव मन्नामजपाभिलाषा ॥
ऐशा तया बंगिच मीं पहावें। तूं यत्न ऐसे कर सर्वभावें! २१
तूं सर्व राज्य कर कल्पभर प्रसन्न। चित्तीं मम स्मृति परोपरिं वागवून ॥
तूं पावशील मम धाम अनन्त अंतीं।जें कीं असें मिळविलें जगतांत संतीं!"

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे शिवस्तुति–बिभीषणसंवादवर्णनं नाम चतुर्विंशतितमस्तरङ्गः॥

— :X: —

तरंग २५ वा

रामोक्ति ऐकुनि बिभीषण हर्षपूर्ण। वंदी कृपाळु विभुचें पदपद्म लीन ॥
तेव्हां समस्त कपि ऋक्ष सहर्ष रामा।वंदोनि वानिति तदीय सुकीर्तिधामा १
येई बिभीषण पुढें निजमंदिरात। रत्नादिकीं वसनिं पुष्पक तो भरीत ॥
नेऊनि तें प्रभुपुढें सुविमान ठेवी। हांसे कृपाब्धि विभुराम वदेहि तवीं–२
" तूं बैस यात, नभिं जाइं बिभीषणा!रे।हें वस्त्रभूषण नभांतुनि वर्ष सारें"
जाई बिभीषण नभीं चढुनी विमानें। सद्रत्नवस्त्रतति वर्षत त्याप्रमाणें ३
जें ज्यांस आवडत तें कपि घेति सारें।घालोनियां वदनिं फेंकिति कीं असारें!
सीतेसमेत सहलक्ष्मण राम हांसे। अत्यंतकौतुकिं विभू स्वकृपाविलासें ॥४॥
ध्यानेंहि जो लाभत ना मुनींना। ज्या वर्णिती वेदहि कीं 'कळेना!'॥
करी कृपासागर तो अनेक। विनोद गोष्टी कपिंशीं सुरेख!! ॥ ५ ॥
नाना तपें, जप, मख, व्रत, नेम यांना। मानीतसे सकृप रामहि एवढें ना॥
तो प्रेम निर्मळचि केवळ एक पाही।श्रीराम त्यावरिच तुष्ट अतीव होई! ६
तीं भूषणें सुवसनें कपि अंगिं लेती। येती जिथें रघुवर प्रभु चारुमूर्ती ॥
पाहोनियां कपिगणीं बहुवर्ण भूषा। येई फिरूनि फिरुनि स्मित कोसलेशा!॥
देखे दयार्द्र नयनीं प्रभु त्या कपींना। बोले वचें मृदुल गौरवयुक्त नाना॥
"म्यां मारिलें दशमुखा तुमच्याच तेजें।राज्यीं बिभीषणहि बैसविला असा जे,
आपापल्या गृहिं रिघा तुम्हि सर्व आतां।मातें स्मरा लवहि चित्तिं,धरा न चिंता"
तैं प्रेमविह्वल कपीहि समस्त होती। जोडोनि पाणि वदले सुविनीत उक्ती ॥ ९

'जें बोललां प्रभु ! तुम्हांप्रति सर्व साजे। ऐकोनि तें अमुचिया हृदिं मोह माजे
जाणोनि दीन कपि तुम्हि सनाथ केले। त्रैलोक्यनाथ रघुनायक नित्य ठेले १०
ऐकोनियां प्रभुवचें मरतोंच लाजें ! । साहाय्य काय मशकें गरुडासि दीजे ?' ॥
रामा प्रसन्न बघुनी कपि अश्रु बाती । प्रेमीं निमग्न गृहकाम कुणां न चित्तीं ! ११

रामस्वरूपा हृदिं राखुनीयां । ते लागले रामनिदेशिं जाया ॥
हर्षें विषादें कपि सर्व पूर्ण । नानापरीं रामयशें स्तवून ॥ १२ ॥

सुग्रीव, नील, नल, अंगद, जांबुवंत । तो वायुनंदन, बिभीषण ज्यांसमेत ॥
तैसेच सर्व कपियूथप शक्तिमंत। प्रेमें भरूनि हृदिं, त्यां नयनाश्रु येत! ॥१३॥
बोलों न कांहिं शकतीच गहींवरें ते । रामासि सन्मुख निमेषविना पहाते ॥
तो प्रेमभाव अति पाहुनि रामराय । घेता तयां चढवुनी स्वविमानिं होय !१४
चित्तांत विप्रचरणां नमुनी, विमाना। तो चालवी करित उत्तरदिक्प्रयाणा ॥
तेव्हां विमान चलतां बहु गर्जुनीयां। सारे निनादति 'विभो जय रामराया !' ॥

अत्युच्य सिंहासन जेथ सुंदर । बैसे प्रभु श्रीसह रम्य त्यावर ॥
रामासवें शोभलि दिव्य भामिनी। कीं मेरुशृंगीं घनयुक्त दामिनी ! ॥१६॥
वेगीचे तें रम्य विमान चाललें । प्रहर्षुनी वर्षति देवही फुलें ॥
अत्यंत सौख्यावह वायु वाहती । ज्यां मंद सौगंध सुशीतलाइ ती ॥१७॥
सर्वत्र होई शकुनालि उत्तमा । प्रसन्न हृन्मङ्गल दिङ् मनोरमा ॥
श्रीराम सांगे, "रण देख जानकि ! । जिंकी इथें लक्ष्मण मेघनाद कीं ! ॥१८॥
इथे रणीं अंगदवायुनन्दनीं । निशाचरांची वधिली अनीकिनी ॥
तो कुंभकर्णासमवेत रावण । येथें वधीं मी मुनिदेवपीडन ॥ १९ ॥
सेतू इथे बांधियला मनोहर । संस्थापिला शंभु इथें उमावर " ॥
सीतेसवें रामकृपांबुधी नमी । श्रीशंकरातें स्थलिं पावनोत्तमीं ! ॥२०॥
ज्या ज्या स्थलीं काननिं तो दयानिधी। करूनियां वास वसे विशालधी ॥
तीं तीं प्रभू दाखवि जानकीप्रती । नामें कथोनी सगळीं सुचारु तीं ॥२१॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने लंकाकांडे श्रीजानकीलक्ष्मणादिसमेतं विमानेनायोध्याभिमुखगमनवर्णनं नाम पंचविंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २६ वा

आलेंचि सत्वर विमान तया स्थळासी। ज्या नाम दंडक, मनोहर जें विशेषीं ॥
जेथें अगस्ति, मुनिवर्य अनेक त्यांतें। भेटावयास रघुनायक जाय तेथें ॥१॥
त्यान्या ऋषींकडुनि मेळवुनी सदाशी। ये चित्रकूटिं जगदीश्वर सौख्यराशि ॥
संतोषवूनि मुनिंना तिथल्या, प्रभूंनीं। केला प्रवास पुढतीं अति शीघ्रमानीं॥
मार्गीं पुढें जनकजेप्रति दावि राम। सुश्यामवर्ण यमुना अघहा निकाम ॥
देखे पुढें सुरनदी अति पुण्यकारी। "सीते! प्रणाम कर हीस" वदे खरारि॥३॥
"हा देख तीर्थपति पावन गे! प्रयाग। जो दर्शनें करित जन्मशताघभंग ॥
शोकापहा तशि पहा शुभ ही त्रिवेणी। श्रेणीच विष्णुनिलया, स्तुत वेदवाणीं॥

पहा अयोध्या अति पावनी पुरी। त्रितापहारी भवरोग संहरी" ॥
वंदीत सीतेसह राम तीप्रती। रोमांचहर्षान्वित होउनी अती ॥५॥

सीतेसमेत राघव करित अयोध्येसि वंदन कृपाळ ॥
लोचन भरले सलिलीं तनु पुलकीं हृदय हर्षभरिं लोल ॥६॥
मग रामचंद्र करिती हृष्ट मनें मज्जन त्रिवेणींत ॥
कपिकरवीं विप्रांतें दानें दे विविध आपण पुनीत ॥ ७ ॥

सांगे प्रभू समजवूनि मरुत्सुताला। "साकेतिं जाइं धरुनी वटुरूप बाळा! ॥
तूं क्षेम सांग भरता अमुचें समग्र। तत्क्षेमवृत्त मज घेउनि येचि शीघ्र" ॥८॥

तेव्हां जाता झाला भरतातें मारुति प्रकामबल ॥
आले राघव तोंवरि तेथ भरद्वाजदर्शना विमल ॥ ९ ॥
नानाप्रकारिं पूजन करिता झाला मुनीश रामाचें ॥
स्तुति करुनि राघवाची आशीर्वचनें वदे मुनी वाचें ॥१०॥
वंदुनि मुनिपदकमलां जोडुनि करयुग्म राघव मुनीस ॥
बसले चढुनि विमानीं चालुं लागले त्वरें अयोध्येश ॥११॥
इकडे निषाद ऐकें 'आले प्रभु रामराय परतोनी ॥!'
तो स्वजनां बोलावी "नावा! नावा!" करोनि निजवाणीं! ॥१२॥
ओलांडुनि गंगेतें येतां उत्तरतटासि तें यान ॥
आज्ञेनें प्रभुच्या तें उतरवितां उतरले सकल तूर्ण ॥१३॥

गंगेसि तों पूजित जानकी तिथें । बहु प्रकारीं चरणीं पडोनि तें ॥
आशीसि गंगा मुदिं दे मनोहर । "सौभाग्य नान्दो तव गे निरंतर!"॥
ऐकोनि येई गुह भक्तिभावन । येई प्रभूपाशिं अतीव हर्षुन ॥
पाहूनि रामासह जानकीसती । भूमीं पडे शुद्धि न राहिलीच ती ! ॥१५॥
घेऊनि हृदिं निज कृपानिधानें त्यासि बसविलें निजनिकट ।
क्षेम विचारी त्या प्रभुराघव, वदला गुह तें निष्कपट ॥
"विरिंचि शंकर सेविति ज्यातें तें पद-पंकज बघिं अपुलें ।
हे सुखधामा! पूर्णकाम विभु पदकंजा मीं तव नमिलें!" ॥१६॥
सर्वपरीं जो अधम असा गुह त्यासि भरतसम उरिं कवळी ! ।
हे मतिमंदा तुलसीदासा! मोहें विसरसि विभु जवळीं ! ॥
रावणारिचें चरित्र पावन सिद्धमुनी, सुर नित गाती ।
राघवपदरति वाढुन चित्तीं स्मरादि नाशुनि सुखवीती ॥ १७ ॥
जे सुज्ञ कीं वाचति राघवाचें । चरित्र युद्धीं विजयी प्रभूचें ॥
करील त्यांला भगवान् अनन्त । विवेकलक्ष्मीजयभूतिमन्त ॥१८॥
जाणोनियां मलिन हा कलिकाळ सारा । हे मन्मना! लवकरीं कर सद्विचारा॥
श्रीरामचंद्रविभुचें त्यजुनी सुनाम। आधार अन्य नच लभ्य कुठें निकाम !॥
'लंकाकांडा'चें हें गायन मज निष्कलंक नित्य रुचो ॥
श्रीरामचंद्रसद्यश कलिमलिना सतत मन्मनास सुचो! ॥ २० ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुष-
विध्वंसने लंकाकांडे श्रीरामचन्द्रस्य मार्गे निषादसमागम-
वर्णनं नाम षड्विंशतितमस्तरङ्गः ॥

इति श्रीरामचरितमानसानुवादे श्रीखण्डेकुलचिन्तामणितनुज-
रामचन्द्रकविरचिते सुश्लोकमानसे महाकाव्ये लंकाकाण्डः
'विमलविज्ञानसंपादनो'नाम षष्ठः सोपानः
श्रीसीतारामचन्द्रकृपाप्रसादेन संपूर्णः ।

॥ शुभं भवतु ॥

॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

❋ सुश्लोकमानस ❋

श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

सप्तम सोपान

उत्तरकांड

तरंग १ ला

मंगलाचरण

मयूरकण्ठच्छविनील यत्तनू । जो श्रेष्ठ हो देवगणांमधें म्हणूं ॥
ज्या विप्रपादाम्बुजचिह्न हो उरीं । मी तो नमीं राम रमापती हरी ॥१॥
पीतांबरें शोभत जो सुशोभन । जो सुप्रसन्न प्रभु पद्मलोचन ॥
करीं सजे चापशरादि संतत । संवेष्टिला जो कपियूथि सहित ॥२॥
जो लक्ष्मणें सेवियला सदोदित । त्या जानकीच्या मम वंदनें नित ॥
जो पुष्पकारूढ विराजला अती । त्या रामरायीं मम हो सदा रति ॥३॥

श्रीराघवाचें पदकंज मंजुल । महेश्वरें वंदित जें सुकोमल ॥
संवाहि ज्यातें करपद्मिं जानकी । जें मोहवी चिंतकचित्तभृंग कीं ! ॥४॥
कुन्देन्दुशंखोज्ज्वलगौरसुन्दर । गौरीपती इष्टद जो महेश्वर ॥
कारुण्यपूर्णांबुजलोचना नमीं । श्रीशंकरा त्या स्मरनाशनास मी ॥५॥
वर्षें सराया चवदा वनावधि । राहे उणा वासर एकला मधीं ॥
साकेतिं नारीनर पौर दुर्बल । चोहींकडे रामवियोगिं आकुल ॥६॥
जो कीं जणों शकुन सुंदर मव्यकारी । झालीं प्रसन्न हृदयें सगळींच भारी ॥
वाटे सुरम्य नगरी सकलप्रकारीं । जें सूचवी रघुवरागम नाहिं दूरीं ! ॥७॥
कौसल्यादी सर्व माता प्रहृष्ट । झाल्या ऐशा कीं गमे, त्यांस इष्ट ॥
वार्ता कोणी सांगणारे मिळाले । कीं, ये राम श्रीसवें बंधुमेळें ! ॥८॥
भरताचा उजवा भुज, लोचन हे स्फुरण पावले बहुदां ॥
शुभ शकुन जाणुनी मन करत विचारा, भरोनि पूर्ण मुदा ॥९॥
आधार जो अवधि, एक दिनीं सरेल । जाणोनि होत हृदिं तो अति खेदशील ॥
"हो काय कारण ? अजून न येति नाथ । मानोनि हा कुटिल, ते मज नाठवीत !
तो भाग्यवान् खचित लक्ष्मण होत धन्य । जो रामपादकमलीं रमला अनन्य ! ॥
जाणे प्रभू कुटिल मी कपटी असाच । याकारणें मजसि संगतिं घे न साच ! ११
झालें असेल जर तन्मत निश्चयें हें । कल्पांतिंही कवण निस्तरणार आहे ? ! ॥
माझे प्रभू परि न पाहति दोष दासीं । ते दीनबन्धु मृदुचित्त, सुभावराशि !
विश्वास या मम जिवा दृढ हाच होय । भेटोनि राम, शकुना शुभ ये अमेय ॥
संपोनियां अवधि ही जर मी जिवंत । माझ्यापरी अधम कोणि न या जगांत !"
श्रीरामचंद्रविरहार्डित मग्नचित्त । जों होय तो भरत कोमल रामभक्त ॥
तों विप्ररूप हनुमन्त समोर येई । नौकाच त्या बुडतया जणुं येत कायी ! १४
दिसला भरत तयातें कृशतनु, दर्भासनीं जटामुकुट ॥
'श्रीराम राम राघव !' जपता नयनांबुजीं स्रवत लोट ! ॥१५॥
हो हृष्ट त्या बघुनियां हनुमन्त चित्तीं । रोमांचकाय, नयनाश्रुहि ज्या वहाती ॥
मानी अतीव सुख तो बहुतां परींनी । बोले सुधेसम अशी श्रुतिरम्य वाणी—१६
"ज्याच्या वियोगिं अतिदुःखित सर्वयाम । ज्याच्या गुणासतत वानिसि तूं निकाम
जो सज्जना सुखद राघववंशदीप । तो राम देवमुनिपालक ये समीप ! ॥१७॥
जिंकी रणीं रिपुस, यद्यश देव गाती । सीतानुजासहित ये नगरा सुमूर्ति !"
तें ऐकतांचि वच, दुःख समस्त लुप्त । तृष्णातुरा अमृतलाभचि काय होत !

'आहांत कोण तुम्हि तात! कुठून आलां? ऐकविलीं प्रियवचें तुम्हि मन्मनाला'
" मी वायुनन्दन कपी हनुमन्त होय। ऐका कृपाजलनिधे ! मम नामधेय
मी दीनबंधु-विभु-राघवदास होय " । हें ऐकतां भरत भेटत त्या अमेय ॥
तो प्रेमभाव हृदिं केविं बरें समावे?। नेत्र स्रवे भरुनि, हर्षित गात्र व्हावें! २०
उद्गारला भरत " दुःख न लेश चित्तीं।कीं पाहिली कपिवरा ! तव भक्तिमूर्ति ॥
भासे मदीय हृदयप्रिय रामराय । हा भेटला तव मनोहररूपिं काय ! ! " ॥
त्यातें पुसे भरत तैं कुशलें कितीदा बोले " तुला वितरुं तें वद काय मोदा!
या वृत्ततुल्य जगतीतलिं काय आहे ? चित्तीं विचार करुनी नच कांहिं लाहें!
केव्हां न तात फिटती उपकार तुझे । तूं रामवृत्त मज ऐकविं गा ! असें जें !"
तेव्हां नमूनि भरता हनुमंत वर्णी । श्रीरामकीर्तिगुणगान यथार्थवाणी ॥२३॥
बोले तदा भरत "सांग कपे ! मला कीं।स्वामी कृपाळ रघुनायक धन्य लोकीं
दासास या स्मरतसे हृदिं काय राम ?"।ऐकोनि तैं पवननंदन हर्षधाम २४

" निजदासाचें रघुकुलभूषण करि स्मरण का मम साचें ? "
भरतोक्तीच्या आर्तिभरें त्या पुलकित नमि कपि, वदत वचें—॥
" रघुवर निजमुखिं गुणगण गाई चराचराधिप नित ज्याचे ।
परमपुण्य तो सद्गुणसिंधू नवल न त्याचे विनयाचें ! ॥ २५ ॥

तूं प्राणसा दयित नाथचि राघवासी।हें सत्य मी वदत रे! तुज सौख्यवर्षी!"
ऐकोनि तैं भरत मारुतितें कितीदा । आलिंगि गाढ, उर त्या पुरलें न मोदा
तो नम्रशीर्ष चरणीं भरता नमोनी । आला त्वरें कपि रघूत्तमसंनिधानीं॥
सांगे तया कुशल सर्व सहर्ष राम । चाले विमानिं पुढतीं विभु सौख्यधाम॥
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने
उत्तरकांडे हनुमदागमनवर्णनं नाम प्रथमस्तरङ्गः ॥

—०—

तरंग २ रा

प्रहर्षानें येई भरत मग तो कोसलपुरा ।
वसिष्ठातें सांगे ' परत विभु ये आत्मनगरा ' ॥
निवेदी वार्ता ती सुमधुर अशी मंदिरिं निज ।
' प्रभु श्रीरामाचे कुशल अधिं देखूं पदरज ! ' ॥ १ ॥

ऐकोनि वृत्त तैं गान्या माता उठुनि धांवती ॥
रामक्षेम निवेदूनी भरतें सांत्विल्या अती ! ॥ २ ॥
दधि, दूर्वा, गोरोचन, पुष्पफलें, सर्व मंगलनिदानें ॥
तुलसीदलें नवीनें सुवर्णताटीं भरूनि मोदानें ॥ ३ ॥
गजगामिनी निघाल्या ललना मधुरस्वरीं म्हणत गानें ॥
जे जे होते जैसे तैसे ते धांवले प्रहर्षानें ! ॥ ४ ॥

घेती न ते संगतिं बालकांप्रति । वृद्धांसही घेति न तेविं संगतीं ॥
परस्परांतें पुसती कुतूहलें । " तुम्हीं दयाब्धी रघुराय देखिले ?" ॥ ५ ॥
'येत प्रभू ' हें कळताच, पावनी । झाली अयोध्यानगरी सुखा खनी ! ॥
वाहे नदी श्रीसरयू सुनिर्मला । सुगंध मंदानिल शीत वाहिला ! ॥ ६ ॥

घेउनी गुरु तसे अनुजातें । ब्रह्मवृन्द निजसेवकही ते ॥
सर्व हृष्ट अति आदरिं जात । राघवा भरत संमुख भक्त ॥ ७ ॥

सज्जावरी चढुनि तैं बहुसंख्य रामा । येतां विमान बघती हृदिं हर्षधामा॥
अत्यंत सुंदरखें म्हणतात गाणीं । जीं पूर्ण मंगल अशीं भरलीं कथांनीं ॥८
तो पौर्णिमेन्दु जणुं सुंदर रामचंद्र । ज्या पाहतांच पुर हर्षित हो समुद्र ॥
कोलाहला भरति पाहुनि येइ चित्तीं। आनन्दपूर्ण ललना जणुं वीचि होती !
श्रीराम भानुकुलवारिजभानुराय । दावी कपींस इकडे पुर तें अमेय ॥
"लंकेश ! अंगद ! कपीश ! पहा पुरी ही। अत्यंत पुण्यतम, देशाचि रम्य होई ! ॥
वैकुण्ठवर्णन जरी सगळे करीती । आहे पुराण-निगमीं जरि थोर कीर्ति– ॥
साकेततुल्य मज आवडतें न तेंही । हें जाणणार जगतीं जन फार नाहीं !
हे जन्मभूमि नगरी मम रम्यरूपा । दिग्भागिं उत्तरिं वहे सरयू अपापा ॥
जीच्यांत मज्जन करून विनाप्रयास । माझ्यासमीप नर पावत पुण्यवास !
मातें अति प्रिय हिच्यामधिं वासकारी।ही सौख्यकारि नगरी मम धामदात्री"
सारे प्रहृष्ट कपि ऐकुनियां प्रभूक्ति । "तूं धन्य धन्य पुरि ! यद्यश राम गाती!"

पाहोनियां लोक समस्त येत । कृपांबुधि श्रीभगवान् अनन्त ॥
आज्ञापुनी उत्तम त्या विमाना । तें थांबवी तो पुरसन्निधाना ॥ १४ ॥
उतरुनि प्रभु त्या कधि पुष्पकां । " अजि कुबेरगृहाप्रति जाइं का!"
प्रभुनिदेशिं सहर्षचि तें चले । परि वियोगिंहि दुःखित जाहलें ! ॥ १५॥

आले तदा भरतसंगति सर्व लोक । जे कीं कृशांग रघुवीरवियोगशोक ॥
तेव्हां वसिष्ठ मुनिनायक वामदेव । देखोनि राम धनु, सायक ठेवि सर्व ॥
धांवोनि तो धरितसे गुरुच्या पदाब्जां । रोमांचकाय अनुजासह हो महौजा!
भेटोनि त्या कुशल तैं पुसती मुनीश।सांगे विभू "करि कृपा तुमची अशेष!"
सर्वां द्विजां नमित राम विनम्रशीर्षि । धर्मी धुरंधर रघूत्तम पुण्यपोषी ॥
हस्ताब्जि घे भरत रामपदांबुजातें । वंदीति देव मुनि साम्बमहेश ज्यांतें ॥
भूमीं पडे भरत तैं उठतां उठे न!।घे त्या उरीं निज दयानिधि ऊचलून!
तो श्यामलांग पुलकीं भरला दयार्द्र। नेत्रीं नवांबुजसमीं जलबिन्दु सान्द्र ॥१९॥

अंबुजलोचनिं जलधाराभर सुंदर तनुवरि पुलक भरे ।
प्रेमातिशयें अनुजा, हृदयें मिळत त्रिभुवनविभु त्वरें ॥
अनुज प्रभुशीं मिळता सुषमा तिजला उपमा मज न सुचे ।
जणुं प्रेमरसशृंगारांचे पुतळे शोभति ते साचे!! ॥ २० ॥
क्षेम कृपानिधि विचारि भरता, परि वेगें ना उत्तर ये ।
गौरि! ऐक तें अगम वाङ्मना, सुख अनुभवणें तें हृदयें! ॥
"कुशलचि आतां कोशलनाथा! आर्त पुरवितां दर्शनिं या ।
वियोगाब्धिमधिं बुडतां मज कर दिधला प्रभुंनीं करुनि दया!"

भेटे शत्रुघ्नातें राम प्रभुराय हृदयिं कवळून ।
परमप्रेमळ बंधुद्वय भेटे भरतलक्ष्मण मिळून! ॥ २२ ॥
शत्रुघ्न लक्ष्मण तसे भेटुनि मग विरहदुःख शमवीती ॥
सानुज भरतें वंदुनि सीतापद सौख्य सेविलें चित्तीं ॥ २३ ॥
पुरवासी लोकांप्रति प्रभुवर हर्षें विलोकिता झाला ॥
सर्व विपत्ती नेई वियोगजनिता क्षणामधिं लयाला! ॥ २४ ॥
प्रेमातुर सर्वजनां प्रभु पाहुनि करित कौतुक कृपाल ॥
प्रकटुनि अनंतरूपें भेटे सर्वां यथोचित नृपाल! ॥ २५ ॥

सर्वांसि पाहत विभू सदयावलोकीं । नारीनरां करित तो सकलां विशोकी ॥
सर्वांस भेटत असे भगवान् क्षणांत । हें मर्म गौरि! कवणां न कळोनि येत!

ऐशाप्रकारें सकलां सुखवूनि रघूत्तम ॥
चालले पुढतीं मार्गें गुणशील-मनोरम ॥ २७ ॥

सोत्कण्ठ सकळ माता कोसल्यादिक धांवुनी ॥
आल्या देखुनियां वत्सा वेगें धेनूचशा कुणी ! ॥ २८ ॥

तान्ह्या वत्सा त्यजुनि गृहीं, वनिं धेनु चराया नेलेली ।
सांजे नगरा हुंब्रत धावे फुटुनी पान्हा त्याजवळीं ॥
भेटति सकळा माता प्रेमें प्रमुसि बोलुनी लडिवाळ ।
विरहविपत्ती लुप्त होउनी अमित हर्षसुख ये जवळ ! ! ! ॥२९॥

भेटे सुमित्राजननी स्वनन्दना । जाणोनि त्या रामपदाब्जमोदना ॥
संकोचुनी फारचि चित्तिं कैकयी । श्रीरामचन्द्राप्रति भेटली तई ॥३०॥
सौमित्र सान्या जननींसि भेटत । आशीर्वचें घेत मनीं प्रहर्षित ॥
पुनःपुन्हां भेटत कैकयीप्रत । तरी मनःक्षोभ न सर्व लोपत ! ॥३१॥
श्वश्रूंप्रती सकळ भेटलि हृष्ट सीता । लागोनियां चरणिं भक्तिभरें पुनीता ॥
आशीर्वचें वदति त्या कुशला पुसोनी। सौभाग्य गे! तव असो ध्रुव सत्यवाणी
सान्या पहाति रघुरायमुखांबुजातें । जाणोनि मंगल उदश्रु न होति चित्तें ॥
त्या आरती कनकताटिं तयां करांतीं। न्याहाळिती प्रभुतनू कितिदा तरी ती!॥
ओवाळिती कितिक वस्तु तयांवरूनी । चित्तामधें परमहर्षभरें भरूनी ॥
पुत्रा विलोकि कितिदा तरि राममाता । स्नेहार्द्रशील रणधीर दयार्द्रचित्ता॥

ती माउली कितिकदा हृदयीं विचारी । 'लंकापतीस वधि हा कवण्याप्रकारीं!
दोनी नितान्त सुकुमार कुमार माझे । कोठें महाबल निशाचर वीर ते जे !' ॥
सीतेसमेत विभुतें सहलक्ष्मणातें । माता विलोकिति महोत्सवपूर्ण चित्तें ॥
आनंदसागर अमेयचि तन्मनींचा । रोमांचती कितिकदां; वदवे न वाचा ! ॥
सुग्रीव नील नल अंगद जांबुवंत । लंकापती पवननंदन शीलयुक्त ॥
तैसेच सर्व कपिवीर मनोज्ञवेष । होती धरून नररूप उणें न लेश ! ॥३७॥

भरताचें शील व्रत नियम रघूत्तमपदांबुजिं रती ती ॥
सादर वर्णिति सारे प्रेमभरें भरतसंस्तवीं रमती ॥ ३८ ॥
देखुनि नागरिकांची रीति मनोज्ञा सुशील-भाव कृति ॥
प्रीति श्रीरामपदीं उत्कट सारे प्रशंसुनी गाती ॥ ३९ ॥

सान्या सख्यांस मग बोलवि रामराया । लावी वसिष्ठपदिं वंदन त्यां कराया ॥
सांगेहि ''हे कुलगुरू अमुचे वसिष्ठ । यांच्या कृपें दनुज सर्व रणांत नष्ट'' ॥४०॥

वदती गुरूंसि विभु "हे मम मित्र सारे। नौकाच कीं रणसमुद्रिं विराजणारे ॥
माझ्या हितार्थ निज जन्मचि वाहती हे।मातें मुने! भरतही प्रिय तेविं नोहे!"
आनंदमग्न ते होती ऐकोनी प्रभुभाषित ॥
क्षणोक्षणीं हृदीं होती सौख्यानें सर्व हर्षित ॥ ४२ ॥
कौसल्यापदकमलीं नमिती मग ते शिरांसि लवबूनी ॥
हर्षे आशी दे ती " आह्मां मज रामसे प्रिय" म्हणूनी ॥४३॥
सुमनवृष्टि नभींहुनि वर्षली । प्रभु निघे भवना सुखसागर ॥
चढुनि सौधतलीं बघती किती । युवतिवृंद विभूसि मनोहर ॥४४॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे भरतसमागमवर्णनं नाम द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

द्वारीं द्वारीं रम्य सौवर्ण कुंभ । सर्वांनींही ठेवियेले सुशोभ ॥
गेहा गेहा तोरणें सत्पताका । लावीयेल्या मंगलार्थी अनेका ॥ १ ॥
मार्गी मार्गी शिंचिलें चारु वारि । सद्गंधानें होय जें चित्तहारी ॥
चौकीं चौकीं हास्तिमुक्ताफलांनीं । केली शोभा वर्णणें केविं कोणीं! ॥२॥
नानारीतीं शोभलीं मंगलें तीं । वाद्यें नाना मंगलें वाजताती ॥
ओवाळाया सिद्ध सर्वत्र नारी । आशीर्वादां हर्षुनी देति सारी ॥ ३ ॥
घेऊनीयां आरत्या स्वर्ण ताटीं । ओवाळीती अंगना रामभेटीं ॥
गाणीं गाती सुस्वना हर्षपूर्ण । मांगल्याला ना तुला अन्य कोण! ॥४॥
त्या आरती आर्तिहरा करीती । श्रीभानुवंशांबुजभानुतें ती ॥
उत्साह सर्वत्र अतीव नांदे । आनंद-मांगल्य जनांत कोंदे ॥ ५ ॥
साकेतशोभा–शुभसंपदा ती । श्रीशारदा, वेद, अहीश गाती ॥
यथार्थगानीं नच शक्ति त्यांही । कैचें उमे! शक्य नरास होई! ! ॥६॥
गमे अयोध्या सरसीच विस्तृत । नारी जणों कैरविणी विकासत ॥
श्रीराघवाचा विरहार्क लोपतां । पूर्णेन्दुसा राम तसा विलोकतां ! ॥ ७ ॥
झाल्या अनेक शकुनावलि पुण्यदायी । आकाशिं दुंदुभि निनादति हर्षवाही ॥
नारीनरां नगरिंच्या अति सौख्य देत । श्रीरामचंद्र भगवान् भवनांत येत ॥८॥

बाधोनि लज्जितमती अति कैकयी ती। जाई प्रभू प्रथम तद्गृहिं सौख्यमूर्ति ॥
तीतें प्रबोध करुनी सुखमूर्ति चित्ता। ये रामराय निजमंदिरिं हृष्टचेता ॥९॥

मंदिरीं आपुल्या ये कीं कृपासागर राघव ॥
सर्व नारीनरां झालें सौख्य ज्या न्यून ना लव ! ॥१०॥

बोले वसिष्ठ गुरु बोलवुनी द्विजांसी। "हो आज उत्तम घडी, दिन पुण्यराशि
आज्ञा तुम्हीं सकळविप्रगणीं करावी। सिंहासनीं प्रभु बसे रघुनाथ जेवीं" ११
ती आयकोनि अतिरम्य वसिष्ठवाणी। झाले प्रहृष्ट हृदयीं द्विज सर्वमानीं ॥
कित्येक विप्र वदले अति मंजुलोक्तीं। "रामाभिषेक जगतीं अभिरामकीर्ति १२
आतां नकोचि मुनिनाथ! विलंब यास। राज्याभिषिक्त झणिं हो! प्रभु जानकीश"
आज्ञापिला मग सुमंत झणीं मुनीशें। तो ऐकतांक्षणिं निघे तिथुनी प्रहर्षें १३
केले सुसिद्ध रथवाजि मतंगजादि। प्रेषूनि दूत झणिं मंगलवस्तु साधी ॥
सर्वांसमेत परतोन सुमंत येत। वंदी वसिष्ठ मुनिवर्यपदीं विनीत ॥१४॥

झाली अयोध्यानगरी सुशोभना। देवीं कृता संतत पुष्पवर्षणा ॥
सांगे प्रभू बोलवुनी स्वसेवकां। 'स्नानें सख्यांतें करवाल आधिं कां?' ॥१५॥
आज्ञापितां चहुंकड जन धांवले ते। स्नानें त्वरें करविती सुगलादिकांतें ॥
कारुण्यसिंधु भरता मग बोलवूनी। त्याच्या जटांसि उगवी प्रभु आत्मपाणीं
स्नानें तिघांहि निजबंधुंसि घालवीत। तो भक्तवत्सल कृपानिधि रामनाथ ॥
वानील कोण भरतोत्तमभक्तिराशि। तें कोमलत्व विभुचेंहि तसे विशेषीं ॥१७॥
जें कोटि शेषशतही शकती न वानूं। तें शक्य होइल इथें मज केविं मानूं? ॥
श्रीराम घे विवरुनी अपुल्या जटांसी। स्नानासि आचरि तसे गुरुसन्निदेशीं ॥

स्नान समाचरुनि प्रभु भूषिततनु शोभले किती राम ! ॥
कोटि अनंगासम ती कांति तदीया नितान्त अभिराम!! ॥१९॥

अत्यादरें सादर सासवांनीं। सीतेसही उत्तम न्हाववोनि ॥
दिव्यांबरीं भूषणिं सर्व अंगीं। ती भूषवीली शुभ त्या प्रसंगीं ॥२०॥
रामाचिया वामदिशीं विराजे। लक्ष्मीस्वरूपा गुणखाणि कीं जे ॥
हृष्टा तिला देखुनि सर्व माता। ये जन्मल्याचें फलपुण्य हातां ! ॥२१॥
ऐकें खगेशा! विधि शंभु देव ते। आले विमानांतुनि उत्सवें तिथें ॥
बघावया त्या सुखकंद राघवा। सानंद सारे मुनिवृंद तेधवां ॥२२॥
क्षमा बघोनिच भरे मुनि भक्तिभारें। सिंहासनास झणिं मागवि हर्षपूरें ॥
तें दिव्य भानुसम तेज अवर्णनीय। विप्रांसि वंदुनि बसे वरिं रामराय ॥२३॥

श्रीजानकीसहित राम बघोनि तैसे । प्रेमें अतीव भरले मुनिवृंद हर्षें ॥
गाईयले द्विजवरीं श्रुतिमंत्र घोषें । देवर्षि गर्जति नभीं जयघोष तोषें ॥ २४
आरंभिला तिलक आधिं वसिष्ठहस्तें । सारे मुनीहि कथितां करिती पुन्हां तें
पुत्रा बिलोकुनि भरे मुदिं राममाता । ओवाळि ती रघुवरा कितिदां स्वहस्तां
दानें दिलीं द्विजगणां विविधप्रकारीं । केली अयाचकचि याचकराजि सारी
सिंहासनीं त्रिभुवनेश्वर बैसलेले । पाहोनि देवगणिं दुंदुभि वाजवीले ॥२६॥

नभीं दुंदुभी विपुल वाजती गाती किन्नर गंधर्व ।
दंग अप्सरोवृंद नर्तनीं आनंदित मुनि सुर सर्व ॥
भरतादिक ते बंधु बिभीषण अंगद मारुतिसह सारे ।
छत्र, चामर, व्यजन, शरासन, शक्तिचर्म असि धरणारे ॥२७
श्रीसीतेसह रविकुलभूषण अनन्तकामच्छवि विलसे ।
नवमेघद्युति पीतांबरधर भुलवित मुनिवरमानसें ॥
मुकुटांगदसम सुरम्यभूषा प्रत्यंगीं अति कांतिमती ।
कमलविलोचन विशाल उर भुज; धन्यचि नर त्या जे बघती ! २८

अत्यंत शोभा-सुख, तो समाज । न वर्णवे रे ! मज पक्षिराज ! ॥
वर्णोत सारे श्रुति-शेष-वेद । शंभूच जाणे रस सत्यशुद्ध ॥ २९ ॥
करोनि रामस्तुति भिन्न भिन्न । गेले स्वधामा सुर ते निघून ॥
तों बंदिवेषांसि धरूनि येती । श्रीरामरायाप्रति वेदमूर्ति ॥ ३० ॥
अत्यादरें त्यांस कृपाळु राम । करीतसे स्वागत सौख्यधाम ॥
कोणासही तें कळलें न मर्म । स्तवीति ते राघवजन्मकर्म— ॥ ३१ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे कलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे रामराज्याभिषेकवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः ॥

— :०: —

तरंग ४ था

" सगुण निर्गुणा जय ! जय ! रामा ! निरुपमरूपा भूपवरा !
प्रबल खलांतें निजबलिं वधिसी रावणराक्षसनायकरा ॥
नरावतारें संसृतिभारा नाशुनि हरिसी दुःखगण ।
प्रभो ! दयाळा ! शक्तिसकुल प्रणतरक्षणा तुज नमन ॥ १ ॥

अगम्य तुझिया मायापाशीं हरे ! सुरासुर चराचर ।
भ्रमती भवपथिं नागनरादिक कालकर्मगुणिं निरंतर ॥
ज्यावरिं करुणाकटाक्षिं बघसी त्रिविध तयाचें दुःख सरे ।
भवभयनाशनदक्षा रामा ! रक्ष अम्हां गा ! तुज नमुं रे ! ॥ २॥
ज्ञानें मानें मत्तपणें जे तुज भवहरणा विस्मरती ।
ते सुरदुर्लभ पदाहुनीही पडति बघतसूं अम्हि जगतीं ॥
दृढविश्वासें त्यजुनि दुराशा तव दास्यीं जे रममाण ।
श्रमाविणें तव नामस्मरणें तरति भवा त्या स्मरत मन ॥ ३ ॥
यत्पद पूजिति शिवविधि, यद्रज लागुनि तरली मुनिगृहिणी ।
यत्पदनखभव विश्वपावनी वंद्य मुनिगणां सुरतटिनी ॥
ध्वजवज्राङ्कुशकंजचिह्नितें कंटककिणयुत वनगमनें ।
तीं पदकमलें सीतानाथा ! भजतों आम्ही सतत मनें ॥ ४ ॥
व्यक्त मूळ नच अनादि तरु जो निगमागमिं मत चतुस्त्वची ।
स्कन्ध सहा ज्या पंचाधिक विस शाखा बहु सुमदल सुरुचि ॥
कटुमधु ऐशीं द्विविध फलें ज्या एकलि वल्ली आश्रयिणी ।
पुष्पपल्लवीं नवललिता तुज भवतरुरूपा लवुं नमुनी ॥ ५ ॥
अज अद्वैत ब्रह्म अनुभवें गम्य मनाहुनि पर म्हणते ।
ध्याते त्यातें जाणोतच्चि परि आम्हि गाउं तुज सगुणातें ॥
करुणायतना प्रभो ! गुणनिधे ! दे तूं आम्हां वर हाच ।
मनोवचनकृतिं अविकृत तव पदिं व्हावें आम्ही रत साच !"

सर्वांचिया देखत या प्रकारीं । केली उदार स्तुति वेदिं चारीं ।
होती पुन्हां गुप्त लगेचि ते कीं । जाती निघोनी क्षणिं धातृलोकीं ॥७॥
हे वैनतेय ! परिसें, इतुक्यांत तेथें । येई उमारमण संनिध राघवातें ॥
रामा स्तवीत अति भक्तिभरें महेश । दाटे गळा, तनु वहे पुलकप्रहर्ष॥८॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वसंने
उत्तरकांडे वेदस्तुतिवर्णनं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

" प्रभो मेघश्यामा ! जय जय रमाचित्तरमणा ! ।
त्रितापां वारोनी कर अभय भक्तां स्वशरणां ॥
अयोध्येशा रामा ! खल दशमुखा संहरुनिया ।
अशोका त्वां केली सकल अवनी, पाळ सदया ! ॥ १ ॥
तुझ्या बाणाग्नीच्या प्रखरतर तेजांत पडुन ।
पतंगांऐसे ते रजनिचर गेलेचि जळुनं ॥
धराभूपा रम्या अतिशय उदारा रघुवरा ! ।
कटीं भाता शोभे, शर धनु तुझ्या साजति करां ॥ २ ॥
मदाची मोहाची अमित ममतारूप रजनी ।
तिच्या अंधारा तूं निवटिसि जणूं वासरमणि ॥
जणों व्याधा ऐसा मदन बहु पीडी जनमृगां ।
कुभोगांच्या बाणीं अशरण जना रक्ष क्षणिं गा ! ॥ ३ ॥
सदा हा अज्ञानें विषयवनिं जीव भ्रमतसे ।
अनेकां रोगांहीं कटुतर वियोगीं सुख नसे ॥
तुझ्या पादांभोजा विसरुनिच हें दुःखफल ये ।
म्हणोनी श्रीरामा ! तुजसि कधिंही विस्मरुं नये ! ॥ ४ ॥

जे ना करीति तव पादसरोजभक्ति । ते या अगाध बुडती भवसागरान्तीं ॥
ते दीन दुःखि नित पापमलांत लिप्त । ज्यांची रती नच तुझ्या पदपंकजांत ॥
ज्यांच्या मनीं तव कथा अवलंब नित्य । त्यांनाच आवडति संत, अनंत सत्य ॥
त्यांना न राग, मद, मान न लोभ ऐसे । त्यांनाच वैभव विपत्ति, समान भासे ॥
याकारणेंचि तव सेवक होति हर्षे । योगादिका त्यजुनि, सन्मुनि सुज्ञ ऐसे ॥
नेमेंचि ते तव निरंतर भक्त होती । सेवीति पादसरसीरुह शुद्धचित्तीं ! ॥७॥
मानोनि मान अपमान समानमान । सारेच संत सुखि संचरती अदीन ॥
तूं नांदसी मुनिमनोऽम्बुजभृंगसाच । हे राघवा ! समरधीर अनादि तूंच ॥८॥
त्वन्नाम संतत जपें, तुज मी नमीत । संसाररोगमदमानरिपो ! अनन्त ! ॥
हे सद्गुणांबुधिसुशील ! कृपानिधाना ! । सीतापते ! नमिल मी पदपंकजांना ॥

नाशीं मदीय रघुनन्दन भेदबुद्धि । हे भूपते! बघ सुदीनजना कृपाब्धि ॥
मी प्रार्थितों फिरफिरूनि सहर्ष हेंचि । दे साधुसंग, तव भक्ति शुभाढ्य साची!"
वर्णोनि रामगुण उत्तम, शंभु ऐसें । कैलासिं जाय निघुनी हृदयप्रहर्षे ॥
श्रीरामराय कपिलागिं अनेक देई । राहावयास सुखवास समृद्धिवाही ॥११॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे महाकाव्ये
कलिकलुषविध्वंसने उत्तरकाण्डे महादेवस्तुतिवर्णनं
नाम पञ्चमस्तरङ्गः ॥

—:•:—

तरंग ६ वा

ऐकें खगवर गरुडा ! रामकथा ही जगांत पुण्यतमा ॥
ताप त्रिविध विनाशी भवभयवन करिल दग्ध दावसमा ! ॥१॥
अभिषेकमहोत्सव हा श्रीरामाचा नितान्तसुखकारी ॥
याच्या श्रवणें लाभे विरतिविवेकादि संपदा भारी ॥ २ ॥

जे ऐकतील नर गातिल या सकाम । संपत्ति सौख्य फल पावत त्यां निकाम ॥
लाभोनि त्यांस सुरदुर्लभ सौख्यराशी । ते जाति अंतिं रघुराजपदांबुजांसी ॥३॥
जे कीं विमुक्त विषयी अथवा विरक्त । ते ऐकतील जर वर्णन हें समस्त ॥
लाभेल त्यांस सगळ्यांसचि निश्चयानें । संपत्ति नित्यनव भक्ति गति क्रमानें ॥
मीं वर्णिली खगपते! रघुनाथगाथा । माझ्या विलास मतिचा तशि ही यथार्था ॥
ही त्रासदुःखहरणी तरणी विमोहीं । वैराग्य-भक्ति-सुविवेक-दृढत्वदा ही ॥५॥
ऐशीं अयोध्येमधिं नित्यमंगलें । सारेच ते पौरसमूह रंगले ॥
श्रीरामपादांबुजिं नित्य सद्रति । ज्या शंभु-धाता मुनिवृंद वंदिती ॥६॥
वस्त्रादिकीं याचकवृंद तुष्टले । दानें द्विजां लाभ असंख्य चांगले ॥
महोत्सवीं सर्वहि जाति मानव । निमग्न होती सुख त्यां सदा नव ॥७॥
ब्रह्मानन्दीं मग्न सारे कपी ते । ज्यांची प्रीती रामपादाब्जि चित्तें ॥
राहे त्यां ना भान गेल्या दिनांचें । ऐसें अर्धें लोटलें वर्ष साचें ! ॥८॥
स्वगृहींहि त्यांस पुरलें निजगेहभान । संतांचिया हृदयिं ज्यापरि वैर तें न ॥
[illegible] त्यांस मग राघव बोलवीत । येवोनि सर्व नमिती प्रभुतें विनीत ९

अत्यादरें बसवि त्यांस समीप राम। तो भक्तसौख्यद वदे मृदु पूर्णकाम॥
"तुम्हीं अतीव मम केलि असेचि सेवा। तोंडावरी तुमचिया स्तव काय गावा!
आम्हांत सर्व अति आवडते मला हो!। मत्कारणें त्यजियलां गृहसौख्य [illegible]
हे बंधु राज्य धनवैभव जानकीही। वा देह गेह परिवार सुहृज्जनें हीं॥११॥
तैसीं न आवडति जेविं तुम्ही मला हे। खोटें न यांत लवमात्रहि कांहिं आहे!
सर्वांसि आवडति सेवक हें दिसेचि। दासीं परी मम हृदीं अति भक्ति साची॥
आतां गृहा अपुलिया तुम्हि सर्व जा हो। नेमें मदीय दृढ भक्ति तुम्हांत राहो!
जाणोनि सर्वगत सर्वहितार्थ मी हों। मत्प्रेम चित्त तुमचें बहुरीतिं वाहो!"
ऐकोनि त्या प्रभुवचा सगळेच मग्न। आहोंत कोण कवण्यास्थळिं? हें न भान॥
पाहाति एकटक, जोडुनि हात रामा। प्रेमातिपूरिं शकले न वदूंचि कामा१४
तत्प्रेम तें प्रभु बघोनि तसें अतीव। सांगे तयां करुनि बोध सुरम्यभाव॥
ते रामसंमुख वदूं शकती न कांहीं। पाहाति रामपदकंज पुनःपुन्हांही! १५
तों भूषणें सुवसन प्रभु मागवीत। जीं दिव्य सुंदर अनुत्तम शोभिवंत॥
सुग्रीव तैं प्रथम भूषविला तयांनीं। घालोनि तत्तनुवरी भरतें स्वपाणीं॥१६
आदेशितां रघुवरें मग आवडीनें। लंकापती सजविला बहु लक्ष्मणानें॥
निस्तब्ध अंगद तिथें बसला समौन। तत्प्रीति पाहुनि विभूसहि बोलवे न!
ते जांबुवंत, नल, नील, समस्त वीर। रामें विभूषविभले करुनी अहेर॥
चित्तांत सांठवुनि गोजिरि राममूर्ति। वंदूनि राघवपदांबुज, सर्व जाती १८
तैं अंगदें उठुनि वंदन आचरोनी। डोळे भरूनि सलिलीं, जुडिल्या करांनीं॥
अत्यंत नम्रपणिं बोलियली निजोक्ती। प्रेमें पुढेंच दिसलीं जणुं जीस होतीं १९

"प्रभुवरा! कृपा-सौख्य-सागरा!। शरणवत्सला हे दयाकरा!॥
मजसि वालिनें मृत्युचे क्षणीं। तुमचिया दिलें पदरिं बांधुनी॥२०॥
शरण आलिया रक्षणें भलें! बिरुद आपुलें नित्य शोभलें!॥
मजसि न त्यजा भक्तपालना!। गुरु पिता तुम्ही माय मन्मना॥२१॥
प्रभुपदांबुजा त्यजुनि उत्तमा। रिघुं कुठें बुरीं मी रघूत्तमा!॥
प्रभुवरें बरा चिंतणें मनीं। घरिं तुम्हांविणें काय जाउनी?!।॥२२॥
[illegible] नेणता, शक्ति-[illegible]। [illegible] रक्षणें दीन जाणुन॥
प्रभुपदीं करूं [illegible] [illegible]। [illegible] कार्मेंआ [illegible] [illegible]॥२३॥

चरणवारिजें बघुनि आपुलीं । भव तरीन मी हा घरातली ! " ॥
म्हणुनि हें, पडे प्रभुपदांवरी । 'नच वदा ! विभो ! जा असें घरीं !'॥
ऐकोनि अंगदवचा अति त्या विनीता । कारुण्यसागर विभू करुणार्द्रचेता ॥
घे अंगदा उठवुनी कवळीत वक्षीं । अश्रु स्रवे रघुकुलोत्तमपंकजाक्षीं ! ॥२५॥
काढोनि माळ अपुल्या उरिंची कराब्जीं । घालीत अंगदगळां प्रभु रत्नराजि ॥
वस्त्रादिकीं सजवुनी समजावि चित्तीं । नाना प्रकारिं, मग बोळवि त्या सुकीर्ति ॥
[भक्तार्थकारि भगवान् निज तीनि बंधु । घेऊनि संगतिं निघे करुणैकसिंधु ॥
त्या सर्व भक्तसुहृदांसि निरोप द्याया । सद्भाव तो कवण होइल शक्त गाया ! ॥]

शत्रुघ्नभरत लक्ष्मण यांसह रघुराय भक्तसुखकारी ॥
सुहृदां निरोप द्याया निघतां प्रेमें भरूनि ये भारी ! ॥ २७ ॥
अंगदहृदयीं येई प्रमाचा अंबुधी उचंबळुनी ॥
कितिदा तो श्रीरामा अवलोकी फिरुनि फिरुनि कीं वळुनी ! ॥२८॥
दंडप्रमाण घाली वारंवार प्रभूचिया चरणीं ॥
आशा मनिं त्या ऐशी म्हणतिल का राम मज 'रहा !' म्हणुनी ! ॥२९॥
श्रीरामाचें बघणें वदणें ऋजु चालणें, हंसत मिळणें ॥
स्मरुनि स्मरुनी हृदयीं भरला तो कितिकदां कसें कळणें ! ! ॥३०॥
पाहोनि भाव विभुचा विनवुनि बहु नम्रवचनिं भक्तिभरें ॥
गेला अंगद, हृदयीं धरुनि प्रभुपादसारसें मधुरें ! ॥ ३१ ॥

साऱ्या कपींस अति सादर पोचवून । ये राम बंधुहि तसे भरतादि तीन ॥
सुग्रीवपाद नमुनी मग मारुतीनें । प्रार्थीयलें बहुपरीं सुविनीततेनें ॥३२॥
" थोडे तरी दिन रघूत्तमपादसेवा । येईन मी करुनियां तुजपाशिं देवा !"
"तूं पुण्यपुंज पवनात्मज धन्य जा गा !॥सेवावयास विभुला करुणान्तरंगा"
जाई पुढें कपिपती वच हे वदोनी । तों सांगि अंगद मरुत्तनया स्ववाणीं ॥
" मी हात जोडुनि वदें हनुमंत ! तूंतें । माझें प्रभूस वद वंदन बद्धहस्तें ॥
तूं नित्य आठवण दे मम रामराया।माझ्या फिरूनि फिरुनी विनती तुला या " ॥
सांगोनि हें निघत अंगद तो स्वमार्गें । ये वायुनंदन रघूत्तमपास वेगें ॥३५॥
प्रीती तदीय कथि तो प्रभुलागिं जेव्हां । होई सगद्गद हृदीं भगवत तेव्हां ॥
[सांगोनि हें वदत काकभुशुंडि सार । जें राघवाविषयिं साजत सद्विचार]३६

वज्राहुनीहि अति मानिं कठोर उग्र । किंवा हवें तर सुमाहुनि कोमलाग्र ॥
श्रीरामचित्त गरुडा ! असलें अमेय । त्याचा कळेल कवणा तरि ठाव काय ? ॥
बोलावि तो मग कृपालु गुहा निषादा । त्या वस्त्रभूषण समर्पि महाप्रसादा ! ॥
सांगे "गुहा! निजगृहाप्रति जाइं आतां। माझी स्मृती सतत वागवुनि स्वचित्तां
तूं कायवाङ्मनसिं आचर धर्म नित्य । माझा सखा भरततुल्यचि होशि सत्य ! ॥
तूं येत जा सतत गा ! नगरास येथें । (प्राणप्रिया ! सतत भेटत जाचि मातें)" ॥
ऐकोनियां प्रभुवचां सुख फार होय । पायां पडे प्रभुसि नेत्रिं वहात तोय ! ॥
ये तो गृहीं धरुनि रामपदाब्ज चित्तीं।रामस्वभाव किति वानित तो जनान्तीं
श्रीरामचंद्रचरिता बघुनी जनांनीं । केली स्तुती कितिकदां तयिं धन्यवाणीं ॥
तो सौख्यधाम विभुराम यदा नृपाल।झाले सुखी सकल लोक अशोकशील ॥
कोणीहि वैर न करी कवणासवेंही । रामप्रतापिं विषमत्व लयास जाई ! ॥
आपापलीं करिति लोकहि धर्मकर्में । श्रुत्युक्तमार्गिं चलती सगळे स्वधर्में ! ॥
सर्वांस सौख्यभर, दुःखिं कुणीच नाहीं । सारेच निर्भय, न रोग कुणांस पाही॥
श्रीरामराज्यिं कवणाहि नसेचि ताप । ज्या देह-दैवभव भौतिक वा स्वरूप॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे रामराज्यवर्णनं नाम षष्ठस्तरङ्गः ॥

तरंग ७ वा

सुप्रीति नांदत परस्पर सर्व लोकीं । श्रुत्युक्तरीति निजधर्मि रती तया कीं ॥
सद्धर्म पूर्ण जगिं चालत चारि पायीं । कीं सत्य-शौच-सदयत्व-सुदातृताहीं ॥१॥
स्वप्नांतही अघ नसे लवलेश कोठें । श्रीरामभक्तिरत लोक लहान मोठे ॥
नारीनरां घडतसे परमार्थ थोर । सारेच पात्र परमागतिलागिं पौर ॥२॥
अल्पायु कोणि न, नुरे कसलीहि पीडा। सारेचि सुंदर अरोगपणाहि गाढा ॥
नोहे दरिद्रि कुणि, दुःखि न, दीन वा न । कोणी अज्ञाणि न,न लक्षणहीन कोण !
निर्दंभ सर्व जन, पुण्य-सुधर्ममग्न । नारी तसे नर गुणी चतुराइपूर्ण ॥
ज्ञानी गुणज्ञमति पंडित सर्व रीतीं । सारे कृतज्ञ, कपटीं बुध नैव होती ॥४॥

सान्या चराचरजर्वी परिसें खगेशा ! । श्रीरामराज्यिं नच संभव दुःखलेशा ॥
कर्म–स्वभाव–गुण–काळ–भवा विपत्ति । होती न अल्पहि कुठें अवनीतळीं ती
कांची जिला गमत सप्तहि सागरांची । पृथ्वी अशी रघुपति प्रतिपाळि साची ॥
ब्रह्मोर्मि रोमिं भुवनें वसती अनन्त । तो हो धरापति, विशेष न कांहिं यांत !! ८
माहात्म्य जाणुनिहि तें प्रभुचें मनाशीं । तो 'भूप एक' म्हणणें लघुतार्थदर्शी !
जे जाणती खगवरा ! महिमा प्रभूचा । ते ही अशा चरितिं भाव धरीति साचा !
लीलांवरी रुचि अशा प्रभुच्या असावी । हें ज्ञान–सत्फल असें मुनिवर्यभावीं ॥
श्री रामराज्यिं सुखवैभवराशि होई । ती वर्णुं ना शकति शेषहि शारदाही !
सारे उदार, सगळे उपकारशील । नारीनर द्विजपदांबुजभक्तिलोल ॥
सारेच आचरिति सद्व्रत एकपत्नी । नारीहि भर्तृसुहिता तनुवाङ्मनांनीं ९

श्रीरामचंद्रराज्यीं 'दंड' यतींच्या करींच ऐकों ये ।
नर्तकनृत्यसमूहीं 'भेद', तसें 'जिंकणें' मनोविजयें !! ॥१०॥

पुष्पीं फळीं सतत वृक्षवनें प्रपूर्ण । एकत्र सिंह गज नांदति वैरहीन ॥
तैसेच पक्षिमृग राहति मित्रभावें । प्रीतिप्रमाण निज वृद्धचि होत जावें ११
नाना विहंगगण काननिं कूजतात । आनंदती हरिणवृंद अभीतिचित्त ॥
वाहातसे सुरभि शीतल मंद वात । गुंजारवांत अलिवृंद मरंद नेत ! १२ ॥
देती यथेच्छ मधुसद्रस वृक्षवेली । धेनूहि देति पय कांक्षित सर्व वेळीं ॥
संपन्न सस्यभरिं संतत भूमि झाली । त्रेतायुगा कृतयुगासम कीर्ति आली ! १३
जाणोनि भूप जगिं तो जगदात्म राम । रत्नांचिया खनि गिरी प्रकटी निकाम
सान्या नद्या वहति सुंदर वारिपूरीं । जें स्वादु शीतल सुनिर्मल सौख्यकारी
अब्धी समग्र परिरक्षिति आत्मवेला । रत्नें तटीं विखुरती, नर घेति ज्यांला
सारे तडाग भरले सरसीरुहांहीं । झाल्या प्रसन्न अतिमात्र दिशा दहाही ॥
श्रीरामराज्यिं घन वर्षति योग्यमानीं । देई रवी उन्हहि कांक्षियलें जनांनीं ॥
दे चंद्र शीतलपणाहि यथेच्छ लोकां । सत्कारणां उचित होय जगांत जो कां !

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुषविध्वंसने उत्तरकांडे श्रीरामराज्यवर्णनं नाम सप्तमस्तरङ्गः ॥

तरंग ८ वा

श्रीराम कोटि हयमेध करीत लोकीं । दानें द्विजां वितरिलीं गणना न ज्यां कीं,
जो रक्षितो श्रुतिपथा अतिधर्मशील।त्रैगुण्यपारग तसा हरिभोगलील ॥ १ ॥
राहे सदैव शुचि पत्यनुकूल सीता । जी शीलधाम सुषमाखनि सद्विनीता ॥
माहात्म्य जाणुनि कृपांबुधिचें अनन्त।सेवीत कान्तपदपंकज शुद्धचित्त ॥२॥
होते गृहांत जरि सेवक दासदासी । सेवेमधें निपुण सद्गुणरत्नराशि ॥
सेवा करी निजकरीं गृहिं ती स्वतांच । आज्ञापिलें रघुवरें परिसोनि साच ! ॥ ३
जेणें प्रकारिं सुख होय कृपाब्धिरामा । तैसेंच ती करितसे सुविनीत रामा ॥
ज्या सासवा सदनिं राघवमातृकादि । सेवीत त्यां जनकजा, अति वृत्ति साधी !
ना मान, ना मद तिला लवलेश चित्तीं । जी वंदिली विधिरमा-गिरिजादिकीं ती
जी कीं अनिन्दित सदा जगदंबिकाच।ती जानकी निजगृहीं करि कार्य साच!
पाहो अम्हांसि नित ही स्वकृपावलोकीं।ऐसें जिच्याविषयिं कांक्षिति देव ते कीं
श्रीरामपादकमलीं रममाण होती । सीता स्वभाव अपुला विसरूनियां ती ।
सेवीति बन्धु सगळे अनुकूल चित्तीं । श्रीरामपादरति वाढति नित्य होती ॥
पाहात राममुखपंकजि सावधान । 'सांगेल कां मजसि कांहिं कृपानिधान ! ?' ७
प्रीती करीत विभु बंधुवरीं सुरीतीं । नानाप्रकारिं शिकवीत तयांस नीति ॥
राहाति नागरिक लोकहि हर्षमग्न । त्यां देवदुर्लभहि भोग सुलभ्य पूर्ण ॥८॥
त्यांची अहर्निश मनीं विनती विधात्या।'श्रीरामचंद्रपदिं रे! रमुं दे अम्हां त्यां'
(श्रीरामराज्यसुखवर्णन-सद्रसाला । गाऊनियां कवनिं ' राम 'हि धन्य झाला !)

झाले पुत्र अतीव सुंदर असे सीतेप्रती दोन ते ।
ज्यां नामें लव आणखी कुश अशीं वेदीं पुराणीं नुतें ॥
दोघेही विजयी तसेच विनयी, जे सद्गुणां मंदिर ।
वाटे कीं प्रतिबिंबयुग्म विभुचें त्रैलोक्यि जें सुंदर ! ॥ १० ॥

सान्या भ्रात्यांप्रती झाले दोन दोन सुनन्दन ।
शीलरूपगुणांहीं जे होते अत्यंत शोभन ! ॥ ११ ॥

ज्ञानवागिन्द्रियातीत मायाचित्तगुणां पर ॥
अजन्मा सच्चिदानन्द दावी मानव्य सुंदर ॥१२॥

स्नानास जाय सरयूस विभु प्रभातीं । बैसे सभेंत सदय द्विजसाधुयुक्तीं ॥
सांगे वसिष्ठ मुनि वेदपुराणसार । सर्वज्ञही श्रवण राम करी उदार ॥१३॥
बंधूसमेत करि भोजन रामराय । मातांस होय सुख पाहुनि त्यां अमेय ॥
शत्रुघ्न आणि भरत प्रभुबंधु दोन । बागेंत जाति हनुमंतसमेत सुज्ञ ॥ १४॥
बैसोनि त्या पुसति ते रघुनाथगाथा । त्यां तो कथीत हनुमान् मतिमान् सुगीता
ऐकोनि ते विमल सद्गुण हृष्टचित्त । त्यातें फिरून फिरुनी पुसती विनीत १५
सान्यांचिया गृहिं गृहीं पढतीं पुराणें । श्रीरामचन्द्रचरितें भरलीं रसानें ॥
नारी तसे नर रघूत्तमकीर्ति गाती । ते नेणती सुखिं निशादिन केविं जाती ॥
अयोध्यापुरीवासियां सौख्यराशि । तशीं वैभवें लाभलीं जीं तयांसी ॥
न तीं वर्णु येतीं सहस्रांहि शेषां । रुचे यत्पुरी रामराया निवासा ! १७
श्रीनारदादि सनकादि मुनीश येती । देखावया मधुर कोसलरायमूर्ति ॥
साकेति जैं प्रतिदिनीं, बघतां पुरी ती । वैराग्यही विसरती मुनि ते स्वचित्तीं १८
सौवर्णरत्नखचिता नगराट्टमाला । गल्ल्या सुरंगि विविधा रुचिरा विशाला ॥
होता सुरम्य अति कोटहि भोंवताली । रंगी अनेक कठडे रचले सुशैली ॥१९॥
गेहें नवग्रह-मणीं खचितें अशीं तीं । शोभा धरीति अमरावतितुल्य-कान्ति ॥
रत्नांचिता विविधवर्णि गृहात भूमी । ज्या पाहुनी मुनिवरांतरिं मोहनोर्मी !
तीं शुभ्रधामशिखरें नभ चुंबणारीं । विद्योतती कलश सूर्यशशिप्रकारीं ॥
वातायनेंहि मणिरत्नि विराजतात । प्रत्येक गेहिं मणिदीप सुशोभतात ! ॥२१॥

माणिदीपांनीं शोभति भवनें विद्रुमखचिता द्वारविभा ।
स्तंभ हिऱ्यांचे विधि रचि जणुं हे कनकनीलमणिभित्तिस भा ॥
स्फटिकशिलायत रम्य अंगणें सुंदर-मंदिर-शोभन जीं ।
हेमकपाटें द्वारां द्वारां वज्रजडित जणुं बलपुंजी ! ॥२२॥

मनोहरा उत्तम चित्रशाला । गृहीं गृहीं शोभति ज्या विशाला ॥
रेखीयल्या रामचरित्रलीला । ज्या मोहवीती मुनिमंडलीला ! ॥ २३॥

सुमनवाटिका शोभना अती । सकल मंदिरीं अंगणीं किती ! ॥
विविध निर्मिल्या यत्नि सुंदर । सुखविती मना ज्या निरंतर ॥२४॥
बहुत जातिच्या ललित वल्लरी । अति मनोहरा पुष्पनिर्भरीं ॥
जणु वसंत त्यां वर्षहीभरी । सुखद साजिऱ्या ज्या परोपरीं ! ॥ २५॥

मधुर गुंजनीं भृंग रंगले । विविध वाहती वायु चांगले ॥
सतत मंद सद्गन्ध शीतळ । हृदयहारिता रम्य त्यांतिल ॥२६॥

पाळीयले खग मनोहर बाळकांनीं । ते कूजती मधुर, सुंदर बागडोनी ! ॥
ते हंस सारस कपोत तसे मयूर । शोभा वहाति भवनांप्रति अत्युदार॥२७॥
छाया बघून अपुल्याच मनोज्ञ लोल । सर्वत्र ते करिति कूजन नृत्यशील ॥
बाळें किती शिकविती शुकसारिकांना । 'श्रीरामराघवरघूत्तम !'शब्द नाना॥२८

राजद्वारा होय शोभा अतीव । सर्वोरीतीं वर्णणें शक्य नैव ॥
वीथीवाटा चोहटा चारुरूपा । बाजारांची योजनाही अमूपा ॥ २९ ॥

बाजारांचें वर्णन कैसें ? मूल्यावांचुनि वस्तु मिळे ।
रामनिवास प्रभु जेथींचा तेथिल लक्ष्मी कैसि कळे ? !
कुबेर जणुं ते तेथें बसले वणिक् सराफ व्यापारी ।
सुखी सकल सच्चरित मनोहर नारीनर शिशु म्हातारीं ! ॥३०॥

पुरीचिया उत्तरभागिं वाहे गंभीरतोया सरयू विनिर्मला ।
तीरास अत्यंत मनोज्ञ घाट बांधीयलेले नच पंक ज्या स्थला ! ॥३१॥
दूरावरीं रम्य विशाल घाट पाणी पिती जेथ गजाश्व-संघ ते ॥
पाणी पिण्याचेहि सुरम्य घाट स्नाना न कोणी नर आचरी तिथें ॥३२॥
तीरीं, तटीं पुष्कळ देवमंदिरें । सर्वत्र नेत्रोत्सवकारि सुंदरें ॥
सभोंवतीं पुष्पवनें मनोहरें । देखोनि आनंद हृदंबुजीं भरे ॥ ३३ ॥
कोठें कुठें श्रीसरयूसरित्तटीं । उदासि-संन्यासि-मुनीश-सत्कुटी ॥
जे ज्ञानसौख्यामधिं मग्न संतत । श्रीसच्चिदानन्दरघूत्तमीं रत ! ॥३४॥
सर्वत्र तीरीं मुनिवृंदिं लाविल्या । सुनीलवर्णा तुलसी विराजल्या ॥
सन्मंजरी गन्धवती विराजती । रामप्रिया तोषविती मनाप्रती ॥३५॥
ती राजधानीसुषमा न वानवे । बाहेरिं सौंदर्यहि हो नवें नवें ॥
तद्दर्शनेंही अघ तें उरेहि न । वापी तडागोपवनादि पावन ॥३६॥

तडाग वापी अनुपम सुंदर कूप मनोहर भव्य किती ।
निर्मल-जलयुत सोपानोद्भव शोभा मुनिंसिहि मोहवि ती ॥
अनेक रंगीं अरविंदें; खग कूजति गुंजति भृंगतती ।
रम्यारामीं पिकादि खग जणुं पथिकां निजरविं बोलविती ! ॥३७॥

राहे रमानायक जेथ भूपती । न कांति त्यांची वदवे यथार्थ ती ॥
सौख्यान्विता त्या अणिमादि संपदा । आल्या अयोध्येमधिं नांदण्या सदा ॥

जेथें तेथें करिती राघवगुणगान सर्वही जन ते ॥
बैसुनि परस्परांतें शिकवण देतां असेंचि ते म्हणते– ॥ ३९ ॥
"प्रणतप्रतिपाल जो करी । भजणें तो प्रभुराम अंतरीं ॥
अति शोभनशील सुंदर । सुगुणांचें जणुं भव्यमंदिर ! ॥४०॥
जलजायत–चारु–लोचन । प्रभु जो श्यामल, दुःखमोचन ॥
नयनां परिरक्षि पांपणी । रत तैसा निजदासरक्षणीं ॥ ४१ ॥
धृतबाण–मनोज्ञ–कार्मुक । धरि तूणीरहि भक्तरक्षक ॥
रणधीर, खलांसि संहरी । रवि तो सज्जन–पंकजा हरि ! ॥४२॥
जणुं काल अही भयानक । खगराजोपम त्यासि नाशक ॥
प्रभु राघव जो दयानिधि । ममता टाकुनि, ध्या मनामधीं ! ॥

जो लोभ-मोह-मृग-यूथ-किरात होय । कीं काम मत्त करि त्या हरिसाच काय ? ॥
वारी तमा रविच, संशयशोकरूपा।जो भक्तसौख्यद, न त्या तुलना अमूपा॥४४॥
जो घोर दानव-वना वणवाच नाशा । संसारभीतिहरणा प्रभुजानकीशा ॥
कां हो तुम्ही भजतसां न अशा दयाळा ? । सीतेसमेत विभुला भुवनैकपाळा ॥
आशाच ज्या विपुलसंख्य अनेक माशा।जो नाशकारि हिमराशिच त्यां अशेषां॥
स्वानन्दराशि अज जो अविनाशि होय।तो कां न हो भजतसां प्रभुरामराय ? ॥

मुनिमानसपूर्णरंजन । महिभाराप्रति जो विभंजन ॥
तुलसी–प्रभु तो रघूत्तम । भजतां कां न तुम्ही मनोरम ? ! ॥४७॥
[सकल-सन्मुनि-मानस-रंजना । अवनिभार-समग्र-विभंजना ॥
तुलसिदासविभू रघुनायका।हृदिं उदारतमा भजतां न कां ?" ४७]

ऐशापरी करीती नारीनरपौर रामगुणगान ॥
करुणानिधान राघव सर्वां दे सानुकूल अवधान ॥ ४८ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुषविध्वंसने उत्तरकांडे रामराज्यवर्णनं नामाष्टमस्तरङ्गः ॥

—★—

तरंग ९ वा

रामप्रतापरवि चंड निजप्रभेनें । जेव्हां जगीं उगवला कथिल्याप्रमाणें ॥
राहे प्रकाश भरुनी गरुडा! त्रिलोकीं।झाले सुखी बहुत; होतिहि कोणि शोकी!१॥
झाले सशोक अति, वर्णुनि सांगतों ते । अज्ञानरात्रि सरली प्रथम प्रभातें ॥
जेथें तिथें लपलिं सर्व उलूक-पापें । तीं क्रोधकामकुमुदें मिटलीं प्रतापें! २
कालस्वभावगुणकर्म चकोर जे हे । त्यांना कुठेंच न मिळे सुखलाभ पाहें ॥
जे मोह मान मद मत्सर चोर लाठे।उद्योग त्यांस उरला नच कांहिं कोठें! ३
सद्धर्मरूप महनीय सरोवरांत । विज्ञान-बोध-कमलें फुलली अनन्त ॥
संतोष सौख्य सुविवेक विराग कोक । झाले विशोक जगतीतलिं हे अनेक!
राम-प्रताप-रवि हा जर हृदयीं उत्तम प्रकाशतसे ।
मागाहुनचे वाढति, पहिले कथिले लयास जाति तसे! ॥ ५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे श्रीरामराज्यवर्णनं नाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

भ्रात्यांसमेत विभु राघव एकवार । संगें अतिप्रिय सुभक्त मरुत्कुमार ॥
उद्यान रम्य अति, जाति पहावयासी।जेथें तरूंसि नव पल्लव पुष्पराशि ॥१
तेथें बघून समया सनकादि येती । तेजोनिधानमुनि सद्‌गुणशीलमूर्ति ॥
जे ब्रह्मचिंतनिं निमग्न सदा प्रसन्न । जे बालसे दिसत, होत जरी पुराण २
ते चार भासति जणूं धृतमूर्ति वेद । निर्भेदमानस जयां समदृष्टि बोध ॥
आशाच ज्यां वसन, सद्व्यसनांत चित्त।श्रीरामकीर्तन जिथें श्रवणार्थ जात ३
ज्ञानी अगस्ति मुनि राहति जेथ, होते।गेले उमे! मुनिहि हे सनकादि तेथें
वर्णी कथा बहुपरीं मुनि राघवाची।ज्ञानाग्निनिर्मितिसि जी अरणीच साची!
येतां मुनींसि बघुनी अति हर्षिं राम । त्यांतें करीत विभु दंडवत प्रणाम ।
तो स्वागता पुसतसे सनकादिकांतें । त्यां बैसण्या पसरि पीतपट स्वहस्तें! ५

राहे रमानायक जेथ भूपती । न कांति त्यांची वंदवे यथार्थ ती ॥
सौख्यान्विता त्या अणिमादि संपदा । आल्या अयोध्येमधिं नांदण्या सदा !॥

जेथें तेथें करिती राघवगुणगान सर्वही जन ते ॥
बैसुनि परस्परांतें शिकवण देतां असेंचि ते म्हणते— ॥ ३९ ॥
"प्रणतप्रतिपाल जो करी । भजणें तो प्रभुराम अंतरीं ॥
अति शोभनशील सुंदर । सुगुणांचें जणुं भव्यमंदिर! ॥४०॥
जलजायत—चारु—लोचन । प्रभु जो श्यामल, दुःखमोचन ॥
नयनां परिरक्षि पापणी । रत तैसा निजदासरक्षणीं ॥ ४१ ॥
धृतबाण—मनोज्ञ—कार्मुक । धरि तूणीरहि भक्तरक्षक ॥
रणधीर, खलांसि संहरी । रवि तो सज्जन—पंकजा हरि! ॥४२॥
जणुं काल अही भयानक । खगराजोपम त्यासि नाशक ॥
प्रभु राघव जो दयानिधि । ममता टाकुनि, ध्या मनामधीं ! ॥

जो लोभ-मोह-मृग-यूथ-किरात होय । कीं काम मत्त करि त्या हरिसाच काय ? ॥
वारी तमा रविच, संशयशोकरूपा। जो भक्तसौख्यद, न त्या तुलना अमूपा॥४४॥
जो घोर दानव-वना वणवाच नाशा । संसारभीतिहरणा प्रभुजानकीशा ॥
कां हो तुम्ही भजतसां न अशा दयाळा ? । सीतेसमेत विभुला भुवनैकपाळा ॥
आशाच ज्या विपुलसंख्य अनेक माशा। जो नाशकारि हिमराशिच त्यां अशेषां॥
स्वानन्दराशि अज जो अविनाशि होय।तो कां न हो भजतसां प्रभुरामराय ? ॥

मुनिमानसपूर्णरंजन । महिभाराप्रति जो विभंजन ॥
तुलसी—प्रभु तो रघूत्तम । भजतां कां न तुम्ही मनोरम?!॥४७॥
[सकल-सन्मुनि-मानस-रंजना । अवनिभार-समग्र-विभंजना ॥
तुलसिदासविभू रघुनायका।हृदिं उदारतमा भजतां न कां?" ४७]

ऐशापरी करीती नारीनरपौर रामगुणगान ॥
करुणानिधान राघव सर्वां दे सानुकूल अवधान ॥ ४८ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे रामराज्यवर्णनं नामाष्टमस्तरङ्गः ॥

—★—

तरंग ९ वा

रामप्रतापरवि चंड निजप्रभेनें । जेव्हां जगीं उगवला कथिल्याप्रमाणें ॥
राहे प्रकाश भरुनी गगना ! त्रिलोकीं।झाले सुखी बहुत; होतिहि कोणि शोकी !! ॥
झाले सशोक अति, वर्णुनि सांगतों ते । अज्ञानरात्रि सरली प्रथम प्रभातें ॥
जेथें तिथें लपलिं सर्व उलूक-पापें । तीं क्रोधकामकुमुदें मिटलीं प्रतापें ! २
कालस्वभावगुणकर्म चकोर जे हे । त्यांना कुठेंच न मिळे सुखलाभ पाहें ॥
जे मोह मान मद मत्सर चोर लाठे।उद्योग त्यांस उरला नच कांहिं कोठें! ३
सद्धर्मरूप महनीय सरोवरांत । विज्ञान-बोध-कमलें फुलली अनन्त ॥
संतोष सौख्य सुविवेक विराग कोक । झाले विशोक जगतीतलिं हे अनेक !
राम-प्रताप-रवि हा जर हृदयीं उत्तम प्रकाशतसे ।
मागाहुनचे वाढति, पहिले कथिले ल्यास जाति तसे ! ॥ ५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे श्रीरामराज्यवर्णनं नाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

भ्रात्यांसमेत विभु राघव एकवार । संगें अतिप्रिय सुभक्त मरुत्कुमार ॥
उद्यान रम्य अति, जाति पहावयासी।जेथें तरूंसि नव पल्लव पुष्पराशि ॥१
तेथें बघून समया सनकादि येती । तेजोनिधानमुनि सद्गुणशीलमूर्ति ॥
जे ब्रह्मचिंतनिं निमग्न सदा प्रसन्न । जे बालसे दिसत, होत जरी पुराण २
ते चार भासति जणूं धृतमूर्ति वेद । निर्भेदमानस जयां समदृष्टि बोध ॥
आशाच ज्यां वसन, सद्व्यसनांत चित्त।श्रीरामकीर्तन जिथें श्रवणार्थ जात ३
ज्ञानी अगस्ति मुनि राहति जेथ, होते।गेले उमे ! मुनिहि हे सनकादि तेथें
वर्णी कथा बहुपरीं मुनि राघवाची। ज्ञानाग्निनिर्मितिसि जी अरणीच साची!
येतां मुनींसि बघुनी अति हर्षि राम । त्यांतें करीत विभु दंडवत प्रणाम ॥
तो स्वागता पुसतसे सनकादिकांतें । त्यां बैसण्या पसरि पीतपट स्वहस्तें ! ५

बंधू तिनीहि हनुमंत समेत त्यांतें । वंद्रीति सादरमनें सुखमग्न चित्तें ॥
पाहोनि रामसुषमा, उपमा न जीस । तल्लीन होति मुनि नावरत प्रहर्ष ।॥
सुश्यामगात्र सरसीरुहनेत्र राम । सौंदर्यमंदिर भवार्तिहर प्रकाम ॥
एकाग्र त्या मुनि विलोकति निर्निमेष।बद्धांजलि प्रभु तयां नमवीत शीर्ष ।७
श्रीराम पाहुनि दशा तशि त्या मुनींची।होई प्रहृष्टतनु, लोचनिं अश्रु सिंची
हातीं धरूनि मुनिना प्रभु बैसवीत । बोलेहि त्यां अति-मनोहर-वाग् विनीत
" ऐका ! मुनीश ! अजि मी अति धन्य होई।तुम्हांस पाहुनि त्याप्रति पाप जाई
भाग्यें अतीव मिळतो जगिं साधुसंग। जेणें प्रयासविण हो भवभीतिभंग ! ॥९॥

सत्संग हो मोक्षसुखप्रदाता । ये कामिसंगें भवकारि पंथा ॥
हें सांगती वेद तशीं पुराणें । सद्ग्रंथ शास्त्री. कवि वा शहाणे"॥१०॥
ऐकोनि वाक्य प्रभुचें मनोज्ञ । झाले मुनी चारिहि ते प्रसन्न ॥
स्तुती करीती प्रभुची सुरीतीं । रोमांचुनी हर्ष भरूनि चित्तीं—॥११॥

" जय भगवंता अनघ अनंता एक अनेका अनामया ।
जय करुणाकर जय गुणसागर जयजय निर्गुण सुखालया ॥
सौंदर्याकर अज शोभाकर जय धरणीधर रमावरा ।
अमान मानद अनादि निरुपम सुयश पावना मनोहरा ! ॥ १२ ॥
ज्ञाननिधाना विदित पुराणां श्रुतिवेद्या जय निरंजना ।
अनेकनामा सर्व अनामा सर्वगता मुनिरंजना ॥
तज्ज्ञ कृतज्ञा सर्वहृदिस्था अज्ञानाच्या भंजना ।
द्वंद्वविपद्भय-भवपाशादिक-काम-मदादिकगंजना ! ॥ १३ ॥

हृदयीं नित्य राहोनी रक्ष आम्हांस राघवा ! ॥
अनाथनाथा ! भक्तांचा तूंच आश्रय आघवा ॥ १४ ॥

परमानन्द हे रामा ! पूर्णकामा कृपाघना ।
निरंतरा प्रेमभक्ति दे प्रभो ! आमुच्या मना ॥ १५ ॥
रघुनाथा तुझी भक्ती दे अम्हां सुखवर्षिणी ।
नाशिनी भवतापाची त्रितापपरिकर्षिणी ॥ १६ ॥
प्रणतांचे काम पूर्ण करिशी रघुनंदना ! ॥
वाटशी सुरधेनू वा कल्पवृक्षचि सन्मना ! ॥ १७ ॥

प्रसन्न होउनी द्यावा वर जो आम्हि वांछिला ॥
त्वत्पाद-पंकज-प्रीती दे आम्हां नित्य निर्मळा ॥ १८ ॥
भववारिधि शोषाया अगस्ति रघुनायक ॥
सुलभ्य सर्वदा दासा समस्त-सुख-दायक ॥ १९ ॥
मनाचीं आमुचीं दुःखें दारुणें कर दारण ॥
दीनबंधो ! अम्हां द्यावी समता दुःखवारण ॥ २० ॥
ईर्ष्या-त्रास-दुराशांचें करिशी तूं निवारण ॥
विवेकाविरती यांतें विनयालेंहि पोषुन ॥ २१ ॥
धरणीमंडना रामा धरानाथ-शिरोमणे ! ॥
भवनौका तुझी भक्ती दे आम्हां हेंच मागणें ! ॥ २२ ॥
मुनि-हृन्मानसींचा तूं हंस होसि निरंतर ॥
तुझिया पदपद्मालें वंदिती विधि शंकर ॥ २३ ॥
केतु जो रघुवंशाचा सेतु सच्छ्रुति-रक्षक ॥
काल-कर्म-स्वभावांचा गुणांचा पूर्ण-भक्षक ॥ २४ ॥
सर्व-दोष-हर-स्वामी तारकांचाहि तारण ॥
प्रभू तुलसिदासाचा त्रैलोक्यास विभूषण" ॥ २५ ॥

प्रेमें स्तुती करुनि उत्तम राघवाची । श्रीरामपादकमलीं नमनेंहि साचीं ॥
ते ब्रह्मलोकिं सनकादि मुनीश जाती । लाभोनि इष्टवर जो प्रभु दे सुचित्तीं २६

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे सनकादिस्तुतिर्नाम दशमस्तरङ्गः ॥

—:○:*:○:—

तरंग ११ वा

गेल्यावरी ब्रह्मलोका सनकादि मुनीश्वर ॥
बंधू ते ठेविती माथा श्रीरामचरणांवर ॥ १ ॥
प्रभूलागीं पुसायातें सारे संकोचती मनीं ॥
बघती हनुमतातें चित्तीं सोत्कंठ होउनी ॥ २ ॥

तृष्णा त्यां ऐकण्या वाणी श्रीराममुखवासिनी ॥
ओंपपेया सुधाधारा सकलभ्रमनाशिनी ॥ ३ ॥
अंतर्यामी प्रभू राम सकलान्तर जाणता ॥
सांगे "विचार जें वाटे विचारावें हनूमता !" ॥ ४ ॥
जोडोनि हस्त वदला तेधवां वायुनंदन ॥
"भगवन् ! करुणाशीला आयका मी निवेदिन ॥ ५ ॥
हे नाथ ! भरता वाटे पुसावें कांहिं आपणां ॥
पुसावया प्रभूलागीं संकोच परि तन्मना" ॥ ६ ॥
बोले राम "तुला ठावा मत्स्वभाव मरुत्सुता ! ॥
भरता–मारुतियांमध्यें नाहीं अंतर तत्त्वतां" ॥ ७ ॥
प्रभूक्ति ऐकुनी बोले रामा भरत वंदुनी– ॥
"प्रणतार्तिहरा नाथा ! ऐका सांगेन जें मनीं ॥ ८ ॥

शंका नसेचि मम नाथ ! मनांत कांहीं । स्वप्नींहि शोक अथवा मज मोह नाहीं
ही होय केवळ कृपा तुमची प्रसन्ना । आनंद-दोह-निपुणा करुणानिधाना! ॥९॥
मी धाष्ट्यं हें करुनि बोलतसें दयाळा । मी दास, सौख्यद तुम्ही सकलां जनांला॥
संतांस गात बहु वेदपुराणवाणी । त्यांचे अनन्तगुण संस्तविले बुधांनी ॥१०॥
संतांवरी प्रभुहृदीं अधिकाचि भक्ति । गातां तुम्हीहि किति सज्जनसाधुकीर्ति ॥
ज्ञानी विचक्षण तुम्ही,तुमच्या मुखाब्जीं । वर्णून संत शुभलक्षण ऐकवा जी !११
सांगा विभेद मज संत–असंत यांत । जें कीं कळेल मज उत्तमरीतिं नाथ!" ॥
श्रीराम सांगति "सख्या ! परिसें वदेन । जीं लक्षणें दिसति संत जनांत पूर्ण ॥१२
गाईयलीं श्रुतिपुराणिं अनन्त गा ! तीं । आहेत सज्जनमनां अति सौख्यदाती ॥
ऐशी असे करणि संतअसंत यांची । जैशी कुठार, तरु चंदन या द्वयाची॥१३॥
बंधो ! पहा मलयजास कुठार कापी । देई कुठारमुखिं गंधचि तें तथापि ॥
श्रीखंड यास्तव जगत्प्रिय होउनीयां । देवांचियाहि चढतें शिरिं तें गुणें या !॥
लाभे कुठार परि दंडन अग्निदाहें । त्याच्या मुखीं पडति घाव घणें पहा हें ! ॥
जे संत ते विषयलंपट नैव होती । सच्छीलसद्गुणमयी जणु मंदिरें तीं ! ॥१५॥
होतात दुःखित मनीं पर दुःखि होतां । होती सुखीहि परसौख्य तसें पहातां ॥
जे कीं अजातरिपु नित्य समस्वभाव । वैराग्यशील हृदिं ज्यां न मदास ठाव ॥

नोहे अमर्ष नच हर्ष न क्षोभ चित्तीं। दीनीं दयाळु अति कोमलचित्तवृत्ति ॥
त्यागी सदा अभय निष्कपटी मनाचे। जे कायवाङ्मनर्षि भक्त मदीय साचे ॥
सर्वांसि मानद अमान परि स्वतां जे। प्राणांसमान भरता! प्रिय तेच माझे ॥
निष्काम ते मम परायण गोड नामीं। वैराग्य-शांति-विनयादिक चित्तधामीं ॥
चित्तीं प्रसन्न ऋजु शीतल मित्रवृत्ति। यत्प्रीति विप्रचरणांबुजिं भव्यकर्ती ॥
जे धर्मपोष करिती जननीसमान। हीं लक्षणें वसति त्यांप्रति संत मान ॥१९॥
ज्यांचा अचंचलपणा नियमादिकांत। नीतीमधें शमदमादिगुणीं नितान्त ॥
ते संत संतत असें हृदिं तत्त्व आणीं। केव्हांहि जे परुष नुच्चरतीच वाणी ॥२०
निंदा स्तुती उभयही सम ज्यांस चित्तीं। माझ्या पदाब्जयुगलीं अनिवारभक्ति ॥
ते सौख्यराशि गुणमंदिर संत होती। प्राणांहुनीहि मजला प्रिय हर्षमूर्ति ॥२१॥

असंतांचें तुला आतां सांगतों ऐक लक्षण ॥
कधींही ना असावी रे! तयांची संगति क्षण! ॥ २२ ॥
खळांचा संग व्हायाचा सदा दुःखासि कारण ॥
उनाड गाइच्या संगें कपिले दुःख दारुण ॥ २३ ॥
खळांच्याच विशेषत्वें अतिताप मनीं वसे ॥
देखोनि परसंपत्ति जळती खलमानसें ॥ २४ ॥
जर कोठें पडे कर्णीं परनिंदा तयांचिया ॥
अति हर्षित ते होती जणों श्रीलाभ तो तयां! ॥ २५ ॥
कामक्रोधमदीं लोभीं खलांचें मग्न तें मन ॥
कपटी कुटिलप्राय पापी निर्दय दुर्जन ॥ २६ ॥
वैरी अकारण तसे खल ते सकलांप्रत ॥
करिती अहिता त्यांच्या ज्यांनीं केलें असे हित ॥ २७ ॥
खाणें सर्व लबाडीचें चावणेंही लबाडि कीं ॥
खळांचें सर्वही खोटें देणें घेणें ठकाठकी! ॥ २८ ॥
बोलती मधुरा वाणी मयूरापरि दुर्जन ॥
महासर्पेहि खाण्याचें काठिन्य हृदयीं पण ॥ २९ ॥
परद्रोही जार चोर परनिंदापरायण ॥
नीच पापी नर जरी मूर्त राक्षस ते म्हण! ॥ ३० ॥

लोमेंच सर्व दिशि जे परिवेष्टिलेले । ज्यां लोभ तो शयन, लोभच वस्त्र त्यांलें ॥
जे कामभोगपर नीच सुखांत मग्न । वाटेचि लाज नरकासहि ज्यां बघून ! ॥
ऐके जर श्रवणिं अन्यनरप्रशंसा । ये कांपरें भरुनि त्या ज्वरही नृशंसा ! ॥
पाहे जरी नयनिं तो विपदा कुणाची । होई सुखी जणुं जगन्नृपतित्व येचि ! ॥
स्वार्थांत जे रत सदा परिवाररोधी । जे कामलोभरत कोपविशेषबुद्धि ॥
माता पिता गुरुजन द्विज मान्य ज्यां न । जाती बुडून, दुसऱ्यांसहि बूडवून ! ॥
मोहान्ध होउनि करीति दुज्यांशिं वैर । सत्संगती, हरिकथारति यांशिं दूर ! ॥
जे दुर्गुणाब्धि मतिमंद अतीव कामी । वेदांस दूषक लुबाडति अन्यलक्ष्मी ॥
देवां-द्विजांवरि विशेषचि वैरवृत्ति । चित्तांत दंभकपटादिक पूर्ण होती ॥
बाहेरुनी धरति सर्व परीं सुवेष । ऐसे जगा फसविती खल हे विशेष ॥३५॥

कृतयुगिं खल हे नसती त्रेतायुगिंही नराधम असे ना ॥
द्वापरिं थोडे तुरळक कलियुगिं रे ! सकल भरलि खलसेना ! ॥३६॥

बंधो ! परोपकृतितुल्य नसेचि धर्म । ना अन्यपीडनसमान अधर्मकर्म ॥
सिद्धान्त हा सकलवेदपुराणसार । मीही कथीं बुधहि सांगति हा विचार ॥
पावोनिही नरतनू करि अन्यपीडा । सोसावि लागति भवार्ति तया दुवाडा
पापें असंख्य नर मोहभरें करीत । स्वार्थान्ध त्यास परलोकहि नष्ट होत ३८
मी काळरूप भरता ! सकलां तयांसी । देई शुभाशुभफलें कृति होय जैशी ॥
जाणोनि हें परम पंडित जे जगांत । दुःखाप्रती चुकविती, मम कीर्ति गात ॥
कर्में त्यजून शुभ वा अशुभें समग्र । मद्भक्त होति नर देव मुनी उदार ॥
वर्णीयले तुजसि संतअसंत मीं हे । हें ठेवितां मनिं, नरा भवताप नोहे ॥४०॥
हे तात ! ऐक गुणदोष अनेक होती । मायाच निर्मित तयांप्रति एकली ती ॥
दोषां गुणां उभय ना बघणें विवेक । दोषां गुणांस बघणें अविवेक, देख !"
श्रीमुखीं गाइल्या, ऐकिल्या बंधुंनीं । उक्ति तैं हर्ष हो थोर त्यांच्या मनीं ॥
तो किती संस्तवी राघवा मारुती । चित्तिं मावे न जो हर्ष झाला अती ४२
त्यावरी ये प्रभू आपुल्या मंदिरीं । नित्य त्यांची अशी चालली माधुरी ॥
(धन्य ते भक्त जे राघवासंगतीं । चित्त हें धांवतें त्यांचिया पंगतीं) ! ॥ ४३॥

वारंवार मुनीश्वर येत अयोध्येंत नारद पुनीत ॥
रामचरित्रें गाउनि हर्षानन्दासि पूर आणीत ॥ ४४ ॥

नारदमुनि अवलोकी नित्यनवें चरित रामरायाचें ॥
वर्णन करि आवडिनें येउनियां ब्रह्मलोकिं तें साचें ॥ ४५ ॥
ऐके विरिंचि आवडिं रामकथा अमित तींत सुख मानी ।
सांगे " पुनःपुन्हां गा ! आम्हांतें रमिव रामगुणगानीं " ४६
सनकादिक मुनि तेव्हां नारदमुनितें प्रशंसिति-किती तें ! ॥
ब्रह्मानन्दरसामधिं करिते जरि ते सदा रत मतीतें ॥ ४७ ॥

ऐकोन गाना मुनिच्या मनोरमा । समाधिसौख्या विसरीति उत्तमा ॥
अत्यादरें ऐकति रामसद्यशा । प्रतिक्षणीं जें नव देइ सौरसा ! ॥ ४८ ॥
ब्रह्मज्ञानी मुक्तही ऐकतीच । सोडोनीही ध्यानसौख्यास साच ॥
श्रीरामाच्या सत्कथा, गोड ज्यां न । पाषाणांचीं तन्मनें होत पूर्ण ! ॥ ४९ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे कलिकलुषविध्वंसने
उत्तरकांडे साध्वसाधुलक्षणवर्णनं नामैकादशस्तरङ्गः ॥

तरंग १२ वा

एका दिनीं रघुवरें जन बोलवीले । सद्विप्र पौरगण तेविं वसिष्ठ आले ॥
आले समेत मुनि सज्जन बैसलेले। भक्तार्तिनाशन विभू वच त्या म्हणाले १
"ऐका समस्त जन हो ! वदणार तें मी। नाहींच यांत ममता मम चित्तधामीं
नाहीं अनीति लवही नच थोरवी वा। ऐका, करा, जर तुम्हां रुचलें स्वभावा
तो होय सेवक मला प्रिय सर्व लोकीं। वर्तेल मानुनि निदेश मदीय जो कीं ॥
सांगेन मी जर तुम्हां लवही अनीति। मातेंहि वर्ज्य समजा, गणुनी न भीति
सद्भाग्य थोर म्हणुनी नरजन्म पावे । देवांहि दुर्लभ असें मुनिवर्यि गावें ॥
तो मोक्षमार्गकर साधनधाम ऐसा। पावोनि जो करित ना परलोकपोषा-४॥
तो दुःख पावत अतीव परत्र लोकीं। पस्तावुनी शिर सकंप सभीत हो कीं ॥
देई उगाच मग तो सकलांस दोष । कालास कर्मगतितें प्रभु ईश्वरास ॥५॥
हा देह नाहिं जन हो ! विषयोपभोगा। हो स्वर्गही लघुच, ने मग दुःखसंगा
पावोनियां नृतनु जो विषयांत सक्त। टाकोनियां अमृत तो विष मूर्ख घेत॥

टाकोनियां परिस जें करिं गुंज घेणें । त्याला भलें कवण हो म्हणणार नेणें !
चौऱ्यांशि लक्ष जगिं आकरिं चारि योनी ।हा जीव त्यांत अविनाशि फिरे भ्रमोनी
त्यातें असें भ्रमवितें जगिं ईशमाया । काल स्वभाव गुण कर्महि घेरिती या ॥
देई अहेतु करुणा करणार ईश । त्यातें असा मनुजदेह कृपाविशेष ॥८॥
नौकाच हो नरतनू भववारिधींत । माझा अनुग्रह तिला अनुकूल वात ॥
हो कर्णधार दृढ सद्गुरुराय नावे । हें सर्व दुर्लभ परी सहजींहि पावे !!! ॥९॥
साहित्य संच मिळुनीहि असा उदार । जाईल जो नच भवाब्धि तरून पार ॥
तो आत्मघातकि कृतघ्न विमूढबुद्धि । त्यांच्याच तो गतिसि केवळ अंतिं साधी !

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकाण्डे श्रीरामगीतावर्णनं नाम द्वादशस्तरङ्गः ॥

तरंग १३ वा

"देथेंहि अंतिंहि तुम्हां जर सौख्य व्हावें । ऐकोनि वाक्य दृढ तें हृदयीं धरावें
सोपी सुखावह अहो ! जगिं वाट हीच । भक्ती मदीय निगमागममान्य साच १
जो ज्ञानमार्ग बहुविघ्न अगम्य भारी । दुःसाध्य, आश्रय मना नच हो समोरीं ॥
कष्टेंकरून कवणा जर कीं मिळाला । भक्तीविना मजसि तो प्रिय नैव झाला ! २
भक्ति स्वतंत्रचि अनंत सुखप्रदाती । सत्संगतीविण कुणा नच लाभते ती ॥
ना पुण्यराशिविण लाभति लोकिं संत। सत्संगती करित संसृतिलागिं अंत ! ॥ ३
हें एक पुण्य जगिं; होय असें न अन्य । वाकायचित्तिं भजणें द्विजपाद धन्य ॥
होतात देवमुनि त्यासचि सानुकूल । जो ब्राह्मणां अति विशुद्धमनें भजेल ॥४॥
आणीकही सकळिकां कर जोडुनीयां । सांगेन या परमगुप्तमता मदीया ॥
गौरीश-सेवनविना शुचि भक्ति माझी । कोणा नरास कधिं लभ्य न व्हायची जी
बोला जि ! भक्तिपथिं कोण तरी प्रयास ? !॥ ना योग, याग, तप, मंत्रजपोपवास!
साधें ऋजू मन, नसे कुटिलत्व ज्यांत । संतोष संतत, मिळेल तयांत शांत॥६॥
सांगेन दास मम, आस वृथा नराची । विश्वास योग्य मज यामधिं मात कैंची?
सांगूं कशास बहु वादवुनी कथा ही । मी या शुभाचरणिं वश्य जनांसि होई७

ज्या वैर विग्रह नसे भय वा न आस । त्यान्या दिशाचि सुखमयचि कीं तयास ॥
संकल्पशून्य अनिकेत तसा अमानी । विज्ञानयुक्त अतिदक्ष असा गुणांनीं ॥८॥
अक्रोध नित्यरत सज्जनसंगतींत । स्वर्गापवर्गहि तया तृणतुल्य होत ॥
जो भक्तिपक्ष धरि निश्चयिं अच्छलानें । दुस्तर्कशून्य, अघलेशहि ज्या न माने ९
माझ्या गुणानुवादीं ममतामदमोहशून्य जे रमती ॥
ठावें सुख त्यांचें त्यां, परमानन्दा वदूं शके न मति ! ” ॥१०॥
ऐकोनि रामवच मूर्त सुधाच जैसें । सारे कृपानिधिपदीं नमवीति शीर्षें—
“ मातापिता गुरुजि बंधु तुम्ही अम्हांला।प्राणांसमान दयित प्रभुवर्य !झालां
तुम्हीच सर्वपरिंनीं प्रणतार्तिहारी । हे देह गेह धन रामाचि भव्यकारी ॥
तुम्हांविना कवण हें शिकवील आम्हां।स्वार्थीच तात–जननी जगतांत रामा!
निःस्वार्थि दोनचि खरे सकलोपकर्ते ।तुम्ही तसे भजक जे तुमचे विभो ! ते
स्वार्थीच मैत्रि जगतामधिं हो सकाम । स्वप्नांमधेंहि परमार्थ नसेचि राम!”
तें प्रेमपूर्णवच ऐकुनियां जनांचें । हर्षें भरोनि जणुं राघवचित्त नाचे ! ॥
जाती गृहासि मग रामनिदेशिं सारे।वाखाणित प्रभुवचें सकलप्रकारें ॥१४॥
उमे ! अयोध्यापुरवासि होती । कृतार्थ नारीनर सर्वरीतीं ॥
कीं सच्चिदानन्दघनस्वरूप । श्रीराम जो ब्रह्म तदीय भूप ॥ १५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे श्रीरामगीताप्रजोपदेशवर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

तरंग १४ वा

एका प्रसंगिं मुनिवर्य वसिष्ठ येती । जेथें निवासि सुखसागर राममूर्ति ॥
अत्यादरें रघुवरें नमिलें मुनीतें । प्रक्षाळुनी चरण राघव सेवि तीर्थें ॥ १ ॥
“ऐकाजि ! राम ! ” वदले मुनि बद्धपाणि ।“बोलेन कांहिं करुणाकर मी स्ववाणीं
जों जों वदे तुमाचिया चरिता सुचित्रा । माझ्या हृदीं भरत मोह विभो ! पवित्रा ॥
वेदांसिही न कळतो महिमा अनन्त । मी तो कसा वदुं शकेन जि! विश्वनाथ !॥
मी तों पुरोहित करीं अतिमंद कर्म । जो कीं श्रुतिस्मृतिपुराणिं निषिद्ध धर्म ॥२॥

मी तें अमान्य करि, तों विधि सांगि मातें ।"होईल लाभ पुढतीं तुज याचि पंथें॥
जें ब्रह्म तत्त्व परम प्रभु रामरूप । होणार राघवकुलीं अवतीर्ण भूप " ॥४॥
तेव्हां मदीय हृदयीं सुविचार ये कीं । ज्यासाठिं योग मख सद्व्रत दान लोकीं ॥
होणार तोच वर लभ्य मला अशानें । ना धर्म अन्य मज होइल याप्रमाणें!॥५॥
जीं वेदशास्त्रविहितें निजधर्मकर्में । नाना तपें नियम सद्व्रत–मंत्रमर्में ॥
तें ज्ञान तीर्थजलमज्जन दान शील । तैसे दयादि गुण सज्जन ज्यांस लोल ॥६॥
ज्यासाठिं हीं कथित, ज्यास्तव वेद सेव्य । शास्त्रादि पावनपुराणकथादि भव्य॥
सर्वांस हेंच फल कीं, प्रभुभक्ति व्हावी । त्वत्पादपंकजिं रती मतिची असावी ! ॥
जाईल काय मळ वस्त्र धुतां मळानें?। पावेल काय घृत मंथियल्या जळानें ! ॥
सत्प्रेमभक्तिसलिलाविण रामराय!। अंतर्गता कलुषिता कधिंही न जाय !॥८॥
सर्वज्ञ तो, तज्ज्ञहि तोच पंडित । तो ज्ञानराशी गुणवान् अखंडित ॥
तो दक्ष, तो लक्षणपुण्यमंडित । ज्याची रती त्वत्पदपद्म धुंडित ! ॥९॥
हे नाथ! एक वर मागतसें तुम्हांला । द्याजी! कृपा करुनि तो मजला दयाळा!॥
व्हावें निमग्न तुमच्या पदपद्मि हें मीं । न न्यून भाव कधिं हो लव जन्मिजन्मीं!"
सांगोनि हें मुनि वसिष्ठ गृहासि येती । झाली रघूत्तममती अति सौख्यवृत्ति ॥
घेऊनि संगिं हनुमान् भरतादि बंधू ।श्रीराम तैं निघत सेवकसौख्यसिंधु ॥११॥
येई कृपालु नगरांतुनि दूरमार्गीं । तेथेंच मागवि करी रथ अश्व वेगीं ॥
पाहोनि त्यां सकृप वानित सर्व रातीं । त्यांना दिली उचित देणगि जी हवी ती॥
हो भ्रांत राम सकलश्रम नाशणारे । ते आंबराइमधिं शीतल जाति सारे ॥
देई तदा भरत त्यां बसण्या स्ववास । बैसे प्रभू, सकल सेविति ते तयास ॥१३॥
श्रीमारुति व्यजनिं मारुत त्यांस घाली । रोमांचुनी तनु विलोचन अश्रुशाली ॥
नोहेचि मारुतिसमान कुणीच धन्य । जो रामपादकमलीं रमला अनन्य ! ॥
प्रीती अतीव तशि थोर तदीय सेवा । श्रीरामहि स्तवित मानुनि त्या सुभावा ॥
दैवी असा नच दिसे हनुमत्समान । हे गौरि! ज्यास विभुसत्तम देत मान ! ॥
ये त्याच कालीं मुनिवर्यनारद । हातांत वीणा मधुरा सुखप्रद ॥
गाई प्रभूची स्तुतिकीर्ति सुंदरी । जियेमधें नित्य नवीन माधुरी !! १६
"हे पंकजाक्ष! अवलोक मला कृपाळा । हे शोकमोचनविभो! करुणार्द्रशीला!
हे नीलतामरससुंदर मेघरंगा । श्रीशंमुहृत्कमलचारुमरंदभृंगा !॥ १७ ॥

हे सर्व राक्षसगणांस विदारणार । तूं रंजवीशि मुनिसज्जनवृंद थोर ॥
सद्विप्रसस्य–नव–पोषक मेघ ऐसा । दीनावनक्षम ! अनाथजनाभयाशा ! १८
खंडीशि तूं भुजबलें खलवृंदभार ! तेजें विराध–खर–दूषण नाशणार ॥
तूं रावणारि अघनाशन सौख्यरूप । हे राम ! तूं दशरथोत्तमवंशदीप ! ॥१९॥
सत्कीर्तिधाम निगमागमगीतनाम । ज्या देव सज्जन मुनीश्वर संगकाम ॥
देवा पुराणविदिता ! करुणांतरा रे ! । अज्ञान–गर्व निवटीशि भल्या प्रकारें ॥
तूं सद्गुणी कुशल कोशल–चारुभूषा । तूं नाशिसी कलिमला, ममताविनाशा ॥
हे राघवा ! प्रणतपालन सत्त्वभावा । रामा अहो ! तुलसिदासमनास पावा !"॥

सप्रेम नारदमुनी वर्णुनियां राम–सद्गुणग्राम ॥
सौंदर्य–सिंधु तो हृदि सांठवुनी जाय, जेथ विधिधाम ॥२२॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' कलिकलुषविध्वंसने उत्तरकाण्डे ससमाज–श्रीरामपरमधामगमनं नाम चतुर्दशस्तरङ्गः ॥

तरंग १५ वा

वर्णीयली परिस गौरि ! तुला कथा ही । रम्या यथामति विशुद्धरसप्रवाही ॥
आहे अपार शतकोटि रमेशगाथा । ना शारदा श्रुतिहि गानिं जिव्हा समर्था॥
आहे अनन्तगुणराम अनन्तमूर्ति । तज्जन्मकर्महि अनन्त अनन्तकीर्ति ॥
होतील गण्य अवनीरज अब्धिबिंदू । श्रीरामचंद्रचरितालि अपारसिंधू ॥२॥
ही सत्कथा हरिपदासि हेतु होय । देईल भक्ति हरिची जिस ना अपाय ॥
सांगीतली तुजसि ही अति पावनी म्यां । जी त्या कथीत गरुडास भुशुंडि रम्या
मीं वर्णिली लवचि राघवकीर्ति तूंतें । आतां भवानि ! वद काय तुला कथूं तें"
ऐकोनि राघवकथा अति हृष्ट गौरी । बोले विनीत अति मंजुळ वाक्यसारीं–४
"मी धन्य धन्य अति धन्य विभो ! जहालें । श्रीरामसद्गुण भवापह ऐकियेले ॥
झाल्यें कृतार्थ ! मम सर्वविमोह जाय । केली कृपा मज कृपायतना ! अमेय॥५॥
आनन्दचिन्मय रघूत्तम जो तयाचा । जाणें प्रताप भगवन् ! अति रम्य साचा
देई मुखेन्दु तुमचा अमृतात्म धारा । म्यां सेविली श्रुतिपुटीं सुकथा उदारा ! ६

माधुर्यपूर्ण रघुवीर–चरित्रपान । संतृप्तता मम मना नच दे अजून !! ॥
संतृप्त रामचरिता परिसोनि होती । त्यांना विशेष रस ना कळलाच चित्तीं ! ७

जीवन्मुक्तहि मुनिवर करिति निरंतर यशःश्रवण हरिचें ॥
तृप्ति न होई त्यांना परिसुनि गुणगान तें परोपरिचें ! ॥ ८ ॥
वाटे जर कां चित्तीं भवाब्धितें या तरूनियां जावें ॥
वेगिं चढावें सुखमय सुदृढ श्रीरामचरित या नावें ! ॥ ९ ॥
विषयी नारीनर जे त्यांसहि हें श्रवणरम्य हरिगान ॥
अतिशय सुखवी हृदयीं अमृतहि गमतें उणेंच उपमान ! ॥ १० ॥

आहे असा श्रवणवन्त जगात कोण । संतोष ज्यास रघुनाथचरित्रिं हो न ? ॥
ज्यांना रघूत्तमकथा गमतें असार । ते आत्मघाति जडजीव अभागि थोर ! ११

श्रीरामचरितमानस गाइयलें तुम्हिं मला मधुरवाणी ॥
ऐकुनि तें मजसि गमे लाभलि मजला अनन्त सुखखाणी !!!॥१२
आपण मज सांगितलें— सुंदर ही रामचंद्रचरितकथा ॥
काकभुशुंडी गाउनि गरुडातें ऐकवीत पुण्यपथा ॥ १३ ॥

तें ज्ञानविज्ञान विरक्ति उत्तम । प्रेमा असा रामयशीं मनोरम ॥
भक्ती दृढा रामपदांबुजावरी । कैसा बरें वायसदेह त्या परी ?! ॥ १४ ॥

ऐका विभो ! दशशतांमधिं होय एक । धर्मव्रती मनुज ज्या रति धर्मि नीक ॥
ऐशाहि कोटि· धिं एकच कोणि होई । ज्याला विरक्ति विषयांत अतीव राही १५
ऐशा विरक्तजनकोटिंत एक होय । ज्ञानें जया वरियलें सहजींच काय ? ! ॥
ज्ञान्यांचिया बहुतकोटिंमधें विराजे । जो मुक्त याच जगतींत जिवंत गाजे ! १६
ऐशा सहस्रमितिं, दुर्लभ सौख्यखाणी । जो ब्रह्मलीन मतिमान् सुविवेकि कोणी!
ज्ञानी विरक्त अति, आणिक धर्मलोल । जो ब्रह्मनिष्ठ शुचि जीवनमुक्तिशील १७
ऐसा सुदुर्मिळचि मानव देवराया ! । जो रामभक्तिरत, मोहि न ज्यास माया !
त्या वायसास अशि भक्ति कशी मिळाली!हे विश्वनाथ! कथणें तुम्हिं भाग्यशाली
जो ज्ञानशीलगुणमंदिर बुद्धिशाली । श्रीरामभक्तिमधिं यन्मति मग्न झाली ॥
त्याला कशास्तव जि ! वायसदेह आला!हे नाथ हो ! मज कथा करुनी दयेला १९
कागास त्या प्रभुचरित्र पवित्र ऐसें । कैसें बरें मिळत तें कथणें विशेषें ॥
कामनाशन ! तुम्हां तरि केविं लब्ध । सांगा जि ! कौतुक मनीं मज हें विशुद्ध

ज्ञानी महान् गरुड सद्गुणशीलराशि । श्रीविष्णुभक्त हरिपाशिं निवास त्यासी ॥
तो कां बरें विमल, वायससंगि जात । ऐकावया मुनिजना वगळूनि, नाथ! २१
संवाद तो शुभ वदा मजलागिं सांग । दोनीहि भक्त हरिचे खगराज, काग" ॥
गौरीगिरा परिसुनी सरला रसाळा । झाले प्रसन्न शिव बोलति ते प्रियेला ॥२२॥
"तूं धन्य धन्य गिरिजे ! मति पुण्य तूझी । श्रीरामपादकमलीं दृढभक्ति हे जी ॥
हा पुण्य चारु गिरिजे ! इतिहास ऐक।नाशीत जो परिसतां भ्रम आणि शोक २३
विश्वास थोर उपजे प्रभुपादकंजीं । जाई तरूनि नर अश्रमिं संसृती जी ! ॥
प्रश्नालि हीच गरुडें पुसियेलि कागा । जाऊनि त्याजवळ सादर पुण्यभागा २४

जें त्यानें कथिलें सारें गरुडाप्रति उत्तम ।
ऐक गे ! आदरें गौरि ! कथितों तें मनोरम ॥ २५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकाडे भक्तिभूमिकावर्णनं नाम पञ्चदशस्तरङ्गः ॥

तरंग १६ वा

"मीं जेविं ऐकिलि कथा भवमोचना ही ।तो मी प्रसंग कथितों तुज पुण्यवाही
हो दक्षगेहिं तव गे! प्रथमावतार । तेव्हां 'सती' तुजसि नाम असे उदार१
जैं दक्षयज्ञिं अपमान तुझा जहाला।क्रोधें तुवां त्यजियलें निजजीविताला ॥
विध्वंसिलें अनुचरें मम तैं मखातें।तूं जाणतेस गिरिजे ! सकला कथा ते ! २
झालों प्रिये ! तव वियोगिं अतीव आर्त । गेलें बुडोनि अतिशोकिं मदीय चित्त
मी कौतुकें बघत तैं फिरलों विराग।रम्यें वनें गिरि नद्या सुभगे ! तडाग ॥३
आहे सुमेरुगिरिच्या बहु उत्तरेस । जो नीलपर्वत अनुत्तम कांतिपोष ॥
आहेत त्यास शिखरें अति रम्य चार । जीं पाहतां मम मना सुखवीति फार
एकेक वृक्ष वरिं साजत त्यां विशाल।अश्वत्थ, आम्र, वट, पाकळ पुण्यमूल॥
शैलावरी सर मनोहर एक साजे । सोपान ज्या सुमणि मोहविती मना जे५
ज्यामाजिं शीत अतिनिर्मळ गोड वारि । पद्में विराजति मनोहररंग सारीं ॥
हंसालि कूजन करीति मधुस्वरानें । गातीहि भृंगतति मंजुल तेथ गानें ! ॥६॥

त्या रम्य शैलिं करि वास विहंग तोही।कल्पांतिंही नच तयाप्रति नाश होई॥
मायाविनिर्मित जगीं गुणदोष कैक । जे मोहकाममय ज्यांत नसे विवेक॥७॥
व्यापीति सर्व जगता जरि हे समस्त।ना ते गिरीजवळि त्या कधिं काळिं जात
तो काक तेथ वसुनी भजतो हरीस । कैशाप्रकारिं गिरिजे! परिसें विशेष ८
अश्वत्थवृक्षतळिं तो करि चिंतनास । त्या पाकरीतरुतळीं जपयज्ञपोष ॥
तो आम्रवृक्षतळिं मानसपूजनातें । ना त्यास ईशभजनाविण कार्य चित्तें ।९
तो सांगतो वटतळीं हरिसत्कथांतें । येऊनि ऐकति किती खगवृंद तैं ते ॥
श्रीरामसुंदरचरित्र विचित्रशील । प्रेमें भरूनि करि गायन भावलोल ॥१०॥
तेथें मरालगण जे सरिं राहतात । ते सर्व शुद्धमति ऐकति तें सदुक्त ॥
मीं जेधवां कुतुकिं जाउनि पाहिलें तें।झालें विशेष मज सौख्य न वर्णुं येतें
मीही तदा धरुनि उत्तमहंसरूप । राहें तिथें प्रभुगुण श्रवण्या अमूप ॥
ऐकोनि सादरपणें रघुरायकीर्ति । कैलासिं मी परत ये वरुनी सुवृत्ति! ॥१२
सांगेन गौरि! तुज तो सकलेतिहास।मी ज्या क्षणीं रिघत काकभुशुंडिपास ॥
आधीं कथीन तुज ज्यास्तव तो खगेश। कागाचिया जवळ ये परिसावयास१३
जेव्हां करी रघुपती रणरंगलीला । पाहूनि तें चरित लाज रिघे मनाला ॥
जैं इंद्रजित्करविं घे विभु बाधनीयां । तैं प्रेरि नारदमुनी गरुडास साह्या ॥
छेदूनि बंध गरुडें प्रभु मुक्त केला । मोठा विषाद परि हो खगराजयाला ॥
चिंती अनेकपरि तो अपुल्या मनाशीं । झालें कसें प्रभुनिबंधन नागपाशीं?
सद्ब्रह्म जें विरज वागधिनाथ पूर्ण । मायाविमोह न जया, परमात्मवर्ण
तो येथ हो अवतरे जगिं, येत कानीं । ना ये प्रभाव परि काहिंच कीं दिसूनी!

संसाराचा बंधही छिन्न होत । ज्याच्या नामा आठवीतां मनांत ॥
त्या रामातें क्षुद्रशा राक्षसानें । कैसें केलें बद्ध पाशांत नेणें !! " ॥१७॥

नानाप्रकारिं करि तो हृदयीं विचार। न ज्ञान हो प्रकट; हृद्भ्रम हो न दूर
खेदें विषण्ण मन, येति वितर्क चित्तीं। तो होय मोहवश गे! तुझियाच रीतीं!
देवर्षिपाशिं अति आकुलचित्त आला। सांगे तयास हृदिं संशय जो उदेला
ऐकोनि नारदमनीं करुणा अती ये। " ऐकें खगा प्रबल या रघनाथमाये
ज्ञान्याचियाहि हृदयास लुबाडते ही। त्यांच्याहि मोहवि मनाप्रति हीच पाहीं
मातें हिनेंचि कितिदा तरि नाचवीलें।ती ही छळी खगवरा! तुज याहि वेळे!

मोठाच मोह तव होय हृदीं उदेला । जाईल ना मदुपदेशिं क्षणीं लयाला ॥
तूं जाइं रे! खगपते! चतुराननातें। देईल तो तुज निदेश करीं सख्या! तें" ॥
देवर्षि सांगुनि असें निघत स्वमार्गे । श्रीरामचंद्रगुणगान करी रसौघें ॥
वर्णी मुनी परमसुज्ञ पुनःपुन्हां ती । माया अनन्तबल त्या हरिची हृदन्तीं ॥
तेव्हां विरिंचिजवळीं गरुडं रिघूनी । सांगीतलें निजमनोगत नम्रवाणीं ॥
ऐकोनि तें विधि नमीत रघूत्तमासी । रामप्रतापिं मन हो रतलें विशेषीं ॥२३॥
चित्तामधें मग विचार करी विधाता । "मायेप्रती वश कवी बुध तेविं वेत्ता ॥
माया अगम्य हरिची अमितप्रभावा । जी नाचवी ममहि कीं बहुवार जीवा ॥
निर्मीत मी सकल सृष्टि चराचरा ही । ऐशा मलाहि ढकलीत असे विमोहीं ॥
आश्चर्य यांत नच अल्पहि पक्षिराया। या पाडि मोहिं अशि ही अजि ईशमाया" ॥
धाता वदे मग सुरम्य अशी स्ववाणी । "रामप्रभुत्व मनिं शंभु महेश जाणी ॥
जा शंकराप्रतिच तूं तर वैनतेया!। ना त्या अनम्रपणि मात्र विचारिं राया! ॥
जाईल तेथ तव संशय रे लयासी" । ऐकोनि ती विधिगिरा क्षणिं जाय पक्षी ॥
सोत्कण्ठ तो खगपती मजपाशिं येत । होतों कुबेरसदना अलकेसि जात ॥२७॥
कैलासिं तू स्वगृहिं पार्वति! राहिलीस । येऊनि तो मम पदीं नत हो खगेश ॥
संदेह तो निजमनांतिल सर्व सांगे । मी तें विनीत वच मंजुल ऐकुनी घें ॥२८॥
सप्रेम मीहि वदलों वच त्या भवानि!। जी वाटली मजसि योग्य अशीच वाणी ॥
"मार्गांत गा! खगवरा! मज भेटलास। सांगूं तुला समजवून कसें विशेष? ॥
होईल रे! सकलसंशयभंग तेव्हां । सत्संगतींत बहुकाल रहासि जेव्हां ॥
स्वां ऐकणें हरिकथा अतिरम्य तेथें । नानाप्रकारिं मुनि गाति सुभक्तिचित्तें ॥
ज्यांमाजिं आधिं मधिं शेवटिं वानिलासे। श्रीरामराय भगवान् प्रभु तो विशेषें ॥
ऐशा कथा सतत ज्या स्थलिं होति तेथ । मी पाठवीत तुज, जा परिसें समस्त ॥
शंका तुझ्या सकळ जातिल ऐकतांच। होईल भक्ति अति रामपदाब्जिं साच ॥
सत्संगतीविण कथा हरिच्या न होती। त्या ऐकिल्याविण सरे नच मोह चित्तीं ॥
झाल्याविना हृदयमोहनिवृत्ति पूर्ण । ना हो रघूत्तमपदीं दृढभक्ति जाण! ॥
ना भक्तिवीण मिळणार कुणीहि रामा। होवोहि बोध-जप-योग-विरक्तिसीमा! ॥
हो उत्तरेस गिरि सुंदर नील एक। राहे तिथें अति सुशील भुशुंडि काक ॥
जो रामभक्तिपथिं हो परमप्रवीण। ज्ञानी गुणाढ्य वय ज्यास अनन्तमान ॥

तो सांगतो सतत रामकथा सुभाक्ति । ऐकावया विविध उत्तमपक्षि येती ॥
जा ऐक सद्गुण तिथें हरिचे अनन्त । मोहार्ति होइल तुझी गरुडा ! विलुप्त !" ॥
जेव्हां तया सकल मी समजावि गौरि ! । गेला खगेश मज वंदुनि हर्षपूरीं ॥
मी त्या स्वतां नच उमे! समजावियेलें । मार्तेहि मर्म रघुरायकृपे मिळालें ! ॥३६॥
झाला असेल कसला हृदयाभिमान । छेदूं पहात विभु त्यास कृपानिधान ॥
मीं ठेविलें न मजपाशिं तयासि तैसे । जाणे विहंग विहगोक्तिस कीं विशेषें ! ॥
अमेया प्रभुची माया गे भवानि ! प्रभाविनी ॥
ज्ञानी तरि असा कोण ? ज्या हे घाली न मोहिनी ! " ॥३८॥
ज्ञानी सुभक्तमणि पावननाम साचा । जो वाहन त्रिभुवनाधिप ईश्वराचा ॥
ऐशाहि त्या खगपतीप्रति मोहि माया । का गर्व पामर मनुष्य धरीत वायां ? ॥
माया विमोहवि विरिंचि–शिवादिकांला । तैं बापुडा कवण अन्य टिके तियेला ?
जाणोनि हें हृदयिं सर्व मुनीश होती । मायापतीस भजुनी अतिधन्यमूर्ती ॥४०॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे
गरुडंप्रति शिवोपदेशवर्णनं नाम षोडशस्तरङ्गः ॥

—: ० :—

तरंग १७ वा

जाई खगेश मग, जेथ भुशंडि होय । जो कीं अखंड हरिभक्त सुधी अमेय ॥
पाहोनि शैल अतितुष्ट खगेश झाला । मायाविमोहयुत शोक समग्र गेला ! ॥१॥
सेवी जला, करुनि मज्जन त्या तडागीं । जाई प्रसन्नमनिं त्या वटवृक्षभागिं ॥
ते वृद्ध वृद्ध खग त्या स्थलिं पातलेले । श्रीरामसच्चरितपानमती मिळाले ॥२॥
आरंभ जों करुं बघे कथनास काग । ये त्याच वेळिं खगराज कथानुराग ॥
येतां पहाति सगळे खगराजयाला । सान्या खगांसह भुशुंडि सुतुष्ट झाला ॥
अत्यादरा करुनियां खगसत्तमातें । त्या स्वागता पुसुनि आसनही दिलें तें ॥
केली अतीव अनुरागिं तदीय पूजा । त्यातें भुशुंडि मधुवाक्यिं वदे महौजा
"झालों कृतार्थ तव दर्शनिं आज नाथा !। हे पक्षिराज गरुडा ! प्रभुवर्यभक्ता ॥
द्यावा निदेश मज तें क्षणिं आचरीन।केलेंत आगमन कां ? प्रभुजी सुजाण!"

बोले खगेश्वर मृदूक्ति "तुम्ही कृतार्थ। आहांत संतत जयां स्तवि विश्वनाथ॥
स्वश्रीमुखांबुजिं महेश्वर आदरानें। सन्मानि सद्गुणगणां निजपुण्यगानें॥६
हे तात! ऐक मज कारण काय याया।मत्काम सर्व पुरले बघुनी तुला या॥
देखें तुझ्या परमपावन आश्रमा रे। संमोह संशय मम भ्रम नष्ट सारे!!॥७॥
आतां कथा परमपावन राघवाची। जी सौख्यदा सतत लोपवि दुःखवीची॥
ती ऐकवीं मजसि सादर भक्तिपूर्ण। हें प्रार्थितों बहुतवार विभो! नमून"
ऐकोनि उक्ति विनता विनतात्मजाची। सुप्रेमयुक्त ऋजु सौख्यद पुण्यवाची
उत्साह उद्गत अतीव भुशुंडिचित्तीं। लागे कथूं त्रिभुवनोत्तम रामकीर्ति॥
सांगे तदा प्रथम तो अनुरागपूरीं। वर्णोनि राघवचरित्रसरासि गौरि!॥
सांगे अपार मग नारदमोह तो कीं। झाला पुढें वदत रावणजन्म लोकीं १०
रामावतार मग उत्तम सांगुनीया। वर्णी पुढें शिशुचरित्रहि रंगुनीयां॥
नाना प्रकारिं शुभ राघव बाललीला। उत्साहपूर्ण हृदयें कथि चारुशीला॥
सांगे पुढें ऋषित्रिरागमनप्रसंग। वर्णीत राघवविवाह सुखान्तरंग॥
रामाभिषेक कृतनिश्चय तो निवेदी। भूपालदत्तवर तें रसभंजनादि!!॥१२॥
रामाचिया विरहिं शोक समस्त पौरां। संवाद लक्ष्मणरघूत्तमजात सारा॥
हें सर्व वानुनि कथीत भुशुंडि काग। कैशापरी प्रभु धरी वनवासमार्ग १३
गाईयली गुहमनांतिल रामभक्ति। येणें प्रयागिं उतरूनि सुरापगा ती॥
वाल्मीकि-राघव-समागम-चारुवृत्त। ते चित्रकूटिं भगवंत कसे रहात॥१४॥
कैसा सुमंत नगरा परते कथोनी। भूपालमृत्यु कथिला करुणार्द्रवाणीं॥
येई कसा भरत तें कथुनी समस्त। तत्प्रेमभक्तिरस वायस सर्व गात!॥१५
भूपक्रिया करुनि पौरसमेत येत। कैशापरीं भरत, राम जिथें रहात॥
श्रीरामराय भरता समजावि कैसा। ये पादुकांसहित तो नगरा निवासा॥
राहे कसा भरत भक्ततपस्विहीर। वर्णीयलें कारि कसें सुरराजपुत्र॥
गाईयली रघुवराप्रति अत्रिभेट। केला विराधवध हीहि निवेदि गोष्ट॥१७
सांगीतलें तनु कशी शरभंग टाकी। झाली अगस्तिशिं कशी प्रभुभेट ती कीं॥
वर्णीलि दंडक-वना कशि पुण्यता ये! ती गृध्रमैत्रिहि कृता प्रभु रामरायें॥
येऊनि राम करि पंचवटीनिवासा। भीती विनष्ट करि ती मुनिंची अशेषा॥
केला अमूप उपदेशहि लक्ष्मणासी। हें सर्व सांगत भुशुंडि सुरम्यभाषी १९

केली स्मरार्ते काशि शूर्पणखा कुरूप । मारी ससैन्य खर-दूषण रामभूप ॥
जेणें कळे सकल मर्म दशाननाला । मारीचसंगति दशाननवाक्यमाला २०
हें सर्व वर्णन करी मग साधु वक्ता । मायामयी हरियली काशि तीहि सीता ॥
श्रीरामराय विरहार्तिहि वर्णि कांहीं । गृध्रक्रिया कशि करी विभुवर्य तीही ! ॥
वर्णीयलें मग कबंधवधासि तेणें । सांगोनि भक्ति, सुगती शबरीसि देणें ॥
वर्णीयला विरह उत्कट राघवाचा । पंपासरोवरतटीं प्रभु येत साचा ॥२२॥
संवाद नारदमुनि-प्रभुचा मनोज्ञ । रामासि मारुति कसा मिळला सुजाण ॥
सुग्रीवमैत्रि कथिली मग वीर्यशाली । मारीयला प्रभुवरें कथि केविं वाली ॥
राज्याभिषेक सुगला कपिराज्यि केला । रामें प्रवर्षणगिरी मग वासियेला ॥
वर्षर्तु-शारदविभा प्रभु राम वर्णी । सुग्रीवचित्त भिववी प्रभु रोषवाणी ! २४
कैशापरी कपिपती कपि पाठवीत । शोधावया जनकजे दशदिक् समस्त ॥
कैशाप्रकारिं शिरती विवरीं कपी ते । संपाति केविं मिळला मग वर्णिलें तें॥२५॥
ऐकोनि सर्वहि कथा पवनात्मजानें । लंघीयला जलधि थोर अवर्ण्यमानें ॥
लंकेंत केविं शिरला कपि अप्रमेय । सीतेसि धीर दिधला कथि भक्तराय ॥२६
विध्वंसुनी वन दशानन बोधियेला । लंकेसि जाळुनि पयोनिधि लंघियेला ॥
आले कपी सकल रामनिवास जेथें । वैदेहिचें कुशल त्यास निवेदिलें तें ॥ २७
सेनेसमेत रघुनाथ जसा निघाला । लंकेचिया जलधितीरिं निवास केला ॥
आला कसा मग विभीषण भेटण्यास । हें सांगुनी कथि पयोनिधि-निग्रहास ॥
बांधोनि सेतु कपिसैनिक अब्धिपार । येती कसे कथियलें रमणीय सार ॥
शिष्टाइ वीरवर वालिकुमार कैसा । लंकेंत जाउनि करी कथिलें विशेषा ॥२९
संग्राम वानर निशाचर यांमधील । वर्णीयला विविधरीतिं रसानुकूल ॥
त्या कुंभकर्ण-घननाद-पराक्रमातें । वर्णून शक्तिबल तद्वधही कथी ते ॥३०॥
संहार राक्षसगणां विविधप्रकारीं । श्रीरामरावणरणीय कथाहि सारी ॥
वर्णीयला समरमृत्यु दशाननाचा । मंदोदरीकृत विलापहि वर्णि साचा ॥३१॥
लंकाधिराज्यि अभिषेक बिभीषणाला । त्रैलोक्यि देवगण सर्व अशोक झाला ! ॥
सीता-रघूत्तम-मनोहरसंगमातें । वर्णीयलें अमृतसार भुशुंडिनें ते ॥ ३२ ॥
ते सांजलि स्तुति करीति समस्त देव । तैं पुष्पकीं कपिगणांसह रूढ सर्व ॥
साकेतिं येत रघुनाथ कृपानिकेत । त्या सर्व उत्तमकथेसि भुशुंडि गात ॥३३॥

रामाभिषेकहि तयें मग वर्णियेला। वर्णीयली रघुवरोत्तमनीतिमाला ॥
सारी कथा जशि तुला कथि मी भवानि!। तैशीच भक्तवर काकभुशुंडि वानी
ऐकोनि राघवकथा खगनाथ बोले। अत्यंत हर्षितमना वचनें रसाळें ॥
"संदेह सर्व मनिंचा मम नष्ट झाला। ऐकोनियां परमसुंदर रामलीला!॥१५॥
हे वायसोत्तम! गमे तुझिया प्रसादीं। श्रीरामचंद्रपदभक्ति मिळे निराधि ॥
संग्रामिं पाहुनि तशा प्रभुबंधनातें। होता अतीव मज मोह सख्या! मनातें॥
आनंदसागर असा प्रभु रामराय। सच्चित्स्वरूप कधिं होइल दुःखि काय? ॥
लीला नरानुकृतिच्या प्रभुच्या बघोनी। गेलें भरूनि मन हें मम संशयांनीं १७
ती भ्रांति मद्हृदयिंची हितकारि झाली। केला अनुग्रह कृपानिधिनें सुकालीं!
अत्यातपें विकल जो हृदयांत होय। छाया तया सुखद हो तरुची अमेय॥१८

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने
उत्तरकांडे गरुडभुशुंडिसमागम-रामचरितश्रवण-संदेहनिवृत्तिवर्णनं
नाम सप्तदशस्तरङ्गः ॥

तरंग १८ वा।

होता न हा अति महा मज मोह ऐसा। हा लाभता मजसि दर्शनयोग कैसा?
ऐकावया मिळति ही कशि रामकीर्ति। अत्यंत चित्र सुकथा तुम्हि गाइली ती॥१
आहे पुराणनिगमागमसन्मती हें। गातात सिद्धमुनि, संशय यांत नोहे–॥
त्यांतेंचि भेटति जगांत विशुद्ध संत। श्रीराम ज्यां निजकृपें अवलोकतात॥२॥
पाहें तुम्हास तरि रामकृपेंचि मी हें। निःशंकचित्त तुमच्या सुकृपेंचि लाहें"॥
ऐशी विहंगपतिची परिसोनि वाणी। जीच्यांत भक्ति विनयादिक गे दिसूनी॥
झाला प्रहृष्ट अति वायस तो हृदब्जीं। रोमांचकाय, नयनीं जलबिंदु गाजि!॥
श्रोता कथारसिक साधु सुधी सुशील। श्रद्धालु भक्त हरिचा ज्वर कां असल॥४॥
त्यातें उमे! प्रकटती अति गोप्यही कीं।। सत्तत्त्वरत्न जगिं सज्जन जे विलोकीं॥
बोले भुशुंडि मग वायस पक्षिराया। प्रेमें करूनि अतिसुंदर शब्दिकीं या–॥

"तूं पूज्य होसि गरुडा! मज सर्वरीतीं। हो रामदृष्टि सकृपा तुझियावरी ती ॥
नोहेच संशय तुला, नच मोहमाया। आलास नाथ! मजलागिं दया कराया! ॥
धाडोनि तूंसि मज मोहमिषें खगेश!। देई महत्त्व रघुराय मला विशेष ॥
सांगीतलास मज मोह तुझा अशेष!। आश्चर्य यात नच नाथ! असेचि लेश! ॥
जे कीं विरिंचि, भव, सन्मुनि नारदादि। विभ्रांत होत सनकादिक आत्मवादी॥
कोणास अंधपण यांत दिलें न मोहें?। कोणास काम जगिं नाचविता जि! नोहे? ॥
तृष्णा करी न कवणाप्रति मूढवृत्ति?। क्रोधें जळून हृदयें कवणें न जाती? ॥
ज्ञानी तपस्वि कवि पंडित शूरवृत्ति। वा सद्गुणायतन हो जगिं चारुमूर्ति ॥९॥
कोणास यांमधिं न हास्य करीत लोभ?। संसारिं सर्व वश त्या, जर नाहिं दंभ ॥
संपत्तिगर्व करि वक्र कुणां न लोकीं?।कोणास ना प्रभुपणा बधिरत्व दे कीं? ॥१०॥
कोणा कटाक्षिं नच मोहविते मृगाक्षी?। कोणास नेत्रशर ते छळिती न वक्षीं?॥
कोणास ना त्रिगुण पीडिति सन्निपातें?।कोणास मान-मद सोडिति का कधीं ते? ॥
आक्रान्त कोण नच यौवनतापिं झाला?। कोणा ममत्वमतिनें न कलंक आला?॥
कोणास ना करित कंपितगात्र शोक?।कोणास मत्सर न लावितसे कलंक? ॥१२॥
ती सर्पिणी ग्रसत ना कवणास 'चिंता'?। माया करीत नच अंकित कोण चित्ता?
हे लागले नच मनोरथकीट ज्याला। ऐसें बलिष्ठ तनुकाष्ठ असे कुणाला? ॥१३॥
त्या लोक-वित्त-सुत या त्रितयैषणांनीं। केली न धी मलिन कोणनि दीनवाणी?
मायाच निर्मित असा परिवार सारा। अत्यंत ही प्रबल; अंत हिच्या न पारा॥

होती ब्रह्मशिवादीही भीतसेच जियेप्रति ॥
तैं अन्यजीव कुठले टिकायाचे तिथें किती? ॥१५॥
व्यापुनियां ससारा मायाकटक प्रचंड हें राहे ॥
कामादिक सेनापति, भट जणुं पाखंड कपट दंभचि हे! ॥१६॥

माया असे ही रघुवीरदासी। मिथ्या जरी ती असलीहि ऐशी ॥
कृपेविना ती नच राघवाच्या। सुटे, वदें निश्चयपूर्ण वाचा ॥१७॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे गरुडोपदेशवर्णनं नामाष्टादशस्तरङ्गः ॥

तरंग १९ वा

जी नर्तवीत सकला जगतास माया। लीला जिच्या उकलती न कुणा अमेया॥
माया अशी प्रभुचिया भृकुटीविलासीं। नाचे खगेश! परिवारसमेत जैसी॥१॥
तो सच्चिदानन्दघनस्वरूप। श्रीराम विज्ञानबलीं अमूप॥
जो व्यापक व्याप्य अनन्त सर्व। अखंड सर्वप्रभु नित्यभाव॥२॥
अमोघशक्ती अज सर्वदर्शी। अगम्य जो वाङ्मनसेन्द्रियांसी॥
जो निर्गुण ब्रह्म अजिंक्य ऐसा। अनिंद्य निर्मोह न जाय नाशा॥३॥
सर्वांचिया हृद्गतिं नित्यवासी। निरीह, ना ज्या रज, निर्मलासी॥
आनंदसंदोह अवर्णनीय। सृष्टीहुनी तो पर रामराय॥ ४॥

भगवंत रघूत्तम निराकार निरंजन॥
अगम्य चरितीं ज्याच्या रमले सर्व सज्जन॥ ५॥
नाहींच मोह व्हायाला येथें लवहि कारण॥
सूर्यापुढतिं का जाई तम जें दृष्टिवारण?॥ ६॥

भक्तकाम पुरवी प्रभुराम। भूपदेह धरुनी सुखधाम॥
आचरी परम रम्य चरित्रें। जीं नरानुकृति विश्वपवित्रें!॥७॥
घेत वेष बहुधा नट कोणी। नृत्य दावि बहुभाव नटोनी॥
राहतो परि अलिप्त तयासी। राम त्यापरि पहा सुखराशि॥८॥
हे खगेश! जरि राघवलीला। मोहवीति दनुजां सकलांला॥
सौख्यदायि रसिकां हृदयांला। नागबंधन रणीं विभु त्याला!॥९॥
पापचित्त विषयां वश कामी। दोष लाविति रघूत्तम रामीं॥
अज्ञता हृदयिंची अपुली ते। लादिती रघुपतीवरि चित्तें॥१०॥
नेत्रदोष कवणा जर झाला। पीतवर्ण शशि भासत त्याला॥
ज्यास दिग्भ्रम असे भुलवीत। पश्चिमे उदित त्या दिननाथ!॥११॥
बैसला चढुनि जो कुणि नौके। चाललें जग, असें जणु देखे॥
वाटतें मनिं तयाप्रति मोहें। आपण स्थिर खरोखर आहे!॥१२॥

बालकें गिरिगिरी भ्रमणारीं । मानिती फिरति त्यांसह सारीं ! ॥
तीं गृहादि दिसती फिरतीं त्यां । 'सांगतां' म्हणति 'केविं असत्या!?'

नसे स्वप्नांतही ज्याला । अज्ञानस्पर्श तो कधीं ॥
हरीविषयिं त्या व्हावा मोह कां हृदयामधीं ? ॥ १४ ॥

मतिमंद अभागी जे मायाविवश जाहले ॥
अज्ञानाच्या जवनिकायोगें यच्चित्त झांकलें ! ॥ १५ ॥
हट्टानें धरिती ऐसें ते महामूढ संशय ॥
अज्ञता आपुली रामीं लाविती मत्त निर्भय ॥ १६ ॥
कामें क्रोधें मदें लोभें व्याप्त गेहादिकीं रत ॥
तमोगर्तांत पतितां कळे कां राम त्यांप्रत ? ॥ १७ ॥

निर्गुणरूप प्रभुचें सुलभ गमे सगुण ते कळे न कुणा ॥
सुगम अगम नानाविध विभुचरितें भ्रमविती बुधहि मुनिंना ॥
रामप्रभुत्व तुज मी ऐक खगवरा! भलें निवेदीन ॥
सांगेन तुज यथामति गोष्ट मनोहर रसें भरलि पूर्ण ॥ १९ ॥
झाला मलाहि होता मोह प्रभुजी ! जशा प्रकारांनीं ।
तें सर्वचि कथितों मी रामकृपापात्र तूंच सुज्ञानी ॥ २० ॥
हरिगुणगानप्रीती तव हृदयींची मला सुखवि भारी ॥
राहें नच वदतां मी परम—रहस्या कथा मनोहारी ॥ २१ ॥
ऐक; असे रामाचा हितकर सहजस्वभाव हा ऐसा ॥
कीं तो दासहृदब्जीं अभिमानाच्या कदा नुरवि लेशा ॥ २२ ॥
संसृतिचा मूलचि जो, शूलप्रद जो अनेकरीतींनीं ॥
निर्मित शोकां सकलां, ऐसा 'अभिमान'सा नसे कोणी! ॥२३॥
म्हणुनीच दूर करितो 'अभिमाना' ला कृपाळु भगवंत ॥
भगवद्हृदयीं नांदे ममता निजसेवकावरि अनंत! ॥ २४ ॥
शिशुतनुतें व्रण होतां कठोरहृदयें चिरीतसे जननी ॥
परि कोणा वाटे का—शिशुविषयीं अदय होय ती स्वमनीं ? २५
यद्यपि दुःखा पावुनि रडतें बालक अधीर होवोनी ॥
व्याधीचा नाश घडे, यास्तव जननी मनीं न तें मानी ॥२६॥

तैसेचि हे रघुपती जपती स्वदासा । ताचिंत्तिच्या करुनियां अभिमाननाशा
त्यागोनियां सकलही भ्रम आणि शंका।ऐसा प्रभू तुलसिदास! न सेविसी कां?

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे गरुडभुशुण्डिसंवादे श्रीरामस्वरूपपरात्परवर्णनं नामैकोनविंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २० वा

कृपालुता राघवाची माझी घी मंदगामिनी ॥
सांगतों ऐक गरुडा! लक्ष लावून घे मनीं ॥ १ ॥
जेव्हां जेव्हां रामचंद्र मनुजत्व धरी असें ॥
भक्तकल्याणहेतूनें लीला बहु करीतसे-॥ २ ॥
तेव्हां तेव्हां अयोध्येंत जाउनी मीहि पाहतों ॥
चरित्र बालरामाचें पाहुनी सुख पावतों ॥ ३ ॥
जातों देखावया जेव्हां प्रभुजन्ममहोत्सवा ॥
पांच वर्षे तिथें राहें लोभुनी हर्षवैभवा ॥ ४ ॥
बाल श्रीराम तो माझा देव अत्यंत लाडका ॥
शोभा त्याची किती वानूं कोटिकामशताधिका! ॥ ५ ॥
प्रभूच्या मुखपद्मातें माझ्या पाहुनि पाहुनी ॥
नेत्रसाफल्य मी घेई गरुडा! कोण तें गणी? ॥ ६ ॥
हरीचा संग मी पावें होउनी बाल वायस ॥
प्रभूच्या बाललीलांचा चाखें मी बहु सौरस ॥ ७ ॥
जिकडे जिकडे राम जातसे रम्य शैशवीं ॥
तिकडे तिकडे मीही जावें उडत वैभवीं ॥ ८ ॥
उच्छिष्ट बालरामाचें पडे जें तेथ अंगणीं ॥
अत्यंत आवडोनीयां खावें मीं तेंच वेंचुनी ॥ ९ ॥
एकवार चरित्रातें दावी मजसि राघव ॥
चमत्कारकृतीचें त्या वानूं मी केविं लाघव?! " ॥१०॥

स्मरतां रामचंद्राची लीला ती अति पावनी ।।
भक्तिभावें सरोमांच भुशुंडी होय तत्क्षणीं ! ।।११।।

बोले पुढें "परिस रे ! खगनाथ चित्र । भक्तास सौख्यद रघूत्तमसच्चरित्र ।।
प्रासाद तो नृपतिचा अतिरम्यरूप । रत्नादिकांचनमणी खचिले अमूप ।।१२।।
त्यीं अंगणें रुचिर, वर्णनिं शक्त कोण ? ! चारीहि बंधुगण जाति जिथें रमून ।।
श्रीराम आचरित बालविनोदलीला । त्या अंगणीं सुखविती अति माउलींला १३
ती इंद्रनीलसम सुंदर अंगकांति । प्रत्यंगभा मनसिजासहि लाजवीती ।।
रक्तोत्पलासम नव्या चरणच्छवी ती । ज्यांची नखद्युति शशिद्युतिहारिदीप्ति ।।
वज्रांकुशध्वजसरोरुह चार चिह्नें । माधुर्यपूर्णरव निर्मित नूपुरानें ।।
सौंदर्यपूर्ण मणिकांचनिं गुंफिलेली । ती किंकिणी कटिसि कोमलनादशाली १५
रेखात्रयी उदरिं सुंदर शोभणारी । गंभीर नाभि रुचिरा मन मोहणारी ।।
श्रीरास त्या उर विशाल विराजताहे । नाना विभूषणविभा किति साजताहे ! ।।
आरक्तपाणियुग, रम्य नखें जयास । बाहू विशाल बहुभूषणकांतिपोष ।।
ते स्कंध सिंहशिशुसे, दररम्यकंठ । अत्यंत रम्य हनु, आननभा अलोट !१७
अस्पष्ट रम्यवच ओष्ठ सुरक्तरंग । ते दोन दोन वर खालतिं दंत चांग ।।
नासा मनोहर, कपोलहि रम्यकांति । सर्वांतरा सुखद हास्यशशांकदीप्ति ।।१८
नीलांबुजासम विलोचन शोभतें जें । संसारदुःखगण मोचनकारि तेजें ।।
गोरोचनी तिलक भालिं विराजताहे । वक्रभ्रु रम्य, समकर्णमनोज्ञता हे।। १९
ते कृष्णवर्ण कुरळे कचशीर्षभूषा । पीतांबरी झगुलि वर्तुल बालवेषा ।।
माझ्याकडे बघत सुंदर दृष्टिपातें । लावीत वेडचि जणों मजलागिं चित्तें ! २०
तो रम्य भूपसदनांगणिं खेळणारा । जो सावली अपुलि पाहुनि नाचणारा ।।
क्रीडा करी मजसवें विविधप्रकारीं । ज्या वर्णितां मजसि लाजचि वाटणारी !
तो ओरडूनि मजला धरुं पाहि राम । धांवोनि येत जंव तो हृदयाभिराम ।।
तों जातसें पळुन मी चुकवून त्यासी । दावूनि बर्फि भुलवी मज तो प्रहर्षी !२२

मी येतां जवळीं हांसे बालराम रघूत्तम ।।
जातां मी पळुनी दूर रडे विभु मनोरम ! ।। २३ ।।
जवळीं जाउनी मीहीं पाहें धरुं पदाप्रत ।।
तों तों राम पळे दूर मागें पाहत पाहत ! ।। २४ ।।

प्राकृतशिशुसमलीला पाहुनि ऐशा मलाहि मोह भरी ॥
आनन्दसच्चिदमल प्रभु असलें चरित दावि काय तरी ! २५ ॥

ऐसा विचार जंव मी करिं पक्षिराया ! । प्रेरीयली रघुवरें मज वेढि माया !॥
माया न ती मजसि दुःखद तेविं झाली । ना अन्य जीवसम संसृतिमाजिं घाली
नाथा ! असे किमपि कारण व्हावया हें । तूं सावधान हरियान ! विचारिं पाहें ॥
तो ज्ञानपूर्ण रघुनाथ अखंड होय । मायेसि वश्य सचराचर हें अमेय॥२७॥
ज्ञानैकसद्रसमयें जर होति सर्व । जीवेश्वरांत नसताच विभेदभाव ॥
मायेसि अंकित अहंकृतिशालिजीव । माया प्रभूसि वश सर्वगुणप्रभाव ॥२८
आहे स्वतंत्र भगवान्, परतंत्र जीव जीव प्रभूत, परमेश्वर एक सर्व ॥
अज्ञानजात जरि भेद अनेक होती । कोटी उपायिंहि हरीविण ते न जाती !
श्रीरामचंद्रभजनाविण जो स्वतांसी । कांक्षीत मोक्षपद निश्चल सौख्यवर्षी ॥
तो ज्ञानवन्तहि मनुष्य पशू गणीन । ज्या न्यून केवळाचि पुच्छ तसें विषाण!
सोळा कलांसहित हो नभिं पौर्णिमेन्दु।तारासमूह जरि हो द्युतिबिन्दुसिन्धू ॥
केले गिरीहि सगळे दवदीप्तिपूर्ण । जाईल ना रविविना रजनी सरून !!
ऐशा प्रकारिं गरुडा! हरिभक्तिवीण । संसारताप नच होइल नष्ट जाण ॥
ना सेवकास हरिच्या छळिते अविद्या । संप्रेरिली विभुवरें धरि त्यास विद्या
विद्या न नाश करिते हरिच्या सुभक्ता । ती भेदभक्ति करिं वार्धित दासचित्ता
पाहे मला रघुवर प्रेमयुक्त ऐशा । होई सहास, परि ऐक पुढें विशेषा ३१
तें मर्म नैव कळलें अपरांसि कोणां । जाणे न तें अनुज, आइ वडीलही ना!
तो जानुपाणि शिशु रांगत येत मातें । सुश्यामगात्र अरुणप्रभ पादहस्तें ॥
मी जाइं रे! पळुनियां गरुडा! दुरीं तों।श्रीराम हात पसरी धरण्या मला तो!
आकाशिं मी जसजसा बहु दूर जात । श्रीरामपाणि मम पाठिशिं येत तेथ।
मी ब्रह्मलोकवरिं पाहत पाठि पाठीं । गेलों उडून जरि ही सगळीच सृष्टि ॥
माझ्यांमधें प्रभुकरामधिं मात्र होतें । कीं दोन अंगुलिच अंतर सर्वदा तें !

भेदूनि सप्तावरणेंहि सारीं । गेलों जरी मी उडुनी भरारीं ॥
दिसे मला तो प्रभुहस्त मागें । भिऊनि मी व्याकुल होउं लागें३७
मी त्रस्त होऊनि मिटें विलोचन । पाहें पुन्हां त्यां उघडूनि किंचन ॥
तों मी अयोध्येमधिं पातलों दिसे । श्रीराम पाहूनि मला बहू हंसे !

तो हांसतां राघव, तन्मुखांबुजीं । प्रविष्ट मी हों नवलाइ थोर जी ! ॥
प्रवेशलों मी उदरांत त्याचिया । ब्रह्मांडराशी दिसली स्थलीं तया! ३९
विचित्र मी लोक बघें तिथें किती । एकाहुनी एक विशेष भासती ! ॥
कोटी विधाते, गिरिजा-महेश्वर । अनंत तारे रजनीश भास्कर ॥ ४०॥
अनन्त ते काल दिशाधिनायक। यमादि ते सर्वहि लोकपालक ॥
असंख्य पृथ्वी गिरिही विशाल ते । सरित्सरें अब्धि जलें सुविस्तृतें ॥४१
विस्तार नानाविध सृष्टिचा तसा । अनन्त तो वर्णनशक्य कायसा ? ॥
मुनी मनुष्यें सुर सिद्धकिन्नर । नागादि खाणी चतुरा चराचर ॥४२॥
जे पाहिलें ना कधिंही न ऐकिलें । जें ना कुणीही कधिंही न कल्पिलें ॥
तें सर्व अत्यद्भुत मीं विलोकिलें । वर्णावया शक्त न कोणि देखिलें !४३

एकेक ब्रह्मांडीं वसलों मी एक एक वर्षशत ॥
यापरि पहात फिरलों ब्रह्मांडें मी तिथें अनन्तमित ! ॥ ४४ ॥
लोकीं लोकीं तेथें भिन्न विधाते, विभिन्न विष्णु शिव ॥
भिन्न मनू, दिक्पालक, भिन्ननरादिक अनन्त सर्व नव !॥४५॥
गंधर्व भूत किन्नर राक्षस पशु विहग नाग भिन्नचि ते ॥
सुरगण दानव गण ते भिन्न अनन्त प्रकारचे होते ॥ ४६ ॥
तिथले समग्र दिसले अन्य तऱ्हांचेच जीव ते मजला ॥
सरिता, सागर, सर, गिरि नानाविध अवनि सृष्टि ती विपुला ४७
सारा प्रपंच तिथला नयना अन्य प्रकारचा भासे ॥
प्रत्येक ब्रह्मांडीं ती ती वस्तू अमूप रम्य असे ॥ ४८ ॥
प्रति भुवनीं मी पाहें भिन्न अयोध्यापुरी, शरयु भिन्न ॥
नरनारी भिन्नपरीं सर्वचि तेथील भिन्न भिन्नपण ! ॥ ४९ ॥
दशरथ–कौशल्याही तेथिल त्या भुवनिं भिन्न भिन्न अशा ॥
भ्राते भरतादिक ते भिन्नचि मूर्ती तुला वदूं कितिशा ? ॥ ५० ॥
प्रत्येक ब्रह्मांडीं मी पाहें राघवीय अवतार ॥
लीलाचरित्र त्याचें बाल्याचें परमपावन उदार ! ॥ ५१ ॥

मीं भिन्न भिन्न सगळी नवलाइ तेथें । देखीयली भ्रमुनियां हरिवाहना ! ते ॥
विश्वें अनन्त जरि मी फिरलों पहात । श्रीराम एकचि परी नच अन्य होत ! ॥

तें तेंच बालपण! तीच सुरम्य शोभा। तो तोच राघव कृपाल विनिर्मि लोभा ॥
सर्वत्र सर्व भुवनीं बधि मी तयासी।दे प्रेरणा मजसि मोहसमीर ऐसा!॥५४॥
ब्रह्मांडकोटिंत असें भ्रमतां दुरन्त। भासे व्यतीत जणुं कल्पशत भ्रमात ॥
आलों पुढें फिरत मी मम आश्रमांत। तेथें कितीक दिन काल मदीय जात ॥
ऐकें पुढें प्रभुरघूत्तमजन्म होय। साकेतिं धांवतचि येइं मुदें अमेय! ॥
जन्मोत्सवा बघत भक्तिभरें रमून। म्यां गाइलें प्रथम ज्यापरिं तेविं पूण ॥५५॥
रामोदरीं बघितलीं भुवनें अनन्त। मीं देखिलीं परि न वानुं शकें समस्त ॥
तेथें बघें पुनरपी भगवंत रामा। मायापती सुमति भक्तकृपाभिरामा ॥५६॥
केला विचार हृदयीं, फिरुनी फिरूनी। मोहें मती भरलि होति अतिप्रमाणीं ॥
म्यां देखिलें जरिहि दोन घडींत सारें। मी भ्रात होय मनिं मोहविशेषभारें ॥
त्रस्ता मला बघुन सर्वचि रीति ऐसें। कारुण्यपूर्ण हृदयें रघुवीर हांसे ॥
तो हांसतां उघडल्या वदनांतुनी मी। बाहेर येइं विहगेश! नृपाल-धामीं! ॥
तो तोच बालिशपणा मजसंगिं राम। होते करीत फिरुनी शिशुसौख्यधाम ॥
कोटि प्रकारिं मम मी समजाविं चित्ता। शांती न लाभलि मला तरि पक्षिनाथा ॥
पाहोनि तें प्रभुचरित्र विचित्रभाव। मद्देहभान हरपे विसरोनि सर्व ॥
मी खालतीं पडत; शब्द मुखीं वहून। 'हे रक्ष रक्ष भगवन्! मज हो प्रसन्न'॥
प्रेमाकुला बघुनिया मजलागिं राम। मायसि आवरत पूरितभक्तकाम ॥
माझ्या शिरीं करसरोज धरी कृपाळ। दीनावनव्यसनि हारवि दुःखजाल!!! ॥
माझा विमोह सगळा प्रभु घालवीत। जो सेवका सुखद नित्य कृपानिकेत ॥
रामप्रभुत्व हृदिं मी बहुधा विचारीं। होई प्रहृष्ट मनिं मी अतिहर्षपूरीं ॥६२॥
वात्सल्य भक्तजनिं पाहुनिया प्रभूचें। प्रेमें भरून मम मानस जाय साचें ॥
बद्धांजली पुलकितांग सवारिनेत्र,। तो मी स्तवीं बहुविधा प्रभु सच्चरित्र ॥६३॥
प्रेमार्द्र ऐकुनि अशी मम आर्त वाणी। पाहूनि दास अपुला अति दीनवाणी ॥
बोले रमापति मनोहर मंजुलोक्ति। जी जाहली मम मनाप्रति सौख्यमूर्ति ॥६४॥

" भुशुंडिकागा! वर माग मातें। प्रसन्न मी होय अतीव चित्तें ॥
समृद्धि सिद्धी अणिमादिका घे। सत्सौख्यखाणी वर मोक्ष मागें!॥६५
घे ज्ञान वैराग्य विवेकबुद्धि। विज्ञान षाड्गुण्यमयी समृद्धि ॥
देईन तूंतें सुरदुर्लभाही! घे अन्य वा कांहिं मनास येई" ॥ ६६ ॥

प्रभुवाक्य ऐकुनी मी अधिकचि अनुरक्त रामपदिं होई ॥
परि मम विचार येती मानसिं, मी चिंतिं हेंचि मद्हृदयीं–॥६७॥
" करुणायतन विभु म्हणे 'देइन तुज इच्छिलीं सुखें सारीं' ॥
'देइन तुज मम भक्ती' ऐसें कां म्हणत नाहिं उपकारी? ॥६८॥
भक्तीविण सर्वहि गुण वाटति मज अरस वा अरुचिकारी ॥
लवणाविण कीं चटण्या रायतिं अळणींच सर्व गमणारीं! ॥६९॥
भजनाविण सर्व सुखें घेउनि तरि काय गा! करायाचीं? " ॥
वाटुनि ऐसें हृदयीं प्रभुरामाला विनम्र मी याचीं ॥ ७० ॥

"देणार हो प्रभुवरा! वर सुप्रसन्न। स्नेहार्द्र चित्तिं करुणा जर कां करून ॥
मी मागतों मजसि ईप्सित जें स्वचित्तीं। सर्वांतरीं वसतसां जि! उदारमूर्ति! ॥

करूनिहि सदुद्यमा गमत योगियां दुर्गमा।
सखी प्रभुकृपेसमा तरिच लभ्य जी संगमा ॥
हिता अमृतविभ्रमा नुरवि जी मनीं संभ्रमा।
अशी अति मनोरमा मजसि भक्ति द्या निर्ममा! ॥ ७३ ॥
विशुद्ध अति उत्तमा प्रणतकामकल्पद्रुमा!
कृपाजलनिधे प्रभो! रघुकुलोत्तमा सत्तमा! ॥
सुभावहृदयंगमा! निरुपमा तुम्हीं आपली।
दया करुनि द्यावि हो! मज अखंड भक्ती भली!" ७४

तेव्हां 'तथाऽस्तु!' म्हणुनी रघुराय डोले।अत्यंत सौख्यकर भाषण रम्य बोले–
"हे वायसा! सहजसन्मति तूं शहाणा। कां मागशील वरदान मला असें ना?
तूं सर्व सौख्यखनि भक्तिच याचिलीस ना भाग्यवंत तुजसा जगतीं अशेष॥
जी कोटियत्निहि न लाभतसे मुनींना। योगें जपें अनलिं दाहुनिही तनूंना
चातुर्य पाहुनि तुझें अति हृष्टलों मी। मागीतलीस मज भक्तिच सौख्यगामी
आतां प्रसाद विहगा! मम हाच ऐक। होईल मानस गुणाढ्य तुझें सुरेख!

जें ज्ञान विज्ञान विरक्ति भक्ति। मदीय लीलादिरहस्य युक्ती ॥
योगादि तूं भेदहि जाणशील। माझ्या कृपेनें सगळें सलील ॥ ७८ ॥
आतां तुला मोहिल नैव माया। व्यापील ना भ्रांति मना त्वदीया ॥
मी निर्गुण ब्रह्म गुणी अनादि। अजन्म जाणेल तुझी सुबुद्धि ॥७९॥

जे भक्त माझे प्रिय ते सदा मला । मती अशी तूं धरिं नित्य निश्चला ॥
रे! कायवाङ्मानधिं माझिया पदीं । असो तुझी ही अनुरागयुक्त धी ॥८०॥
माझी अतीव विमला अजि ऐक वाणी।सत्या सुगम्य निगमादिक जीस वानी
सिद्धान्त एक तुज सांगत ऐक माझा। सारें त्यजून मज रे भज भक्तराजा !
मायेमुळेंच मम हा परिवार सारा । सृष्टी चराचर अशी विविधप्रकारा ॥
माझी प्रजा म्हणुनि मत्प्रिय होय सारी।त्यांतूनि मानव मला प्रिय होय भारी

त्यांतून द्विज मजला, द्विजांमधें वेदविद् मला प्रिय गा ! ॥
त्यांच्यांतहि मत्प्रिय ते वैदिकधर्मानुसारि जे कागा ! ॥८३॥
त्यांतहि विरक्त मत्प्रिय त्यांतहि मत्प्रिय अतीव जे ज्ञानी ॥
विज्ञानी अनुभवि जे मत्प्रिय ते त्यांतही असें मानीं ॥ ८४ ॥
त्यांतूनिहि माझा जो दास असे तोचि आवडे मजला ॥
आशा त्यजुनी दुसरी अनन्यगतिनें मलाच जो भजला ॥ ८५ ॥
सांगतसें मी तुजला पुनःपुन्हां सत्य हें भलें पाहें ॥
माझ्या दासाऐसा प्रिय मजला कोणि ना दुजा आहे ! ॥ ८६ ॥
मद्भक्तिहीन ऐसा हो कां तो ब्रह्मदेवही साच ।
इतर जसे जीव मला प्रिय होती, होय तो मज तसाच ! ॥ ८७ ॥
अतिशय नीचहि कोणी प्राणी जर भक्तिवंत तो असला ॥
होतो प्राणप्रिय मज, बाणा मम वायसा ! असे असला ॥ ८८ ॥
जो शुचि सुशील सेवक सुमति, प्रिय तो कुणा न गमणारा ?
सिद्धान्त हाच कागा ! वेदपुराणांहि मान्य होणारा ॥ ८९ ॥

तूं सावधान परिसें मत घे स्वचित्तीं । एका पित्यास कुणि सूनु अनेक होती
त्यांचे पृथक् गुण विचार कृतीहि शील।ज्ञाता कुणी, कुणि तपी सुमती असेल
कोणी धनी कुणि उदार कुणी सुवीर। सर्वज्ञ कोणि, कुणि धर्मरती कुमार॥
प्रीती समानचि तयां सकलांवरी ती । नांदे सदैव पितयाहृदिं सत्यरीतीं ९१
कोणी तयांत सुत, कायवचोमनांनीं । होई स्वतांच पितृभक्त नितांतमानीं॥
स्वप्नींहि ज्या न दुसरा निजधर्म होत । तो अज्ञही निजपित्या प्रिय, जीव मूर्त
ऐशापरीं जगिं चराचर सृष्ट जीवीं । सान्या सुरासुरनरीं सहजस्वभावीं ॥
मीं निर्मिलें सकल विश्व म्हणून साच।आहे मदीय सकलांवरतीं दयाच ! ९३

मायामद त्यजुन जो परि त्यांत मातें । सेवीत भक्तिभरिं वाक्तनुयुक्त चित्तें ॥
तो पुं-नपुंसक असो अथवाहि नारी । सान्या चराचरिं मम प्रिय तोच भारी !
मी सांगतों प्रियखगा ! तुज सत्य हें कीं । तो प्राणसा प्रिय मला शुचि दास लोकीं
चिंतूनि हें मजसि केवळ तूं भजावें । आशादि टाकुनि समग्र अनन्य भावें !९५

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे काकभुशुंडिगरुडसंवादे बाललीलाकाकभुशुंडिवर्णनं नाम विंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २१ वा

माझें स्वरूप जर संतत चिंतशील । व्यापूं शकेल न कधीं तुजलागिं काळ !"॥
ना तृप्ति हो प्रभुवचोऽमृत तें पिऊनी । चित्तप्रहर्षि तनु ये पुलकीं भरूनी ॥१॥
त्या सौख्यि सानुभव मानस आणि कान । सांगूं शकेल रसना कधिंही तया न ॥
श्रीरामचंद्रसुषमासुख नेत्र जाणे । वाणी तयास कधि वास्तव वर्णु नेणे ! ॥२॥
नानाप्रकारिं उपदेशुनि सौख्य देत । तो बाल्य आचरण कौतुकिं दाखवीत ॥
डोळ्यात अश्रु भरुनी मुख दीन होय । मातेकडे बघि भुकेजुनि रामराय !॥३॥
माता तया बघुनि आतुर ऊठलीच । बोलोनि गोड मृदु घे उरिं त्यासि साच !
घेवोनि अंकिं, पय त्याप्रति पाजवी ती । श्रीरामरम्यचरितें म्हणते सुगीतीं !!४
जो सौख्यलाभ शिव घे अशुभेंहि वेषें । जो कीं स्वयें सुखद भव्य करी विशेषें॥
साकेतवासि जनता नर आणि नारी । सौख्यांत त्या सतत जात बुडोनि सारी !
तो सौख्यलेशलवही मिळला जयाला । स्वप्नामधेंहि अनुभूतिस एकवेळां ॥
न ब्रह्मसौख्यहि तसे गणतीच चित्तीं । ते सुज्ञ सज्जन खरोखर पुण्यमूर्ति ! ॥६॥
साकेतिं काहिं दिन मी पुढतींहि राहीं । श्रीरामशैशवचरित्र रसाळ पाहीं ॥
लाभोनि भक्तिवर रामकृपासहायें । वंदोनि रामपदिं मी मम आश्रमा यें ॥७॥
तेथूनियां मतिस या नच मोहि माया । जेथून राम मज घे घरिं आपुलीया ॥
मीं सर्व गुप्तचरिता मम गाइलें या । कीं जेविं बांचवि मला प्रभुराममाया ॥
आतां खगेश ! वदतों अनुभूति माझी । ना रामभक्तिविण जाय भवार्ति कीं जी
रामप्रसादाविण जाण खगेश्वरा ! हें । रामप्रभुत्व न कळेचि कुणाहि पाहें ॥९॥

रामप्रभुत्व कळल्याविण न प्रतीति। प्रीति प्रतीतिविण होइल ना कधीं ती ॥
स्नेहाविना नच कदा दृढ भक्ति होते। स्नेहाविना सलिलही चिकटेचि ना तें।
हो ज्ञानलाभ कधिं कां गुरुवांचुनीयां?। न ज्ञान लाभत विरक्तिविनाहि वायां॥
तैसेंच गाति जगिं सर्व पुराण-वेद। ना ईशभक्तिविण शब्दहि सौख्य लब्ध!
विश्रांति कोठुनि मना मिळणार तात!। संतोष जोंवरि वरी नच आत्मचित्त?॥
चालेल काय कधिं नांव जलाविना ती?। कोटीहि यत्न जरि आचरिले समस्तीं
नाशेल काय कधिं कामविना सुतोष?। ना कामनाशविन सौख्य मिळेल लेश!
ना रामभक्तिविण होइल कामनाश। भूमीविना तरु कदापि रुजे न लेश!॥
विज्ञान तेविं नसतां समता कधीं का। आकाशवांचुनि कधीं अवकाश हो का?
श्रद्धेविना कधिंहि धर्म असेल का गा। पृथ्वीविना कधिंहि गंध असेल? कागा!
कैशी तपाविण बरें द्युति लाभणार?। तो कोण वारिविण गा! रस निर्मिणार?॥
सत्संगतीविण कसें मिळणार शील?। तेजाविना कधिंहि रूप न तें दिसेल! १५
का आत्मसौख्यविन सुस्थिर चित्त होय?। स्पर्शप्रभाव पवनाविण शक्य काय?
विश्वास नाहिं तर सिद्धि कशी मिळावी?।ना भक्तिवीण हरिच्या भवभीति जावी
विश्वास नाहिं तर भक्ति असेल कैशी। भक्तीविना द्रव कसा हृदिं राघवासी?॥
स्वप्नींहि कां शुभकृपेविण राघवाच्या। जातील आर्ति कधिं काय बरें जिवाच्या?
ऐशा विचारिं मति निश्चल ही करून। टाकून संशय कुतर्कसमूह पूर्ण॥
श्रीरामचंद्र रघुवीर सदैव सेव। कारुण्यमंदिर सुखप्रद रम्य देव॥ १८॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे काकभुशुंडिगरुडसंवादे श्रीरामप्रतापभक्ति-अनन्यशरणागतवर्णनं नामैकविंशतितमस्तरंगः॥

तरंग २२ वां

माझी जशी मति तसा तुज गाइला मीं। रामप्रतापमहिमा सुकृतानुगामी॥
ना वर्णिलें तुजसि युक्ति करून कांहीं! हें सर्व जें बघित मी निजलोचनांहीं!॥१॥
श्रीरामनाममहिमा गुणकीर्ति रूप। सारें अनंत अमित प्रभुचें अमूप॥
आपापल्या मतिं मुनी हरिकीर्ति गाती! ना पार शेष,शिव, वेदहि प्रावताती!॥

ऐकें खगेश! तुम्हि ते मशकान्त पक्षी। ना अन्त पावत असा कधिं अंतरिक्षीं ॥
तैसा अगाध महिमा रघुनायकाचा। त्याचा कुणा गवसला तळ काय साचा?॥
श्रीराम कामशतकोटि-सुरम्य-रूप। दुर्गाब्जकोटिसम वैरि वधी अमूप! ॥
तो इंद्रकोटिशततुल्य असा विलासी। आकाशकोटिसम जो अमितावकाशी ॥
जो वायुकोटिशततुल्य विशालशक्ति। आदित्यकोटिशततुल्य अनन्तदीप्ति ॥
जो चंद्रकोटिशत-शीतल तापहारी। संसारताप शमवी अतुलप्रकारीं ॥५॥
जो कालकोटिशतसाच दुरन्त होय। जो अग्निकोटिसम नित्य अधर्षणीय ॥
पातालकोटिसम जो प्रभु हो अगाध। जो कीं कराल यमकोटिसमानबाध ॥६॥
जो तीर्थकोटिसम पावनरम्य राम। यन्नाम सर्व अघकोटिंसि हो विराम ॥
श्रीराम सुस्थिर हिमालयकोटिसाच। गंभीर सिंधुशतकोटिसमान तोच ॥ ७ ॥
तो सर्व काम पुरवी भगवान् रमेश। कीं कामधेनुशतकोटिसमत्व त्यास ॥
चातुर्य ज्यांत शतकोटि सरस्वतींचें। ज्या धातृकोटिसम निर्मितिभाग्य साचें ॥
जो विष्णु-कोटिशत पालन-कार्यदक्ष। जो रुद्रकोटिसम संहरि पंकजाक्ष ॥
श्रीमंत जो धनदकोटिशतासमान। मायोपमान शतकोटिहि योग्य ज्या न!॥९॥
जो भारधारि शतकोटि अहीश ऐसा। ऐशा सुयोग्य उपमा तरि काय ईशा!॥
[आहे अगाध रघुराय, तयास साची। योग्या मनोज्ञ उपमा प्रभुमानसाची ॥]

निगम म्हणति कीं निरुपम रामा उपमा रामाविण कैंची ?।
कोटि काजव्यांसम रवि म्हणणें लघुता दावित अति त्याची! ॥
असें असुनिही निजनिजमतिच्या विलासिं हरिला गाति मुनी ॥
भावग्राहक कृपाळु विभु तो प्रेमें परिसुनि सुख मानी! ॥११॥

श्रीराम होय अमितांबुधि कीं गुणांचा। पावेल पार तरि कोण तदीय साचा?॥
संतांचियाकडुनि जें मजला कळालें। सांगावया तुजसि तें रसिका मिळालें! ॥
तो भाववश्य भगवान् सुखराशि राम। कारुण्यमंदिर मनोहर जो निकाम॥
टाकूनि मान ममता मद मानसींचे। सीतापतीस भजणें तनुचित्तवाचें १२

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे काकभुशुंडिगरुडसंवादे श्रीप्रतापप्रचण्डातिन्यूनाधिक्य-रूपकालंकारवर्णनंनाम द्वात्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २३ वा

ऐकोनि ती बहु मनोज्ञ भुशंडि-वाणी। हर्षोनि पंख खगराट् फुलवीत दोनी
अत्यंत हर्षुनि मनीं जल नेत्रिं येत। श्रीरामसुंदरचरित्र भरे मनांत ! ॥ १ ॥

पश्चात्ताप तया होय स्मरुनी मोह मागला— ॥
'अनादि ब्रह्म जो राम तो म्यां मनुज मानिला !' ॥२॥
पुनःपुन्हां कागपायीं लववी शीर्ष आदरें।
रामतुल्यचि त्या मानी अंतरीं प्रेमनिर्भरें ! ॥ ३ ॥
गुरुवाचूनियां कोण तरेल भवसागर ॥
असो कीं नर तो जैसा ब्रह्मा वा देव शंकर ॥ ४ ॥
होतों ग्रसित मी ताता ! सर्वथा संशयोरगें ॥
कुतर्कलहरीसंघीं दुःखें प्राण निघूं बघे ! ॥ ५ ॥
मिळे तव स्वरूपीं हा गारुडी रघुनायक ॥
मजला जीववी जो कीं त्रैलोक्यसुखदायक ॥ ६ ॥
तुझिया सत्प्रसादानें मोह माझा विनाशला ॥
रहस्यभाव रामाचा जाणला, ज्या नसे तुला ! ॥ ७ ॥

त्याला प्रशंसि बहुरीनि जुडोनि पाणी। वंदीतसे गरुड तच्चरणीं लवोनी ॥
सप्रेम मंजुल विनम्र विनीतभाव। तो बोलला पुढतिं निर्मल कीं अपूर्व ॥८॥
'अज्ञानचित्ति मम यास्तव मी विचारीं। स्वामिन् ! तुम्हांस; कथणें मज सत्प्रकारीं
कारुण्यसागर विभो ! मजला वदावें। जाणोनि दासचि मला अपुला सुभावें ९

सर्वज्ञ, तत्त्वज्ञ, तुम्ही विशुद्ध। तमोगुणातीत ऋजू सुबुद्ध ॥
विनिर्मलाचार रमेशभक्त। ज्ञानी सुविज्ञाननिधान संत ॥१०॥

हा देह वायस तुम्हांप्रति केविं येत ?। सांगा समस्त मज कारण जें यथार्थ ॥
श्रीरामचंद्रचरितोत्तममानसाची। ही प्राप्ति जाहलि तुम्हां कशि तें वदाचि !
हे नाथ शंकरमुखें कळलें मला कीं। नोहे तुम्हां प्रलयिंही कधिं नाश लोकीं ॥
नोहे मृषा कधिंच वाक्य उमापतीचें। मानस हें म्हणुन संशयलोल साचें !१२
त्रैलोकिंच जीव नर नाग चराचरांच। हें सर्व कालवदनामधिं होत खाद्य ॥
ब्रह्माण्डकोटि अमिता लय जो करीत। तो काल नित्यदुरतिक्रमसाच, तात !

व्यापीत ना अति करालहि काल तुम्हां। याचें वदा जि! मज कारण पुण्यसीमा!
ज्ञानप्रभाव अथवा निजयोगशक्ति। तें सांगणें जि! मजलागिं कृपालुमूर्ति १४
मी पातलों तुमचिया जंव आश्रमासी। झाली विनष्ट तंव मद्भ्रममोहराशि॥
यांचेंहि कारण मला प्रियनाथ! सांगा। माझेवरी करुनियां करुणानुरागा" १६

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे गरुडवार्ताविनयप्रश्नवर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

तरंग २४ वा

हे गौरि! ती गरुडवाक् परिसूनि काग। आनंदुनी वदत त्या अति सानुराग॥
'रे धन्य धन्य तव मानस, पक्षिराया!। स्वप्रश्न हे रुचति फारचि मन्मना या
त्वत्प्रश्न भक्तियुत सुंदर आयकोनी। गेलों भरून बहुजन्मभवस्मृतींनीं॥
गाऊन सर्व निजवृत्त तुला कथीन ! तूं ऐक सादर सख्या! मनिं सावधान॥२
विज्ञान योग दम दान शमव्रतादि। वैराग्य यज्ञ, तप, मंत्र विवेकबुद्धि॥
सर्वांस सत्फल रघूत्तमपादभक्ति। कोणासही तिजविना नच हो सुखाप्ति॥३॥
श्रीरामभक्ति मज या तनुमाजिं होय। यासाठिं हीच तनु मत्प्रिय गा! अमेय॥
हो स्वार्थसाधन जयें करुनी कसेंही। त्याचेवरीच ममता हृदयीं वसे ही!॥४
ही नीति होय गरुडा! जगतीतलांत। जी वेदमान्य तशि सज्जनमान्यरीत॥
दे आपणां परम जें हित साधुनीच। प्रीती कराविच तयीं जरि तें सुनीच॥५॥
कीटांमुळें रेशिम तें जहालें। ज्यापासुनी निर्मियलीं दुकूलें॥
अपावनां त्या कृमिना अतीव। प्राणांपरी रक्षिति लोक सर्व!॥६॥
हा स्वार्थ एकचि खरा जगिं जीवनाचा। कीं रामपायिं रति हो मनिं देहिं वाचा
तो देह पुण्य, अतिसुंदर तीच काया। जी पावुनी मन जडे प्रभुरामराया!७
लाभोनिही विधिसमा तनु, रामवैरी। ना त्या प्रशंसिति कवी बुध सद्विचारी
श्रीरामभक्ति रुजली मम या तनूंत। याकारणें परम मत्प्रिय तीच नाथ!॥८
इच्छामृती असुनिही तनु मी न टाकीं। देहाविना भजन नाहिं, वदे श्रुती कीं॥
मी आधिं मोहसलिलीं बहु आर्त झालों। रामासि मी विमुख झोंपिं सुखें न गेलों

झाले असंख्य मम जन्म, अनेककर्मीं । ते योग यागतप दानजपां करीं मी ॥
मी जन्मलों नच जियें अशि कोण योनि? केली भ्रमन्ति बहु मी फिरुनी फिरूनी
मीं पाहिली करुनि कर्मतती अनेक । आतांपरीं कधिं सुखी नच होइं देख !॥
शुद्धी असे मज असंख्याचि जन्मिची हे । शंभुप्रसादिं नच मन्मति लिप्त मोहें
सांगेन मी प्रथमजन्मचरित्र माझें । ऐकें विहंगमपते ! श्रवणीय हें जें ॥
ऐकोनियां प्रभुपदांबुजभक्ति जन्मे । होऊनि नष्ट सगळी हृदयार्तिमर्में ! ॥ १२

पूर्वीं एका कल्पीं झालें कलियुग अतीव मलमूल ॥
नरनारी सर्व जयीं वेदविरोधी, अधर्मिं अनुकूल ! ॥ १३ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे महाकाव्ये
कलिकलुषविध्वंसने उत्तरकाडे गरुडं प्रति भुशुंडिनिज–
दशावर्णनं नाम चतुर्विंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २५ वा

मीं त्या कलियुगीं येईं अयोध्येमधिं जन्मुनी ॥
होतों शूद्र, करीं भक्ति शिवाची तनुवाङ्मनी ! ॥ १ ॥
अन्य देवांसि मी निन्दीं ! अभिमानमदोद्धत ॥
अतिवादी धनोन्मत्त उग्रधी दंभपूरित ॥ २ ॥
राघवाची राजधानी वसती जरि ती मम ॥
तरी न महिमा तीचा जाणिला म्यां मनोरम ॥ ३ ॥
अयोध्येच्या प्रभावातें आतां जाणत उत्तम ॥
गातीही बहुधारीतीं पुराणें निगमागम ॥ ४ ॥
कुठेंही जन्मतां कोणीं अयोध्यावसती कृता ॥
श्रीरामपदभक्तींत होते तन्मति सद्रता ॥ ५ ॥
अयोध्येच्या प्रभावातें जीव जाणत तेधवां ॥
जेधवां वास हो चित्तीं श्रीरामा जानकीधवा ॥ ६ ॥
उरगारे ! अती उग्र होता तो कलिकाल गा ! ॥
नरनारी जियें सान्या पापाच्या होत आपगा ॥ ७ ॥

कलिपापीं लुप्त धर्म गुप्त सद्ग्रंथ जाहले ।।
खलबुद्धी दांभिकांनीं नाना पंथ विनिर्मिले! ।। ८ ।।
मोहग्रस्त मनें झालीं लोभग्रसित सत्कृति ।।
कलिधर्म वदें काहीं गरुडा ! ऐक सन्मति ।। ९ ।।

ना वर्ण धर्म नच आश्रम होति चारी। वेदां विरोध करिती नर आणि नारी।।
विप्र श्रुतीस विकिते, नृप लोकभक्षी। कोणीच मानि नच वेदहि विश्वसाक्षी ।।
जो ज्यास आवडत तो पथ तो धरीत। तो होय पंडित, करीत यथेष्ट उक्ती।।
मिथ्यातपी करित दांभिकरीति सारी। त्याचीच संत म्हणुनी झळके तुतारी! ।।
तो शाहणा, हरित जो परसंपदेसी। आचारवान् म्हणति जो जन दंभराशी ।।
जो आचरीत सगळीच लबाडि युक्ति। त्यालाच या कलियुगीं गुणवंत उक्ति ।।
आचारहीन सुटला पथ ज्या श्रुतींचा। ज्ञानी विरागि गणला कलिकालिं साचा।।
ज्याची विशाल नखपंक्ति तशा जटाही। तो ख्यात तापस असा कलिमाजिं होई।।
ज्यां वेषभूषण अमंगल सर्वरीतीं। खाणें अभक्ष्य कसलेंहि, नुरेचि नीति ।।
ते योगि, तेच नर सिद्ध कलींत हात। त्यानाच पूज्यपण लाभतसे समस्त! ।।
आचार ज्यांस दुसऱ्या अपकारकारी। त्यांनाच गौरव कलीमधिं मान भारी।।
देहें वचें मनिंहि जे अगदींच खोटे। वक्ते तयास म्हणती कलिचे चखोटे! ।।
स्वामिन् समस्त नर लपट कीं स्त्रियाशीं। ते नाचतीच नरमर्कट कामपाशीं।।
ज्ञानोपदेश करि शूद्रहि कीं द्विजास। घेती कुदान, उरिं जानवें विप्रवेष ।।१६।।
क्रोधी समस्त नर कामुक लोभबुद्धि। जे वद-विप्र-गुरु-साधुजनां विरोधी ।।
त्यागूनि आत्मपति सद्गुणि सुंदरांगी। अन्यासवें रमति कीं युवती अभागी! ।।
सौभाग्यिनी दिसति भूषणहीन दीन। शृंगार लेति विधवा ललना नवीन ।।
ते शिष्य आणखि गुरू बधिरांध दानी। ऐके न एक, दुसरा बघतो न कोणी ।।
द्रव्या हरी, परि हरी नच शिष्यशोका। ऐसे गुरू पडति कीं नरकींच देखा!।।
माता पिता निजशिशूंप्रति बोलवूनी। देती धडे उदरपूरण धर्मवाणी ।।१९।।

ब्रह्मज्ञानाविण नारीनर करिति न दुसरी भाषाही।
कवडीच्याही धनलोभानें करिती द्विजगुरुनाशाही! ।।
शूद्र भांडती विप्रजनाशीं म्हणत 'न आम्ही उणे तुम्हां।
ब्रह्म जाणतो तोच ब्राह्मण' म्हणुनि दटाविति 'रे! अधमा!' ।।२०

परस्त्रियांशीं लंपट कामी कपटाचरणी चतुर नर ।
मोहमत्सरीं लपेटलेले लोभें भरले आंत वर ॥
अद्वैतांच्या सिद्धांताचे वक्ते म्हणुनी त्या ख्याती ।
पाहत आलों, विहंगमवरा ! कलियुगकालीं हे रीती ! ॥ २१ ॥
नाशा जाती स्वतांहि नेती दुसऱ्यालाही जे नाशा ।
सन्मार्गाचें पालनकर्त्या सरल भाविका कुणा अशा ॥
दुष्टतर्कें रचुनी निंदिति पूज्य पावना श्रुतिमाते ।
कल्प-कल्पभरि नरकीं पडणें न चुके ऐशा अधमांतें ! ॥ २२ ॥
नीच वर्णिचे किरात कोळी कलार तेली कुंभार ।
श्वपच असे जन, बाइल मरतां मोडिति अपुला संसार ॥
मुंडुनि मुंडा फिरती चहुं दिशिं होउनि बाहिर संन्यासी ।
नमविति पायां द्विजां अपुलिया नाशिति इहपर-पुण्यांसी ॥ २३ ॥
विप्र निरक्षर कामुक लोलुप वृषलीपति शठ दुश्चरित ।
शूद्र करी जपदानव्रततप कथिन पुराणें रसभरित ॥
मनास वाटे तसे कल्पुनी करिती सारे आचार ।
अनीति ऐशी किति वर्णावी ? दिसत न मजला तरि पार ! ॥२४॥

हो वर्णसंकर कलीमधि सर्वरीतीं । सद्धर्मसेतु नर भंग करें करीती ॥
भोगीति तत्फल अनन्तपरीं परी ते । रे ! दुःखशोकभयरोगवियोग यांतें ! ॥
सोडोनिया श्रुतिमता हरिभक्ति पंथा । वैराग्य-नीति-शमशांति-विवेकयुक्ता ॥
ते चालती कुमति मानव दुष्ट पंथें।कल्पोनि काहिंतरि तें कलिमूढचित्तें २६

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे कलिधर्मवर्णनं नाम पंचविंशतितमस्तरङ्गः ॥

—:०:—

तरंग २६ वा

मिळवुनि दामा सजविति धामा विषयीं रत यति ना विरति ॥
गृही दरिद्री, तपी धनाढ्यहि; कौतुक कलिचें वर्णु किती ? ! ॥

कुलीन टाकी सती स्त्रियांना आणुनि ठेविति गृहिं अ-सती ।
निर्भयचित्तीं असे वागतां डावलुनीयां सुभगगती ॥ १ ॥
सुत वडिलांतें मानिति तोंवरि जोंवरि अबला कर न धरी ।
सासुरवाडी प्रिय झाल्यावरि कुटुंबजन त्या शत्रुपरी ! ॥
अधर्मरति नृप पापपरायण प्रजा विटंबिति दंडांनीं ।
मलिनहि धनिका कुलीन गणना, द्विजत्व जानविं, तप नमीं ! ॥२॥
वेदपुराणां मान देइना तो हरिभक्तचि संत खरा ।
वृंद कवींचे असुनि न वाणी उदार लाभे श्रुतिमधुरा ॥
गुणास ठेविति दोषचि सगळे गुणी न येई आढळुनी ।
दुष्काळांचा सुकाळ कलिमधिं, भुकी मरति जन कळकळुनी ! ॥ ३ ॥
ऐक खगेशा ! द्वेषकपट हठ दंभ मोहमद काम तसे ।
ब्रह्मांडासहि पाखंडादिक मान व्यापिति सर्व कसे ! ॥
धर्मेहि होतिल तामस सारे जपतप, यज्ञव्रतदान ॥
वर्षतील ना देवहि धरणीं, धान्यहि नुगवे पेरून ! ॥ ४ ॥
अबला होतिल अलकविभूषण अतिक्षुधाळू धनहीन ॥
दुःखी अतिशय ममत्वपूर्णा, कांक्षिति सुख परि मूर्खपण ॥
धर्मावरती रती न लवही अल्पबुद्धिच्या निष्करुण ॥
कोमलता नच हृदयामध्यें; कलिमधिं ऐसे अधमगुण ! ॥ ५ ॥
रोगक्लेशीं नर पिडलेले, भोग शक्य नच सेवाया ।
अभिमानी अति विरोध करिती सकल अकारण ते वायां ॥
जीवन लघु अति पंचदशावधि-वर्षकाल तें मात्र जरी ।
तरी मत्तता इतुकी हृदयीं, नाश न जणुं कीं कल्पवरीं ! ॥ ६ ॥
कलि हाल करी अशा परींनीं । अनुजा वा तनुजा न कोणि मानी ! ॥
नच तोष मनीं विचार शांति । लघु मोठे सगळेच भीक घेती ! ॥७॥
अति मत्सर रोषशब्द लोभ । अशि सर्वत्र; मिळे न साम्यलाभ ! ॥
जन सर्व वियोगि शोकि झाले । शुभवर्णाश्रमधर्म ते निमाले ! ॥८॥
न दया, नच दान, ना दमादि । नच सुज्ञानपणा वरीत बुद्धि ॥
जडता परवंचनादि वृत्ति । कलिमाजीं सकलांतरीं रहाती ! ॥ ९ ॥

सारेचि नरनारी ते कलिपोषक जाहले ॥
परनिंदा करोनीयां भरती जगतीतलें ! ॥ १० ॥

हें एक ऐक गरुडा! कलि हा कराल। आहे मलायतन दुर्गुणराशि काल॥
आहेत सद्गुणहि ते बहु या युगांत। कीं अप्रयासिंच तिथें सुटकाहि होत!

कृतामधें तारक होय पूजा। त्रेतायुगीं यज्ञ, न मार्ग दूजा ॥
द्वापारिं यज्ञें गति जी मिळे कीं, । नामें हरीच्या युगिं या, विलोकीं॥
विज्ञानी योगि सारे कृतयुगिं तरती या भवा ध्यानरीतीं।
त्रेतामध्यें करूनी बहु मख हरितें अर्पुनी होय मुक्ति ॥
द्वापारीं रामपूजा करुनिच तरणें, मार्ग नाहींच दूजा।
गावोनी मात्र रामा नर तरति भवा या युगीं, पक्षिराजा!॥१३॥
कलियुगिं साध्य न होई कवणाही योग यज्ञ वा ज्ञान ॥
एकचि आधार असे, कीं, गाणें रामचंद्रगुणगान ॥१४॥
टाकुनि अन्य भरंवसा, जे भजती सौख्यधाम रामातें ॥
तद्गुणसमूह गाती प्रेमानें आळवूनी नामातें ॥ १५ ॥
ते नर तरतिल भव हा संशय यामाजि लवहि नाहींच ॥
नामप्रताप दिसतो कलियुगिं तरि नित्य आगळा साच! ॥१६॥
कलिचाही एक असे विशेष पावन महा प्रताप असा।
पुण्य मिळे मानसही, कलिमध्यें पापमात्र ना मनसा ॥१७॥

कलियुगासम तें युग अन्य न। दृढ असा ऋजुभाव धरो मन ॥
विमल रामगुणांप्रति गाउनी। भव विनाश्रम जाय उतारुनी ॥१८॥
[युग असें दुसर न कलीविना। भरंवसा दृढ हा धरिं रे मना! ॥
विमल राघवसद्गुणगायनें। भव सरे युगिं या श्रमल्याविणें!॥१८॥]
प्रकट धर्मपदें जरि चारिही*। कलिमधें परिमुख्य दयाच ही ॥
कवणही विधिनें दिधलें तरी। खचित 'दान' हितोत्तम कीं करी!॥१९॥
श्रीराममाया हृदयात निर्मी। युगीं युगीं अन्यचि वृत्तिभूमी ॥
विज्ञान सत्त्वाश्रित साम्यभाव। कृतीं म्हणूनी मन तुष्ट सर्व ॥२०॥

---

*टीपः—सत्य, दया, तप व ज्ञान.

त्रेतायुगांत रज अल्प, अनल्प सत्त्व। यासाठिं कर्मिं रति, सर्व सुखप्रभुत्व ॥
हो द्वापरीं रज बहू, लघुसत्त्व तैसें। किंचित् तमस्त्व म्हणुनी सुखदुःख वर्षे ॥
आहे कलींत गुण तामस मात्र फार। थोडा रजोगुण म्हणोनि विरोध थोर ॥
जाणोनि सर्व युगधर्म असे मनांत। त्यागी अधर्म बुध, धर्मि रती वहात॥२२॥
हे कालधर्म नच बाधति त्याजलाच। ज्याची रती रघुपतीवरतींच साच ! ॥
जें कीं करीं कपट तो नट युक्तिशाली। ती व्यापिते न नटसेवकचित्ति भूली ! ॥

हरिमाया निर्मित ते हरिभजनाविण न जाति गुणदोष ॥
सर्वहि काम त्यजुनी, भजणें श्रीराम चित्तसंतोष ! ॥ २४ ॥
गरुडा ! त्या कलिकालीं बहु वर्षे राहिं मी अयोध्येंत ॥
पडतां दुष्काळ परी, तेथुनि मी अन्य देशिं गा! येत ॥ २५ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे कलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे कलिकालमहाघोरकर्मवर्णनं नाम षड्विंशतितमस्तरङ्गः॥

तरंग २२ वा

ऐक रे ! गरुडा ! आलों तेव्हां उज्जयिनींत मी ॥
अत्यंत दीन मलिन दुःखाच्या व्यापिलों तमीं ॥ १ ॥
गेल्यावरी काल ऐसा मिळवीं कांहिं संपदा ॥
फिरूनी तेथ मी अर्ची भक्तीनें शंभुच्या पदा ॥ २ ॥
होता विप्र तिथें एक शिवपूजक वैदिक ॥
शिवपूजा करीं नित्य न त्या कार्यहि आणिक ॥ ३ ॥
हृदयीं अति साधुत्व जाणता परमार्थिचा ॥
उपासी शंकरा प्रेमें न द्वेष्टा परमेष्ठिचा ॥ ४ ॥
ऐशा त्या ब्राह्मणा सेवीं मी मनें कपटें परी ॥
दयाळू अति तो विप्र नीतिमंदिर तो जरी ॥ ५ ॥
बाह्यतां नम्रता माझी देखोनी, विहगेश्वरा ! ।
विप्र तो पढवी मातें मी कीं पुत्रचि दूसरा ! ॥ ६ ॥

शंभुमंत्र मला देई विमल द्विजसत्तम ॥
उपदेशहि दे नाना निवाराया मनस्तम ॥ ७ ॥
मी तो मंत्र जपें नित्य शिवमंदिरिं जाउनी ॥
वृद्धिंगत परी होत दंभ गर्वहि मन्मनीं ! ॥ ८ ॥

मी नीचजाती खल पाप दुर्मति । उन्मत्ततेनें हृदयीं भरें अति ॥
मी विष्णुभक्त द्विज पाहातां जळें । द्रोही हरीचा महिमा न आकळे ॥ ९

गुरु नित्य प्रबोधीत माझिया हृदयाप्रति ॥
पाहूनि मम आचार गुरु दुःखित हो अति ॥ १० ॥
एकदा गुरुरायानें मजलागिं निमंत्रुनी ॥
बोधिली मजला नीती बोलून बहुरीतिंनीं ॥ ११ ॥

“ हें जाण ताता ! शिवभक्तिचें फल । कीं रामभक्ती मिळणें सुनिर्मल ॥
ब्रह्मा तसे शंकर, भक्त राघवा । त्याच्या पुढें थोरवि केविं मानवा ?॥१२॥
ज्याचे पदाब्जरजिं सद्रत शंभुधाते।त्या द्रोहिं दैवहतका ! शुभ कांक्षिसी तें?”
जैं कीं म्हणे गुरु ‘असे शिव विष्णुभक्त’।ऐकोनि तें खगवरा ! जणुं दग्ध चित्त!
विद्या मिळालि मज जात्यधमास ज्यातें।सर्पास दुग्ध जणु पाजविलें तसें तें॥
मानी कुजाति, कुटिलात्म कुमार्गि तो मी।झालों गुरूस रजनीदिन वैरगामी!
माझे गुरू अतिदयाळु; मुळीं न कोपी । देती सुबोधचि मला बहु ते तथापि॥
घेऊन नीचहि कुणी मिळवी महत्त्व।हट्टेंचि त्यास करि नाश, दिसेचि तत्त्व!
बा! धूम्र हा असत अग्निमुळेंचि झाला।अग्नीस तो विझवि पावुनि मेघतेला
मार्गावरीं पडलि धूळ, न मान तीतें।पादप्रहार सकलांकडुनी सहाते ॥ १६!
वारा तिला उडवि तैं पडतेच्च आधीं।राजाचिया मुकुटिं, लोचनिंही अबाधीं
पाहोनि हे खगपते ! जगतीं प्रसंग । ना शाहणे करिति कीं अधमासिं संग!
गाताति पंडित कवी अशि हे सुनीति । दुष्टांसवें कलह योग्य न वाऽनुरक्ति
व्हावें खलासह सदैवचि बा ! उदासी।श्वानां तसा परिहरो जन कीं खलांसी!

माझें सुदुष्ट हृदय कपटी कुटिलात्म तें ॥
सांगती गुरु कल्याण परी तें कटु मन्मतें ॥ १९ ॥
शिवालयीं एकदां मी होतों जपत शंभुतें ॥
आले गुरु तरी गर्वें नुठें, ना वंदिं त्यांसि तें ! ॥ २० ॥

न तें दयाळू गुरु बोललही । रोषा न त्यांच्या हृदिं ठाव कांहीं ॥
अती परी गुर्वपमानपाप । साहूं शकेनाच शिवप्रकोप ! ॥ २१ ॥
येई नभोवाग् तइं मंदिरांतुनी– । " मूढा अभाग्या ! अति गर्व ज्या मनीं
संक्रुद्ध झाले जरि ना तुझे गुरू । सुज्ञानि चित्तीं करुणामहातरू ॥ २२ ॥
तरी तुला देइन शाप मी शठा ! । साहेन ना नीतिविरोध उद्धटा ! ॥
करीन तूतें जर मी न शासन । जाईल रे ! सच्छ्रुतिमार्ग भंगुन ॥ २३ ॥
ईर्ष्या करीत जन जो गुरुशींच साच । तो रौरवीं नरकिं कोटियुगें पडेच ! ॥
त्रैलोकिंय तो सकल योनित जन्म घेत । दुःखें सहे अयुतजन्मभरीं नितान्त ! ॥
राहासि तूं अजगरासम बैसुनीच । पाप्या खळा ! अहिच हो कुमती सुनीच॥
मूढा ! महाविटपकोटरिं राहशील । पावोनियां अविमला गति पापशील" ॥२५॥

हाहाःकार गुरुमुखीं आला शिवशाप उग्र ऐकोन ॥
मज कंपिता बघोनी गेल तद्हृदय दुःखभरिं भरुन ॥ २६ ॥
सप्रेम द्विज घाली दंडवत प्रभुसमोर बद्धकर ॥
प्रार्थी सगद्गदगिरा जाणुनि मम भव्य घोर गतिनिकर ! ॥ २७ ॥

"नमो ईश ईशान सौख्यस्वरूपा ! । विभो ! व्यापका ब्रह्मवेदा अमूपा ॥
स्वयं निर्गुणा निर्विकल्पा निरीहा । चिदाकाश आकाशवासा अनीहा॥२८॥
निराकार ॐकारबीजा तुरीया । नमो इंद्रियातीत देवाधिराया ! ॥
कराला महाकालकाला कृपाला ! । गुणाढ्या भवांभोधिपारा दयाळा ! ॥२९
तुषाराद्रिगौरा मनोज्ञा गभीरा । नमूं कोटिकामाहुनी रम्यसारा ॥
जया शीर्षभागा मनोहारिगंगा । नमो भालबालेन्दुभूषाप्रसंगा ॥ ३० ॥
चलत्कुंडला शुभ्रनेत्रा विशाळा । प्रसन्नानना नीलकंठा दयाळा ॥
धरी सिंहचर्मांबरा मुण्डमाला । नमूं शंकरा नाशितान्तस्तमाला ॥ ३१ ॥
प्रचंडा प्रकृष्टा प्रगल्भा परेशा । अखंडा अजा कोटिसूर्यप्रकाशा ॥
मनःशूलनिर्मूलना शूलहस्ता । भवानीपते ! नाशिं दुःखां समस्तां ॥ ३२ ॥
नमूं सर्वकल्याणकारी अनन्ता । सदा सज्जनानन्ददा हे पुरान्ता ॥
शिवा सच्चिदानन्ददोहा विमोहा । स्मरान्ता ! नको विस्मरूं भक्त कीं हा ॥
तुला भावगम्या उमानाथ ! लोक । न वंदीति तों केविं व्हावे अशोक ? ॥
प्रभो ! सर्वभूताधिवासा गिरीशा । सदा दे सुतोषा विनाशीं दुराशा ॥३४॥

स्तुतीही तुझी केविं गावी यथार्थ ? । न योगीं जपीं पूजनीं मी समर्थ ॥
जराजन्मदुःखार्त जीवास ईशा । प्रभो ! रक्ष रे ! वंदितों आशुतोषा !" ॥३५॥
रुद्राष्टका म्हणत विप्र सभक्ति ऐशा । जें होय तत्क्षणिंच शंकरचित्ततोषा ॥
गातील जे नर हरस्तुति ही सुभावीं । त्यांना प्रसन्न गिरिजावर हो न केवीं ?
ऐकूनि ती स्तुति बघूनिहि विप्रभक्ति । सर्वेश शंकर अतीवचि तुष्ट चित्तीं ॥
ये मंदिरांतुनि नभोवच याप्रकारें-।"आतां मला द्विजवरा ! वर माग कीं रे!"
सांगे द्विज "प्रभुवरा ! जर तूं प्रसन्न । माझ्यावरी असिस दीनदयाळ पूर्ण ॥
द्यावी मला निजपदांबुजभक्ति एका । द्यावा जि ! अन्यवर एक असाहि ऐका-
मायेमुळें तुमचिया, जडजीव लोकीं । राहे सदा फिरत मूढपणीं विलोकीं ॥
न क्रोध त्यावरि करा भगवन् महेश !। कारुण्यसागर उमावर आशुतोष ३९
हे दीनवत्सल विभो ! करणें कृपा या । दीनावरी, धरित मी प्रभुवर्य पायां ॥
व्हावा जि ! शंकर अनुग्रहरूप शाप । थोड्याच कालिं अशि हो करुणा अपाप॥
कल्याण याप्रति अनंतपरीं जयानें । ऐसा प्रसाद करणें करुणानिधानें ! ॥
ऐकोन विप्रवच तें उपकारपूर्ण। वाणी 'तथाऽस्तु!' अशि होय नभामधून ॥
"केलें असे जरि तयें अति घोरपाप । कोपूनि मीं जरि दिलाचि तयास शाप ॥
साधुत्व पाहुनि तुझें परि हें नितान्त । याचेवरी करिन मी स्वकृपा अनन्त
जे कीं क्षमाच करिती, उपकारि जे जे । ते हे द्विजा! प्रिय मला जणुं राम माझे! ॥
जाईल नैव मम शाप कधींच वायां । लागेल यास जगिं जन्मसहस्र याया ४३
हो जन्ममृत्युसमयीं जरि दुःख थोर । याला न अल्पहि तसें परि वाटणार ! ॥
या ज्ञानलोप नच होय कुण्याहि जन्मीं । हे शूद्र ! ऐक मम वाक्य वदेन जें मी
श्रीरामचंद्रनगरीं तव जन्म झाला । मत्सेवनांत करिशी रत मानसाला ॥
माझ्या कृपें नगरिंच्याहि तसें प्रभावें । श्रीरामभक्ति हृदयीं तुझिया ठसावे ४५
हें तात ! ऐक मम वाक्य सदैव सत्य । दे विप्रपूजन हरिप्रति तोष नित्य ॥
विप्रापमान कधिं तूं करणें न आतां । मानीं अनंतसम संतत साधुसंतां ! ४६
जें इंद्रवज्र अथवा ममहि त्रिशूल । कीं कालदंड हरिचक्रहि वा कराल ॥
यांच्या प्रहारिंहि न जो मरणार कोण । तो विप्रमत्सरदवीं जळणार तूर्ण !४७
ऐसा विवेक धरिं तूं निज मानसांत । ना या जगीं तुजसि दुर्लभ कांहिं होत ॥
मी आणखीहि तुज देत अशीच आशी। निर्बाध राहिल तुझी गति सर्व देशीं"

ऐकोनि शंभुवच तें गुरु हर्षे 'एवमस्तु' हें वदले ॥
बोधुनि मज ते गेले स्वगृहा शिवपद धरूनि हृदयिं भले ॥४९॥
कालें प्रेरियला मी विंध्यगिरीमाजिं जाहलों व्याल ॥
आयासाविण तीहीं तनु मीं टाकीयली यथाकाल ॥५०॥
जी जी तनु मी घेई ती ती टाकींहि मी अनायासें ॥
परिरावें नव वसना परिहरुनी वसन तें जुनें जैसें ! ॥५१॥
रक्षीयले श्रुतिपथा शिवशंकरानें । मत्क्लेशही सकल तो सहजीं लया ने ॥
ऐशा प्रकारिं विविधा तनु घेतल्या मीं । न ज्ञानलोप मम हो कुठल्याहि जन्मीं !
॥ इति श्रीसुश्लोकमानसे कलिकलुषविध्वंसने उत्तरकाडे शिवशापानुग्रह-गुरुकृपावर्णनं नाम सप्तविंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २८ वा

तिर्यक् तनू, सुरतनू, नरदेह वा मी । जों जों धरीं असत मी रत तेथ रामीं ॥
मी ना कधीं विसरलों परि एक मूल । कीं सद्गुरू किति दयार्द्र सुभावशील! ॥
माते लाभे पुढती ब्राह्मणजनु धर्मदेह, भाग्यानें ॥
देवासहि दुर्लभ जो गाइयला श्रुतिपुराणिं बहुमाने ॥ २ ॥
मी तेथ खेळें जमवून मेळे । जे बालकांचे गमले रसाळे ॥
करीत मी राघव-रम्य-लीला । ज्या घालवीती झणिं हृन्मळीला ॥३॥
मी प्रौढ होत मज तो शिकवीत तात । ऐकोन जाणत परी रुचि ना मनात ॥
गेल्या मनांतुनि समस्तहि वासनाच । हो रामपादकमलीं रति मात्र साच !४
तूं सांग कोण विहगेश ! असा कुदैवी । जो कामधेनु दवडूनि खरीस सेवी !
मी प्रेममग्न मज काहिंच ना रुचे ते । सांगून सांगुन मला त्यजिलेंचि तातें !
होतांच कालवश ते मम तात माता । गेलों वनीं भजत विश्वपित्या अनन्ता ॥
जेथें जिथें विपिनिं लाभत ते मुनीश । जाऊनि आश्रमिं तया नमवीं स्वशीर्ष
मी त्या विचारित रघूत्तमकीर्तिगाथा । ते सांगती मुदित मी परिसें समस्तां ॥
श्रीरामकीर्ति अशि ऐकत मी फिरें हा । शंभुप्रसादिं मम ना गतिरोध केव्हां ॥
गादैषणा त्रिविधही सुटल्या मदीय । हे लालसा हृदयिं वृद्धिमतीच होय ॥
श्रीरामपादकमलें जंव मी बघीन । तेव्हांच जन्म मम धन्य गणीन पूर्ण ॥८

ज्या ज्या पुसें मुनिसि मी, कथि तो असें कीं।'हो सर्वभूतमय ईश्वर हें विलोकीं'
ना तों रुची मजसि निर्गुणवर्णनाची। जें ब्रह्म हो सगुण तें मज आवडेचि!
मातें स्मरोनि गुरुवाक्य, मनीं मदीय । होई रघूत्तमिं रती जगतीं अमेय ॥
मी गात गात रघुनाथयशा फिरावें । मातें प्रतिक्षण रघूत्तम आवडावें १०

मेरुशृंगीं वटच्छाये बसल्या मुनि लोमशा ॥
पाहूनि वंदुनी पायीं वचा बोलत दीनशा ॥ ११ ॥

ऐकोनि माझी मृदु लीन वाणी । मुनी कृपाळू मजला बघोनी ॥
विचारि तो सादर चित्त मातें । " आलास कां गा द्विजवर्य ! येथें ? "१२
तेव्हां म्हणालों " तुम्हि सर्व जाणते । आहां कृपासागर सुज्ञ मन्मतें ॥
ब्रह्मास कैसें सगुणा उपासणें ? । सांगा मला जी ! भगवन् कृपागुणें"॥१३॥
तेव्हां मुनींशें रघुनाथ-सद्यशें । गाईयलीं सादर कांहिं सद्रसें ॥
विज्ञानि सद्ब्रह्मरत प्रबुद्ध ते । मलाहि मोठा अधिकारि मानते ॥१४॥
ब्रह्मोपदेश मजला करिती मुनीश । " अद्वैत निर्गुण अनादि न रूप ज्यास ॥
जें कीं अगम्य अविनाशि सुखात्मराशि । जें निर्विकार कळतें नच इंद्रियांसी
जें वागतीत नच नाम, अनीह तेंसें । जें कीं अखंड उपमा नच ज्या विलासे ॥
ज्यातें नसे अवधि, निर्मल जें विशुद्ध । जें गम्य हो अनुभवाप्रति साधुसिद्ध ॥
तें ब्रह्म तूंच, तुज-त्यांत नसेचि भेद । कीं वारि आणि लहरी कथितात वेद"
घाली मुनीश बहु हे समजूत माझी। चित्ता मदीय परि निर्गुण ना कळे जी!
मी तैं फिरूनि वदलों नमुनी पदांस । मातें वदा जि! सगुणार्चन तें मुनीश!
श्रीरामभक्तिसलिलीं मन मीन व्हावें । त्यांतून हें विलग केविं बरें रहावें ? १८
तेव्हां दया करुन तो उपदेश द्याच। जेणें बघेन निजलोचनिं राम साच !॥
डोळे भरून रघुराय बघेन जेव्हां । ऐकेन निर्गुण सुवागुपदेश तेव्हां ! " ॥
सांगे पुन्हां हरिकथा मुनि तैं अमूप । खंडोनिया सगुण, निर्गुण मांडि रूप ॥
तैं मीहि निर्गुण मताप्रति दूर लोटीं । मांडीत मी सगुणरूपाचे फार हट्टीं !
प्रत्युत्तरें करित मी बहु उत्तरांतें । संक्रुद्ध होत मुनि लोमश तैं स्वचित्तें ॥
ऐकें प्रभो ! [illegible] घडे अवशा । शान्याचियाहि उपजे हृदिं रोष सुशा !
अतिमात्रचि कीं केलें संघर्षण कुणी जर ॥
प्रकटीलचि अग्नीतें ग्रांतही चंदनांतर !! ॥ २२ ॥

बारंवार सकोप होउनि मुनी सांगे मला ज्ञानचि ।
मी माझ्याच क्षोभि आसनिं मनीं नानानुमानें रची ॥
क्रोध द्वैतमतीविना कुठुनि ये ? अज्ञानज द्वैतधी ।
मायावश्यचि होय जीव जड, ये ईशत्व जीवा कधीं ?। ॥२३॥

जो सर्वसौख्यद तयाप्रति दुःख केवीं ?। ज्याला असे परिस तो न दरिद्रि तेवीं ॥
द्रोही दुज्यास, कधिं निर्भय काय राही ?। कामी कलंकविण राहिल केविं तोही ॥
विप्रापमान करतां कधिं वंश राहे ?। ज्ञानें टिकेल नच कर्महि तेविं पाहें ॥
राहील केविं सुमती खलसंग होतां। पावेल केविं सुगती परदारकर्ता ? ॥२५॥
केवीं पडेल भविं जो परमार्थवेदी। होईल केविं सुखि जो दुसऱ्यास निन्दी ?॥
राहेल राज्य कधिं काय विना सुनीति। कां पाप राहि भजतां हरिसद्यशें तीं ?
पुण्याविना सुयश पावन लभ्य काय ?। पापाविना कधिं तरी अपकीर्ति होय? ॥
आहे न लाभ हरिभक्तिसमान अन्य। जी मानिली सुजनिं वेदपुराणिं धन्य
पावोनिही नरतनू भजणें न रामा। ऐसी न हानि गरुडा! जगतीं असीमा! ॥
दुष्टत्व-तामसगुणांसम पाप नाहीं। नाहीं दयेसरिस उत्तमधर्म पाहीं!" ॥२८॥
ऐशापरीं अमितयुक्ति मनीं विचारीं। ना आदरें मुनिसदुक्तिस मानिं भारी ॥
मी घेइं जो सगुणपक्ष पुनःपुन्हांही। तो बोलला मुनि सकोप अशा वचांहीं ॥२९
"मूढा! तुला शिकविं उत्तम; मानिसी न। तूं उत्तरा करिसि उत्तर ऊलटून! ॥
विश्वास ना करिशि सत्यवचीं मदीय। सर्वांसि भीतियुत वायससाच काय ?
दुष्टा! स्वपक्षचि तुझ्या हृदयीं विशाल। चांडाळ पक्षि झणिं हो; नच यास वेळ!"
मीं घेतला स्वशिरिं तो नमुनीच शाप। वाटे न भीति, नच दीनपणा, न ताप ॥
झालोंच मी त्वरित काग, न त्यास वेळ!। वंदीत मी मुनिपदांबुज भक्तिशील
चिंतूनि राम रघुवंशमणी मनांत। हर्षेंचि मी उडुनि जात नभोऽगणांत! ॥३२॥
जे होति गौरि! रघुनाथपदाब्जभक्त। न क्रोध—काम—मद ज्यांप्रति मानसांत ॥
जे पाहती प्रभुरघूत्तमपूर्ण विश्वा। त्यांचा असेल तरि काय कुणाशिं दावा ?॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे द्विजलोमशसंवादे परस्परोत्कर्षमतवर्णनं नाम द्वाविंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग २९ वा

ऐकें खगेश ! नच हा ऋषिदोष कांहीं । सर्वांसि चालक हृदंतरिं राम राही ॥
तो भूलवीत मुनिधीस दयांबुराशि । मद्भक्तिचें करि परीक्षण चित्सुखासी ॥१॥
जाणोनि वाक्तनुमनीं मज आत्मदास । रामें पुन्हां फिरविलें मुनिच्या मनास ॥
पाहोनियां सहनशीलपणा मदीय । विश्वास रामपदपद्मिं तसा अमेय ॥ २ ॥
तो विस्मयें मुनि मनीं अति दुःखि होत । बोलावुनी मजसि सादरचित्त घेत ॥
नानापरीं मजसि तोषवि सांत्वनांनीं । दे राममंत्र मज अंतरिं तोषपूर्णी ॥३॥
तो ध्यान वर्णि मज बालकरूपराम । विद्वान् दयानिधि मुनी करुणाभिराम ॥
आधींच मीं तुजसि वर्णियलें असें तें । जें आवडे मजसि संतत भक्तिचित्तें ॥४॥
ठेवूनि घेइ मुनि तो मज काळ काहीं । वर्णीत रामचरितोत्तम–मानसाही ॥
सप्रेम ऐकवि मला सगळी कथा ती । बोलेहि तो मुनि मला अति मंजुलोक्तीं ॥५॥
"हें गुप्त मानसचरित्र रघूत्तमाचें । वत्सा ! मिळे मजसि शंभुकृपेंचि साचें ! ॥
जाणोनि तूं दयित भक्तचि राघवाचा । म्यां गाइलें तुजसि पावन हें स्ववाचा ॥
ज्याच्या हृदीं नच असे मुळिं रामभक्ति । ताता ! नकोचि वदुं त्याप्रति हे सदुक्ति
नानाप्रकारिं मुनिवर्य मला कथीत । मी आदरें मुनिपदांबुजिं नम्र होत ॥७॥
स्पर्शोनि मस्तकिं मला निजपाणिपद्म । आशीर्वचें मजसि दे मुनि हर्षसद्म ॥
श्रीरामभक्ति अति गाढ तुझ्या हृदब्जीं । माझ्या प्रसादिं नित राहिल सौख्यदा जी
होशील तूं प्रिय सदैवचि रामचंद्रा । वैराग्य-बोध-गुणमंदिर धी-समुद्रा ! ॥
निर्मान, काममरणी, निजकामरूप । होई प्रभाव तव सर्वपरीं अमूप ! ॥९॥

तूं आश्रमीं ज्या वसशील भक्ता ! । चिंतीत रामा प्रभुला अनन्ता ॥
व्यापी अविद्या लवही न त्यातें । सभोंवतीं योजनिंही कदा ते ॥१०॥

जे काल कर्म गुणदोष तसा स्वभाव । यांचें न दुःख तव चित्ति करील ठाव ॥
नानाविधा ललित राम-रहस्यजातें । जीं कीं पुराणिं इतिहासिं निधानभूतें ॥
तीं गुप्त वा प्रकट होतिल बुद्धिगामी । भक्ती जडोनि तव नित्य नवीन रामीं ॥
इच्छा असेल हृदयामधिं जी त्वदीय । ती सर्व पूर्ण करणारचि रामराय ॥१२॥
आशीर्वचें परिसुनी गरुडा ! सुधीरा । अलोकि होय गगनांतुनि कीं गभीरा ॥
"होवो असेंचि, वदलां मुनि सन्मतीं जे । हा काय वाङ्मनसिं भक्त मदीय साजे ।"॥

ती ऐकुनी गगनवाग् मज हर्ष होय । येई भरून उर, संशय दूर जाय ॥
मी प्रार्थुनी मुनिवरासि निरोप घेई । तद्‌पादपद्मिं कितिदा लववोनि डोई ! ॥
हर्षेचि येइं मग मी मग आश्रमा या । श्रीशप्रसादिं वर दुर्लभ पावुनीयां ॥
येथें बसोनि मजला, खगराज! ऐक । गेलेचि कल्प विस आणिक सात देख ! ॥
मी नित्य आचरिं रघूत्तमकीर्तिगान । हे आदरें परिसतात विहंग सुज्ञ ॥
साकेतिं राम रघुवीर यदा यदा तो । भक्तार्थ मानवतनू अवतार घेतो ॥१६॥
त्या त्या सुधन्य समयीं प्रभुच्या पुरीला।जाऊनि सौख्यिं बघिं राघव-बाल-लीला
हृत्पद्मिं राखुनि शिशूत्तमराममूर्ति । मी येइं आश्रमि मदीय सुखात्मचित्तीं ॥
केलें निवेदन तुला सगळेंचि वृत्त । ज्याकारणें मजसि वायस देह आप्त ॥
मी प्रश्न सर्वहि तुझे कथिले तुला गा ! । श्रीरामभक्ति किति थोर तया प्रसंगा ॥
हा देह वास्तवचि मत्प्रिय फार होय । कीं रामरायपदिं भक्ति जडे अमेय ॥
लाभे मला सुखहि मत्प्रभुदर्शनाचें । जावोनि सर्व मम संशय चित्त नाचे ! ॥
मी भक्तिचा धरित पक्ष असा हठानें होऊनि शप्तहि तसा मुनिच्या मुखानें ॥
मी मेळवीं वर सुदुर्लभही मुनींना । भक्तिप्रताप कवणासहि वर्ण्य हो ना ! ॥२०

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुषविध्वंसने उत्तरकांडे काकभुशुंडि-गरुडप्रश्नोत्तरवर्णनं नामैकोनत्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग ३० वा

जाणोनि भक्ति अशि ही त्यजुनी तियेला । ज्ञानार्थ केवळ परिश्रमि जो जहाला॥
तो कामधेनु गृहिं पातलि मंद टाकी । शोधीत अर्क फिरतो पय मेळवूं कीं ॥१॥
ऐकें खगेश ! हरिभक्तिस जे त्यजोनी । पाहाति सौख्य मिळवूं भलत्या प्रयत्नीं ॥
ते मूर्ख, सागर महान्, तरणीविनाच । पाहाति हातिं तरण्या परपार साच !"॥
हे गौरि ! ऐकुनि भुशुंडिवचा सुसारा । बोले प्रहर्षुनि खगेश गिरा विनम्रा ॥
"नाहीं प्रभो! मम उरीं तुमच्या प्रसादें । शोका भ्रमा स्थल, न संशयमोह नांदे॥
मीं ऐकिलें तव कृपें तुझियाकडून । श्रीरामसद्‌गुणगणां हृदिं शांतिपूर्ण ॥
मी एक आणखि विभो ! पुसतों विनीत । तें सांगणें समजवून दयार्द्रचित्त ॥४॥
गातात तत्त्व मुनिवेदपुराणसंत । ज्ञानासमान नच दुर्लभ कांहिं होत ॥
तें ज्ञान सांगत तुम्हां मुनिवर्य, नाथा! । कां भक्तिसें तुम्हि न तें वरिलें स्वचित्तां

हो ज्ञानभक्ति मधिं अंतर केतुकें तें ?। तें सांगणें मजसि सर्व कृपानिकेतें!" ॥
ऐकोनियां गरुडवाक्य सहर्ष काग। अत्यादरें वदत सुज्ञ मनोज्ञभाग ॥ ६ ॥
"ज्ञानांत भक्तित नसे लवमात्र भेद। दोनीहि नाशितिच संसृतिजन्य खेद ॥
नाथा ! कथीति मुनि भेदहि त्यांत कांहीं। तूं लक्ष्य देउनि खगेश्वर त्यांसि पाहीं
विज्ञान वा ज्ञान विराग योग। सारेचि होती पुरुषात्मवर्ग ॥
हो पौरुषाचा प्रबल प्रताप। स्त्रिया स्वभावें दुबळयाच खूप.॥८॥
जे कीं ज्ञान विराग योगहि तसे विज्ञान सारें जण।
होती हे हरिवाहना! पुरुषचि प्रख्यात त्यांचे गुण ॥
सर्वांरीतिं असे बलिष्ठ पुरुष क्रांतिप्रतापगळा।
बाला त्या अबलाचि दुर्बल जडा, तद्धर्म हो वेगळा ! ॥ ९ ॥
नारीप्रतीं, पुरुष जो मतिधीर कोण। त्यागूं शके, जर असेल विरक्तिपूर्ण ॥
ऐसें करूं नच शके विषयात्मकामी। जो अंतरीं विमुख रामपदाब्जमर्मी ॥१०॥
तो ज्ञानराशिहि मुनी मृगलोचनेचें। पाहोनियां विधुमुखा हृदयांत नाचे ॥
होतोच तो विकल पंचशरप्रहारें। मायास्वरूप जगतीं युवतीच कीं रे !॥११॥
ना पक्षपात करतों, कथितों यथार्थ। जें सांगती स्वमत वेदपुराणसंत ॥
मोहूं शके न युवती युवतिस्वरूपीं। हें जाणसीच गरुडा ! कथिं मी तथापि ! ॥
माया तशीच हरिभक्ति तुम्हांस ठावी। नारीसवर्ग उभया सहजस्वभावीं ॥
त्यांतूनि आवडति भक्ति रघूत्तमातें। माया खरोखरचि बापुडि नर्तकी ते !
पाहूनि भक्तिसि सदा अनुकूल राम।माया असे मनिं भिऊनि तिला निकाम
श्रीरामभक्ति अतुला निरुपाधि ऐसी। नांदे जयाहृदयिं संतत निर्विनाशी
त्याला बघून मनिं संकुचतेच माया।दावी न त्या निज बलाढ्यपणासि वाया
विज्ञानिंही मुनि अशाच विचारिं सत्य।प्रार्थीति भक्ति विमला सुखखाणि नित्य!
हें सत्यसार सुरहस्य न जाणताती। कोणीहि सत्वर जगत्रितयीं समस्तीं ॥
जाणेल जो परि रघूत्तमसत्प्रसादें। स्वप्नांतही नच तयाप्रति मोह बाधे! १६
तूं ज्ञानभक्तींमधला विभेद रे !। आणीकही ऐक खगेश्वरा ! बरें ॥
ऐकोनि तो, रामपदांबुजीं रती। राहे अविच्छिन्न सदा विराजती १७

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे ज्ञानभक्तिसबाध्याबाध्यभेदवर्णनं नाम त्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग ३१ वा

ही ऐक तात ! जरि गोष्ट न सांगण्याची।जाणायची अनुभवें, वदवे न साची!
हो ईश्वरांश अविनाशि असाचि जीव।चैतन्ययुक्त सुविशुद्ध सुखात्मभाव १

तो होय मायावश हे खगोत्तम ! । हो बद्ध की तो शुकमर्कटोपम ॥
ही गांठ बद्धा जड-चेतनांमधें । मृषा, परी ना उकलावया बधे!॥२॥
हा जीव संसारि तिथून जाहला । ग्रंथी सुटेना, सुखही न त्याजला ! ॥
पुराणवेदीं कथिले उपायही । दृढाचि होई अधिका, सुटे न ही ! ॥३॥

जीवाचिया हृदयिं मोहतम प्रगाढ । ग्रंथी सुटे कसाचि ? ना दिसतेहि द्वाड !
आणील ईश्वर असा जर गोड योग । तेव्हांच ती सुटलि तों सुटणार सांग !
श्रद्धा सुसात्त्विक अशी सुरभी सवत्सा।आली जर प्रभुकृपें हृदयाधिवासा ॥
जे कीं अनेक नियमव्रत मंत्र योग । सांगितले श्रुतिगणीं करणीय चांग॥५॥
ते मानुनी जर हरित्तृण ती चरेल।सद्भाववत्स शिशु पाहुनि पान्हवेल ॥
बांधोनि पाय दृढ रज्जुनिवृत्तियोगें। केलें जर स्थिर तिला सदयांतरंगें ॥६॥
विश्वासपात्रिं मग निर्मल निर्विकल्प । काढील धारमन हा हरिभक्त गोप ॥
लाभेल दुग्ध परमोत्तमधर्मराशि । निष्कामवह्नि जर तापवि कीं तयासी ७
घाली क्षमा निववित्या जर तोषवात।त्यातें जरी विरजवील धृती सुशांत ॥
आनंदवृत्ति जर माठ, विचार मंथा।केलें तसें घुसळलांव दमाख्य पंथा! ॥
घेऊनि रज्जु ऋजु सत्य सुरम्य वाणी।काढीयलें मथुनियां नवनीत लोणी ॥
वैराग्यरूप अतिपावन जें विराजे । अत्यंत निर्मल मनोहर पुण्य तेजें ॥९॥

योगाग्नि प्रकट करुनि जाळुनि कर्में शुभाशुभ समस्तें ॥
ममता मल जाळोनी ज्ञानघृता बुद्धि शुद्ध निववीते ॥ १० ॥
विज्ञानरूपिणी धी निर्मल घृत भरिल चित्त-समईत ॥
ठेवुनि दृढ समतेची दिवटी तैशीच चारु बनवीत ॥ ११ ॥
त्रिगुणात्मक कापुस जो तीन अवस्थांसवें धरूनि करीं ॥
सूत्र तुरीयावस्थारूप करुनि वात गाढ जाड करी ॥१२॥
ऐशारीतीं लाविल जर कां विज्ञानदीप तेजाचा ।
ज्यातांच ज्यासमीपहि जळत मदादिक समूह शलभांचा ! ॥ १३॥

की सोऽहमस्मीति अखंडवृत्ति । शिखा प्रचंडा जणुं त्या दिव्या की ॥
सुखात्मभूतिप्रद सुप्रकाशें । संसारभेदभ्रम सर्व नाशे ! ॥ १४ ॥
जो कीं अविद्यापरिवार थोर । मोहात्म अंधार निमेचि शीघ्र ॥
बुद्धीस तेव्हां मिळुनी सुदीप्ति । ग्रंथीस त्या सोडवि ती ह्दन्तीं ! ॥१५

ग्रंथी सुटेल जर कां सगळी कशीही । होईल जीव कृतकृत्य क्षणींच पाहीं ॥
ग्रंथी असे सुटत हें कळतांच माया । आणीत विघ्नतति ती बघ पक्षिराया॥
प्रेरीत ती बहुपरीं मग ऋद्धिसिद्धी । ज्या लोभवूनि बहु मोहवितात बुद्धि॥
लालूच-शक्ति-कपटीं जवळीं रिघूनी।त्या दीप मालविति अंचलवारियांनीं!!
होईल बुद्धि जर कां परमप्रवीण । ढुंकूनही बघि न त्यां अघ ओळखून ॥
निर्विघ्न त्यांतुनि सुटे जर बुद्धि ऐशी।आणीति विघ्नतति देव किती तियेसी!!
नाना गवाक्षसम भासति इंद्रियें हीं । त्या दारिं दारिं बसल्या नित देवताही
कीं पाहती विषयवात तयांत येत । द्वारें सताड उघडूनिच त्यास देत !!॥
येतांच तो ह्रदयमंदिरिं थोर वारा । विज्ञानदीप ह्रदिंचा विझणार सारा!॥
ग्रंथी न ती सुटलि! दीप्तिहि लुप्त झाली।तैं बुद्धिही विषयवातिं सुदीन केली
न ज्ञान आवडत इंद्रियदेवताना । भोगांत त्यांस रुचि वैषयिकांत नाना ॥
बुद्धिप्रती विषयवात करीत दीन । तेव्हां फिरूनि उजळील दिव्यास कोण ?
हा संसृतींत अति पीडित होत जीव । नानापरीं भ्रमुनि पावत ना उपाव॥
ही दुस्तराच अति भासत ईशमाया । कैशी तरावि कठिनात्मचि पक्षिराया!

ज्ञान कठिण सांगाया, समजाया कठिण कठिण साधाया ॥
त्यांत घुणाक्षररीतीं लाभे तारे संकटें अमित गा या ॥ २३ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे नीरसज्ञानदीपकवर्णनं नामैकात्रिंशतितमस्तरङ्गः ॥

—:०:—

तरंग ३२ वा

हा ज्ञानमार्ग जणुं काय कृपाणधार । तीच्यावरून पडण्या नलगे उशीर !
निर्विघ्नरीतिं जर हा पथ कोणि लंघी । कैवल्यलाभ न तया चुकणार वेगीं १

कैवल्यसंपद् सुदुर्लभ नित्य होत । हें सांगती निगमशास्त्र पुराण संत ॥
श्रीरामरायभजनीं रत जो नितान्त।मुक्ती अनीप्सितचि निश्चयिं त्या वरीत !
जैसें स्थलाविन न राहिच वारि कोठें।केले उपाय शतकोटिहि कोणि मोठे ॥
तैसेंचि मोक्षसुखही विहगाधिनाथ! । भक्ती त्यजून हरिची कधि ना रहात!
ऐशाविचारिं हरिभक्त विवेकवंत । मुक्तीस सोडुनिच भक्तिसि लुब्ध होत ॥
भक्ती करीतअसतां सुख सर्वरीतीं । श्रीरामचिंतनिं सुनिर्मल चित्तवृत्ति ४

यत्नप्रयासाविण भक्तिमार्गीं । नाशे अविद्या भवमूल वेगीं ॥
तें जेवणें भोजनतृप्तिसाठीं । विपाककारी जठराग्नि पोटीं ! ॥५॥

ऐशी सुगम्य सुखदा हरिभक्ति होत।तो कोण मूढ, नच ज्या रुचते मनांत ?
ऐकें खगेश ! भव हा तरणें असेल । त्या सेव्यसेवकपणा उपकारशील ! ॥६
सिद्धान्त हा हृदयिं वागवुनी सदैव । श्रीरामपादकमला भजणें सुभाव ॥
जो चेतना जड करी, जड चेतनातें।रामास त्या भजति सन्मति धन्य की तें

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे ज्ञानदीपक-नीरसमुक्तिभेदवर्णनं नाम द्वात्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग ३३ वा

म्यां ज्ञानतत्त्व तुजला समजावियेलें । आता वदेन बल भक्तिमणींत ठेलें ! ॥
चिंतामणीच अतिसुंदर रामभक्ति।ज्याच्या हृदीं निवसली गरुडा! शुभा ती
दिव्यप्रकाश दिनरात तया हृदन्तीं । ना दीप मागत घृता अथवा न वाती
दारिद्र्य मोह जवळींहि न त्यास येती।ना लोभ-वात विझवील तदीय दीप्ति॥
गाढांधकार तम राहिल ना अविद्या । तो हारवीतचि सदा शलभां मदाद्या॥
कामादि दुष्ट निकटींहि न त्यासि येती।ज्याच्या असे हृदयमंदिरिं रामभक्ति
होई अरीहि हितसा, विषही सुधेसें । ना त्या मणीविण कुणासहि सौख्य वसे
त्या व्यापिती न लव, मानस रोग दुष्ट।ज्यांच्यामुळें सतत भोगित जीव कष्ट!
हा रामभक्तिमणि यद्हृदिं वासकारी । स्वप्नींहि दुःखलवलेश तया सुदूरीं ॥
जे या मणीस्तव करीति सुयत्न भारी । विश्वांत ते चतुरशीर्षमणी शरीरी ॥५

आहे मणी प्रकट तो जरिही जगांत । रामप्रसादविण लभ्य कुणा न होत ।
तत्प्राप्तिचा सुगम होय उपाय लोकीं।लाथाडिती परि तया हतभागि जे कीं!
ते पुण्यपर्वताचे वेदपुराण मूर्त । खाणीच राघवकथा रुचिरा तयांत ।।
ते संत तज्ज्ञ, कुदळी सुमती खणाया।ते ज्ञान आणखि विराग सुनेत्र साह्य
सद्भावयुक्त हृदयें नर शोधि कोणी।त्यालाच भक्तिमणि लाभत सौख्यखणी!
विश्वास हाच हृदयीं मम हो खगेश !।रामाहुनीहि बहु थोरचि रामदास !
श्रीराम सिंधु, तर सज्जन मेघ धीर। श्रीराम चंदनचि, सज्जन हे समीर।।
हो सर्व साधनफलोत्तम रामभक्ति । संतांविणा नच कुणासहि लभ्य होती !

ऐशा विचारिं धरती नर जे साधुसंगति ।।
त्यांनाच सुलभा जाण विहंगा ! रामभक्ति ती ! ।। १० ।।

क्षीराब्धि तें ब्रह्म गमे मनाला । जे ज्ञान तो मंदर मंथनाला ।।
येती जणों देवचि संत कीं ते । कथासुधा भक्तिमधू मथीते !।।११।।

वैराग्य ढाल, खड्ग ज्ञान, तयें लोभमोह रिपु वधुन ।।
विजयी होणे हीच श्रीहरिभक्ती खगेश्वरा ! जाण !" ।।१२।।

।। इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकालिकलुषविध्वंसनें उत्तरकांडे **भक्तिचिन्तामणिवर्णनं** नाम त्रयस्त्रिंशतितमस्तरङ्गः ।।

तरंग ३४ वा

सप्रेम बोलत पुन्हा खगनाथ ऐसें । " माझेवरी जर कृपा तुमची विशेषें ।
जाणोनिया मज विभो! निजदास एक। हे प्रश्न सप्त मम, त्यां विवरा जि! नीक।।
सांगा विभो ! प्रथम हेंचि तुम्ही सुजाण । सर्वांत दुर्लभ तनू जगतांत कोण ?।।
अत्यंत दुःख जगिं, सौख्यहि कोणतें तें?। संक्षेपिं उत्तम कथा सुविचार मातें ।।
जाणीतसां सकल संत-असंत-मर्म । त्यांचा स्वभाव कथणें मज साधुकाम ।।
तें पुण्य कोण कथिलें श्रुतिनीं विशाल?। तैसेंचि थोर अघ कोण वदा कृपाल।।
सांगा जि ! नीट मज मानसरोग कोण ?।सर्वज्ञ तुम्हि अधिकारि कृपानिधान"।।
"बा! ऐक सादर मनें अति आवडीनें । संक्षेपिं तत्त्व कथितों पुसल्याप्रमाणें ।।४।।

नाहींच मानवतनूत्तम कोणतीही । इच्छीत जीव सचराचर सर्वदा ही ॥
ही स्वर्ग-मोक्ष-नरकांस शिडीच मान । दे ज्ञान भक्ति विरती सुख मेळवून ॥
ऐशी तनू मिळुनि ना भजती हरीसी । होतात जे विषयमग्न कुबुद्धिराशि ॥
हातून फेकुनि दुरीं परिसास साच । मंदांत मंदमति ते उचलीति कांच ! ॥६॥
दारिद्र्यतुल्य नच दुःख जगांत अन्य । ना साधुसंगतिसमानहि सौख्य धन्य ॥
वाक्कायमानसिं परोपकृती करीती । स्वाभाविकीच अशि सज्जनसाधुरीति ॥
अन्यार्थ दुःख सहती जगतांत संत । ते अन्यदुःखद असंत अभाग्यवंत ॥
होती कृपाल जणुं भूर्जतरूच संत । अन्योपकारिं विपदा महती सहात ॥८॥
तागासमान खरु ते परबंधनार्थ । काढून साल, निज हाल, मृतीहि घेत ! ॥
स्वार्थाविनाहि करिती खल अन्यहानि। जे सर्प-मूषकपरीं, गरुडा! कसोनी ॥९॥
नाशीति आत्महतिनें परसंपदेतें । सस्यास नाशुनिच गार लयास जाते ! ॥
दुष्टोदय प्रकट हो जगदार्तिहेतु । जैसा प्रसिद्ध अधम ग्रह होत केतु ! ॥१०॥
ते संत संतत जगत्सुखहेतु येती । विश्वास सौख्यद जशा शशि-सूर्य-मूर्ति ! ॥
तो श्रेष्ठधर्म निगमस्तुत हो अहिंसा । निन्देसमान नच पापगिरीहि तैसा ॥११॥
घे जन्म विष्णुगुरुनिन्दक बेडकाचे । ऐसे सहस्रमित योनिंत त्याच साचें ॥
जातात ते नरकिं निंदक जे द्विजांसी । घेतात जन्म मग वायसदेहवासी ॥१२॥
जे मत्त निंदिति जगीं श्रुतिंना सुरांना । ते प्राणि रौरविं सहातिच आर्ति नाना ॥
संतांसि निंदिति, उलूकजनूसि घेती। ज्ञानार्कि त्यां अरुचि आवडि मोहरातीं ! ॥
जे मंद निंदितिच कीं सकलां जनांला । त्यांना जगांत वटवाघुळजन्म आला ! ॥
आतां विभो ! कथिन मानसरोग ऐक। दुःखार्त होति जगिं ज्यास्तव सर्व लोक ॥
व्याधींस सर्व जगतीतलिं मोह मूळ । ज्यानें अनंतपरिं उद्भवतोच शूल ! ॥
हो काम वात, कफ, लोभ अपार दाटे। हो क्रोधपित्त, उर ज्यांत जळेचि वाटे ॥
प्रीती करीति जर का गरुडा ! तिनीही। तो सन्निपात म्हणणें अति दुःखदायी! ॥
जे कामनाविषय दुर्धर तेच नाना । आहेत शूल कळणेंहि न नाम कोणां ॥१६॥

ममत्व वाटे गजकर्ण मोठें । ईर्ष्या गमे कंडुच अंगिं दाटे ! ॥
जीं हर्ष-दुःखें उपदंशसीं तीं । न अन्यसौख्यें सहणें क्षयार्ति ॥१७॥
दुष्टत्व चित्तांतिल शाठ्य कुष्ठ । अहंकृती हाच डबा अनिष्ट ॥
जे दंभ गर्वोन्मदमान नारू । तृष्णा अती ती उदरार्ति मारू! ॥१८॥

ज्या एषणा तीन गमे तिजारें । अतितीक्ष्ण तापद्वय त्या प्रकारें ॥
होतीच कीं मत्सर दुर्विवेक । कुरोग सांगूं तरि का अनेक ? ॥१९॥
हो एकरोगींहि समर्थ नरा वधाया । व्याधी असाध्य बहु हे, बघ पक्षिराया ! ॥
जीवास पीडित सदोदित, तेथ कैचें ? । लाभेल आत्मसुख त्या क्षणही कशाचें ? ॥

त्यां नेम धर्म तप वा आचार ज्ञान यज्ञ जप दान ॥
भेषज-कोटि असोनिहि रोग न हटतीच कांहिंही मान ! ॥२१॥

ऐशापरीं सकलही जडजीव रोगी । प्रीति-प्रहर्ष-भय-शोक-वियोगभागी ॥
म्यां गाइलें न बहु मानसरोग येथें । सर्वांतरीं वसति त्या विरलाच वेत्ते २२
होतां उपाय लव ते जरि जाति मागें । ना होति नष्ट परितापद होति संगें ॥
होतां कुपथ्य, विषयोद्भव अंकुरोनी । व्यापीति सन्मुनिसिही, नर कोण मानी ?
रामप्रसाद निवटी सकलांहि रोगां । संयोग येइ जुळुनी जर यापरीं गा ! ॥
हो सद्गुरुप्रथम उत्तम वैद्यराय । विश्वास तद्वचनिं हो हृदिं अद्वितीय २४
आसक्ति सर्वविषयीं झणिं संयमावी । संजीवनीमुळि रघूत्तमभक्ति ध्यावी ॥
श्रद्धावती शुभमती अनुपान पूर्ण । यावा असा अमृतयोग सदा जुळून २५
होईल सर्वहि कुरोगविनाश येणें । ना यत्नकोटिहि दुज्या उपयोगिं येणें ! ॥
जाणा तदाच निजमानस रोगमुक्त । जेव्हां विरक्तिबल हो हृदिं बुद्धिमंत २६
सद्बुद्धि भूक नित होइल वाढणारी । दौर्बल्य जाइल रती विषयानुसारी ॥
सुज्ञानशुद्धजलिं जैं मन नाहणार । श्रीरामभक्ति हृदयांबुजिं राहणार ! ॥२७॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे मानसरोगवर्णनं नाम चतुस्त्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग ३५ वा

ब्रम्हा महेश सनकादिक सन्मुनींनीं । ब्रह्मज्ञ नारद शुकादि विचारदांनीं ॥
सर्वांहिं सार कथिलें खगनाथ ! हें हो । श्रीरामपादकमलीं रति नित्य राहो ! ॥१॥

ग्रंथ वेदपुराणादि सर्वही हेंचि सांगती ॥
श्रीरामभक्तिवांचोनी न कोठें सौख्यसंगति ! ॥२॥

वाढेल केसहि कधींतरि कूर्मपृष्ठीं । वंध्यासुताकरविं हो हत कोणि काष्ठीं ॥
आकाशही सृजिल पुष्पवितान नाना । ना सौख्यलाभ कधिंही हरिवैरियांना !
तृष्णा शमो जल पितां मृगतृष्णिकेचें । वाढोहि शृंग कधिं वा शशशीर्षिं साचें !
ग्रासील कीं तिमिर वा कधि तें शशांका । ना रामचंद्रविमुखा सुखलेश–रेखा

तैसा होईल अग्नीही निर्मियेला हिमें कधीं ।
कोणाही रामविमुखा न सुखाप्ति जगामधीं ॥५॥

होईल वारिमथनें घृतही कधीं तें । लाभेल तैल सिकतांमधुनीहि येथें ॥
ना रामभक्तिविण हा भव होय तीर्ण । सिद्धान्त हा निरपवाद असाच जाण ! ॥

मशका विधिता दे प्रभु मशकाहुनि हीन वा करि विधात्या ॥
ऐशाविचारिं संशय टाकुनि बुध भजति राघवपदा त्या ॥७॥

माझें तरी निश्चित जाण हें मत । खोटें न माझें कधिं होय भाषित ॥
जे भक्तिनें श्रीहरितेंचि सेविती । ते दुस्तरातें तरतीच सन्मति ॥ ८ ॥
म्यां वर्णिलें निरुपमा चरिता हरीच्या । संक्षेपविस्तर यथामति गोड वाचा ॥
सिद्धान्त हा श्रुतिमतीं खगराय! ऐक । सार्‍यांसि विस्मरुनि रामचि सेव एक !
जे राम मत्समशठीं ममता करीती । त्यांतें त्यजूनि भजणें कवणां सुरीतीं ? ॥
विज्ञानरूप विभु तूं तुज मोह नोहे । केली कृपा मज अती गरुडा ! तुवां हे
श्रीरामसुंदरकथा पुसलीस मातें । जी पुण्यपावन अतीवचि उत्तमा ते ॥
जी आवडे शिवविरिंचिशुकादिकांना । ब्रह्मर्षिनारदमना सनकादिसुज्ञां ॥
संसारिं दुर्लभचि केवळ साधुसंग । एकाहि वेळें, घडिही, पळही अभंग ! ॥
हें तूं पहा ! गरुड ! चित्तिं विचारुनीयां । मी रामरायभजना अधिकारि कीं या ?
मी हा अपावन खगाधम सर्वरीतीं । त्या तो मला प्रभु करी जगिं पुण्यकीर्ति !
मी आज धन्य ! अति धन्य ! जरीहि हीन । सत्संग राम मज दे अपुला म्हणून
नाथा! यथामति कथा कथिली तुला ही । ना ठेविलेंचि हृदिं राखुनि गुप्त कांहीं
श्रीरामचंद्रचरितामृतसागराचा । लागेल काय कवणा तरि ठाव साचा? १४
श्रीरामसद्गुणगणां विविधां स्मरून । तो हो प्रहृष्ट बहुवार भुशुंडि सुज्ञ ॥
ज्याचें प्रभुत्व बल निस्तुल सत्प्रताप।ज्या 'नेति' वेद म्हणती महिमा अमूप !
तो राम, शंभु-विधि पूजिति यत्पदांला।माझ्यावरी मृदुलचित्त कृपालु झाला !
म्यां देखिलाहि न कुठें असला स्वभाव।ना ऐकिलाहि कधिं यापरिं अन्य ठाव !

कोणासवें रघुपती मग तो तुलावा ? । श्रीरामरायसम कोण बरें मिळावा ? ॥
जे सिद्धसाधक विमुक्त तसे उदासी।संन्यासि पंडित कृतज्ञ कवी महर्षि ॥१७॥
ज्ञानी तपी समरशूर सुधर्मि योगी। विज्ञानि सर्व जगतीतलिंचे सुभागी ॥
माझ्या प्रभूसि भजल्याविण तीर्ण कोण?।मी रामरायपर्दि लीन, नमीं, नमीन!
जातां जया शरण मत्सम पापराशि । होती विशुद्ध नमिं मी प्रभु तो अनाशी ॥
[कारुण्यसागर मनोहर रामराय ! । भक्तांसि तारक सदैव तुझेच पाय] ॥१९॥

यन्नामरूपी भवभेषजानें । क्षणींच तापत्रयशूल जाणें ॥
सदानुकूल प्रभु तो कृपाळू । मला स्वभक्ता तुजलाहि पाळू ! " ॥२०॥

ऐकोनियां उक्ति भुशुंडिची ती । पुण्या रघूत्तर्सि बघोनि भक्ति ॥
सप्रेम बोले खगनाथ वाणी । संदेह जातां सगळे निघोनी ॥ २१ ॥
" झालों कृतार्थ तव ही परिसोनि वाणी । श्रीरामचंद्रपदभक्तिरसैकखाणी ॥
भक्ती नवीन मम जाहलि रामपायीं । मायोद्भवा सकल आर्ति मदीय जाई !
झालास तूं मजसि मोहजलाब्धिनौका।नाथा ! दिल्यास सुखराशि मला अनेका
व्हावें तुझें गुरुवरा ! उतराइ कैसें । त्वत्पाद मी नमितसें बहुवार शीर्षें ! २३
तूं पूर्णकाम विभुसत्तम रामभक्त । कोणीच ना तुजसमान सुभाग्यवंत ॥
ते संत वृक्ष सरिता गिरि तेविं भूमी । सर्वोपकारकरणी सगळ्यांत नामी ! ॥
आहेत साधु हृदयें नवनीतऐशीं । ऐसें कवी वदति तें नकळे तयांसी ! ॥
तापें द्रवे अपुलिया नवनीत सत्य । अन्यार्ति त्या द्रवविते सुजनासि नित्य !
साफल्य लाभे मम जन्मजीवना । तुझ्या कृपें संशयही नुरे मना ॥
तूं मान मातें निजदास सर्वदा " । खगेश सांगे कितिदा नमी पदां ! २६
ऐसा सुधीरमति पक्षिपती विनीत । वंदी भुशुंडिचरणीं गिरिजे ! पुनीत ॥
वैकुंठि जाय निघुनी निजपुण्यधामा । राखोनि आत्महृदयीं प्रभुवर्य रामा ॥
सत्संगसा न दुसरा जगतांत लाभ । तो लाभतो जर कृपा करि कंजनाभ ॥
गातात हें जगतिं वेदपुराणराशि । हें सत्य ठेविं गिरिजे ! निज अंतराशीं ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकाण्डे सर्वोपरिभक्तिवर्णनं नाम पंचत्रिंशतितमस्तरङ्गः ॥

तरंग ३६ वा

सांगीतली तुजसि गौरि ! कथा पुनीता।जी ऐकतांच रिघतो भवपाश अन्ता॥
श्रीराम जो प्रणतकामदवृक्ष साच। त्याच्या पदांबुजिं रती अति वाढतेच॥
जे हे कथा परिसती श्रवणें सुचित्तें। वाक्कायचित्तज अघें नुरतींच त्यांतें॥
तीर्थाटनें सकल साधनराशि योग। वैराग्य बोधनिपुणत्व सुधर्मसंग॥ २॥
नानाव्रतें सुकृति संयम यज्ञसेवा। भूतीं दया जपतपोदम वेदठेवा॥
विप्रादिपूजन विवेक तशा स्तुतीही। सांगीतलीं श्रुतिमुखीं शुभसाधनें हीं ३
सर्वांस एकचि असे फल उक्त गौरि!। कीं साधणें हितकरी हरिभक्ति सारी॥
ती रामभक्ति, कथिती श्रुति विश्ववंद्या। रामप्रसादिं कवणा तरि होय साध्या॥
ती श्रेष्ठ भक्ति हरिची अतिदुर्लभाही। संपादिती नर सलील विनाश्रमांहीं॥
जे ही कथा परम पावन ऐकतील। विश्वासयुक्त हृदयें अति साधुशील॥५॥
सर्वज्ञ तोच जगतांत गुणज्ञ धन्य। तो भूमिमंडन सुपंडित तो वदान्य॥
तो धर्मशीलहि कुलोद्धृतिकारि तोच।ज्याचे मनीं रघुपदांबुजिं भक्ति साच!
नीतिज्ञ तोच चतुराग्रणिही तसाच। वेदान्तविज्ञ अति उत्तम होय तोच॥
तो सुज्ञ पंडित कवी रणधीर तोच। जो राघवा भजत निष्कपटें सदाच!॥७॥
तो धन्य देश अतिपावन जेथ गंगा। नारी सुधन्य अशि जी पतिचित्तसंगा॥
तो भूप धन्य परिपाळित जो सुनीति। तो विप्र धन्य नच जो च्युत धर्मरीतीं॥
तें द्रव्य धन्य, गति ज्याप्रति धर्मदानीं। ती शुद्धबुद्धि रत जी अतिपुण्यमानीं॥
ती धन्य होय घडि जीमधिं साधुसंग। तो धन्य जन्म भजणें द्विज जैं अभंग॥

तें कुल धन्य उमे गे ! सर्वजगद्वंद्य पुण्यतमकीर्ति॥
श्रीरघुवीरपरायण उपजे जेथें सुभक्त नरमूर्ति !॥ १०॥

वर्णीयली तुज यथामति सत्कथा मीं। होती जरी प्रथम गुप्तचि चित्तधामीं॥
प्रीती तुझी बघुनि थोर मनामधील। सांगें रघूत्तमकथा तुज पुण्यशील॥११॥
सांगों नये कधिं शठाप्रति हट्टशीला। जो नायके सुहृदयें हरिच्या कथेला॥
सांगों नये कुपित-लुब्ध-सकाम-चित्ता। जो ना भजेचि सचराचरविश्वनाथा॥
द्वेष्टा द्विजां नच अशाप्रति ही वदावी। हो इंद्रतुल्यहि जरी नृप त्या न दावीं॥
तें होत राघवकथे अधिकारि गौरि!। सत्संगती हृदयिं ज्यां प्रिय होय भारी!॥

ज्यांची रती गुरुपदीं, प्रिय ज्यास नीति । जे विप्रसेवक, हिला अधिकारि होती॥
त्यांना अतीवचि कथा सुखदायिनी हे । ज्यां प्राणतुल्यचि मनीं प्रिय राम आहे॥

रामपदाब्जप्रीती ज्यास हवी मोक्षपदहि.हो ज्यास ॥
त्यानें भावें प्यावें श्रवणपुटाहीं हिच्याच सुरसास ॥ १५ ॥

म्यां गौरि! राघवकथा तुज वर्णियेली । जी नाशिते कलिमनोमल पुण्यशाली ॥
संजीवनी जणुं मुळी भवरोगनाशी। गाती कवि श्रुति रघूत्तमकीर्ति ऐशी ॥१६॥
सोपान सप्त अति दिव्यरुची हिच्यांत । जे रामभक्ति सुगतिप्रति होति पंथ ॥
ज्यांच्यावरी हरिकृपा परमोच्च होय । या मार्गि ठेवितिल सज्जन तेच पाय! ॥१७॥
हृत्कामना सकलसिद्धि तयास लाभे । गाई कथा सुरस ही नर जो अदंभें ॥
जे वाचिती परिसती अनुमोदितीही । ते गोष्पदासम भवा तरतात पाहीं" ॥
ऐकोनि ती शुभकथा हृदिं तुष्ट भारी। बोले मनोहर गिरा गिरिजाकुमारी ॥
"नाथप्रसादिं मम सशय सर्व गेला। प्रेमा रघूत्तमपदीं नव निर्मियेला !॥१९॥
झालें कृतार्थ अजि मी तुमच्या प्रसादें । विश्वेश्वरा! मन भरें अमित प्रमोदें॥
चित्तीं दृढा उपनली मम रामभक्ति। गेली समग्र विलयाप्रति दुःखपंक्ति!" ॥
संवाद हा शुभद शंकरपार्वतींचा । सौख्यें समर्पि उरवील विषाद कैंचा! ॥
संसारभंजन करी जनरंजनासी । संदेह गंजन करी, प्रिय सज्जनासी ॥२१॥
जे रामभक्त जगतीतलिं होत त्यातें । नाहींच यासम दुजें प्रिय काहिंही तें !॥
म्या गाइलं प्रभुकुरे चरिता पवित्रा। रामायणा रसिकभक्तमनोज्ञचित्रा ॥२२॥
नाहींच साधन दुजे कलिकालिं ऐशा । योगार्चन-व्रत-तपोजप-पूजनाशा ॥
राम स्मरून नित रामयशासि गावे । श्रीरामसद्गुणगणां श्रुतिपात्रिं प्यावें! ॥
ज्याचा असे पतितपावन थोर बाणा । जो गेय सज्जन-कवि-श्रुतिंना पुराणां ॥
त्यालाच रे! भज मना! कपट त्यजूनी । कोणास सद्गति चुके प्रभुला भजोनी?॥

कोण न मिळवी गति रे भजुनी पतितोद्धरणा श्रीरामा ।
व्याध-गृध्र-गज गणिकाजामिल खलगण तारिशि रघूत्तमा ! ॥
यवन किरात श्वपच खसादिक अति अघकर्ते, तव नामा ।
एकवारही घेउनि, पावन होती त्या तुज नमुं रामा! ॥ २५ ॥
जो नर वाची ऐके गाई रघुकुलभूषणचरिता या ।
कलिमलहृन्मल जाउनि अभ्रमिं जाई रामाच्या निलया ॥

पंचशतावधि चौपायांतें जाणुनि सुंदर चरित करीं ।
त्यास अविद्यापंचक दारुण विकृती नुरविल राम हरी ॥ २६ ॥

सुजाण सुंदर कृपाब्धि करि जो प्रीती दीनावरि अमित ।
अकाम देई मोक्षसुखा प्रभु रामासम त्या कुणि नसत ॥
कृपालेश लव लाभुनि ज्याचा, मंदहि तुलसीदास अहो !
परमशांतितें पावे, प्रभु त्या रामासम हो ! कुठे न हो ! ॥ २७ ॥

न दीन माझ्यासम रामराया ! । तुम्हां असा दीनदयाळही न
रघूत्तमा ! जाणुनि हें हरावी । संसारिंची दारुण भीति पूर्ण ! ॥

कामी नरातें प्रिय जेविं नारी । लोभ्यास जैसा प्रिय होय दाम
तैसाच तूंही प्रिय हो मला बा ! । निरंतर प्राणसमान राम ! २९

पूर्वी जें सत्कवि श्रीशिव मनिं विरची राघवाचें चरित्र ।
श्रीसीताराम–पादांबुजरति मिळण्या दुर्लभ प्रीतिमंत्र ॥
जाणोनी रामकीर्ती विपुल तथिं, तिथें नाशण्या हृत्तमास ।
भाषेमध्यें करी तो रसमय तुलसीदास या 'मानसा'स ॥३०॥

जें कीं पावन पापहारि शुभ दे विज्ञान–भक्तींसि दे ।
माया–मोह–मलासि नाशि अमल प्रेमार्द्र ऐसें मुदें ॥
श्रीमद्रामचरित्रमानसिं अशा जे भक्तिनें डुंबती ।
ते या संसृति–सूर्य–घोर–किरणीं ना तापती सन्मति ! ॥३१॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे सकलकलिकलुषविध्वंसने उत्तरकांडे योगवैराग्यज्ञान–परमतत्त्व–भक्तिनिरूपण–सर्वशास्त्रसिद्धान्तवर्णनं नाम षट्त्रिंशतितमस्तरङ्गः ॥

ऐसें या मानसाचें अविरत घडलें स्नान माझ्या मनाला ।
तेणें हृत्तीव्रताप प्रशमुनि अमितानन्द चित्तास झाला ॥
श्रीसीतारामचंद्र प्रभु मजकरवीं ही रची श्लोकमाला ! ।
तीच्या सद्गंधमोदें रघुवरकृपया 'राम' हा धन्य झाला ! ॥३२॥

श्रीरामा सत्सुखारामा ! माझिया 'मानसां'त ये ॥
रामनामीं बहु प्रेमा मानसीं वाढुं दे तयें ! ॥२३॥

सीतारामपदांभोजीं 'राम' 'सुश्लोकमानस' ॥
अर्पी प्रेमाश्रुपूरानें सगद्गदितमानस ॥२४॥

नमितों भक्तिभावानें भवानी-कमलेश्वरां ॥
त्यांनीं मन्मानसाचा हा हेतु केला भला पुरा ! ! ॥२५॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सुश्लोकमानसे महाकाव्ये सकलकलि-कलुषविध्वंसने 'अविरलहरिभक्तिसंपादनो'नाम सप्तमः सोपानः ॥

॥ इति श्रीसुश्लोकमानसे उत्तरकांडः

श्रीसीतारामचंद्रकृपया समाप्तः ॥

॥ श्रीसुश्लोकमानसं संपूर्णम् ॥

॥ शुभं भवतु ॥

— ॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥ —

श्रीतुलसीदासांची आरति

जयदेव जयदेव जय तुलसीदासा । श्रीतुलसीदासा ।
वंदन करितां देसी हृदयीं उल्लासा ।। जयदेव जयदेव ।।

अतिशय मंजुलशब्दीं रसमय रामकथा ।
मधुरा रचिलिस साधो ! अतुलितभक्तियुता ।।
जीतें गातां प्रेमें अगणित सुख चित्ता ।
होई राघवरायीं अति रति सद्भक्ता ।।१।। जयदेव०

'रामकथा–मानस' तव मानस हृष्ट करी ।
राघवचरितामृतिं या मन्मन हो लहरी ! ।।
भवतापें भीताला आश्रय याच सरीं ।
रघुवरभक्तिप्राप्तिस वाट नसे दुसरी ! ।।२।। जयदेव०

गातां गाता 'मानस' मानसिं सौख्य भरे ।
भक्तीचे लोटति हृदिं संतत रम्य झरे ! ।।
श्रीशिवगौरीकृपया चिंता सर्व हरे ।
सीतारामपदांबुजिं 'राम' सदा विहरे ! ।।३।।

जयदेव जयदेव जय तुलसीदासा । श्रीतुलसीदासा ।
वंदन करतां देसी हृदयीं उल्लासा ।। जयदेव जयदेव ।।

—: श्रीरस्तु :—

महत्त्वाचें शुद्धिपत्र.

पृष्ठ	श्लोक	चरण	शुद्ध
(११)	ओळ ६		मानसा'च्या दिशेनें
(३१)	ओळ १५		इष्टान् देशान् विचर जलद
७	२४	३	रार्त्री न अमि मृदुले! मिळणार चैन"
९	२७	४	आशीर्वचें तव ०
१०	१	२	० राक्षसगणां ०
११	२२	३	वालीसर्वेहि ०
१५	१३	२	० शेषहि शक्त हो की!"
१६	२०	४	आणणें तें "
१६	२२	४	आणणेंचि "
१७	३५	उत्तरार्ध	तों राम...सुकंठा। 'व्हावें ०
१७	३६	२	० प्रवीर'
२४	१९	१	बोले "चराचरविभो रघुराय! ऐका।
२८	३	४	० कार्मुकिं उग्रभाव
३२	२२	१	० भजेल त्याप्रति।
३४	११	२	० शरण वाघहि ०
३४	२१	१	० नाथ! कैशी।
३६	५	२	० राहि बैसुन
४९	२४	१	० तसाच भेद।
४९	२५	२	० जो जायचा
६३	१०		व्या श्लोकानंतर पुढील श्लोक वाचणें

स्वर्गीचे चिरडी रागें कपींच्या कोटि कोटिही।
मिळवी धूळिंतें कोटी कपींना पाडुनी मही ॥ १० अ ॥

६९	४	४	चितहि वाजति.

पृष्ठ	श्लोक	चरण	शुद्ध
७०	७	२	० जयां विरोध ॥
८५	३०	१	० वर्णन तुलसिदास हा मंदमति ।
८५	३०	२	० मार्ने बघत उडाया गगनपथीं ! ॥
९२	३२	२	ध्यावोतहि जे ०
१००	१४	४	० त्या बुडतया ०
१०९	८	३	ऽम्बुजभृंगसाच ।
११२	३३	१	थोडे तरी ०
११३	४	३	ज्ञानी गुणज्ञ०
११६	१३	२	द्विजसाधु ०
११६	१७	१	सौख्यराशि ।
११७	३०	२	रमानिवास ०
११९ तरंग१०	४	४	ज्ञानाग्निनिर्मितिसि
१३२	१०	२	० खगवृंद ०
१४६	श्लोकांक ७३ ते ९५ हे ७२ ते ९४ समजावेत.		
१४८	८	२	घरिं ऐवजीं हृदिं वाचावें
१५१	११	३	श्रीरामचंद्रचरितोत्तममानसाची ।
१५२			१६ श्लोकांक १५ समजावा.
१५८			तरंग २२ अंक २७ समजावा.
१६०	२१	१	० गुरु बोललेही ।
१६१	४१	२	० निघानें ! ”
१६२	५	४	सांगून संगुन ०
१६७	९	३	० क्रांतिप्रतापागळा ।
१७१	८	२	० सौख्यखाणी !
१७४	१४	४	० ठाव साचा ! ! ”
१७४	१५	३	“ ज्याचें प्रभुत्व

डॉ. रा. चिं. श्रीखंडेकृत ग्रंथ

★ वाङ्मय-श्री--खण्ड	[श्रीखंडे बंधुभगिनी व कवि कात्रेशास्त्री यांची सुरस रचना गद्य व पद्य; संस्कृत कवितांसह]	किं. ६ रु.
★ सुश्लोक–गोविंद	गीतगोविंदाचा सुरस श्लोकानुवाद सचित्र. विवेचक प्रस्तावना व मूळ गीतगोविंद यांसह. [२री आवृत्ति]	४ रु.
★ सुश्लोक–कुमार	'कुमारसंभव' महाकाव्याचा सुरस श्लोकानुवाद सचित्र. विवेचक प्रस्तावना व मूळ कुमारसंभव यांसह	४ रु.
★ कुंदमाला	दिङ्नागकृत संस्कृत कुंदमाला नाटकाचें मराठी भाषांतर. कै. रड्डीशास्त्री व डॉ. रा. चिं. श्रीखंडेकृत	१। रु.
★ सुश्लोक–मेघ	सुरस श्लोकमय मेघदूतानुवाद मूळ मेघदूत व विस्तृत विवेचक प्रस्तावना यांसह	४ रु.
★ सुश्लोक--मानस भाग १ ला	श्रीतुलसीरामायणाचा सुरस मराठी प्रसन्न रचनेचा श्लोकानुवाद, बाल-कांड. सचित्र	५ रु.
भाग २ रा	अयोध्या, अरण्य व किष्किंधाकांड सचित्र	५ रु.
भाग ३ रा	सुंदर, लंका व उत्तरकांड सचित्र (आगामी)	

पुस्तकें मिळण्याचा पत्ता :—डॉ. रा. चिं. श्रीखंडे,
एम्. बी. बी. एस्.
श्रीतुलसीमंजरी, बेलबाग, कोल्हापूर.